मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।
ISSN 0973-8452


मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

भारतीय

जानेवारी-मा

प र्य ट वि षां क



लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक **अर्थसंवाद**

जानेवारी-मार्च २०१७ / खंड ४० अंक ४

International Research Journal

ISSN 0973-8452

Reg. No. 31918/77

मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

www.marthpari.org

**प्रमुख संपादक**

**अविनाश रामलाल निकम**

**सहाय्यक संपादक**

शंकर सुदामराव पवार

**सल्लागार मंडळ**

(२०१५-१८)

तेजस्विनी मुडेकर

अरूण पिसे

राजेंद्र गव्हाळे

विजय भोपाळे

**संपादकीय पत्रव्यवहार**

**डॉ.अविनाश निकम**

मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,

परिमल कॉलनी,

यशवंत क्लासेसच्या मागे,

शहादा-४२५४०९

जिल्हा नंदुरबार.

मोबा: ९८२२६६५१४१

**लेखातील मते लेखकांचीच**

**अनुक्रमणिका**

अविनाश निकम, शहादा
संपादकीय संवाद : संपादक पदाच्या कार्यपूर्ती निमित्तानं......३२३
चारुदत्त गोखले,जळगाव : गोविंद तळवलकरांना श्रध्दांजली..३२५
शिवाजी भोसले,सातारा:
महाराष्ट्रातील जलसिंचन : एक चिंतन........................३२७
विरेंद्र वडेर, कोल्हापूर: ई पर्यटन.............................३४१
सोमनाथ पाटील, तळेगाव ढमढेरे
महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय: संधी व भवितव्य.............३४७
शशिकांत आंडगे, मोहोळ
पर्यावरणीय पर्यटनाचा अर्थकारणावरील परिणाम.............३५१
बबन भापकर,वालचंदनगर,मुलाणी महंमद रफीक,बारामती,
कृषी पर्यटनाचा इतिहास व विकास.............................३५७
दिलीप महाजन,चिखली, राजेंद्र गव्हाळे,खामगाव
वाढत्या पर्यटनक्षेत्रात रोजगार संधी..........................३६१
तानाजी गिते, राजगुरूनगर
पर्यटन विकासासाठी भारताचे धोरण: एक आढावा...........३६६
रामलिंग नाळे,सरुड :
कोल्हापूर जिल्हा: आर्थिक पर्यटनाची पंढरी...................३७१
मनिषा चौधरी,शिरपूर
पर्यटनाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम............................३७७
अरूण तवार,परभणी:
कृषि पर्यटन: ग्रामीण जीवनाचा आधार.......................३८१
सुभाष भालेराव, शहादा:पर्यटन आणि रोजगार निर्मिती.......३८७
रमजान मुजावर,पेण: पर्यटनक्षेत्र व भारतीय अर्थव्यवस्था....३९१
शिवाजी पाते,परभणी: कृषीपर्यटनातून ग्रामीण विकास......३९६
सुरेश जगताप, अमरावती: कृषी पर्यटन-काळाची गरज......४०१
जयश्री उपाध्ये, पुणे: ग्रंथ परीक्षण-स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र...४०७
पांडुरंग कल्याणकर,फुलंब्री:
विदेशी पर्यटकांची राज्यनिहाय स्थिती.......................४११
सूत्रसंचालकांचा अहवाल, ४०वे अधिवेशन
ज.फा.पाटील, अनिल सत्रे......................................४१७
जयवंत भदाणे, सुभाष पाटील..................................४१९
तेजस्विनी मुडेकर, शकुंतला पाटील..........................४२१
निबंधलेखकांसाठी विषयाची रूपरेषा,४१वे अधिवेशन
विनायक देशपांडे, नागपूर.......................................४२३
संजय तुपे, नाशिक...............................................४२५
मधुकर शिंदे, इस्लामपूर.........................................४२७
कार्यवाहांचा अहवाल- रामदास भांडवलकर...................४३०
प्रमुख संपादकांचा अहवाल-अविनाश निकम...................४३७

## मराठी अर्थशास्त्र परिषद

**कार्यकारी मंडळ २०१६-१७**

**अध्यक्ष**

शिवाजी मुरलीधर भोसले (सातारा)

**कार्याध्यक्ष**

चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)

**कार्यवाह खजिनदार**

रामदास बापुराव भांडवलकर (यवतमाळ)

**प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

अविनाश रामलाल निकम (शहादा)

**विश्वस्त**

अर्जुन महाडिक (कोल्हापूर)
विनायक भिसे (औरंगाबाद)
बालाजी शिंदे (परभणी)

**सदस्य**

सुभाष गुर्जर (वरवट-बकाल)
अशोक खाचणे (जळगाव)
राजेंद्र शिंदे (धुळे)
महादेव पाटील (मिरज)
हनुमंत नरवरे (अकलुज)
संजय धनवटे (कारंजा)
पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री)
तुकाराम मुंडे (मानवत)
दिनकर मोरे (इस्लामपूर)
जीवन सोळंके (नाशिक)
वामन सावंत (रत्नागिरी)
राहूल म्होपरे (कोल्हापूर)
सुरेश ढाके (भुसावळ)
सुरेश पाटील (चांदवड)



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: रामदास भांडवलकर
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगावरोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६

**अर्थसंवाद वर्गणी:**

- परिषदेचे सदस्य:
  आजीव सदस्य: रु.३०००/- (एकरकमी)
- संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:
  शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)
- वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

१) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
टिप: म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

अक्षर रचना- सुनिल मुरलीधर भांडारकर, शहादा.
मुद्रणालय- सातपुडा ऑफसेट, जळगाव.

# संपादकीय संवाद...संपादक पदाच्या कार्यपूर्ती निमित्तानं....

मला मोकळेपणानं वाचकांशी अर्थसंवादविषयी चर्चा करायची आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेनं एकमतानं गेल्या सहा वर्षांपूर्वी 'अर्थसंवाद'च्या संपादकपदी नियुक्ती केली. या संपादनाची कार्यपूर्ती करताना मला विशेष आनंद होतोय. मराठीतून अर्थविषयक दर्जेदार शोधनिबंध प्रकाशित व्हावेत या उद्देशानं सुरू झालेल्या, तज्ज्ञ अभ्यासक संपादकांनी समर्थपणानं चालवलेल्या अर्थसंवादचे संपादन करण्याची संधी प्राप्त होणं हा माझ्यासाठी सुखद भाग्याचा योग होता. अर्थशास्त्राच्या विविध विषयांत शोधनिबंध मिळवणं, ते शास्त्रीय भाषेत संपादन करणं, संदर्भ पहाणं, विविध विषयांवर विशेषांक काढणं हे सगळं करताना नवीन लेखक, नवीन वाचक यांना अर्थसंवादशी जोडणं हे माझ्यासाठी मोठं आव्हानच होतं. 'अर्थसंवाद'ला त्याचा स्वतःचा एक बाज आहे. तो बाज सांभाळून मुद्रणक्षेत्रातील तंत्रज्ञानात्मक बदलांचा स्वीकार करून अंक आणणं, अंकातील प्रत्येक पृष्ठ सुबक करून वाचकांना वाचनात सहजता यावी यासाठी बदल करणं, मुखपृष्ठाला आकर्षक रुपात मांडणं ही काळाची गरज होती. काळानुसार न चालणं म्हणजे मागं पडणच होय. विविध ग्रंथालयात रॅकवर अनेक नियतकालिकांच्या रांगेत अर्थसंवाद केव्हाच पोहोचलाय्. अशा वेळी वाचकांचं लक्ष अर्थसंवादकडे वेधलं जावं यासाठी मुखपृष्ठात काळानुसार बदल आणणं, स्पर्धेच्या युगात दर्जा राखणं हेही एक आव्हानच होतं. अर्थसंवादसाठी उत्कृष्ट कागद वापरणं, पीनलेस बाईंडींग, कव्हर लॅमिनेशन, नवीन पध्दतीचं पाकीट आणणं, रंगीत पृष्ठांचा यथायोग्य समावेश करणं त्याचबरोबर अर्थसंवादच्या बजेटची बाजू सांभाळणं हेदेखील एक आव्हानच होतं. मी सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी परिसरात राहतो. इथं प्रिंटींगच्या दर्जेदार सुविधा नाहीत त्यासाठी मला एका बाजूनं २०० किमीवर जळगाव येथील प्रेस निवडावी लागली. प्रत्येक अंकासाठी धावपळ करणं हेही आव्हानच होतं. अर्थसंवादात लिहिण्यासाठी केवळ अर्थविषयक संशोधनाची, ते प्रभावीपणानं मांडण्याची गुणवत्ता लागते हा विचार मला लेखकांमध्ये रुजवायचा होता, त्यांना हक्काचं व्यासपीठ द्यायचं होतं यामध्ये चांगल्यापैकी यश देखील आलं. त्यासाठी एका खंडात एका लेखकाचा केवळ एकच लेख प्रकाशित करणार हा निर्णय घेतला. गेली सहा वर्षेखंबीरपणानं या निर्णयाशी बांधील राहिलो. त्यामुळे नवनवीन लेखक अर्थसंवादसाठी लिहिते झाले. आर्थिक लेखन करणारी एक नवीन पिढी यानिमित्तानं परिषदेनं समाजासाठी उपलब्ध करून दिली. अर्थसंवादमध्ये लेखांचं सिलेक्शन तटस्थपणानं केलं जातं याचा अनुभव लेखकांनी घेतला. अगदी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातनं लेख आले. ज्यांना अर्थसंवादसाठी दर्जेदार लेखन करायचं आहे त्या सर्वांना अर्थसंवादशी जोडणं हा प्रामाणिक उद्देश त्या निर्णयामागे होता. हे सगळं करताना अर्थसंवादच्या गुणवत्तेशी तडजोड न होऊ देण्याचं आव्हान आमच्यासमोर होतं. शहादा येथे एका कार्यक्रमासाठी आमच्या महाविद्यालयात अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव आले होते. त्यावेळी अर्थसंवादबद्दल समाधान व्यक्त करून ते म्हणाले की, ''अर्थसंवादमध्ये शहरी लेखकांबरोबरच ग्रामीण लेखकांचा सहभाग कमालीचा वाढणं ही प्रशंसनीय बाब आहे.'' प्राप्त सर्वच लेख पृष्ठमर्यादेमुळे प्रकाशित करता आले नाहीत याची खंत वाटते. परिषदेचे सर्व पदाधिकारी, ज्येष्ठ मंडळी व सदस्यांनी संपादकास स्वायत्तता प्रदान केली होती. संपादकाला मिळणारं निर्णय स्वातंत्र्य ही अर्थसंवादच्या कार्यपध्दतीची जमेची बाजू आहे.

'संपादकीय' ऐवजी 'संपादकीय संवाद' असं शीर्षक दिलं. त्यामागील माझा उद्देश वाचकांशी संवाद साधणे हा होता. सहज चर्चा करायची होती. ही चर्चा केवळ आर्थिक विषयांवर करायची होती. हे करत असताना वाचकमित्रांचे संपादकीय आवडल्याबाबत फोन यायचे तर काही वाचक परिषदेच्या अधिवेशनात प्रतिक्रिया द्यायचे. एक-दीड वर्षांपूर्वी लिहिलेल्या एखाद्या विषयावर ''तुम्ही त्या संपादकीयचा विषय चांगला हाताळला होता'' अशा प्रतिक्रिया मिळायच्या. सन्माननीय वाचकांचा प्रतिसाद पाहूनच मी संपादकीयचा समावेश प्रत्येक अंकात करत गेलो, हे मी नम्रपणे व्यक्त करू इच्छितो.

विशेषांक वारंवार आणण्याचं देखील मी कधीच ठरवलं नव्हतं. सुरवातीला एक-दोन विशेषांक आल्यानंतर अनेक लेखक दूरध्वनीवरून संपर्क साधत असत. आता तुम्ही कोणता विशेषांक आणणार आहात?

| प्रमुख संपादक काळातील लेखाजोखा | | | |
|---|---|---|---|
| लेख संख्या:३३८ | लेखक संख्या:४०९ | अंकांच्या प्रती:४३१४० | एकूण पृष्ठे:२७१४ |
| संपादकीय:२४ | विशेषांक:८ | फुलपेज जाहिराती:२८ | जाहिरात उत्पन्न:रु.२,८६,००० |
| म.रा.सा.व सं.मंडळ अनुदान:रु.२,४०,००० | आयसीएसएसआर अनुदान:रु.५,२०,००० | रंगित अंक:२३ | |
| शेती विशेषांकासाठी जैन उद्योगसमुहाचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांच्याकडून देणगी:रु.७१,००० | | | |

आहात? तेव्हा मी जरूर लेख देईन. अथवा पुढच्या विशेषांकाचा विषय द्या, त्यावर मला लिहायचं आहे असा आग्रह अनेक लेखकांकडून असे. आपल्या लेखकांनी विशेषांकांना खरोखरच भरभरून प्रतिसाद दिला. विशेषांक प्रकाशनानंतर बहुसंख्य वाचकांचा कौल लक्षात घेऊनच वारंवार विशेषांक आणण्याचा निर्णय घ्यावा लागला, हे मला इथं आवर्जून सांगावसं वाटतं. अर्थसंवादची समृध्द परंपरा जोपासण्यात मला खारीचा वाटा उचलण्याची संधी दिल्याबद्दल परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा मी ऋणी आहे. अर्थसंवादचं संपादकपद मी स्वीकारलं तेव्हा दरवर्षी चार अंकांच्या ६४०० प्रती प्रकाशित होत असत. यात वाढ होऊन गतवर्षी हीच संख्या ७३५० वर पोहोचली आहे. अर्थसंवादला ISSN क्रमांक प्राप्त असल्यानं अर्थसंवाद हे जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीमध्ये समाविष्ट आहे, हे विशेष ! अनुदान व जाहिराती मिळवल्यानं अर्थसंवादला आर्थिक पाठबळ मिळालं.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ध्येयधोरणांस अनुसरून अर्थसंवादनं केलेली वाटचाल निश्चितच दीपस्तंभासारखी दिशादर्शक ठरेल. आर्थिक विचारांच्या आविष्कारामुळं अर्थसंवादचं वाचकांशी असलेलं नातं अधिकाधिक दृढ होत आहे. वाचकांनी दिलेल्या प्रचंड विश्वासामुळेच आम्हांस वेगळं बळ प्राप्त झालं आहे. पूज्य सानेगुरुजी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पी.के.अण्णा पाटील यांनी मला प्रोत्साहन दिलं. संपादकपदाची जबाबदारी पेलताना माझे गुरूवर्य व परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी वेळोवेळी मार्गदर्शन तर केलच त्यासह अर्थसंवादला जाहिराती देण्याचं भरीव कार्य केलं. डॉ.संतोष दास्ताने यांनी अंकाच्या गुणवत्तावाढीसाठी मार्गदर्शन केलं. अर्थसंवादचा बाज कायम राखून गुणवत्तेसह देखण्या स्वरूपात आणण्यासाठी मला नेहमी पाठबळ देणारे प्रा.चारुदत्त गोखले, डॉ.दि.व्यं. जहागिरदार, डॉ.मुक्ता जहागिरदार, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ.ज.फा.पाटील, डॉ.संतोष दास्ताने, डॉ.भालचंद्र मुणगेकर, डॉ.विनायक भिसे, डॉ.विनायक देशपांडे, डॉ.श्रीराम जोशी, डॉ.अ.रा.पडोशी, डॉ.सूर्यकांत जगदाळे, डॉ.दिलीप कदम, डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.सुहास आव्हाड, डॉ.रामचंद्र रसाळ, डॉ.बी.के.शिंदे, डॉ.के.के.पाटील, डॉ.अनिल सूर्यवंशी, डॉ.दिलीप पाटील, डॉ.रामदास भांडवलकर,डॉ.रामकृष्ण टाले, डॉ.विलास खंदारे, डॉ.मोहन चौधरी, डॉ.श्रीहरी मिसाळ, डॉ.अशोक खाचणे, डॉ.संजय धनवटे, डॉ.प्रशांत काटोले, डॉ.तुकाराम मुंडे, डॉ.हरिहर तिवारी, डॉ.जयवंत इंगळे यांच्या अनमोल जिव्हाळ्यामुळेच हा पैलतीर गाठू शकलो. यासह अनेक मित्रांची मदत झाली परंतु सर्वांचा नामोल्लेख करणं शक्य नाही.अंकाला आकर्षक स्वरूप देणारे सुनिल भांडारकर तितक्याच आपुलकीनं मुद्रणाची जबाबदारी स्वीकारणारे सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या दोघं मित्रांनी मोलाची मदत केली. यापुढे संपादकपदाची धुरा आता डॉ.राहूल म्होपरे हे सांभाळणार आहेत. अर्थसंवाद प्रत्यक्षात साकारण्याची संधी त्यांना प्राप्त झाली आहे. डॉ.म्होपरे यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!

दिवसेंदिवस जगातील सर्वच अर्थव्यवस्थांत पर्यटनाचं महत्त्व वाढलय्, त्यासह महाराष्ट्र सरकारनं हे वर्ष 'व्हिजिट महाराष्ट्र' जाहीर केलय् या निमित्तानं आपण पर्यटन विशेषांक देत आहोत. अर्थसंवाद सल्लागार मंडळ, कार्यकारी मंडळ, जाहिरातदार, मुद्रणालय, मित्रपरिवार व कुटुंबिय या सर्वांचे ऋण हृदयी बाळगून हा विशेषांक कृतज्ञतापूर्वक वाचकांसाठी देत आहे, यापेक्षा मोठं कोणतं समाधान असेल? संत तुकारामांच्या अभंगातील वैचारिक धन व्यक्त करून संपादक म्हणून लेखणीला विराम देतो.....

''याचसाठी केला होता अट्टाहास। शेवटचा दिस गोड व्हावा।।''

अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'

# अर्थसंवाद

## गोविंद तळवलकरांना विनम्र श्रद्धांजली

**चारूदत्त गोखले**, जळगाव
कार्याध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी: ९४२२६१८४१०

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक सदस्य व पत्रकारिता क्षेत्रातील मानदंड श्री. गोविंद तळवलकर यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी २२ मार्च २०१७ रोजी अमेरिकेतील ओहिओ प्रांतातील क्लिव्हलँड येथे दु:खद निधन झाले. १९५० ते १९६२ अशी बारा वर्षे लोकसत्ताचे उपसंपादक तर १९६८ ते १९९६ अशी सलग २७ वर्षे महाराष्ट्र टाईम्सचे संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले. बेधडक आणि निर्भीड अग्रलेखांसाठी ते प्रसिद्ध होते. वाचक सकाळी चहा घेण्याआधी त्यांचे अग्रलेख वाचत असत. १९७८ मध्ये त्यांनी लिहिलेला ''हे राज्य जावे ही श्रींची इच्छा'' हा अग्रलेख विशेष रूपाने गाजला. राजकारण, समाजकारणाला दिशा दाखवणारे लिखाण हा त्यांच्या लेखणीचा अलौकिक पैलू होता. संपुर्ण भारतातील लेखक, विचारवंत, साहित्यिक, कलावंत यांना त्यांनी महाराष्ट्र टाईम्समधून लिहिते करत पत्रकारिता अधिक समृद्ध केली. त्यांचे ''वाचता वाचता'' हे सदर प्रचंड वाचकप्रिय ठरले. समाजावर पत्रकारितेचा नैतिक अंकुश निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. राजकारणात वाकड्या वाटेने जाणाऱ्या नेत्यांचा आक्रमक शैलीत समाचारही त्यांनी घेतला.

गोविंद तळवलकरांनी सुमारे २५ ग्रंथाचे लिखाणही केले. ''टिळक दर्शन'' हा त्यांचा पहिला ग्रंथ. सत्तांतर, गोपाळकृष्ण गोखले गांधीज् पॉलिटीकल गुरू, भारत आणि जग, इराक दहन, यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व आणि कर्तृत्व, सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त, अग्निकांड, नवरोजी ते नेहरू, न्यायमूर्ती रानडे हे त्यांचे काही प्रसिद्ध ग्रंथ.

तळवलकरांचे मित्र मंडळही मोठे होते. त्यात प्रामुख्याने कुसुमाग्रज, ग.दि.माडगुळकर, पु.भा.भावे, लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा. गोवर्धनदास पारेख, पु.ल. देशपांडे, अ.भि. शहा, अनंतराव भालेराव, डॉ. रफिक झकेरीया, यशवंतराव चव्हाण, ना.धो. महानोर, शरदराव पवार इत्यादींचा समावेश आहे. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यात प्रामुख्याने राज्य सरकारचा लोकमान्य टिळक पुरस्कार, रामशास्त्री सामाजिक न्याय पुरस्कार, उत्कृष्ट पत्रकारितेचा बी.डी. गोयंका पुरस्कार, दुर्गारतन पुरस्कार, न.चि. केळकर पुरस्कार इ. पुरस्कारांचा

समावेश आहे.

सामाजिक व राजकीय घडामोडींचे परखड भाष्यकार, साक्षेपी संपादक, व्यासंगी व अभ्यासू व्यक्तिमत्व, शिस्तप्रिय, मितभाषी पण परखड, पत्रकारितेतील भिष्माचार्य, आदर्श संपादक, वैचारिक व्यासपीठ, व्यासंगी वाचक, स्पष्ट, रोखठोक व प्रखरपणे मांडणी करणारे लेखक, वाङ्.मय साहित्य आणि संस्कृती या विषयांचाही उत्तम व्यासंग असणारा पत्रकार असे गोविंदरावांचे किती तरी पैलू सांगता येतील.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे जे ५४ संस्थापक सदस्य आहेत त्यापैकी गोविंदराव एक होते. ९ जानेवारी १९७७ रोजी परिषदेची स्थापना झाली. त्या दिवशी पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या धनंजयराव गाडगीळ सभागृहात परिषदेच्या संस्थापक सदस्यांची जी साधारण सभा झाली त्या बैठकीला २० सदस्य उपस्थित होते त्यात गोविंदरावांचा समावेश होता. परिषदेच्या स्थापनेपासून म्हणजे १९७७ ते १९९२ अशी सलग १५ वर्षे ते परिषदेचे विश्वस्त होते. इतक्या दीर्घकाळ परिषदेचे विश्वस्तपद यशस्वीपणे सांभाळणारे गोविंदराव हे एकमेव सभासद. त्यांच्या निधनाने मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले असून परिषदेतर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो.

## प्रा.डॉ. शंकर मोडक पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ज्येष्ठ सभासद प्रा.डॉ. शंकर मोडक, मुंबई यांनी परिषदेला दिलेल्या एक लाख रु. देणगीतून २०१७ च्या वार्षिक अधिवेशनापासून प्रतीवर्षी प्रा.डॉ.शंकर मोडक पुरस्कार सुरू करण्यात येणार आहे. रु. ५००० व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून वार्षिक अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमात सदर पुरस्कार प्रदान केला जाईल.

रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, जल वाहतूक (अंतर्गत व समुद्री), धरणे आणि कालवे, पाईप लाईन, विद्युत उत्पादन आणि वितरण, शहर नियोजन, पाणीपुरवठा, रस्ते दिवे प्रणाली, पोस्ट ऑफीसचे अर्थशास्त्र इत्यादी विषयांवर व संरचनात्मक अर्थशास्त्र (Infrastructural Economics) या संकल्पनेत मोडणाऱ्या कोणत्याही विषयावरील शोधनिबंधास सदरचा पुरस्कार दिला जाईल.

शोधनिबंध इंग्रजी किंवा मराठीतून असावा. शोधनिबंध पाठवतांना आपला संपूर्ण पत्ता व सभासद क्रमांक लिहीणे आवश्यक आहे. परिषदेचे आजीव किंवा साधारण सभासदच शोधनिबंध पाठवू शकतील. १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१६ या दोन वर्षात मान्यताप्राप्त मासिकांतून/नियकालिकातून प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधाच्या तीन छायांकित (झेरॉक्स) प्रति कार्यवाह खजिनदारांच्या पत्त्यावर ३१ ऑगस्ट २०१७ पूर्वी पाठवाव्यात. अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध झालेला लेख कृपया पाठवू नये. कारण अर्थसंवाद मधील लेखांसाठी स्वतंत्रपणे पुरस्कार दिला जातो.

कार्यवाह खजिनदारांचा पत्ता:

डॉ. रामदास भांडवलकर, गजानन नगर,
पिंपळगावरोड, यवतमाळ-४४५ ००१

# अर्थसंवाद

# महाराष्ट्रातील जलसिंचन : एक चिंतन


**शिवाजी मुरलीधर भोसले, सातारा,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी कॉलेज.
भ्रमणध्वनी: ९४२१२११९७४५
ई-मेल: bshivajim@gmail.com


(मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान(कनिष्ठ)महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक यांच्या विद्यमाने चांदवड शहरात नोव्हेंबर २०१६ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण....)

प्रास्ताविक:

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड करून परिषदेने माझा जो सन्मान केला त्याबद्दल मी आपणा सर्वांचा मनापासून आभारी आहे. अधिवेशन श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकूल) संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान (वरिष्ठ) आणि श्रीमान प्रेमराजजी दलीचंदजी सुराणा कला, वाणिज्य व विज्ञान(कनिष्ठ)महाविद्यालय, नेमिनगर, चांदवड, जिल्हा नाशिक येथील महाविद्यालयाच्या प्रांगणात होत आहे याचा मला विशेष आनंद होत आहे. आपल्या सर्वांच्या वतीने संयोजक महाविद्यालय व या संस्थेला मी धन्यवाद देतो. या संस्थेच्या व महाविद्यालयाच्या उज्वल व भावी वाटचालीस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा. चांदवड नगरीत या अधिवेशनास उपस्थित असणाऱ्या सर्व सभासदांचे व नागरिकांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो.

अर्थशास्त्रविषयक शास्त्रीय दृष्टिकोन व विचार मराठीतून प्रसिद्ध करणे, अर्थशास्त्रीय समस्यांची सैद्धांतिक व व्यावहारिक दृष्टिकोनावर चर्चा घडवून

आणणे यासाठी परिषदेची वार्षिक अधिवेशने, विविध उपक्रम, व्याख्यानमाला, प्रोत्साहनपर विविध पुरस्कार, सन्मान, मान्यताप्राप्त राष्ट्रीय पातळीवरील अर्थसंवादच्या माध्यमातून विविध आर्थिक विषयांवर विचारमंथन करणे हे परिषदेचे महत्वपूर्ण कार्य आहे. प्रारंभीच्या काळात परिषदेच्या जडणघडणीचे श्रेय मुख्यतः प्रा. नी. वि. सोवनी, प्रा. वि. म. दांडेकर, प्रा.रवींद्र सबनीस यांना जाते. परिषदेच्या आजपर्यंतच्या लौकिकात त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. तसेच परिषदेचे माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, विश्वस्त, कार्यवाह-खजिनदार, अर्थसंवादचे संपादक, परिषदेचे आजी-माजी पदाधिकारी आणि कार्यकारणी सदस्यांनी परिषदेच्या उद्देशाशी बांधिलकी राखून समर्पित भावनेने केलेल्या कार्यामुळे व त्यास परिषदेच्या सन्माननीय सभासदांनी केलेल्या सहकार्यामुळे मराठी अर्थशात्र परिषदेने ४०व्या वर्षात पदार्पण केले असून परिषदेला समाजमान्यता प्राप्त झाली आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनाप्रसंगी रयत शिक्षण संस्था, सचिव, प्रि.डॉ.गणेश ठाकूर, परिषदेचे माजी अध्यक्ष गुरुवर्य प्रा.डॉ.ज.फा.पाटील, प्रा.डॉ.पी.बी.कुलकर्णी व मला मौलिक सहकार्य करणाऱ्या विविध संस्था व व्यक्ती यांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य मानतो. परिषदेच्या स्थापनेपासून मार्गदर्शक, तत्वज्ञ व मित्र या तिन्ही भूमिकेतून त्यांनी मला मार्गदर्शन केले आहे. परिषदेच्या वाटचालीत त्यांचे मौलिक योगदान आहे हे विसरता कामा नये.

**जलसिंचनाची आवश्यकता:**

शेतीला पाण्याची आवश्यकता असते. पाण्याशिवाय शेती होऊ शकत नाही. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी शेती निश्चित स्वरूपाचे उत्पादन देऊ शकत नाही. शेतीतील खात्रीशीर उत्पादनासाठी जलसिंचनाच्या सोयी असणे अत्यंत महत्वाचे असते. जलसिंचनामुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे व शेतीचे उत्पादन वाढवणे शक्य आहे. महाराष्ट्रातील शेती लहरी मान्सूनवर अवलंबून आहे. महाराष्ट्रात अनियमित, अनिश्चित व विषम स्वरुपात पाऊस पडतो. पावसाच्या अनियमितपणामुळे शेती उत्पादनातही अनिश्चितता येते. अनिश्चितता दूर करण्यासाठी जलसिंचनाची आवश्यकता आहे. राज्यात विशिष्ट काळात व विषम प्रमाणात पाऊस पडत असल्याने एक पीक घेता येते. हे चित्र बदलण्यासाठी व पावसाव्यतिरिक्त काळातसुद्धा शेतीला पाण्याचा शाश्वत पुरवठा होण्यासाठी जलसिंचन आवश्यक असते. ज्या भागात पावसाचे प्रमाण अल्प असते अशा प्रदेशात शेती उत्पादनात होणारे नुकसान होऊ नये यासाठी सिंचनाची आवश्यकता असते.

शेतीच्या विकासामध्ये सिंचन महत्वाची भूमिका पार पाडते. महाराष्ट्रात सिंचनाच्या सोयी फारच अल्प आहेत. १९६०-६१ मध्ये एकूण जलसिंचन क्षेत्र एकूण पिकाखालच्या क्षेत्राच्या ६.५% होते. जलसिंचन प्रकल्पात प्रचंड गुंतवणूक करून देखील २००९-१० मधे जलसिंचन क्षेत्र एकूण पिकाखालच्या क्षेत्राच्या फक्त १७.९% होते. थोडक्यात आजही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रातील शेती मान्सूनवर अवलंबून आहे.

**महाराष्ट्रातील जलसिंचन :**

महाराष्ट्र हे भारतातील एक प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. क्षेत्रफळाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी २३ लाख होती.राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३.०८ लक्ष हेक्टर आहे यापैकी २.२५ लक्ष हेक्टर क्षेत्र लागवडीयोग्य असून त्याचे भौगोलिक क्षेत्राशी असणारे प्रमाण ७३ % आहे.

राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ५८.४ % लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पाया आहे. महाराष्ट्रात सरासरी ११६४ मि.मी. एवढा पाऊस पडतो व तो विषम प्रमाणात पडतो. कोकणात २००० मि.मी. पेक्षा जास्त तर दुष्काळी भागात ५०० मि.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो याचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. शेती उत्पादन शाश्वत करण्यासाठी जलसिंचनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. राज्याचा विकास शेती क्षेत्रावर व शेती क्षेत्राचा विकास जलसिंचनाच्या सोयींवर अवलंबून आहे. ज्या राज्यातील शेती केवळ पर्जन्यावर अवलंबून न राहता सिंचनावर अधिकाधिक अवलंबून असते असे राज्य अधिक समृद्ध होते.

### महाराष्ट्रातील प्राचीन काळातील जलसिंचन:

महाराष्ट्र राज्यात अगदी प्राचीन काळापासूनच जलसिंचनाच्या योजना कार्यान्वित आहेत. तापी खोऱ्यात सावळदा व भीमेच्या खोऱ्यात इनामगाव इ. केंद्रे सिंधु संस्कृतीकालीन आहेत. त्यात नदीच्या पात्रात एक बंधारा घालून शेतीला पाणी पुरवण्याची व्यवस्था केली जात होती. यजुर्वेदमध्ये कालवे व धरणे यांचा उल्लेख आहे. निसर्गाच्या दोलायमानावर उपाय शोधण्यासाठी व लहरीपणावर मात करण्यासाठी पृष्ठभागावर तलावांची मालिका निर्माण करून पाण्याची साठवणूक करणे आणि त्या साठवलेल्या पाण्याचा उपयोग उर्वरित काळामध्ये सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी करण्याची अनेक उदाहरणे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी प्राचीन काळापासून आपणास पहावयास मिळतात. त्यामध्ये खानदेशातील फड पद्धती, विदर्भातील मालगुजारी तलाव मराठवाड्यातील नांदेड भागातील जुने मालगुजारी तलाव, खजाना विहीर व बारव विहिरींचे जाळे दक्षिण कोकणातील झऱ्यावरील सिंचन व उत्तर कोकणातील तळी व पंचगंगा खोऱ्यातील बंधाऱ्यावरून उपसा सिंचन इ. सिंचनशेती महाराष्ट्राला नवीन नाही. याचे बीज हजारो वर्षांपूर्वी कौटिल्याच्या काळाच्या पाठीमागेही सापडते. प्राचीन काळात महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये पिकामध्ये व सिंचनाच्या पाणी पुरवठ्याच्या रचनेमध्ये निसर्ग अनुकूल अशी विविधता स्थानीय भौगोलिक आणि हवामानाच्या परिस्थितीनुरूप होती. पाणी वितरण्याच्या पद्धती पिकाप्रमाणे, हवामानाप्रमाणे आणि पाणी पुरवठ्याच्या रचनेप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारच्या होत्या परंतु सर्वांमध्ये समान गोष्ट म्हणजे स्थानिक राजांकडून सिंचन विकासाला अतिशय प्रोत्साहन व मदत दिली जात होती. सिंचनाच्या दैनंदिन व्यवस्थापनात ढवळाढवळ नव्हती. देखभाल व व्यवस्थापन पद्धती पूर्णतः लोकांच्या हाती होत्या. ब्रिटीश राजवटीपूर्वी महाराष्ट्रात सिंचनाचे मोठे काम फारसे झालेलं दिसून येत नाही.

### ब्रिटीश काळातील जलसिंचन:

महाराष्ट्रात १८६७ नंतर ब्रिटीश सरकारने स्वतंत्र पाटबंधारे विभागाची स्थापना केली. १८६९ मध्ये १० वर्षांसाठी सर्वकष सिंचन विकास नियोजन तयार केले. या योजनेवर ५२.८५ दशलक्ष डॉलर्स खर्च करण्यात आला. यातील कामे समाधानकारक व उपयुक्त वाटल्याने त्यापुढील सिंचन प्रकल्प शासकीय खर्चाने शासकीय संघटनेमार्फत करण्याचे धोरण राबविण्यात आले. सध्याच्या शासकीय यंत्रणेची व कार्यपद्धतीची सुरवात येथून झाली. ब्रिटीश काळातील महाराष्ट्रातील पहिले मोठे सिंचनाचे काम म्हणजे खोडशी येथील १८७० मध्ये सुरु झालेला कृष्णेचा बंधारा (कालवा), जलसंचय करून त्यातून काढलेल्या कालव्यांची सुरवात

म्हणजे मूठा नदीवरील खडकवासला धरण हे काम १८७५ मध्ये पूर्ण झाले. विहार (१८६६), पवई व तुळसी (१८७६), तानसा(१८८३), भाटघर(१८८५), १८८७ मध्ये करमाळा तालुक्यातील वांगी तलावाचे बांधकाम सुरु करण्यात आले. १९१६ मध्ये दारणा जलाशय पूर्ण करून गोदावरीला कालवे काढण्यात आले. १९१८ मध्ये चणकापूर धरण, १९२० मध्ये भंडारदरा, १९३० मध्ये भाटघर धरणाचा विस्तार करून निरा उजवा कालवा सुरु केला. विदर्भात रामटेक (१९०९), घोडाझरी (१९१०), असोलमेंढा (१९११) व नालेश्वर (१९१९) साली सिंचनास सुरवात केली. या काळात मातीएवजी दगडी धरणे बांधण्यात आली आणि स्वातंत्र्यपूर्व काळात गोदावरी, प्रवरा, निरा, मूठा कृष्णा व गिरणा हे मोठे प्रकल्प यांची सिंचन क्षमता १.७२ लक्ष हेक्टर होती व १५ मध्यम प्रकल्प असे एकूण २१ जलाशय निर्माण करण्यात आले. यापासून २.७४ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली व यावर १६.६० कोटी रुपये खर्च करण्यात आले.

**स्वातंत्र्योत्तर काळातील सिंचन विकास :**

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले व महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० मध्ये झाली.१९३० नंतर १९५४ सालात गंगापूर जलाशय पूर्ण होईपर्यन्त २५ वर्षात राज्यात कोठेही नवीन मोठे सिंचनाचे काम सुरु करण्यात आले नव्हते. गंगापूर धरणानंतर घोड, गिरणा, मूळा, पानशेत दिना इटियाडोह, बोर, मानार, कोयना, बीट, येलदरी, सिद्धेश्वरी इ. धरणाची कामे हाती घेण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली भविष्यकालीन सिंचनाची दिशा व धोरण आखण्यासाठी पहिला सिंचन आयोग १९६० रोजी नेमण्यात आला. त्यानंतर अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिति १९७३, आठमाही पाणी वापर समिती १९७९, कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती १९८०, सिंचन व्यवस्थापनाबाबत उच्चाधिकार (जैन) समिती१९८१, राज्यातील प्रादेशिक अनुशेष विषयक दांडेकर समिति १९८४, कसबेकर गट अहवाल १९८४, डॉ.सुब्रमन्यम समिती १९८७, कोल्हे समिती१९९१, माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा सिंचन आयोग डिसेंबर १९९५, केळकर समिति व माधवराव चितळे समिती २०१२ इ. समित्यांची स्थापना झाली.

**सिंचनाचे प्रकार / पद्धती:**

सिंचनाच्या मुख्यतः प्रवाही सिंचन व उपसा सिंचन पद्धती असे दोन प्रकार पडतात. पाण्याच्या उगमापासून शेतापर्यंत पाणी वाहून नेणे व पुढे त्याचे शेतात योग्य प्रमाणात वितरण करणे याला प्रवाही सिंचन पद्धती असे म्हणतात तर दुसऱ्या पद्धतीत 'विहिरी, नद्या,ओढे व तळ्यातील पाणी उंचावरील जमिनीस द्यावयाचे झाल्यास असे पाणी पंपाच्या सहाय्याने किंवा इतर साधनांनी दिले जाते यास उपसा सिंचन पद्धती असे म्हणतात.

पृष्ठीय जलसिंचन /पारंपरिक पद्धती:

या पद्धतीमध्ये शेतापर्यंत आणलेले पाणी शेतामध्ये वितरित करून पिकास पाणी दिले जाते.शेतकरी विहिरीचे किंवा धरणाचे पाणी याच पद्धतीने आपल्या पिकांना देत असतात. या पद्धतीमध्ये मोकाट सिंचन पद्धत, सरी सिंचन पध्दत, सारा सिंचन पद्धत व आळे पद्धती इ. उपप्रकार आढळतात या पारंपरिक सिंचन पद्धतींची कार्यक्षमता फारच कमी असते व पाण्याचा गैरवापर जास्त होतो.

सिंचनाच्या आधुनिक पद्धती :

अ) ठिबक सिंचन पद्धती :

सिंचनाच्या आधुनिक पद्धतीमध्ये ठिबक सिंचन पद्धती व तुषार सिंचन पद्धती या जगमान्य

झालेल्या पद्धती आहेत. महाराष्ट्राच्या मर्यादित सिंचन क्षमतेत जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९८६-८७ पासून ठिबक सिंचनाच्या राज्य पुरस्कृत ठिबक सिंचन योजना व सन १९९१-९२ पासून केंद्र पुरस्कृत ठिबक सिंचन योजना राबविण्यास सुरवात केली. जमिनीची पोत, पिकांच्या वाढीची अवस्था, वातावरणातील पाण्याचे प्रमाण व पिकांचा गुणांक इ. मुलभूत गोष्टींचा विचार करून पिकांच्या मूळाशी त्यांच्या गरजे इतकेच पाणी लहान प्लास्टिक नळावाटे थेंबाथेंबातून अथवा बारीक धारेने सतत किंवा गरजेनुसार देण्याच्या आधुनिक सिंचन पद्धतीला ठिबक सिंचन पद्धती असे म्हणतात. याबरोबरच पाणी, पिकांना आवश्यक असणारी अन्नद्रव्ये अथवा किटकनाशके, औषधे ठिबक सिंचनाद्वारे देता येतात. या पद्धतीमुळे पाण्याचा, खताचा व औषधांचा मोठा अपव्यय टाळता येतो. ठिबक सिंचन पद्धत इ.स.१८६० साली जर्मनीत मातीच्या भाजलेल्या पाईप मधून पाणी देण्याच्या प्रयत्नातून सुरु झाली. मात्र या तंत्रावर संशोधन करून त्याची अधिक सुधारित आवृत्ती इस्राईल देशाच्या ब्लास या शास्त्रज्ञाने इ..स. १९०० साली शोधून काढली. त्यामुळे ब्लासला या तंत्राचे संपूर्ण श्रेय दिले जाते. पुढे त्याने पॉलीथिनपाईपचा वापर करून कमी दाबाची ठिबक सिंचन पद्धत विकसित केली गेली. प्लास्टिकच्या शोधानंतर या तंत्रात लक्षणीय सुधारणा झाली आहे. त्यामुळे ही पद्धती कोणत्याही हवामानात चालू शकते.

(ब) तुषार सिंचन पद्धती :

जलसिंचन क्षेत्रात कार्यक्षमपणे वाढ करणारा व पाण्याचा पर्याप्त वापर करण्याचा महत्त्वपूर्ण मार्ग म्हणजे तुषार व ठिबक सिंचन पद्धती होय. महाराष्ट्राला उपलब्ध पाण्याचा पर्याप्त वापर करून सिंचनक्षमतेत जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी तुषार व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करण्याशिवाय पर्याय नाही कारण पाण्याचे उपलब्ध साठे कमी होत आहेत व पाण्याची मागणी प्रचंड वाढत आहे. महाराष्ट्रातील ठिबक व तुषार सिंचन पद्धतीच्या प्रगतीचा विचार केला असता या दोन्ही पद्धतींमध्ये वाढ झालेली आहे. या दोन्ही सिंचन पद्धतीद्वारे २,१३८१७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. तुषार व ठिबक सिंचनावरील खर्चात ६०.६६ कोटी वरून ६८८.४१ कोटी पर्यंत वाढ झालेली दिसून येते. महाराष्ट्र शासनाकडून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचा वापर वाढवावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सध्या महाराष्ट्र शासनाचा असा विचार चालला आहे की ठिबक सिंचनाशिवाय ऊस पीक घेता येणार नाही.

**सिंचनाचे परिणाम:**

कृषी व सिंचन या दोन घटकांचा फार जवळचा संबंध आहे. कृषी विकासात सिंचनाचे योगदान फार मोठे आहे. महाराष्ट्रातील सिंचन प्रगतीमुळे जमीन वापरामध्ये वाढ झालेली दिसून येते. एकूण पिकाखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. कृषी उत्पादनातील अनिश्चितता तुलनेने कमी झाली आहे. शेतकऱ्यामध्ये सिंचनामुळे विश्वास निर्माण होतो आहे. शेतीमध्ये अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतकरी अधिक मेहनत घेत आहेत. शेती उत्पादनामध्ये वाढ झाली आहे, शेती आधारित कारखान्यांसाठी कच्च्या मालाची उपलब्धता वाढली आहे. शेतकऱ्यांबरोबरच कारखान्यातील कर्मचाऱ्यांचे उत्पन्न वाढले आहे. उत्पादनातील वाढीबरोबर रोजगारात वाढ होत आहे. बाजारात वस्तूंची उलाढाल वाढून बाजारपेठांचा विकास होत आहे. कराच्या रुपाने शासनाच्या उत्पन्नात वाढ होत आहे, सिंचनामुळे रोजगारात

प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष वाढ होते, सिंचनामुळे अनेकांना रोजगार मिळतो, अन्नधान्य, फळे, भाजीपाला, दुध इत्यादींच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

महाराष्ट्रात सिंचन क्षमता अपेक्षे प्रमाणे वाढलेली नाही, धरणे बांधण्यासाठी अवर्षणप्रवण भागात पाणी उपलब्ध होत नाही, हमखास पावसाच्या प्रदेशात योग्य अशा साईटस मिळत नाहीत, जास्त पावसाच्या प्रदेशात जमिनीच्या प्रस्तारामुळे पाणी साठवण्यात अडचणी येत आहेत तर काही भागात वनक्षेत्रात पाणी साठवले जाणार असल्याने धरणाच्या बांधकामाला मान्यताच मिळत नाही, पुनर्वसनाच्या अडचणी आहेत, सिंचन विकासाला आवश्यक तेवढा निधी उपलब्ध होत नाही,त्यामुळे प्रकल्पाची कामे अपेक्षित वेळेत पूर्ण होत नाहीत, खर्चात वाढ होत आहे, लालफितीचा कारभार, पाण्याचा गैरवापर व देखभालीकडे दुर्लक्ष अशा अनेक कारणांमुळे सिंचन क्षमता अपेक्षे प्रमाणे वाढत नाही. सिंचनक्षमता व प्रत्यक्ष भिजणाऱ्या क्षेत्रामध्ये मोठी तफावत दिसून येते. उपलब्ध पाणी योग्य कार्यक्षमतेने वापरले जात नाही त्यामुळे अपेक्षित विकास दर साध्य होत नाही.

**महाराष्ट्रातील जलधोरण:**

१९६० मध्ये स.गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेला पहिला सिंचन आयोग, १९९५ मध्ये माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेला व नंतर ११९७ मध्ये नामांतरित झालेला दुसरा जल व सिंचन आयोग यांच्या व्यापक अभ्यासाव्यतिरिक्त महाराष्ट्रातील सिंचनविषयक व पाणीपुरवठा विषयक धोरणे व कार्यपद्धती यांना योग्य आकार देणेसाठी तत्कालीन गरजेनुसार विविध समित्या महाराष्ट्र शासनाकडून स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांचे मार्गदर्शनपर अहवाल उपलब्ध झाले. त्यातील काही प्रमुख अहवाल सार्वत्रिक संदर्भासाठी प्रकाशितही झाले आहेत उदा. अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन समिती १९७३, आठमाही पाणी वापर समिती १९७९, कोकण बृहत आराखडा समिती १९८१, राज्यातील प्रादेशिक अनुषेशविषयक समिती १९८४, मुंबई पाणीपुरवठा समिती १९९५, मुंबई महानगर प्रदेश पाणीपुरवठा समिती २०००, केळकर समिती व चितळे समिती (२०१२) अशा प्रकारच्या समित्यांनी व वेळोवेळी नेमलेले इतर अभ्यास गट यांनी त्यांना सोपवलेल्या प्रश्नांसाठी जे अहवाल तयार केले त्यातील काही अप्रकाशित राहिले असले तरी त्यातील काही विचार महाराष्ट्रातील जल व्यवस्थापनाला दिशा देण्यास निश्चित प्रभावी ठरले आहेत. अशा या सर्व विचारांमध्ये एक दीर्घकालीन सुसूत्रता असावी, फक्त शासनाच्या कार्यवाहीसाठीच नाही तर समाजातील पाणी विषयक वैचारिक व संख्यात्मक पुनर्रचनासाठी महाराष्ट्रापुढे स्पष्ट दिशा असावी म्हणून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्याची जलनीति जुलै २००३ मध्ये प्रस्तुत केली व त्यामधून एका नव्या प्रगत व्यवस्थेचा पाया घातला गेला आहे. स्वत:ची स्वतंत्र अशी स्पष्ट जलनीति निश्चित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे. राज्यातील पाणी वापरकर्ते व पाण्याचा विविध प्रयोजनांचे हक्कदार या सर्वांचे प्रतिनिधी यांचे विचार विचारात घेऊन जलनीति ठरवण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या जनतेला सर्वाधिक आर्थिक व सामाजिक लाभ पुरविण्यासाठी राज्यातील जलसंपत्तीचा शाश्वत विकास इष्टतम वापर आणि व्यवस्थापन करण्याची हमी देणे ही महाराष्ट्र राज्य जलसमितीची उद्दिष्टे आहेत.

महाराष्ट्राच्या जलधोरणात पाणी वापराचा पहिला क्रम पिण्याला व घरगुती वापरला आहे, दुसरा प्राधान्यक्रम शेतीला, तिसरा प्राधान्यक्रम उद्योगाला व चौथा प्राधान्यक्रम पर्यावरणीय व मनोरंजनात्मक वापरासाठी दिलेला आहे.

**महाराष्ट्रातील सिंचन क्षमता:**

महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी

झाल्यापासून महाराष्ट्रात विविध आयोगांच्या व समित्यांच्या अहवालानुसार मोठ्या सात सिंचन प्रकल्पामध्ये सर्वाधिक सिंचनक्षमता (१,३५,५६५ हेक्टर) जायकवाडी प्रकल्पाची आहे व सर्वात कमी सिंचन क्षमता निम्न वर्धा प्रकल्पाची (५२,९८० हेक्टर) आहे. मोठ्या सिंचन प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता ५०७८३४ हेक्टर (६९.३०%) इतकी आहे, सात मध्यम प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता १,७९,०१४ हेक्टर इतकी असून यामध्ये सर्वाधिक सिंचनक्षमता दारणा प्रकल्पांची ३३७७२ हेक्टर इतकी असून यामध्ये सर्वात कमी सिंचन क्षमता निम्न वेण्णा प्रकल्पाची २२,८६३ हेक्टर आहे. लघुसिंचन प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ४६०४४ हेक्टर (६.२७%) इतकी असून यामध्ये सर्वाधिक सिंचन क्षमता वीर प्रकल्पांची १६११० हेक्टर आहे तर सर्वात कमी जायकवाडी टप्पा दोन लघुप्रकल्पाची १४,१६४ हेक्टर इतकी आढळते. मोठ्या, मध्यम व लघु अशा एकूण सतरा प्रकल्पांची एकूण सिंचन क्षमता ७,३२,६९२ हेक्टर इतकी आहे. यामध्ये मोठ्या प्रकल्पाचा हिस्सा ६९.३०%, मध्यम प्रकल्पाचा हिस्सा २४.४३% व लघु प्रकल्पाचा हिस्सा फारच अल्प म्हणजे ६.२७% आढळतो.

**महाराष्ट्रातील खोरे निहाय क्षेत्र आणि पाणी उपलब्धताः**

महाराष्ट्रामध्ये पाण्याची उपलब्धता, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष क्षमतेचा वापर यामध्ये बराच फरक आढळतो. महाराष्ट्रात साधारणपणे १,६३,८२० द.ल.घ.मी. पाणी पावसामूळे उपलब्ध होते. त्यामुळे सर्व सिंचनव्यवस्था पावसावर अवलंबून आहे. राज्यात सर्व धरणे शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठी बांधली आहेत परंतु सध्या शेतीचे पाणी कमी कमी होत चालले आहे. वाढत्या शहरीकरणामुळे लोकांना पिण्यासाठी व इतर वापरासाठी तसेच उद्योगांना प्राधान्याने पाणी दिले जाते. त्यानंतर शिल्लक पाणी शेती क्षेत्राला दिले जात आहे. पाण्याच्या नियोजनामध्ये बाष्पीभवनाचा विचार करावा लागतो. जलाशयातून, कालव्यातून, सिंचन क्षेत्रावरून बाष्पीभवन होते. महाराष्ट्रात मोठ्या सिंचन प्रकल्पातून बाष्पीभवन १४%. मध्यम सिंचन प्रकल्पातून २३% तर लहान धरणात सर्वात जास्त म्हणजे २४% बाष्पीभवन होते. रत्नागिरी

तक्ता क्र.१: महाराष्ट्रातील खोरेनिहाय पाण्याची उपलब्धता व क्षेत्र

| खोरे | खोरेनिहाय वापरास उपलब्ध असलेले पाणी | | | | भौगोलिक स्थिती | लागवड योग्य क्षेत्र (हजार हे.) | २०३० साठी अपेक्षित द.ल.घ.मी. निव्वळ तूट/शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | द.ल. घ.मी. | सिंचन | इतर वापर | एकूण | | | |
| गोदावरी | ३८८८२ | ४६४२२ | ३५४६ | ४९९६८ | १५२८११ | ११२.५६ | -११०८६ |
| कृष्णा | १८३५६ | १८७१३ | ४७४८ | २३४६१ | ६९०३२ | ५६.२७ | -५१०५ |
| तापी | ९३२४ | ८४८७ | १८४१ | १०३२८ | ५१३०४ | ३७.३१ | -१००४ |
| नर्मदा | २३४ | ३६४ | १० | ३७४ | १०४८ | ६४ | -१३१ |
| कोकण | ७२३२२ | ९२६२ | ३६७५ | १३५३७ | ३३२२८ | १८.६४ | +५८७८५ |
| एकूण | १३९२२७ | ८३८४८ | १३८२० | ९७६६८ | ३०७४२३ | २२५.४६ | - |

*स्रोत: महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१३-१४ पृ.११३*

जिल्ह्यात बाष्पीभवनाचे प्रमाण सर्वात कमी आहे. महाराष्ट्रात सर्वात जास्त पाण्याचे बाष्पीभवन अमरावती व जळगाव मध्ये होते.

**जलसिंचन विकास महामंडळ चालू प्रकल्पांची संख्या:**

महाराष्ट्रात जलसिंचन क्षेत्र वाढविण्यासाठीचे प्रयत्न म्हणून जलसिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने १९९६ ते १९९८ या काळात पाच जलसिंचन विकास महामंडळाची स्थापना केली. त्यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, कोकण जलसिंचन विकास महामंडळ, तापी जलसिंचन विकास महामंडळ, गोदावरी मराठवाडा जलसिंचन विकास महामंडळ व विदर्भ जलसिंचन विकास महामंडळ यांचा समावेश होता. सध्या या महामंडळामार्फत सुरु असलेल्या जलसिंचन प्रकल्पांची व ते पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी तक्ता क्रमांक २ मध्ये दर्शिवला आहे.

सर्व जलसिंचन विकास महामंडळाची चालू प्रकल्पांची एकुण संख्या १०५९ इतकी असून, यामध्ये कृष्णा खोरे जलसिंचन विकास महामंडळाच्या चालू प्रकल्पाची संख्या ३१७ व सर्वात कमी ९६ संख्या कोकण जलसिंचन विकास महामंडळाच्या प्रकल्पाची आहे. हे सर्व प्रकल्प पूर्ण झाले तर जलसिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यासाठी सिंचन प्रकल्प तत्काळ पूर्ण होणे गरजेचे आहे. या सिंचन प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात सिंचनात वाढ होईल. त्यासाठी सिंचन प्रकल्प तत्काळ पूर्ण होणे गरजेचे आहे. या सिंचन प्रकल्पावर मोठ्या प्रमाणत खर्च होऊनही जल सिंचन क्षमतेत त्या प्रमाणात वाढ झालेली नाही.

**राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र:**

महाराष्ट्राच्या दृष्टीने शेती, सिंचन आणि पाणी हा एक संवेदनशील विषय बनला आहे. देशातील सिंचन क्षमतेचे प्रमाण ४०% आहे. महाराष्ट्रात मात्र हेच प्रमाण १७.९% आहे.दुसऱ्या सिंचन आयोगाच्या अहवालानुसार राज्यात सर्व उपखोऱ्यातून वेगवेगळ्या स्त्रोताद्वारे निर्माण होणारी सरासरी वर्षातील अंतिम सिंचनक्षमता १२६ लक्ष हे. पर्यंत जाण्याची शक्यता दिसून येते. सिंचन व्यवस्थापनाखाली येणारे एकूण क्षेत्र यापेक्षा अधिक म्हणजे १४०

**तक्ता क्र.२: जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणारा आवश्यक निधी**

| प्रकल्प प्रकार | महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ | कोकण जलसिंचन विकास महामंडळ | तापी जलसिंचन विकास महामंडळ | गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ | विदर्भ जलसिंचन विकास महामंडळ | एकूण कोटी रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| मोठे(संख्या) | १९ | ०४ | १० | १६ | २४ | ७३ |
| मध्यम(संख्या) | ३३ | ११ | २५ | १६ | ५१ | १३६ |
| लघु(संख्या) | २६५ | ८१ | ९८ | २०७ | १९१ | ८४२ |
| एकूण(संख्या) | ३१७ | ९६ | १३३ | २३९ | २६६ | १०५९ |
| निर्माण करावयाची सिंचनक्षमता(हे.) | १०.८५ | २.५२ | ५.६३ | ५.६१ | ९.९६ | ३४.१७ |
| आवश्यक निधी | १३६१० | ४७२८ | ५८८५ | ५६४० | ११४९३ | ४१३५६ |

*स्त्रोत: इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ इंडिया*

लक्ष हेक्टर असेल, महाराष्ट्राच्या एकूण लागवडीयोग्य क्षेत्राच्या तुलनेत सरासरी वर्षातील सिंचनाचे प्रमाण हे जवळ जवळ ६०% राहील. अलिकडील अंदाजानुसार २०३० सालापर्यंतची निर्माण होणारी एकूण सिंचन क्षमता ६८.२० लक्ष हेक्टर होईल.

१९६०-६१ मध्ये महाराष्ट्रात एकूण १८८२३ हजार हेक्टरक्षेत्र पिकाखाली होते. त्यापैकी १२२० हजार हेक्टर म्हणजे ६.५ % क्षेत्र एकूण सिंचित क्षेत्र होते हेच प्रमाण २०१३-१४ मध्ये एकूण पिकाखालील क्षेत्र २३३८० हजार हेक्टर होते त्यापैकी ४०५० हजार हेक्टर इतके एकूण सिंचित वाढले आहे. १९६०-६१ मध्ये एकूण सिंचन क्षेत्राचे पिकाखालील एकूण क्षेत्राशी असलेले प्रमाण ६.५% होते ते २००९-१० मध्ये १७.९ % इतके वाढले. म्हणजे ५० वर्षात सिंचन क्षेत्रात फक्त ११.४ % इतकी वाढ झालेली आहे. १९६० ते २०११ या कालावधीत एकूण पिकाखालील क्षेत्रात २०.१३% व सिंचित क्षेत्रात २३१.९६ इतका वाढीचा दर आढळतो. थोडक्यात महाराष्ट्रात सिंचनाखालील क्षेत्रात फारच अल्प वाढ झालेली आहे. महाराष्ट्रात सिंचन विहिरीचा वापर पूर्वीच्या तुलनेने अधिक केला जात आहे. त्यामुळे प्रतीविहीर सिंचन क्षेत्रात वाढ झालेली आहे. सिंचन क्षेत्रात वाढीचे श्रेय सरकारऐवजी शेतकरी वर्गाकडे जाते असे वाटते.

### सिंचन पाणीपट्टी वसूली व थकबाकी:

महाराष्ट्रातील २०००-२००१ ते २०१४-१५ या कालावधीत सिंचन व बिगर सिंचन क्षेत्रातील पाणी पट्टीच्या आकारणीत ७४.४८,व ३६२.६० कोटीवरून अनुक्रमे ७८.१५ व५९३.५९ कोटी रु. इतकी वाढ झाली आहे. एकूण पाणी पट्टीची आकारणी ४३७.०८ कोटी रु.वरून ६७१.७४ कोटी.रु. इतकी वाढली आहे. याच कालावधीत सिंचन व बिगर सिंचन क्षेत्रातील वसुलीची रक्कम अनुक्रमे ४१.२३ कोटी रु. व १५३.९९ कोटी रु. वरून अनुक्रमे ६१.९७ कोटी रु. व ५७४.५३ कोटी रु. इतकी वाढली आहे मात्र त्याच बरोबर सिंचन व बिगर सिंचन क्षेत्रातील एकूण पाणी पट्टीची रक्कम थकबाकी ७९४.६९ कोटी रु. वरून १३५९.७३ कोटी रु. इतकी वाढलेली दिसून येते. सिंचन क्षेत्रातील पाणीपट्टीची थकबाकी अनुक्रमे २३.३९ कोटी रु. वरून ६४८.२९ कोटी रु. इतकी वाढ झालेली आहे. बिगर सिचन क्षेत्रातील पाणी पट्टी ९७१.३० किती रु. वरून ६९५.२९ कोटी रु. इतकी कमी आहे.

### पाटबंधारे व कृषी क्षेत्रावरील खर्चाचा कल:

महाराष्ट्र शासनाने पाटबंधारे, पूरनियंत्रण, शेती व संलग्न सेवा साठीच्या खर्चाची तरतूद तिसऱ्या योजनेत ४३४.७९ कोटी रु. होती ती १२ व्या योजनेत ६९,९०७ कोटी रु. इतकी वाढलेली दिसून येते. ११ व्या पंचवार्षिक योजनेचा अपवाद वगळता त्यामध्ये सलगपणे वाढ झाल्याचे दिसून येते कृषी व संलग्न सेवा यावरील खर्चाची तरतूद तिसऱ्या योजनेपासून १० व्या योजनेपर्यंत घटत गेल्याचे दिसून येते. ११ व १२ व्या योजनेत त्यामध्ये वाढ झाल्याचे दिसते.

### महाराष्ट्रातील सिंचन आयोग/समित्या:

मुंबई राज्यात स्वातंत्र्यापूर्वी त्या प्रदेशातील सिंचन विषयक अभ्यास अहवाल १९२१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. दख्खन भागातील कालव्यांच्या प्रश्नाचा अभ्यासाठी मुंबई सरकारने इ.स.१९२८ मध्ये मि. ब्रिस्टो यांची खास नेमणूक केली होती. त्यावेळी मुख्य समस्या कालव्यातील पाणथळ जमिनीची होती. त्यानंतर बा.स.कामत यांच्या अध्यक्षतेखाली डेक्कन कॅनॉल फायनान्शिअल इम्प्रुवमेंट कमिटी स्थापन केली.

या समितीचा अहवाल १९३२ मध्ये सादर झाला. महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्थेवर दूरगामी प्रभाव टाकणारे काम १९३७ श्री.विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई प्रांतातील सिंचन विषयक अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीकडून झाले. या समितीने १९३८ मध्ये शासनाला आपला अहवाल सादर केला. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर राज्यात सिंचन विषयक विविध आयोग/समित्यांनी अहवाल शासनाला सादर केले त्याचा आढावा पुढीलप्रमाणे:

(१) महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग १९६२: राज्यातील सिंचन विषयक समस्या व जलसंपत्ती विकासाच्या संबंधित बाबी यांची चौकशी करण्यासाठी आणि त्याबाबत अहवाल सादर करणेसाठी शासनाने श्री.स.गो बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली ७ डिसेंबर१९६० रोजी पहिल्या महाराष्ट्र राज्य सिंचन आयोगाची स्थापना केली. महाराष्ट्र शासनाने या आयोगाच्या अहवालावर आपला निर्णय १९६४ मध्ये प्रसृत केला. महाराष्ट्रातील जलसिंचन कामाच्या पध्दती मूलतः या निर्णयावर आधारलेल्या आहेत. बर्वे आयोगाच्या अहवालात अवर्षणप्रवण संदर्भात असे सूचविले होते की पाण्याचे वाटप करताना टंचाईच्या प्रदेशांना विशेष प्राधान्य द्यावे.

(२) अवर्षणप्रवण क्षेत्राची सत्यशोधन (सुकथनकर समिती )१९७३: १९७२-७४ मधील भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील दुष्काळी भागाच्या अभ्यासासाठी शासनाने १९७२ मध्ये सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली टंचाईग्रस्त प्रदेशासाठी एक सत्य शोधनसमिती नेमली व तिला पाण्याच्या व सिंचनाच्या उपाययोजना बाबत सूचना करण्यास सांगितले.

(३) आठमाही पाणी वापर समिती १९७९: सन १९७२-७४ च्या अवर्षणाच्या पार्श्वभूमीवर व तत्कालिन सुकथनकर समितीच्या प्रकल्प क्षेत्राच्या विस्तारिकरणाच्या सूचनेमुळे तुटीच्या प्रदेशातील पाण्याच्या सुयोग्य नियोजनाचा प्रश्न शासनापुढे होता. म्हणून राज्य शासनाने ६ जुलै १९७८ अन्वये वाढीव क्षेत्रासाठी सिंचनाचा लाभ होण्यासाठी देऊस्कर, देशमुख व दांडेकर या तीन सदस्यांची समिती नियुक्त केली.या समितीने १४ फेब्रुवारी१९७९ रोजी शासनास अहवाल सादर केला.

(४) कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती (१९८० ): कोकणातील उपलब्ध जलसंपत्तीचा सर्वकष तांत्रिक अभ्यास करून कोकणची भौगोलिक रचना, हवामान, पर्जन्य, लागवडीयोग्य क्षेत्र, प्रचलित पद्धती व नवीन पीकरचना या सर्व बाबी विचारात घेऊन कोकण विभागाच्या सिंचन विकासाचा समयबद्ध व सुविहित असा बृहत आराखडा तयार करून सिंचन विकासाबाबत शिफारसीकरीता शासनाने पाटबंधारे मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १७ ऑक्टो. १९८० मध्ये एक उच्चाधिकार समिती नेमली. या समितीने आपला अहवाल मार्च १९८१ मध्ये सादर केला.

(५) उच्चाधिकार जैन समिती (१९८१): राज्यात जलाशयातील पाण्याचा साठा सिंचनासाठी जास्तीत जास्त उपयोगात आणणे व कृषी उत्पादन वाढविणे याबाबत सुरेश जैन यांच्या अध्यक्षतेखाली १९८० साली उच्चाधिकार समिती स्थापन केलीया समितीने आपला अहवाल नोहेंबर १९८१ मध्ये सादर केला.

(६) राज्यातील प्रादेशिक-अनुशेष दांडेकर समिती (१९८४):प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील प्रादेशिक असमतोल दूर करणेकरीता सत्यशोधक समितीची स्थापना शासनाने ३ ऑगस्ट १९८३ रोजी केली.या समितीने आपला अहवाल ३० एप्रिल १९८४

रोजी शासनास सादर केला. यात सिंचन विस्तार कामाचा परामर्श घेण्यात आला. राज्यातील अनुशेष काढण्यासाठी राज्याच्या निधींपैकी १५% रक्कम राखून ठेवावी व प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी एक संवैधानिक प्राधिकरण स्थापावे.

(७) कसबेकर अभ्यास गट: राज्यातील निर्मित सिंचन क्षमतेचा वापर व त्या प्रमाणात वाढविणारे उपाय सुचविण्यासाठी पी.डी.कसबेकर यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने १६ जानेवारी१९८४ साली एक अभ्यास गट स्थापन केला होता.

(८) डॉ सुब्रमण्यम समिती १९८७ :महाराष्ट्र शासनाने ५ मार्च १९८४ रोजी डॉ सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली अवर्षण प्रवण क्षेत्र पुनरावलोकन समिती स्थापन केली. या समितीने अहवाल शासनास १९८७ रोजी सादर केला.

(९) श्वेतपत्रिका १९९५: पिण्याच्या पाण्याच्या समस्या सोडविण्यासाठी ग्रामीण व नागरी विभाग करीता बरीच मोठी गुंतवणूक होऊनसुध्दा पाणी समस्येचे गांभीर्य कमी न झाल्याने शासनाने सर्वमान्य धोरणासाठी २६ जुलै रोजी पिण्याचे पाणीपुरवठा कार्यक्रमावर श्वेतपत्रिका काढली.

(१०) दुसरा सिंचन आयोग १९९५ :सिंचन विकासाच्या संदर्भात नव्याने विचार करण्यासाठी दुसरा सिंचन आयोग नेमण्याचा विचार १९९५ मध्ये सुरु झाला. हा आयोग माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला. पाण्याचा विचार एकाच कप्प्यात न होता अधिक व्यापक संदर्भात होऊ लागल्यामुळे महाराष्ट्रात सर्वत्र अनुकूलता वाढली. सध्याच्या महाराष्ट्राचा सिंचनप्रवास हा त्या आयोगाने ऑक्टोंबर१९९९ मध्ये केलेल्या शिफारशीला अनुसरून चालू आहे.

(११) केळकर समिती:राज्य पातळीवर विकासाचा समतोल राखण्यासाठी मागे राहिलेल्या विभागांच्या बाबतीत कोणत्या उपाय योजना करता येतील हे सुचविण्यासाठी डॉ विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. ज्या भागात सिंचनाच्या सोयी उपलब्ध आहेत त्यांचा विकास झालेला आहे व ज्या भागात सिंचन अनुशेष आहे त्यांचा विकास झालेला नाही असे समितीने स्पष्ट केले आहे.

(१२) माधवराव चितळे समिती :महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्रात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशीसाठी महाराष्ट्र शासनाने २०१२ मध्ये माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष चौकशी समिती नेमण्यात आली होती.या समितीने आपला अहवाल ११ जून २०१४ रोजी सादर केला.

**जलसिंचनाच्या समस्या:**

(१) खर्च लाभ गुणोत्तर कमी: जलसिंचनाचे प्रकल्प उभारण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणत खर्च करावा लागतो. परंतु त्या तुलनेने मिळणारे लाभ मात्र कमी मिळतात. महाराष्ट्राच्या जलसिंचनाच्या बाबतीत असे म्हटले जाते की गुंतविलेल्या रकमेपासून उत्पादनाच्या स्वरुपात किंवा पैशाच्या स्वरुपात झालेला लाभ अतिशय निराशाजनक आहे. सिंचनाची सोय झाल्यानंतर उत्पादनातील अपेक्षित वाढ झाली नाही. मध्यम व मोठ्या प्रकल्पातील खर्च लाभ गुणोत्तर विचारात घेता त्यांचे कार्य समाधानकारक नाही. अनेक प्रकल्पावरील प्रती तोट्याचे प्रमाण वाढत आहे.

(२) सिंचन क्षमतेचा अपुरा वापर: सिंचन प्रकल्पामधून निर्माण झालेली क्षमता आणि प्रत्यक्ष वापरात असलेली क्षमता यामध्ये मोठा फरक आहे. प्रकल्प उभारणीस व प्रकल्प उभारणीनंतर कालव्याची कामे पूर्ण करण्यास होणारी दिरंगाई, पावसाळ्यात प्रकल्पांच्या पाण्याचा शेतकऱ्याकडून वापर न होणे, शेतकऱ्यांचा अपुरा प्रतिसाद व अल्प सहभाग, सिंचन प्रकल्पातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा

निरुत्साह, पाणीपट्टीचे अधिक दर, समन्वयाचा व नियोजन अभावामुळे निर्मित सिंचित क्षमतेचा पर्याप्त वापर न झाल्यामुळे क्षमता वाया जाते.

(३) अकार्यक्षम व्यवस्थापन: जलसिंचन प्रकल्पातील व्यवस्थापन अकार्यक्षम आढळते. पाणी व त्याच्या वापराबाबत अधिकारी, कर्मचारी व शेतकरी कोणीही गंभीर असत नाहीत. सदोष व्यवस्थापनामुळे पाण्याचा गैरवापर होतो. पाणीपट्टी दर आकारणी, सुपरव्हिजनचा अभाव, भ्रष्टाचार, पारदर्शकतेचा अभाव, यामुळे जलसिंचनाच्या वापरात वाढ होत नाही.

(४) पाण्याचा गैरवापर: पाणी हे जीवन आहे. पाणी हे पैशापेक्षाही महत्वाचे आहे असे असताना जलसिंचन प्रकल्पातील पाणी उघड्या, मोठ्या प्रमाणात पाझर असणाऱ्या कालव्यातून शेतीला पुरविले जाते.त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. शेतीला गरजेपेक्षा जास्त पाणी वापरले जाते. पाणी पिकांना देण्याएवजी पाणी जमिनीला दिले जाते. त्यामुळे शेतात पाणी साठून राहते. पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे जमिनीचा पोत कमी होतो.

(५) क्षारपड जमिनीच्या प्रमाणात वाढ: शेतीला पाटाद्वारे पाणी दिले जाते. शेतकऱ्यांचा असा समज असतो,जास्त पाणी म्हणजे जास्त उत्पादन कै. अप्पासाहेब पवार यांचे मतानुसार शेतकरी ऊसाला/शेतीला ठिबक सिंचना ऐवजी ठिबक सिंचनाद्वारे पाणी देतात.शेतीला कालव्याद्वारे अतिरिक्त पाणी दिल्याने जमिनी सतत ओलसर राहतात. त्या जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढून जमिनी क्षारपड बनतात. क्षारयुक्त जमिनीची उत्पादकता जवळ जवळ नष्टच होते. सिंचन प्रकल्पाच्या क्षेत्रात अशा क्षारपड जमिनींची मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

(६) पूनर्वसनाचा प्रश्न:मोठया जलसिंचन प्रकल्पामुळे फार मोठ्या प्रमाणात शेतजमीन, आजूबाजुची गावे, जंगले, वसाहती पाण्याखाली जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक मोठ्या प्रमाणात विस्थापित झाले आहेत. अशा विस्थापितांचे योग्य पुनर्वसन केले जात नाही. त्यांना त्यांच्या जमिनी व घरांचा योग्य मोबदला व तो वेळेत दिला जात नाही. त्यांना मोठ्या प्रमाणात हाल अपेष्टांना तोंड द्यावे लागते. विस्थापित लोकांच्या पुनर्वसनाबाबत शासन व शासकीय अधिकारी फारसे गंभीर दिसत नाहीत त्यामुळे पुनर्वसनाची समस्या गंभीर बनली आहे.

(७) सिंचन प्रकल्पाच्या देखभालीचा प्रश्न: जलसिंचनामध्ये धरणाची व कालव्याची देखभाल महत्वाची असते. सिंचन प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी व पाणी वाया जाऊ नये यासाठी सिंचन प्रकल्पाची देखभाल वेळोवेळी करावी लागते. महाराष्ट्रात देखभालीसाठी यंत्रणा आहे. परंतु ती अपूरी व अकार्यक्षम आहे. प्रकल्पाच्या व कालव्याच्या देखभालीकडे दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे प्रकल्पांची व कालव्यांची गळती मोठ्या प्रमाणात वाढते. देखभाल व दुरुस्ती अभावी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. देखभालीचा खर्च येतो तो केला जात नाही.

(८) पीकरचनेचा प्रश्न: जलसिंचन प्रकल्पामुळे दुष्काळी भागात पाणी उपलब्ध झाले आहे. परंतु पाणी उपलब्ध झाल्याबरोबर शेतकरी कमी पाण्यावर येणारी पिके घेण्याएवजी अधिक पाणी लागणारी ऊस, केळी अशी पिके घेण्यास सुरवात करीत आहेत. तसेच अन्नधान्याचा लागवडी खालील क्षेत्र कमी होऊन नगदी पिकांखालील क्षेत्र वाढत आहे. खाद्यान्न, कडधान्य इ. पिकाखालील क्षेत्रात घट होत आहे.

(९) अपूरे सिंचन प्रकल्पांचा प्रश्न: महाराष्ट्रात पाण्याची समस्या सोडविण्यासाठी राजकीय हेतूने प्रेरित होऊन भविष्याचा, आर्थिक बाजूचा,

वास्तवतेचा विचार न करता अनेक जलसिंचन प्रकल्प सुरु केले आहेत. अनेक सिंचन प्रकल्प नियोजानाअभावी व भांडवलाअभावी अपूरे आहेत मोठे प्रकल्प हाती घेतल्याने ते पूर्ण करण्यासाठी दीर्घ कालावधी लागतो व त्यामुळे सिंचन प्रकल्पाच्या किमतीत वाढ होते. अपूऱ्या सिंचन प्रकल्पाचा खर्च वाढलेला आहे तो पूर्ण न केल्याने सिंचन प्रकल्पाचा वापर करता येत नाही.

(१०) नैसर्गिक असमतोल: मोठ्या प्रकल्पापासून मिळणारे फायदे हे मध्यम व लघुसिंचन प्रकल्पापेक्षा कमी असतात तर धोके, तोटे जास्त असतात. अलिकडे मोठ्या सिंचन प्रकल्पाच्या मोठ्या धोक्याकडे लक्ष वेधले जात आहे. तो धोका म्हणजे निसर्गातील समतोल वातावरण बिघडून विविधप्रकारची प्रदूषणे निर्माण होत आहेत व अशा प्रदूषणामुळे भावी पिढ्यांना प्रतिकूल परिणामांना तोंड द्यावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

(११) सिंचननिधीचा प्रश्न: महाराष्ट्रामध्ये जलसिंचन प्रकल्प उभारणीचा खर्च प्रचंड मोठा आहे. जलसिंचन प्रकल्प उभारण्यासाठी लागणारा आवश्यक निधी महाराष्ट्र शासनाकडे उपलब्ध नाही. महाराष्ट्रातील अपुरे जलसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जवळ जवळ १ लाख कोटी रुपयाच्या निधीची गरज आहे. निधी अभावी महाराष्ट्रातील अनेक सिंचन प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत केंद्रशासनाकडून राज्यातील सिंचन प्रकल्पासाठी वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत मिळणारे अनुदान कमी झाले आहे. तसेच १२ व्या योजनेत पाटबंधारे व पूर नियंत्रण यासाठी खर्चाची तरतूद कमी झालेली आहे सिंचन प्रकल्प पूर्ण करणेसाठी राज्याने केंद्राकडे ३६००० कोटी रुपयाची मागणी केली असताना केंद्राने फक्त रु.३६०० कोटी देण्याचे कबूल केले आहे.

(१२) पाण्याच्या बाष्पीभवनाचा प्रश्न: महाराष्ट्रात बाष्पीभवनाचे प्रमाण मोठे आहे. जलाशयातून, कालव्यातून, सिंचन क्षेत्रावरून पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होते. महाराष्ट्रात मोठ्या सिंचन प्रकल्पातून १४%, मध्यम स्वरूपाच्या प्रकल्पात२३%, व लहान धरणात २४% बाष्पीभवन होते. रत्नागिरी जिल्ह्यात बाष्पीभवनाचे प्रमाण सर्वात कमी (१४७८ मि.मि.) आहे. तर महाराष्ट्रात सर्वात जास्त बाष्पीभवनाचे प्रमाण अमरावती व जळगावमध्ये होते. पाण्याच्या एकूण साठ्यापैकी ४०%पाण्याचे बाष्पीभवन होते ते कमी केले पाहिजे.

(१३) पाण्याच्या गळतीचा प्रश्न: राज्यात अनेक धरणांना व कालव्यांतून पाणी गळती मोठ्या प्रमाणात होत आहे. धरणे व कालव्याच्या भेगा व तडे निसर्गामुळे कमी पडल्या असून ते मानवनिर्मित अधिक आहेत. कालव्यातील पाण्याची गळती हा राज्याच्या पाणी वाटपातील मोठा अडसर आहे. परंतु त्यासाठी कधीच पुरेसा निधी उपलब्ध होत नाही. कालव्या ऐवजी बंद पाईपमधून पाण्याचा वापर अधिक कार्यक्षम होऊ शकतो हे माहित असूनही गेल्या पाच दशकात त्या दृष्टीने पाउल उचलले गेलेले नाही.

(१४)पाण्याचे असमान वाटप: महाराष्ट्रात पाण्याचे वाटप असमान होत आहे. काही भागांना पाण्याचा पुरवठा अधिक प्रमाणात, काही भागात पाण्याचा अल्प तर काही भागाना कसलेच पाणी दिले जात नाही त्यामुळे समन्यायी पाणीवाटप झाले पाहिजे.

१५) थकबाकीचे प्रमाण अधिक: सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी थकबाकीचे अधिक आहे. सिंचन पाणीपट्टी भरण्याची सवय शेतकऱ्यांना लावली पाहिजे. कारण पाणीपट्टी वसूल झाल्याशिवाय सिंचन क्षेत्रात वाढ होणार नाही म्हणून पाणीपट्टी वसुलीसाठीचे पर्यंत प्रामाणिक झाले पाहिजेत व

शेतकऱ्यांनीही पाणीपट्टी जबाबदारीने भरली पाहिजे.

## समारोप:

समाजाचे पाण्याशी असलेले नाते खूप बदललेले आहे म्हणून पाण्याच्या संदर्भातील व्यवहारांची नवी हितकारक व्यवस्था उदयास आणणे गरजेचे आहे. पाण्याचा नीट वापर, पाण्याची बचत ही संकल्पना अलिकडील काळात पैशाच्या बचतीप्रमाणे वापरली पाहिजे भविष्यात निर्माण होणारी पाणी टंचाई व निर्माण होणाऱ्या समस्येचे गांभीर्य सर्वांना समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. गेल्या काही दिवसापासून महाराष्ट्रात पाणी प्रश्न अधिकच गंभीर बनू लागला आहे. पाण्याबद्दलची जनजागृती, पाण्याचा काटकसरीने वापर, पुनर्वापर व जलसाक्षरता याकडे सर्वांनीच जागरुकपणे पहिले पाहिजे. तरच पाणीप्रश्न कमी होण्यास मदत होईल व जलसिंचन क्षमतेत वाढ होईल.

।। पाणी आहे तर भविष्य आहे ।।

।। पाण्याला म्हणतात जीवन, तेच येथे नाही ।।

## संदर्भसूची:


१. *महाराष्ट्र जलसिंचन आयोग अहवाल, खंड-१, तात्विक विवेचन*, महाराष्ट्र शासन, जून १९९९.

२. *महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-पर्यायी दृष्टिकोन*, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, २०१५.

३. मोरे दि.मा., *सिंचन चिंतन*, महाराष्ट्र सिंचन सहयोग, औरंगाबाद, २०११.

४. *महाराष्ट्र आर्थिक पाहणी*, २००८-०९ ते २०१५-१६.

५. भोसले काटे-दामजी, *कृषी अर्थव्यवस्था*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. देसाई-भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था*, निराली प्रकाशन, पुणे.

७. सावंत प्रकाश, *कृषी भूगोल*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. *सिंचन क्षेत्रातील परिवर्तन*, ७ वी महाराष्ट्र सिंचन परिषद, नाशिक.

९. पाटील जे.एफ., *भारतीय शेतीचे अर्थकारण*, कोल्हापूर, २०१५.

१०. खांदेवाले पाटील, *महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती समस्या व उपाय*, गोविंद पानसरे अमृत महोत्सव समिती, कोल्हापूर, २०१०.

११. गायकवाड बी.आर., *महाराष्ट्राचा आर्थिक विकास एक चिंतन*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

१२. ढमढेरे सुरेश, *महाराष्ट्रातील सिंचन व पाणलोट आणि जलसंधारण*, पुणे.

१३. जुगळे वसंतराव, *जलमूल्य निर्धारण*, सेंटर फॉर सोशल स्टडीज् अन्डर रिसर्च, सांगली २०११.

१४. *पाणी पाणी विशेषांक*, लोकराज्य, ऑगस्ट२००१ व २०१२, महाराष्ट्र शासन.

१५. *योजना*, जुलै २०१६, जलमाहात्म्य.

१६. *वनराई पाणी पाणी विशेषांक*, वनराई विश्वस्त मोहन धारिया, २००३.

१७. महाराष्ट्र जलसंपत्ती नियम प्राधिकरण कायदा, २००५.

१८. *जलजा*, सांगली जिल्हा जलसंधारण कार्यक्रम.

१९. पाणलोटक्षेत्र विकास मार्गदर्शिका, जलसंधारण व कृषी विभाग महाराष्ट्र शासन, २००३.

२०. पवार जयसिंगराव, *विज्ञान तंत्रज्ञान आणि प्रगती*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२१. जलसंधारण विशेषांक, साप्ताहिक वार्तामंच, विटा, २००४.

२२. Maharashtra Water Resources Dept, Vision 2020, Report Govt of Maharashtra.


२३. Dattsundharm, Indian Economy, S. Chand Company PVT. LTD. New Delhi, 2014.

२४. Misra-Puri, Indian Economy, Himalaya Publishing House-2015




क प्रकाशन,
हाराष्ट्र सिंचन
*अर्थकारण,*
*रेडवाहू शेती*
मृत महोत्सव
*क विकास एक*
*ाणलोट आणि*
ंटर फॉर सोशल
१.
ऑगस्ट२००१
ई विश्वस्त मोहन
कायदा, २००५.
कार्यक्रम.
संधारण व कृषी
*न आणि प्रगती,*
हेक वार्तामंच,
s Dept, Vision
ashtra.
omy, S. Chand
elhi, 2014.
my, Himalaya






# ई-पर्यटन

**विरेंद्र बाळकृष्ण वडेर, कोल्हापूर,**
जय हनुमान हायस्कुल व बा.वि.वडेर ज्युनिअर कॉलेज,
इस्पुर्ली, ता. करवीर, भ्रमणध्वनी: ९९२१०२७५५५

**भारतीय पर्यटन मंत्रालय व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगातील १५० देशांमधील प्रवाशांना भारतात प्रवेशासाठी ई-व्हिसा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. ऑगस्ट २०१५ पर्यंत ११३ देशांकरिता ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सध्या ई-व्हिसाला (व्ही.ओ.ए.) - व्हिसा ऑन अराईव्हल असे संबोधण्यात येते. विदेशी व परकीय पर्यटकांना भारतात आकर्षित करणे, सहज प्रवेशाची सुविधा देण्याकरिता ही नवकल्पना पर्यटन मंत्रालयाकडून वेगाने राबविण्यात येत आहे. पाकिस्तान व्यतिरिक्त जगातील बहुतेक सर्व देशांमध्ये ही सुविधा उपलब्ध आहे. ई-प्रवासी इंटरनेट सुविधांचा वापर करतात. ई-व्हिसा अदा करीत असताना सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न काळजीपूर्वक हाताळावा लागतो.**





कागदपत्रांच्या छाननीऐवजी इलेक्ट्रॉनिक्स प्रणालीवर सजग पडताळणी करणे आवश्यक असते. भारताने हे आव्हान स्वीकारले असून जागतिक पर्यटकांना अधिक क्षमतेने आकृष्ट करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

सन २०१४ मध्ये जागतिक पर्यटन व्यवसायात भारत ६५व्या स्थानी होता. सध्या भारत पर्यटन व्यवसायामध्ये जगात ५२व्या स्थानी आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक्स कौन्सिल द्वारा केलेल्या पाहणीत जागतिक पर्यटन व्यवसायाच्या तुलनेत भारतीय पर्यटन व्यवसायाचा विकास वेगाने होत आहे. परदेशी पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने ही बाब उत्कृष्ट आहे. सध्या भारतीय पर्यटन मंत्रालयाच्या प्रयत्नातून जागतिक वारसा स्थळांच्या वेबसाईटवर भारतीय ऐतिहासिक वास्तूंचा व स्थळांचा उल्लेख सन्मानपूर्वक होत आहे. त्यामुळे जगाच्या विविध देशांमधून भारताकडे पर्यटक आकृष्ट होत आहेत. भारतीय पर्यटन व्यवसायात प्रतिवर्षी १०.२% ने वृध्दी होत आहे. सध्याचे सरकार हा वृध्दी दर २०% पर्यंत नेण्याचे उद्दिष्टाने प्रेरित आहे. याकरिता ETV - Electronic Tourist Visa - ११३ देशांत उपलब्ध करून दिला असून १५० देशांत ही सुविधा देण्याचे भारत सरकारचे उद्दिष्ट आहे.

**पर्यटनः** पर्यटन म्हणजे व्यक्ती, कुटुंब किंवा समुह एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रवास करतो. मनोरंजन, फुरसत किंवा कामासाठी केलेला प्रवास म्हणजे पर्यटन होय.

**पर्यटनाचे प्रकार :** फुरसतीचे पर्यटन , आम



आदमी
निरीक्ष
जोपास
आरोग्य
मंदीतले
इ. पर्यट
मॉरिशस
येतात.
पॅरिस,
टुरिझम
हिमाचल
प्रदेशांत
युरोपियन
राहून अ
थंड हवे
संकल्पने
प्रथम पर
उष्ण क
प्रमाणात
व्हीसाच
वेगवेगळे
प्रवेशाक
असतो.
केला जा
येण्याचा
करावा ल
लागते व
रक्कम
तज्ज्ञांच्या
तपासणी
तात्पुरत्या
असतो.
कागदपत्रां
आहे त्या



आदमी, जनता पर्यटन, समुद्री पर्यटन, पक्षी निरीक्षण, वर्षा सहल, पर्यावरण पर्यटन, जोपासनाशील पर्यटन, हिवाळी/उन्हाळी पर्यटन, आरोग्य, कृषी व शैक्षणिक पर्यटन, सेक्स पर्यटन, मंदीतले पर्यटन, फोटोग्राफी पर्यटन, धार्मिक पर्यटन इ. पर्यटनाचे विविध प्रकार आहेत. स्वित्झर्लंड, मॉरिशस, मलेशिया इ. देशांमध्ये सर्वाधिक पर्यटक येतात. या देशांचा प्रमुख व्यवसाय पर्यटन आहे. पॅरिस, कोरिया, लॉस एंजिल्स हे सेक्स टुरिझमसाठी प्रसिध्द आहेत. भारतात सध्या हिमाचल प्रदेश, नागालँड, आसाम या पर्वतमय प्रदेशांत भारतीय वंशाचे अपत्य प्राप्तीसाठी युरोपियन देशातून प्रवासी येतात व ते वर्षभर तेथे राहून अपत्य प्राप्तीनंतर मायदेशी परततात. अति थंड हवेच्या देशांतून येणारे हे प्रवासी सरोगेट मदर संकल्पनेनंतर या प्रकारच्या पर्यटनास भारतास प्रथम पसंती देत आहेत. कारण भारतासारख्या हा उष्ण कटिबंधीय प्रदेशात प्रजोत्पादन अधिक प्रमाणात होण्यास सहाय्य होते.

**व्हीसाचा अर्थ:** प्रत्येक देशाचे नियम व कायदे वेगवेगळे असतात. एका देशातून दुसऱ्या देशात प्रवेशाकरिता परवाना पत्र (व्हिसा) आवश्यक असतो. प्रत्येक देशाच्या नियमानुसार व्हिसा अदा केला जातो. याकरिता त्या व्यक्तीस त्या देशात येण्याचा उद्देश व वास्तव्याचा कालावधी नमूद करावा लागतो. परतीचे तिकीट आधी खरेदी करावे लागते व वास्तव्य काळात आवश्यक खर्चाची रक्कम बँक खात्यावर जमा असावी लागते. तज्ज्ञांच्या मते व्हिसा म्हणजे कागदपत्रांच्या आधारे तपासणी करून दिलेला परवाना होय. व्हिसा हा तात्पुरत्या स्वरूपाचा व विशिष्ट कालावधीकरिता असतो. अर्जदाराचे पासपोर्ट व प्रवासासंबंधी सर्व कागदपत्रांची छाननी केली जाते. ज्या देशात जायचे आहे त्या देशात प्रवेश करण्यापूर्वी व्हिसा घेणे आवश्यक असते. पासपोर्ट असल्याखेरीज व्हिसा दिला जात नाही.

**ई-व्हिसा:** भारतात सध्या पर्यटन मंत्रालय व प्रवासी वाहतूक नियामकांद्वारे इलेक्ट्रॉनिक्स व्हिसा प्रवाशांना उपलब्ध करून दिला जातो. देशातील विमानसेवा, विमानतळ, जहाजे व बंदर याद्वारे व सरकारद्वारा निर्गमित इलेक्ट्रॉनिक्स सिस्टमवर कार्यरत संस्था, भारत सरकार व सहयोगी कंपनीद्वारा हा व्हिसा अदा केला जातो. ज्याला व्हिसा ऑन अरायव्हल (VOA) असे म्हटले जाते. कालांतराने इलेक्ट्रॉनिक्स टुरिस्ट व्हिसा (ETV) असे संबोधन केले जात आहे.

**इलेक्ट्रॉनिक्स माध्यमाची उपयुक्तता:**

ई प्रवाशांना इंटरनेट सुविधा आवश्यक असते. संगणक किंवा मोबाईल वरील विविध ॲप्सची माहिती व त्याचा वापर करण्याच्या पध्दतीचे ज्ञान आवश्यक असते. विविध सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. त्यामुळे मध्यस्थ वा एजन्सीची आवश्यकता भासत नाही. प्रवासी स्वत: ऑनलाईन तिकीट बुकींग, हॉटेल बुकींग करू शकतो. हवाई जहाजाचे तिकीट, कार, बस, हॉटेल इ. विविध सेवा व प्रवासात आवश्यक पॅकेजेस विविध वेबसाईटस्‌वर उपलब्ध आहेत. हॉटेल्स वा विविध सुविधांच्या किंमतीबाबत तुलना करून योग्य पर्याय निवडणे ग्राहकाच्या हातात असते. हे पोर्टल सर्व भाषांमध्ये उपलब्ध आहेत.

**सध्या भारतात उपलब्ध कॅशलेस बँकींग ॲप्स्:** नोव्हेंबर २०१६ मधील विमुद्रीकरणामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये बरेच बदल घडले. यापूर्वीच्या क्रेडीट व डेबिट कार्डबरोबर (प्लास्टिक मनी) एटीएम सुविधांचा लाभ घेतला जात होता. इंटरनेट बँकींग काही प्रमाणात होत होते. ई पर्यटनामध्ये या सुविधा अधिक वापरात आहेत. जवळ रोकड रक्कम वापरण्याऐवजी प्लास्टिक

मनी, यु.पी.आय., ई-वॉलेंटस्, मोबाईल बँकींग इ. सुविधा या प्रवाशांना सुलभ वाटतात. सध्या भारतात केंद्र सरकारने ३० डिसेंबर रोजी भीम मोबाईल ॲप सादर केले. 'भीम' च्या (भारत इंटरफेस फॉर मनी) ३३ सहयोगी बँका आहेत. याचबरोबर यु.पी.आय. (युनिफाईड पेमेंट इंटरफेस) ई वॉलेट, मोबाईल वॉलेट द्वारे ऑनलाईन व्यवहार करता येतात. मोबाईल बँकींगमध्ये एसएमएस व यु.एस.एस.डी. (अन्स्ट्रक्चर्ड सप्लिमेंटरी सर्व्हिस डेटा) या पध्दती वापरल्या जातात. एम.पासबुक, ई-पासबुक इत्यादी सुविधा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनाखाली नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशनच्या माध्यमातून निर्माण झालेल्या वेबसाईटद्वारे ज्या त्या बँकातील ग्राहकांना उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

**ई-पर्यटन जागतिक स्तर:**

१. युरोपमध्ये सन २००९ मध्ये जगातील एकूण प्रवाशांपैकी १८% प्रवाशांनी ई-पर्यटनाचा पर्याय निवडला आहे. यापैकी ३३% प्रवाशी स्वतः ऑनलाईन असतात.

२.सन २००५ मध्ये युनायटेड स्टेटस्मध्ये ३०% प्रवासी इंटरनेटद्वारा प्रवास करताना आढळून आले.

३.युरोपमध्ये ८०% हॉटेल्सची स्वतःची वेबसाईट आहे.

४. ऑस्ट्रिया मध्ये ९०% वेबसाईटस्वर ६३% हॉटेल्सच्या जाहिराती असतात तर ७३% प्रवाशी यावर बुकींग करत असल्याचे दिसून येते.

**भारतातील ई-सेवा:** अमेरिका व युरोपियन राष्ट्रातील प्रवाशांना भारत सरकार विशेष सुविधा पुरविते. त्यामुळे सन २०१४-१५ मध्ये १७.६८ मिलियन विदेशी पर्यटक भारतात आले. गतवर्षीपेक्षा १०.२% ने हे प्रमाण अधिक आहे. या प्रवाशांमुळे १,२२,३२० कोटी रुपयांचे विदेशी चलन प्राप्त झाले. गतवर्षीपेक्षा हे १४.५% ने

**तक्ता क्र. १: भारतात विदेशी पर्यटकांचे आगमन**

| वर्ष | भारतात विदेशी पर्यटकांचे आगमन (मिलियनमध्ये) | मागील वर्षाची टक्करीतील बदल |
|---|---|---|
| २००५ | ३.९२ | १३.३ |
| २००६ | ४.४५ | १३.५ |
| २००७ | ५.०८ | १४.३ |
| २००८ | ५.२८ | ४.० |
| २००९ | ५.१७ | -२.२ |
| २०१० | ५.७८ | ११.८ |
| २०११ | ६.३१ | ९.२ |
| २०१२ | ६.५८ | ४.३ |
| २०१३ | ६.९७ | ५.९ |
| २०१४ | ७.६८ | १०.२ |
| २०१५ (ऑगस्ट) | ५.०७ | ४.५ |

*स्त्रोत - मिनिस्ट्री ऑफ टुरिझम - गव्हर्मेंट ऑफ इंडिया.*

अधिक आहे. भारतातील मध्यप्रदेश टुरिझम, गुजरात टुरिझम, इनक्रेडिबल्स इंडिया, छत्तीसगड, पंजाब व ओरिसा, गोवा या राज्यांच्या वेबसाईटस्ना विदेशी नागरिकांची भेट असते.

**भारतात विदेशी पर्यटकांचे आगमन:**

जागतिक पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भारत सरकारने विविध वेबसाईटस् बनविल्या असून त्यावर भारतातील पर्यटन स्थळांची माहिती दिली आहे. उदा. वाघ, रॉयल बेंगॉल टायगर, आशियाई सिंह, गिर नॅशनल पार्क, गुजरात यातून भारतातील नैसर्गिक आवास स्पष्ट होतो. भारतातील ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा स्थळांसोबत आध्यात्मिक व प्रार्थनास्थळांची माहिती इंटरनेटवर उपलब्ध आहे. याकरिता विदेशी पर्यटकांचे सन्मानाकरिता 'अतिथी देवो भव' व 'इनक्रेडेबल इंडिया' यासारख्या जाहिराती व व्हिडीओचा कल्पकतेने वापर करण्यात आला आहे. भारतीय पर्यटन मंत्रालयाचे अहवालानुसार भारतीय पर्यटन व्यवसायाची स्थिती आशिया खंड व जागतिक स्तरावर पुढीलप्रमाणे आहे. जागतिक प्रवाशांचे प्रमाणात भारतात येणारे विदेशी पर्यटक ०.६८% आहेत. २.९१% प्रवाशी आशिया खंडातील देशांपैकी भारतास पसंती देतात. जागतिक स्तरावर भारताचे पर्यटन व्यवसायातील स्थान ४१ वे असून आशिया खंडात भारत १२व्या स्थानी आहे.

**पर्यटन व्यवसायाद्वारे प्राप्त परकीय चलन:**

सन २००० ते २०१४ या कालावधीत भारतात विदेशी पर्यटकांनी भारतास अधिक भेट दिल्यामुळे पर्यटन व्यवसायामुळे परकीय चलनात वृध्दी झाल्याचे दिसून येते. सन २००५ मध्ये ७४९३ मिलियन डॉलर्स परकीय चलन प्राप्त झाले ते सन २०१५ च्या ऑगस्ट महिन्याअखेर पर्यटन व्यवसायाद्वारे १३०१७ मिलियन यु.एस. डॉलर्सचे परकीय चलन प्राप्त झाले. म्हणजेच दहा वर्षात जवळपास दुप्पट परकीय चलन प्राप्ती पर्यटन व्यवसायातून झालेचे दिसून येते.

**भारतातील ई-व्हिसाची सद्य:स्थिती:**

भारतीय पर्यटन मंत्रालयाच्या सन २०१४ व २०१५ च्या ऑगस्ट अखेरीस प्रसिध्द आकडेवारीवरून विविध देशांतून भारतात ई-व्हिसाद्वारे प्रवेश करणारे प्रवाशांची संख्या पुढीलप्रमाणे. सन २०१४ मध्ये भारतातील आंतरराष्ट्रीय विमानतळावर एकूण ३९०४६ ई-प्रवाशांचे आगमन झाले तर सन २०१५ मधील जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यात ही संख्या १६९९७६ इतकी अधिक झाली आहे.

**निष्कर्ष:**

भारतात ई-व्हिसामुळे जगातील विविध देशांमधून येणारे पर्यटकांमध्ये वृध्दी झाली आहे. पर्यटन व्यवसायाद्वारे परकीय चलनवृध्दी झाली आहे. ई-व्हिसा वितरण अर्ज केल्यापासून ३० दिवसात उपलब्ध होतो. ई-टुरिस्ट फी किमान ० डॉलर्स व कमाल ६० डॉलर्स असून बँक कमिशन २.५% असते. ही फी प्रवासाच्या किमान चार दिवस अगोदर भरणे आवश्यक असते. ई-प्रवाशांना आपल्यासोबत ई टिव्ही (ETV - Electronic Tourist Visa) जवळ बाळगणे अत्यावश्यक असते. भारतात एकूण १६ आंतरराष्ट्रीय विमानतळावर ही सुविधा उपलब्ध आहे. एका वर्षात दोन वेळा ई-व्हिसा वापरण्यास मुभा आहे.

**संदर्भसूची:**

1. Govt. of India, Ministry of Jourism, *Incredible India Brochure* (2013) - Retrieved from http://incredibleindia.org/images/docs/e-brochurespdf

तक्ता क्र. ३: भारतात येणारे विविध देशातील ई-प्रवासी

| अ.क्र. | देश किंवा राष्ट्रीयत्व | सन २०१४ | सन२०१५(ऑगस्ट अखेर) |
|---|---|---|---|
| १ | युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका | ३४१६ | ५३७८७ |
| २ | रशिया | २१२१ | १५२८० |
| ३ | जर्मनी | ५७० | १६४५९ |
| ४ | ऑस्ट्रेलिया | ११२४ | १४८४१ |
| ५ | कोरिया | ६६३१ | १२५१५ |
| ६ | युक्रेन | ११४९ | ७२७४ |
| ७ | मेक्सिको | १५२ | ३८९२ |
| ८ | न्युझीलंड | ४४०५ | ३६०३ |
| ९ | जपान | ५२८८ | ३९४८ |
| १० | युएई | ३६१ | ६०८० |
| ११ | सिंगापूर | ४०९५ | ३२४१ |
| १२ | ईस्त्राईल | १२२ | २९२१ |
| १३ | फिलिपाईन्स | ३७८३ | २९५८ |
| १४ | थायलंड | १२४ | २५११ |
| १५ | ब्राझील | ८८ | २०३८ |
| १६ | इतर देश | ५६१७ | १८५४० |
| | एकूण | ३९०४६ | १६११७६ |

*स्त्रोत - ब्युरो ऑफ इमिग्रेशन*


2. Government of India, Ministry of Tourism, Market Research Department (2015). *India Tourism Statistics*. Retrieved from http://tourism.gov.in/sites/default/fieles/other/India/20 Tourism/20 statistics pdf.
3. Dr. Shekhar Upadhyay : *E Tourist Visa* - Abhinav Publication - Monthly Journal of Research in Commerce & Management (March 2016).

# महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय:संधी व भवितव्य

**सोमनाथ वसंतराव पाटील**, तळेगाव ढमढेरे,
अर्थशास्त्र विभागप्रमुख, एस.एस.ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय,
तालुका शिरूर, जिल्हा पुणे.
भ्रमणध्वनी: ९८५०३८५५१७, ईमेल: patileco@rediffmail.com

जागतिक पातळीवर पर्यटन व्यवसाय प्रचंड वेगाने विस्तारत आहे. अनेक देशांनी आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून पर्यटनाला चालना दिलेली आहे. भारताला प्रचंड वैविध्यता, ऐतिहासिक वारसा व निसर्गसौंदर्य भरभरून लाभले आहे. भारताच्या आर्थिक विकासामध्येदेखील पर्यटन व्यवसायाचे योगदान वाढत आहे. मात्र उपलब्ध असलेल्या संधींचा कार्यक्षमपणे वापर करण्यात भारत मागे पडत आहे. पर्यटन व्यवसायातील समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य उपाययोजना केल्यास भारताला आर्थिक विकास व रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होऊन पर्यटन व्यवसायास उज्वल भवितव्य असल्याचे दिसते.

वेगवान आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आज प्रत्येक देश प्रयत्न करत आहे. आपल्या देशाचा विकास करण्यासाठी आपल्या देशातील बलस्थाने शोधून त्यांचा विकासासाठी कार्यक्षमपणे वापर केला जात आहे. आर्थिक विकासाबरोबरच लोकांची जीवनशैली बदलत आहे. सर्वत्र स्पर्धा, ताण-तणाव वाढत आहेत. अशा वेळी मानवास स्वास्थ्य मिळवून देण्यामध्ये पर्यटन क्षेत्र वेगाने पुढे येत आहे. जगभरामध्ये पर्यटकांची संख्या वाढत आहे. त्यामुळे पर्यटन व्यवसायामध्ये प्रचंड संधी निर्माण झाल्या आहेत.

अतिथी देवो भव ही संस्कृती असणारा भारत आणि भारतातील विविधता पर्यटकांना आकर्षित करत आहे. भारत हा पर्यटकांसाठी आकर्षण बनण्याचे कारण म्हणजे भारताला लाभलेला सात हजार पाचशे कि.मी.चा निसर्गरम्य विस्तीर्ण समुद्रकिनारा, निसर्गसंपन्न हिमालय, बारमाही वाहणाऱ्या नद्या, विविध पर्वतरांगा, धार्मिक स्थळे, विविध डोंगररांगा, भारताचा इतिहास, वने, वनस्पती, प्राणी, पक्षी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतातील आदरभाव, आतिथ्य, स्वागतसत्कार आणि चविष्ट व रुचकर खाद्यसंस्कृती या सर्व गोष्टी पर्यटकांवर भुरळ घालत असतात. आज जगामध्ये शहरीकरण वेगाने होत आहे. या शहरीकरणाबरोबरच प्रचंड प्रदुषण, वृक्षतोड, उद्यानांच्या जागी प्रचंड इमारती उभ्या राहत आहेत. संयुक्त कुटुंबपद्धतीच्या ऱ्हासामुळे संवाद घटला आहे. त्यामुळे आर्थिक सुबत्ता आली, तरी सामाजिक व मानसिक स्वास्थ्य बिघडत आहे. अशा वेळी स्वत:ला व आपल्या कुटुंबाला पर्यटन आणि भटकंतीद्वारे स्वास्थ्य

व विरंगुळा मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. यातूनच पर्यटन व्यवसायास नवीन क्षितिज निर्माण झाले आहे.

**महाराष्ट्रातील पर्यटन संधी:**

महाराष्ट्राला पर्यटन क्षेत्रात प्रचंड संधी लाभल्या आहेत. अतिशय रम्य असा विस्तीर्ण सुमुद्रकिनारा, विविध प्रकारची जंगले आणि प्राणी व पक्षी, विविध गडकिल्ले, जलदुर्ग, थंड हवेची ठिकाणे, मंदिरे, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक वारसा स्थळे, येथील खाद्य संस्कृती, ही पर्यटकांसाठी पर्वणी आहे. त्यामुळे महाराष्ट्राला खालील क्षेत्रांमध्ये अधिक संधी निर्माणाची गरज आहे. पर्यटन उद्योग हा एकाच वेळी पर्यटकांना आनंद देण्याबरोबरच देशाच्या आर्थिक विकासाला आणि रोजगारनिर्मितीला हातभार लावत आहे.

**पर्यटन आणि रोजगार निर्मिती:**

पर्यटनामुळे पर्यटन क्षेत्राच्या विकासाबरोबरच विविध उद्योग व व्यापार वाढतो. लहान व्यापारी, सेवा पुरवणारे किरकोळ विक्रेते, मार्गदर्शक, हॉटेल व निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था, एजंट, सहल आयोजक, वाहतुक व दळणवळण, मनोरंजन अशा क्षेत्रांचा विकास होतो. यातून प्रचंड रोजगारनिर्मिती होते. पर्यटन हे क्षेत्र सर्व कुशल, अकुशल, साक्षर, निरक्षर लोकांना रोजगार पुरविते.

**पर्यटन उद्योगाची व्याप्ती:**

पर्यटन हे क्षेत्र प्रचंड मोठे असून त्याच्या विविध शाखा विकसित होत आहेत. या प्रत्येक शाखेत महाराष्ट्राने चालना देणे आवश्यक आहे.

१) कृषी पर्यटन - कृषी पर्यटनाची संकल्पना ब्राझीलमध्ये विकसित झाली. मानवाला प्रथमपासूनच शेतीचे आकर्षण आहे. मात्र आज उद्योग व सेवा क्षेत्राच्या विस्ताराबरोबर तो शेतीपासून दूर जात आहे. अशा वेळी शेतीमध्ये पर्यटकांना आकर्षित करणारी निवासस्थाने, उद्याने, विविध वनस्पतींची माहिती व उपयोग, बैलगाडीच्या सफरी, आकर्षक टेकड्या, तळे, विहिरींची निर्मिती करून व ग्रामीण खाद्य संस्कृती निर्माण केल्याने आज पर्यटक आकर्षित होत आहेत. पर्णकुटी, कृषी प्रक्रिया उद्योग उदा. फळांचे रस, लोणचे, पापड इ., शेतमाल विक्री, आरोग्यवर्धक पदार्थनिर्मिती, आयुर्वेदिक वनस्पतींची लागवड व जोपासना, आयुर्वेदिक औषध निर्मिती या क्षेत्रात प्रचंड वाव आहे.

२) साहसी पर्यटन : महाराष्ट्राला प्रचंड मोठी सह्याद्रीची पर्वतरांग असून ती गिर्यारोहण, जंगल भ्रमंती व ट्रेकींगसाठी पर्यटकांना खुणावत आहे.

३) ऐतिहासिक पर्यटन - महाराष्ट्राला फार मोठा ऐतिहासिक वारसा आहे. महाराष्ट्र हा गड किल्ल्यांनी समृद्ध आहे. प्रत्येक गड आणि किल्ल्यावर अनेक लढाया घडलेल्या आहेत. प्रत्येकाचा स्वतंत्र इतिहास आहे. आज हा इतिहास जाणून घेण्याची उत्सुकता वाढत आहे. उदा. रायगड, सिंधुदुर्ग, शिवनेरी आदि.

४) धार्मिक पर्यटन - महाराष्ट्र ही साधुसंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक मंदिरे, पंढरीची वारी, गणेशोत्सव, यात्रा, जत्रा या ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढत आहे. शिर्डी, तुळजापूर, पंढरपूर, शेगाव, अक्कलकोट, नाशिक, जेजुरी, अष्टविनायक येथील क्षेत्रांच्या विकासास वाव आहे.

५) शैक्षणिक पर्यटन - महाराष्ट्र हा शैक्षणिक बाबतीत आघाडीवर असून पुण्यास विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. अनेक देशांतून शिक्षणासाठी विद्यार्थी येतात. शिक्षणाबरोबरच योग अभ्यास, आरोग्य, ध्यानधारणा, मानसोपचार या हेतूंनी पर्यटन वाढत आहे.

६) थंड हवेची ठिकाणे - महाबळेश्वर, लोणावळा,

खंडाळा, माथेरान ही थंड हवेची ठिकाणे महाराष्ट्र पर्यटन वैभवात भर घालत आहेत.

७) पर्यटन स्थळांची प्रसिद्धी व गाईड - या क्षेत्रात संधी वाढत आहेत. आज महाराष्ट्रातील अजिंठा, वेरूळ, महाबळेश्वर, पाचगणी अशी ठराविक क्षेत्रेच लोकांना माहीत आहेत. मात्र अनेक ठिकाणे दुर्लक्षित आहेत. त्यांचा विकास करून त्यांना प्रसिद्धी देणे व या सर्व ठिकाणांची माहिती देण्यासाठी स्थानिक लोकांना गाईडचे प्रशिक्षण देऊन पर्यटन क्षेत्र निर्मितीस मोठी संधी आहे.

**भारताच्या पर्यटन उद्योगात महाराष्ट्राचे योगदान:**

भारताच्या पर्यटन उद्योगात महाराष्ट्र महत्त्वाचे योगदान देत आहे. २०१५ च्या आकडेवारीनुसार देशातील प्रमुख १० राज्यांमध्ये देशांतर्गत पर्यटकांनी भेटी दिलेल्यांमध्ये महाराष्ट्र ५ व्या स्थानी होता, तर देशांतर्गत एकूण पर्यटकांमध्ये महाराष्ट्राला भेट दिलेल्या पर्यटकांचा वाटा ७.२ टक्के होता.

विदेशी पर्यटकांच्या बाबतीत मात्र महाराष्ट्र आघाडीवर असून एकूण विदेशी पर्यटकांपैकी १८.९ टक्के पर्यटकांनी महाराष्ट्रास भेट दिली व महाराष्ट्र देशात तामीळनाडूनंतर दुसऱ्या स्थानावर होता. थोडक्यात, देशांतर्गत पर्यटकांना आकर्षित करण्यात महाराष्ट्र खूपच मागे असल्याचे दिसते.

**महाराष्ट्रातील पर्यटन वृद्धीसाठी उपाय:**

महाराष्ट्राला सौंदर्याचे वैभव लाभलेले आहे. महाराष्ट्रात जगात मान्य केलेली ११ भौगोलिक वैशिष्ट्ये आहेत. मात्र असे असूनही पर्यटन विकासात आपण अधिक प्रगती का करू शकत नाही, हा प्रश्न आहे. महाराष्ट्रातील पर्यटन वृद्धीसाठी खालील उपाय करता येतील.

१) पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांचा विकास:

आज पर्यटनक्षेत्राच्या ठिकाणी अनेक मूलभूत समस्या आहेत. रस्ते, वीज, पाणी, निवास व्यवस्था, संपर्क साधने यांच्या सुविधा मर्यादित आहेत. स्वच्छता, आरोग्य यात महाराष्ट्र मागे पडत आहे. अशा वेळी या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

२) स्थानिक लोकांचा सहभाग आवश्यक:

पर्यटन स्थळांचा विकास व विस्तार करताना स्थानिक लोकांना विश्वासात घेणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यटनस्थळांच्या विकासामुळे या स्थानिकांना होणारे लाभ व रोजगार संधीबाबत अवगत केले पाहिजे. त्यामुळे ते अशा स्थळांचा विकास करण्यासाठी स्वतः होऊन सहभागी होतील. अन्यथा त्यांचा विरोध असल्यास ते पर्यटकांशी सहकार्य करणार नाहीत.

३) स्थानिक उद्योगांना चालना आवश्यक:

पर्यटनामागे अनेक हेतू असले तरी पर्यटकांना बदल हवा असतो. अशा वेळी स्थानिक भागात उपलब्ध असणारेही साधने वापरून अथवा स्थानिक मालावर प्रक्रिया करणारे उद्योग विकसित केल्यास परिसरातील कृषीमालाला देखील चांगला भाव मिळेल. तसेच पर्यटन स्थळाबरोबरच त्या भागातील खाद्य संस्कृतीचे जतन होऊन तिला चालना मिळेल. आज जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये खाद्य संस्कृती अतिशय वेगाने पाश्चिमात्य देशांच्या बाजूने वळत आहे. वेळीच उपाययोजना न केल्यास भारतीय खाद्य संस्कृतीवर मोठा आघात होऊ शकतो. त्यामुळे स्थानिक वाण, शेतमाल, विविध मसाले, चटण्या, हुर्डा पार्ट्या, बेसन-भाकरी, भरीत पार्टी यांना उत्तेजन देणे योग्य ठरेल. मध, रस, वनस्पती, आयुर्वेदिक औषधे, कलाकुसरीच्या वस्तू, शिल्पकला, हस्तकला इ. गोष्टींच्या वापराला चालना दिली पाहिजे.

४) पर्यटकांची सुरक्षितता व विश्वास संपादन:

पर्यटन व्यवसाय हा अतिशय संवेदनशील

आहे. एखाद्या पर्यटन स्थळावर एखादी अनुचित घटना घडल्यास त्यांचे पर्यटनावर दीर्घ काळ अनिष्ट परिणाम होतात. त्यामुळे पर्यटकांची सुरक्षितता महत्त्वाची असते. केवळ कायदे करून अथवा पोलिसांचा आधार घेऊन सुरक्षितता न देता पर्यटक व स्थानिक लोक यांच्यामध्ये एक विश्वासाचे व जिव्हाळ्याचे नाते निर्माण व्हावे.

५) नवनवीन पर्यटनस्थळांचा शोध व विकास

महाराष्ट्र अनेक परिचित अशी लोकप्रिय पर्यटनस्थळे आहेत. मात्र त्याचबरोबर अनेक माहीत नसलेली अशी अज्ञात स्थळे आहेत. त्यांचा शोध घेऊन विकास करणे आवश्यक आहे. जिल्हानिहाय व तालुकानिहाय व गावनिहाय वर्गवारी केल्यास या स्थळांचा विकास होईल.

६) पर्यटन स्थळांची प्रसिद्धी आणि जाहिरात:

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. यामध्ये जागतिक कानाकोपऱ्यांतील माहिती तुम्हाला सहज उपलब्ध होत असते. अशावेळी आपण आपल्या पर्यटन स्थळांची प्रसिद्धी देण्यात व जाहिरातबाजी करण्यात अग्रेसर राहणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील अनेक पर्यटन स्थळे केवळ प्रसिद्धीच्या अभावामुळे वंचित राहिली आहेत. पर्यटनस्थळांच्या प्रसिद्धीबरोबरच तेथील सुविधा, इतर उपठिकाणे, मुख्य ठिकाणापासूनचे अंतर, प्रवास सुविधा, इ. बाबींची आकर्षक जाहिरात आवश्यक आहे. त्यामुळे ती स्थळे पर्यटकांपर्यंत पोहचतील, अशी माहिती केंद्रप्रमुख शहरांमध्ये विकसित करणे आवश्यक आहे. इंटरनेट, व्हॉटस्ॲप, फेसबुक वापरून प्रसिद्ध करावी.

७) मार्गदर्शक (गाईड) यांची नियुक्ती व प्रशिक्षण:

प्रत्यक्ष पर्यटनस्थळांचा सखोल इतिहास, विशेष बाबी, प्रसिद्ध घटना इ. बाबतचे ज्ञान पर्यटकांना मिळावे या हेतूने पर्यटनस्थळांवर मार्गदर्शकांची नियुक्ती आवश्यक असते. या मार्गदर्शकांनादेखील प्रशिक्षण दिल्यास पर्यटन सफल झाल्याचा आनंद पर्यटकांना येईल.

९) पर्यावरण व पर्यटनस्थळांचे संवर्धन:

पर्यटनाचा आनंद घेतानाच पर्यटन क्षेत्रातील पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, त्या क्षेत्राचे पावित्र्य, विविधता, संस्कार जपले जातील, याची काळजीदेखील पर्यटकांनी व स्थानिकांनी घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्या स्थळाचे महत्त्व राहणार नाही. महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. पुरातत्त्व खात्याचे कडक नियम व राज्यशासनाचे दुर्लक्ष यामुळे हा अमूल्य ठेवा नामशेष होण्याची भीती आहे. यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

### संदर्भसूची:


१) जोशी श्रीनिवास, *मार्केटिंग करण्याची गरज*, उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, जाने. १७.

२. कुलकर्णी एस. व्ही., *महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगातील संधी*, उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र.

३. दास एस. (२०११), *इकोटुरिझम, सस्टेनेबल डेव्हलपमेंट लँड द इंडियन स्टेट*, इ. पी. डब्ल्यु, सप्टेंबर १०.

४. बॅनर्जी रत्नदीप (२०१५), *भारतातील पर्यटन क्षेत्राचा आढावा - उत्कृष्ट पर्यटन विकास*, योजना, मे. २०१५.

५. इंडिया २०१३, *टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी - स्टडी इन बाय अलोचेम अँड यस बॅंक.*

६. जोशी व्ही. एम. (२०१५), *डेव्हलपमेंट अॅन्ड मार्केटिंग ऑफ टुरिझम इन महाराष्ट्र*, इंटरनॅशनल जर्नल ऑफ २०१४, मॅनेजमेंट अॅन्ड बिझनेट स्टडीज, व्हॉल्यूम ४, इश्यू ४.

७) झा एस. एम. (१९९५) *टुरिझम मार्केटिंग*, हिमालया पब्लिशिंग हाऊस, मुंबई.

८) मनदीप कौर, नितिशा शर्मा (२०१२) *ग्रोथ अॅन्ड डेव्हलपमेंट ऑफ इंडियन टुरिझम इन्डस्ट्री*, जर्नल ऑफ हॉस्पिटॅलिटी अॅप्लीकेशन अॅन्ड रिसर्च, व्हॉल्यूम ७, २०१२.

९) पर्यटन मंत्रालय, भारत सरकार.



# पर्यावरणीय पर्यटनाचा अर्थकारणावरील परिणाम

शशिकांत चंद्रकांत आंडगे, मोहोळ,
नागनाथ कॉलेज, जि. सोलापूर.
भ्रमणध्वनी: ९७६६१०४१७५, ई-मेल: shashiandge@gmail.com

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पर्यटन व्यवसायाचा झपाट्याने विकास होत आहे. मॉरिशस, सिंगापूर, हवाई बेटे किंवा भारतातील गोवा, अंदमान-निकोबार, हिमाचल प्रदेश,जम्मू व काश्मीर यांची अर्थव्यवस्था बऱ्याच अंशी पर्यटनावर अवलंबून आहेत. परंतु या बरोबर पर्यटन क्षेत्रात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. पर्यटनामुळे तरुण पिढी मादक पदार्थाच्या आहारी जात आहे, भारतीय संस्कृतीवर परदेशी संस्कृतीचा विघातक परिणाम होत आहे, पर्यटन क्षेत्रात अनौरस संतती वाढली, पर्यटन क्षेत्रही वाढत्या पर्यावरण प्रदूषणाच्या प्रभावापासून अलग राहिलेले नाही, पर्यटन स्थळे म्हणजे कचऱ्याचे ढीग आणि अस्वच्छतेचे अड्डे बनले आहेत, अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानातील पशू-पक्ष्यांच्या संख्येत अपेक्षित वाढ होऊ शकलेली तर नाहीच



उलट त्यांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे, नैसर्गिक सृष्टीसौंदर्यास अवकळा येत आहे. त्यामुळेच पर्यावरणाच्या संदर्भात पर्यटनाचा वेगळ्या विचारास पर्यावरण पर्यटन असे म्हणतात.

**पर्यावरण पर्यटन संकल्पना:** नैसर्गिक आकर्षण क्षेत्रात केलेला असा प्रवास ज्यात पर्यावरण, पर्यटन क्षेत्रातील मृदा, पाणी, वनस्पती, जैविक प्रक्रिया यांना अडथळा न आणता ऊर्जेचा किमान उपयोग, किमान प्रदूषण व स्थानिक लोकांशी स्नेह जोडून त्यांना विकासात योग्य स्थान देणे, पर्यावरणसंवर्धन व समाजामध्ये पर्यावरणाविषयी नैसर्गिक आकर्षण व आपुलकी निर्माण करणे म्हणजे पर्यावरण पर्यटन होय. पर्यावरण पर्यटनात पर्यावरण मित्रत्व, समाज मित्रत्व व बाजारपेठ मित्रत्व या बाजारपेठ मित्रत्व या तिन्ही अंगांचा विचार होतो.

**पर्यावरण पर्यटन संकल्पनेचा प्रभाव :**

पर्यावरण पर्यटनाचा पाश्चात्य देशात पर्यटन संकल्पना चांगली रुजलेली आहे. अशा पर्यावरण पर्यटनाचा चांगला विकास पूर्व आफ्रिका, मध्य अमेरिका, उत्तर अमेरिका, अंटार्टिका, हिमालय पर्वतीय क्षेत्र, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोपच्या काही भागात झालेला आहे. उदा. कोस्टारिका या राष्ट्रातील राष्ट्रीय उद्यानात दरवर्षी ३ लाख पर्यटक भेट देतात. त्यातील किमान ४०.००० पर्यटक गॅलपॅगोसला भेट देतात. हे पर्यटनाचा चांगला विकास पूर्व आफ्रिका, मध्य अमेरिका, उत्तर अमेरिका, अंटार्टिका, हिमालय पर्वतीय क्षेत्र, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोपच्या काही भागात झालेला आहे. उदा. कोस्टारिका या राष्ट्रातील राष्ट्रीयउद्यानात दरवर्षी ३ लाख पर्यटक

भेट देतात. त्यातील किमान ४०.००० पर्यटक गॅलपॅगोसला भेट देतात. हे गॅलपॅगोस डार्विनच्या जीवांच्या उत्क्रांती या सिध्दांतात अभ्यासले गेलेले बेट आहे. तेथे अनेक प्राणी आणि पक्षी त्यांच्या हजारो वर्षांच्या पूर्वीच्या सवयीने राहतात. आजही तेथे त्याच प्रकारचे पर्यावरण केवळ पर्यावरण पर्यटन संकल्पनेमुळे विकसित झालेले आहे.

**पर्यावरण पर्यटन आणि भारत:** भारतात सात महत्वाच्या पर्वतरांगा आहेत. त्यातील सर्वात महत्वाची हिमालय पर्वतरांग आपल्या देशाला वैभवशाली अशा हिमालयाची देणगी मिळाली आहे. ज्यात सिमला, डलहौसी, मसूरी नैनीताल व दार्जीलिंग ही थंड हवेची पहाडी स्थळे आहेत. ही हिल स्टेशने समुद्रसपाटीपासून १००० ते ८००० फूट उंचीवर आहेत. दुर्दैवाने भारतातील पर्वतातील स्त्रोतांमध्ये मोठा ऱ्हास होत आहे. त्यामुळे स्थानिक लोकांचे जीवन कठीण झाले आहे आणि आधीच नाजूक असलेल्या पर्यावरणाची आणखी हानी झाली आहे. त्यामुळे हिमालयाच्या दक्षिणेकडील सिंधू, गंगा व ब्रम्हपुत्रा या नद्यांच्या खोऱ्यातील जमिनींची धूप होत आहे. दरडी कोसळत आहेत. अतिशय दाट वस्तीतल्या भागातून मोठे पूर येत आहेत. हिमालयाच्या कुमॉन भागात गेल्या काही वर्षात लोकवस्ती मोठया प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे घरबांधणी, उद्योगधंदे, शेती, खाणी यांची कामे मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यामुळे उरलेल्या जमिनीतील वने नष्ट होऊ लागली आहेत.

**पर्यावरण पर्यटन संकल्पना आणि अर्थकारण:**

१. उत्पन्नाचे साधन : पर्यटनाचा उत्पन्न वृध्दीवर होणारा परिणाम अनेक प्रकारचा असतो. पर्यटनामध्ये खर्च केलेल्या रकमेचा विनियोग विविध प्रकारे होऊ शकतो. उदा. हॉटेलमध्ये जे भाडे व बिल मिळते त्याचा उपयोग हॉटेल व्यवस्थापन पर्यटकांसाठी आणलेल्या धान्य, भाजीपाला, फळे इत्यादीचे मूल्य भागवते. तसेच हॉटेलमध्ये ज्या वापराच्या वस्तू उदा. बेड्स, खुर्च्या इत्यादीसाठी त्याचप्रमाणे वीजबिल, कपडे धुलाई आणि मनोरंजन इत्यादीसाठी वापरते. प्रत्येकवेळी हा पैसा वेगवेगळ्या लोकांच्या हाती भांडवल म्हणून जातो. हा पैसा जितक्या अधिक लोकांच्या हाती जाईल तितका त्याचा अर्थव्यवस्था विकसित होण्यामध्ये होतो. परदेशी पर्यटकांमार्फत मिळणारा पैसा देशाच्या विकासासाठी अधिक उपयुक्त ठरतो. जरी हा पैसा मुख्यत्वे आयातीसाठी वापरावा लागला तरी त्याचे मूल्य देशांतर्गत पैशाच्या मूल्यापेक्षा अधिक महत्वाचे असते.

२. रोजगाराची उपलब्धता: पर्यटन हा जसा एक आर्थिक व्यवसाय आहे तसाच तो एक रोजगार उपलब्ध करुन देणारा व्यवसाय आहे. या व्यवसायात विविध प्रकारे रोजगार उपलब्ध होतात आणि त्यात अत्यंत अकुशल कामगारापासून तज्ज्ञ प्रशिक्षित विशिष्ट अनुभवी कामगारांपर्यन्त सर्वांचा समावेश होतो. पर्यटन व्यवसायामध्येही उच्चशिक्षित, विशिष्ट प्रशिक्षण घेतलेले लोक उदा. हिशेब तपासणीस, रोखपाल, आचारी, वेटर्स, हाऊसकिपर्स, मनोरंजन करणारे आवश्यक असतात. निमकुशल व अकुशल कामगारांमध्ये हमाल, झाडूवाले, माळी, स्वयंपाक घरातील गडी इत्यादी लागतात. या उद्योगामध्ये संबंधित क्षेत्रात अनेक प्रकारे रोजगार उपलब्ध होतो. उदा. घरगुती साहित्य तयार करणे, शेतीत काम करणारे, वाहतुकीमध्ये कामगार, चालक या उद्योगातील उपकरणे व त्यांचे सुटे भाग तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगार यांचाही समावेश होतो. भारतात जम्मू-काश्मीर, महाबळेश्वर येथे अनुक्रमे हिवाळा व पावसाळ्यात पर्यटनातील अकुशल कामगारांना रोजगार नसतो कारण या काळात पर्यटक फार येत नाहीत, कारण हवामान प्रतिकूल असते. अशा ऋतूतही येथे यात्रा व सवलतीचे दर इ. उपायांनी पर्यटन चालू ठेवता येते.

३. लघु उद्योग व व्यवसायांचा विकास: पर्यटनाचा अप्रत्यक्ष परिणाम देशातील निरनिराळया लघुउद्योगांच्या विकासासाठी होतो. या उद्योगांसाठी लागणारे घरगुती वापराचे फर्निचर, उपकरणे, हॉटेल व भोजनालय यासाठी लागणारे साहित्य, सुटे भाग तयार करणारे लघुउद्योग प्रमुख आहेत. याशिवाय शेती उद्योगातून निर्माण होणारी उत्पादने आणि मांस, अंडी, मासे, दूध इत्यादी प्राणीजन्य उत्पादनांचा वापर पर्यटन उद्योगात केला जातो. त्यामुळे शेती व पशुपालन उद्योगांच्या विकासास चालना मिळते. पर्यटन व वाहतूक, दळणवळण व्यवसाय यांचाही निकटचा संबंध आहे. पर्यटकांची व त्यांना आवश्यक असणाऱ्या साहित्यांची ने-आण करण्यासाठी वाहतूक व्यवसायाला महत्व प्राप्त होते. अशारीतीने पर्यटनामुळे त्या भागात इतर व्यवसायांना आर्थिकदृष्ट्या चालना मिळते.

४. भूमिउपयोजन: पर्यटन विकासामुळे भूमि-उपयोजनामध्ये बरेच परिवर्तन घडून येते. पर्यटन विकासामुळे वेगवेगळया कारणांसाठी शेतजमिनींचा वापर केला जातो. उदा. पर्यटकांसाठी निवासगृहे, हॉटेल्स बांधणे, पर्यटन क्षेत्रात अधिक रस्ते व इतर वाहतुकीची सोय करणे, पशू पक्ष्यांसाठी अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने निर्माण करणे इत्यादी. यामुळे भारतातील वाढत्या लोकसंख्येस पर्यटन क्षेत्रात रोजगार संधी उपलब्ध होऊ लागली आहे. परिणामता शेती क्षेत्रातील प्रच्छन्न बेकारीचे प्रमाण काही प्रमाणात कमी होऊ लागले आहे. पर्यटन क्षेत्राच्या विकासाबरोबरच त्या पर्यटन क्षेत्राजवळील शेतजमिनींच्या किंमती भरमसाठ स्वरुपात वाढत असल्याचे आढळते.

५. शेतकऱ्यावरील परिणाम: पर्यटनामुळे ग्रामीण भागातील लोकांना बऱ्याच सोई उपलब्ध होतात, शेतकऱ्यांचा फायदा होतो, असे काही पर्यटन योजनांच्या अभ्यासावरुन दिसून आले आहे. उदा. मेक्सिकोच्या किनाऱ्यावर उभारण्यात आलेल्या अगदी नवीन पर्यटन स्थळामुळे तेथील शेतकऱ्यांना वीजपुरवठा, पाणीपुरवठा, सांडपाण्याची व्यवस्था, वृक्ष लागवड, डांबरी रस्ते, लाटांपासून किनाऱ्यांचे संरक्षण करण्याच्या योजना, डास निर्मूलन इत्यादी योजनांचा फायदा मिळाला. तसेच कोरियातील क्योंगज योजनेनुसार तेथील साधनसंपत्तीचा विकास होऊन त्याचा फायदा तेथील ग्रामीण वस्तींना मिळाला, जलसिंचनाच्या सोई वाढून शेती उत्पादन वाढले. पर्यटनामुळे निर्माण होणारे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय विमानतळ, इमारती, रस्ते, अभयारण्ये, आरोग्यधाम इ. चा फायदा तेथील शेतकरी वर्गास निश्चित होतो. मोठ्या जमीनदारांना वरील निरनिराळया कारणांसाठी शेती क्षेत्र विकल्यामुळे त्यांचाही आर्थिक फायदा होतो.

६. प्रादेशिक विकास: पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग त्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाकरिता होतो. विकसित देशात या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न इतर उद्योगांच्या तुलनेने कमी असते. परंतु जे देश किंवा देशाचा जो भाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे त्या प्रदेशास विकासाच्या दृष्टीने निश्चित मदत होते. उदा. इंग्लंडचे स्कॉटलंड, वेल्स, नैऋत्य इंग्लंड हे तुलनात्मदृष्टचा अलग आणि आर्थिकदृष्या मागासलेले प्रदेश असून तेथे रोजगाराची समस्या महत्वाची आहे. अशा प्रदेशांच्या विकासासाठी पर्यटन विकासावर अधिक भर देण्यात आला आहे. फ्रान्समध्ये लांग्यूडू-रोझीकिओ योजनेमध्ये आर्थिकदृष्या मागासलेल्या भागात हॉटेल्स, मोटेल्स बांधून पर्यटनाला उत्तेजन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. भारतामध्ये १९९० नंतर अंदमान-निकोबार द्वीपसमूह, ईशान्य भारतामध्ये काही ठिकाणी याच कारणाने पर्यटन विकासावर भर

देऊन विकासातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशारितीने जेथे संपत्ती कमी आहे किंवा उपलब्धच नाही तेथे रोजगार व उत्पन्नाचे साधन म्हणजे पर्यटन हे आहे.

७. भांडवल गुंतवणूक: पर्यटनातसुध्दा इतर उद्योगाप्रमाणे मोठ्या प्रमाणावरील भांडवलाची आवश्यकता असते. गुंतवणूकदार हा नेहमी अशाच उद्योगात भांडवल गुंतवतो की, त्यातून त्यांना भरपूर नफा मिळू शकेल आणि त्यात निश्चितता मिळेल. या दृष्टीने पर्यटनात केलेली गुंतवणूक अधिक फायदेशीर आहे काय असा प्रश्न उपस्थित होतो. पर्यटनात गुंतलेले बहुतेक भांडवल स्थिर व कायम स्वरुपाच्या वस्तूंच्या स्वरुपात गुंतवले जाते. उदा. निवास व्यवस्थेतील भांडवल, जमिनीची खरेदी, इमारती व त्यातील फर्निचर, क्रोकरी, काचसामान, गालिचे, स्वयंपाक घरातील साहित्य इत्यादी. मेडलिकच्या मते, पर्यटनातील एकूण गुंतवणुकीच्या ९० टक्के भांडवल अशारीतीने स्थिर व निश्चित वस्तूंच्या स्वरुपात गुंतवले जाते. त्यामुळे भांडवल पर मिळण्याची शाश्वती इतर कोणत्याही उद्योगापेक्षा पर्यटनात अधिक आहे. त्यामुळे या उद्योगात भांडवलदार भांडवल गुंतवणूक करण्यास उत्सुक असतात. उपलब्ध भांडवलाचा जास्त फायद्यासाठी बिगर हंगामातसुध्दा पर्यटकांना हॉटेल्स सवलतीच्या दरात दिली जातात.

८. स्थानिक व्यवसायांना ऊर्जितावस्था: पर्यटन हा बहुतेक क्षेत्रात हंगामी तसेच जोरदार चालणारा व्यवसाय आहे. पर्यटन काळात विपुल प्रमाणात वापरात असल्या वस्तूंचे उद्योग व्यवसाय बिगर-हंगामी काळात मागणी अभावी जवळपास बंद अवस्थेमध्ये असतात. पर्यटन क्षेत्रात निर्माण होणाऱ्या इतर उद्योगांमुळे त्या प्रदेशात गोंगाट, हवेचे प्रदूषण होणार नाही, पर्यावरणास हानी होणार नाही या दक्षतेच्या दृष्टीने तेथे अवजड, रासायनिक उद्योग विकसित होऊ नयेत. याउलट संशोधन उपकरणे, घड्याळे, संगणक, तयार कपडे, हस्तकलेच्या वस्तू इत्यादी पर्यटकांकडून मागणी असणाऱ्या उत्पादनाचे उद्योग तेथे स्थापन व्हावेत. त्यामुळे स्थानिक रोजगार उपलब्ध होईल.

९. नागरीकरण: पर्यटनाचा एक दृश्य परिणाम म्हणजे नवीन मानवी वस्त्यांची निर्मिती होय. या संदर्भात पिंचेमल यांनी फ्रान्समधील पर्यटन व वस्ती यांच्या अन्योन्यसंबंधात म्हटले आहे की, या देशात उद्योगधंद्यांपेक्षा पर्यटनामुळे अधिक नविन वस्त्या निर्माण झाल्या आहेत. स्पेन मध्येसुध्दा किनारी प्रदेशात अनेक लहानलहान नवीन वस्त्या पर्यटन विकासामुळे निर्माण झाल्या आहेत. भारतामध्ये ब्रिटिश काळात अनेक पर्यटन स्थळांचा, विशेषत: थंड हवेच्या ठिकाणांचा या दृष्टीने विकास झालेला आहे. उदा. डेहराडून, उटी, सिमला, दार्जिलिंग, मसुरी, महाबळेश्वर, पाचगणी, लोणावळा इत्यादी.

१०. नविन इमारतींची उभारणी: पर्यटनामुळे नवनवीन इमारती बांधल्या जातात. डेन्मार्क, स्वीडन, फ्रान्स, संयुक्त संस्थाने व इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर अशा इमारती बांधलेल्या आहेत. याचा एक परिणाम असा की या घरासाठी जास्त किंमत देऊन ती शेतजमीन विकत घेतली जाते व जेथे उपजीविका करणारे शेतमजूर, शेतकरी, जमिनी विकत घेणाऱ्या श्रीमंतांशी स्पर्धा करु शकत नाहीत. असाच परिणाम पुणे-मुंबई महामार्गाच्या दोन्ही बाजूस दिसून येतो. तेथील मूळचे तांदूळ उत्पादन शेती क्षेत्र मुंबईतील श्रीमंत कारखानदार, सिनेकलाकार, राजकीय नेते यांनी विकत घेतलेले आहे. सध्या त्या शेतीचा वापर शेतीपिकांसाठी होत नाही. दुसरा परिणाम अशा ग्रामीण भागातील पूर्वीच्या लहानलहान वस्त्या, खेडी नाहीशी होऊन तेथे नवीन घरे बांधली जातात, खेड्यांचे पुनर्जीवन

होते. त्यांना वीकेन्ड व्हिलेजिस म्हणतात. कारण शुक्रवार ते रविवारी पर्यटकांनी गजबजलेली असतात व सोमवार ते गुरुवार ओस असतात.

११.राहणीमानावरील परिणाम: पर्यटकांमुळे पर्यटन क्षेत्रातील लोकांच्या जीवनपद्धतीमध्ये परिवर्तन घडून येते, पर्यटकांचे राहणीमान, त्यांची जीवनपद्धती, संस्कृती, त्यांचे स्थानिक लोकांशी संबंध यांचा स्थानिक लोकांवर बराच प्रभाव पडतो. हा परिणाम पर्यटक ज्या देशातून येतात. त्यावर अवलंबून असतो. उदा. पर्यटक जर अमेरिका, युरोप, जपान यासारख्या विकसित देशातून आशियाई, आफ्रिकन या अविकसित देशांत येत असतील तर त्यांचा स्थानिक लोकांवर विशेष प्रभाव पडतो. याउलट जर पर्यटक अविकसित देशांतून अविकसित देशांकडे किंवा विकसित देशांकडून विकसित देशांकडे येत असतील तर हा प्रभाव फारसा जाणवत नाही. उदा. अमेरिकन व युरोपियन पर्यटकांच्या प्रभावामुळे नेपाळसारख्या अविकसित देशांतील लोकांच्या राहणीमानात बरेच बदल झाले आहेत.

१२. आंतरराष्ट्रीय सामंजस्य: पर्यटनामुळे राष्ट्राराष्ट्रांतील मतभेद, वाद, समस्या सुटून आंतरराष्ट्रीय सामंजस्य व ऐक्य वाढीस लागते. पर्यटन हा आंतरराष्ट्रीय शांतता व सामंजस्याच्या प्रसारात उपयुक्त आहे. यामुळे केवळ राष्ट्रातील परस्पर मतभेद दूर होतात असे नव्हे तर परस्परांची संस्कृती व सामाजिक, शैक्षणिक देवाणघेवाण सुरु होते, व्यापार वाढतो. राष्ट्राराष्ट्रात ऐक्य निर्माण होऊन जागतिक युध्द, अण्वस्त्र कार्यक्रम, पर्यावरणाचे प्रश्न, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रश्न यामुळे मार्गी लागतील अशी शक्यता वाढली आहे.

१३. शिक्षण व संशोधनावरील परिणाम: पर्यटनामुळे भिन्न भिन्न देशांतील विचारांचे लोक एकत्र येतात. त्यांच्यामध्ये विचारांची देवाण घेवाण होते. त्यातून शिक्षण वृध्दी, शैक्षणिक समस्यांची जाण, अभ्यासक्रम, संशोधन इत्यादी बाबींची चर्चा होते. यातून देशोदेशींच्या शिक्षणाविषयी माहिती मिळते. शैक्षणिक, तांत्रिक क्षेत्रात देवाणघेवाण वाढण्यास पर्यटनाची मदत होते. पर्यटन हा असा मार्ग आहे की, त्यामुळे ज्ञान, शास्त्र, तंत्रज्ञान यांचा विकास होऊ शकतो.

संदर्भसूची :


1) *Development of Tourism and Travel Industry,* 1997, Premnath Dhar, Kanishka publishers, Delhi.
2) *Tourism Economic and Social Development,* 1997, Pushpinder S.Gill, Anmol Publication, Delhi.
३) शिंदे एस.बी., *पर्यटन भूगोल* ,२०११, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
४) खतीब के.ए., *पर्यटन भूगोल,* २००६, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
५) टाले रामकृष्ण व कायरकर मनिष, *महाराष्ट्रातील पर्यटन उद्योग,* अर्थसंवाद ३८, अंक १, एप्रिल जून २०१४.
६) संतोष यादव, *पर्यावरणीय पर्यटन : समस्या व भवितव्य,* योजना, ऑगस्ट २००२, प्रसिध्दी विभाग, भारत सरकार, मुंबई.
७) उषा बांदे, *पर्यावरणीय पर्यटन व पर्वतराजी,* योजना, ऑगस्ट २००२, प्रसिध्दी विभाग, भारत सरकार.
८) महेश्वर राव, *पर्यावरणीय पर्यटन पर्वतीय क्षेत्र,* योजना, ऑगस्ट २००२, प्रसिध्दी विभाग, भारत सरकार, मुंबई, महाराष्ट्र शासन.
९) जगमोहन, *पर्यावरणीय पर्यटनाच्या योजना,* योजना, प्रसिध्दी विभाग, भारत सरकार, मुंबई, महाराष्ट्र शासन.

# कृषी पर्यटनाचा इतिहास व विकास


| | |
|---|---|
| **बबन बाजीराव भापकर,** | **मुलाणी महंमद रफिक उमराव,** |
| **वालचंदनगर,** | **बारामती,** |
| अर्थशास्त्र विभाग प्रमुख, | अर्थशास्त्र विभाग प्रमुख, |
| विश्वासराव रणसिंग महाविद्यालय, | शारदाबाई पवार महिला |
| कळंब. | महाविद्यालय, शारदानगर. |
| भ्रमणध्वनी : ९४२३२५०३५८ | भ्रमणध्वनी : ९८८११६१८९३ |


पर्यटनाला हजारो वर्षाची परंपरा असून पर्यटन व भटकंती करणे ही मनुष्याची स्वाभाविक आवड आहे. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार २१ व्या शतकातील सर्वात झपाट्याने वाढणाऱ्या व्यवसायामध्ये आतिथ्य, पर्यटन हे व्यवसाय आहेत. सुट्टी मिळाली की आपल्या कुटुंबासह, मित्रपरिवारासह फिरायला जाणे व सहलीचा आनंद घेणे हा पर्यटनाचा मुख्य उद्देश असला तरी अलिकडील काळात गर्दीने वेढलेल्या स्थळाऐवजी निसर्गाच्या सान्निध्यात निवांत शांततेचे क्षण अनुभवण्यासाठी पर्यटन होत असल्याचे दिसते. अतिथी देवो भव: ही आपली भारतीय संस्कृती आहे. या संस्कृतीचा अनुबंध कृषीप्रधान भारताशी आहे. भारतीय संस्कृतीही मुख्यत: ग्रामीण भागाशी निगडित असल्याने प्रत्येकालाच आपल्या ग्रामीण संस्कृतीची ओढ असते. शहरातील धकाधकीच्या जीवनास कंटाळलेल्या प्रत्येक व्यक्तीला आनंद घेण्यासाठी निवांतपणे निसर्ग सान्निध्यात जावेसे वाटते म्हणून कृषी पर्यटन हा अलिकडे झपाट्याने विकसित झालेला पर्यटनाचा प्रकार आहे. अनेक विकसित देशात पर्यटन व्यवसायाकडे उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जाते. जगाच्या एकूण जीडीपीमध्ये आज पर्यटन व्यवसायाचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष योगदान जवळपास ०९% इतके आहे. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये पर्यटन हे रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकासाचे एक महत्वपूर्ण साधन ठरले आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास २०१७ हे वर्ष 'व्हिजीट महाराष्ट्र इयर' म्हणून साजरे करण्यात येणार आहे. देश-विदेशातून येणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्र कळावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. महाराष्ट्र सरकारने अलिकडेच पर्यटन धोरण २०१६ जाहीर केले आहे. या धोरणानुसार राज्यातील पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांचा विकास करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. १० लाख रोजगार संधी आणि रु.३० हजार कोटींची गुंतवणूक करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. नव्या पर्यटन धोरणात धार्मिक, वैद्यकिय, निसर्ग व कृषी पर्यटनाकडे खास लक्ष ठेवण्यात आले आहे. कृषी पर्यटनामुळे शेतकऱ्यांना

आर्थिक आधार मिळण्यास मदत होते. अलिकडील काळात शहरी भागातील मध्यम आणि उच्च मध्यमवर्गीयांचा कृषि पर्यटनाकडे ओढा वाढत चालला आहे.

**कृषी पर्यटनाचा इतिहास व विकास:**

अमेरिका: अमेरिकेत इ.स. १८०० व्या शतकात कृषि क्षेत्राशी संबंधित पर्यटन केले जात होते. काही कुटुंबे त्यांच्या ओळखीच्या शेती करणाऱ्या नातेवाईकांना भेटण्यासाठी उन्हाळ्याच्या सुटीत जात होते. त्यातील एक अमेरिकेतील डेलिंग कुटुंबिय उन्हाळ्याच्या सुट्टीत शेतकऱ्यांच्या शेतावर पर्यटनासाठी गेले. अमेरिकेत जरी कृषी पर्यटन उन्हाळ्याच्या सुट्टीत होत असले तरी ते फारसे लोकप्रिय नव्हते. कारण लांब अंतरावर प्रवास करण्याचे साधन चांगले नसल्याने अनेक कुटुंबांना पर्यटनासाठी जाता येत नव्हते. १९२० नंतर वाहनांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रवास करणे सुखकारक झाल्याने कृषि पर्यटन वाढण्यास मदत झाली. परंतु १९४० च्या दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने कृषी पर्यटन मंदावले होते.

इटली: लहान शेती असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीक्षेत्रात मोठा तोटा होत असल्याने इटलीतील शेतकऱ्यांनी १९५० ते १९७० च्या दशकात शेती करणे सोडून मोठ्या शहरात कामे शोधण्याचा प्रयत्न केला. तर अमेरिकेत १९६० ते १९७० च्या दशकात घोडेस्वारी पशु-पक्षी, प्राणी व कृषी क्षेत्राची माहिती घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटक कृषी पर्यटनाला पसंती देऊ लागल्याने कृषी पर्यटनाची मागणी पुन्हा वाढू लागली. १९७१ मध्ये लंडनच्या सेक्रेटरींनी शनिवार व रविवार मध्ये कृषी पर्यटन आयोजित केले व कृषी पर्यटनातून सुट्टीचा व मनोरंजनाचा आनंद घेतला. १९८० ते १९९० च्या दरम्यान व्यावसायिक सहलींची प्रथा अमेरिकेत सुरू झाली त्यामध्ये निवास, न्याहरी इ. संकल्पनांना प्रसिद्धी मिळाल्याने कृषी पर्यटनात वाढ होत गेली. पूर्वीच्या काळी शेतकरी व बिगर शेतकरी यांच्यामध्ये जी दरी होती ती दरी कृषी पर्यटनामुळे कमी होण्यास मदत झाली. इटलीमध्ये १९८५ मध्ये कृषी पर्यटनाचा कायदा पास होऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. त्याचा फायदा इटलीतील शेतकऱ्यांना होऊन शेतकऱ्यांनी अनेक कृषी पर्यटन केंद्रे चालू केली. सध्या इटलीमध्ये ०९ ते २० हजार कृषी पर्यटन केंद्रे सेवा देतांना दिसतात. युरोपीयन देशांनीही इटलीच्या यशस्वितेप्रमाणे आपल्या देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले व ग्रामीण भागात रोजगार निर्मिती केली. इटलीमध्ये तीन प्रकारची कृषी पर्यटन केंद्रे सुरू झाली. इटलीतील शेतकऱ्यांनी स्थानिक कृषीमाल कृषी पर्यटनातून विक्री करण्यासाठी प्रयत्न केले.

ऑस्ट्रेलिया : ऑस्ट्रेलियात जरी कृषी पर्यटनाला १९६५ मध्ये सुरूवात झाली असली तरी १९९१ मध्ये कृषी पर्यटन उद्योगाने ३५० दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलरचा व्यवसाय केला होता. तर कृषी पर्यटन व्यवसायाची प्रती वर्ष वाढ २० प्रतिशत इतकी होती. ऑस्ट्रेलियातील ७८ प्रतिशत व्हिक्टोरियन शेतकऱ्यांनी शेती बरोबरच कृषी पर्यटन केंद्रे सुरू करून जादा उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न केला. तर १४ प्रतिशत व्यावसायिकांनी सीडने शहराजवळील न्यू साऊथ वेल्स परिसरातील पर्यटनाचा लाभ घेण्यासाठी कृषी पर्यटन केंद्र सुरू केले. ऑस्ट्रेलियातील कृषी पर्यटन हे मनोरंजन, शिक्षण व कृषी मालाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू झाल्याचे दिसून येते.

भारत: भारतामध्ये सन १९८५-९० मध्ये सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पर्यटन क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे पर्यटन

उद्योगास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. पर्यटन उद्योगास चालना मिळाल्याने वाहतूक साधने, निवासस्थाने, करमणूक संपर्क यासारख्या मूलभूत सेवांच्या वापरामध्ये प्रचंड वाढ होऊ लागली. पर्यटन क्षेत्रास चालना मिळाल्याने पर्यटनाच्या विविध प्रकारांचा विकास होऊ लागला त्यामध्ये कृषी पर्यटन आघाडीवर असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील प्रगतीशील शेतकरी स्व. आप्पासाहेब पवार यांनी आपल्या शेतावर नाविन्यपूर्ण कृषी संशोधन अथवा प्रयोग केल्यानंतर इतर शेतकऱ्यांना फायदा व्हावा आणि कृषि क्षेत्रात प्रगती व्हावी या हेतूने आपल्या शेतावर अनेक शेतकऱ्यांना निमंत्रित करत असत. त्यांची राहण्याची, जेवण्याची सोय शेतावर करून त्यांनी केलेले अभिनव प्रयोग शेतकऱ्यांना समजावून सांगत होते. कालांतराने शुल्क आकारून कृषी अभ्यास दौरे आयोजित केले जात होते. महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचे जनक म्हणून कृषी भूषण चंद्रशेखर भडसावळे यांचे नाव उच्चारले जाते. त्यांनी अमेरिकेतील उच्च पदावरील नोकरी सोडून ते भारतात स्थानिक झाले. व सगुणा बाग नावाचे कृषी पर्यटन केंद्र उभारले. महाराष्ट्रात कृषी पर्यटन हे गेल्या पंधरा वर्षापासून नव्याने सुरू झालेले दिसते. सन २००० पासून कृषी पर्यटन केंद्र या संकल्पनेवर आधारित पर्यटन केंद्राची स्थापना होण्यास सुरूवात झाली. सुरूवातीच्या काळात २००५ पर्यंत फक्त ०२ केंद्रे सुरू झाली तर २०१० ते २०१४ या कालावधीत १३६ कृषी पर्यटन केंद्रे सुरू झाली. सध्या महाराष्ट्रात २३५ पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्रे सुरू आहेत.

भारत देशातील कृषी पर्यटन चळवळ सुरू करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. कृषी पर्यटन संकल्पना १६ मे २००४ साली बारामतीपासून औपचारिकपणे सुरू करण्यात आली. सन २००५ मध्ये ॲग्रो टुरिझम डेव्हलपमेंट कार्पोरेशन (ए.टी.डी.सी.) ची स्थापना पांडुरंग तावरे यांनी केली. ए.टी.डी.सी. कडून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कृषी पर्यटन केंद्र सुरू करण्यासाठी प्रशिक्षण, प्रोत्साहन व मदत दिली जाते. तसेच कृषी पर्यटन केंद्राची नोंदणी करून त्यांचा यशाचा आलेखही तपासला जातो. कृषी पर्यटन संस्था बारामती यांनी २००८-२००९ साली केलेल्या पाहणी व अहवालानुसार महाराष्ट्र राज्यातील कृषी पर्यटन करणाऱ्या शेतकरी कुटुंबाच्या उत्पन्नात, पर्यटनाच्या माध्यमातून ३३ प्रतिशत अधिक उत्पन्न मिळाले असून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत असे दिसून आले. भारताचे तत्कालिन केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली १२ डिसेंबर २००८ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ (मार्ट) ची स्थापना करण्यात आली. मार्टच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी कृषी पर्यटन प्रशिक्षण राबविण्यात येते व कृषी पर्यटन सुरू करण्यासाठी सर्वातोपरी मदत केली जाते. महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांमध्ये कृषी पर्यटन केंद्रे सुरू असून १ एप्रिल २०१५ ते ३० मार्च २०१६ या एका आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील कृषी पर्यटन केंद्रांना ७ लाख ६८ हजार पर्यटकांनी भेटी दिल्या आहेत. त्यामधून शेतकऱ्यांना १८ कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न कृषी पर्यटनातून मिळालेले दिसते.

कृषी क्षेत्राला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त व्हावे यासाठी संयुक्त राष्ट्र व्यवसाय परिषदेने २०११ मध्ये १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिवस म्हणून साजरा करावा अशी मान्यता दिली. त्यानंतर दरवर्षी १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. शेती पूरक उत्पन्नाचे साधन म्हणून कृषी पर्यटनाकडे पाहिले

जात असल्याने दिवसेंदिवस कृषी पर्यटन व्यवसाय चांगले मूळ धरून बहरू लागला आहे. शहरी पर्यटकांना ग्रामीण जीवनाची ओळख करून देणे व शहरी पैसा ग्रामीण भागाकडे वळविणे हा उद्देश कृषी पर्यटनातून साध्य होतो. तसेच रोजगार निर्मिती, शेतीमालाला शेतातच ग्राहक इ. हेतू यातुन साध्य होतात.

**कृषी पर्यटनाचे स्वरूप:**

कृषी पर्यटन ही एक पर्यटनांची नवीन व्यापक अशी संकल्पना असून ती मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. सन २००४ सालापासून महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने कृषी पर्यटनाचा विकास होण्यास सुरूवात झाली. शेतकरी किंवा शेतकरी गट, शासकीय, निमशासकीय संस्था, खाजगी संस्था यांनी कृषी पर्यटन संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबवली आहेत. या संस्था, समुहाच्या माध्यमातून शहरी पर्यटकांना ग्रामीण भागाकडे आकर्षित करत आहे. पर्यटकांना शेतामध्ये चालणाऱ्या प्रत्यक्ष कामामध्ये सहभागी होण्याची संधी मिळते, शेतावरील गाई, म्हैशी, शेळी, बैल, कोंबड्या, कुत्रा, मांजर यासारख्या पाळीव प्राण्यांच्या सान्निध्यात वेळ घालवता येतो. बैलगाडी, ट्रॅक्टरमध्ये बसून ग्रामीण शिवाराचा फेरफटका मारून आनंद घेता येतो. तसेच चटणी, लोणचे, दही, दूध, ताक, लोणी, वांग्याचे भरीत, कांदा यासारखे विविध पदार्थाचा आस्वाद घेता येतो.

कृषी पर्यटन केंद्राच्या माध्यमातून गावातील यात्रा, उत्सव, ग्रामीण सण, आठवडे बाजार याविषयी माहिती होते. ग्रामीण भागातील विटी दांडू, गोट्या, लंगडी, भोवरा, लंपडाव, खो-खो, कबड्डी, कुस्ती, मल्लखांब, आट्यापाट्या, सुरपारंबी यासारख्या विविध खेळांची माहिती होते. ग्रामीण भागातील विविध प्रकारचे लोकनृत्य, लोककला, गौळणी, भारूड, जागरण गोंधळ, वासुदेव याद्वारे ग्रामीण संस्कृतीची ओळख होते. ग्रामीण भागातील दगडांनी बांधलेले वाडे, पाचट-काडाचा वापर करून तयार केलेली घरे, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवितात. ग्रामीण भागातील पुरूष व स्त्रियांच्या वेशभूषा, राहणीमान याविषयी माहिती होण्यास मदत होते. तसेच शेतातील गहू, ज्वारी, मका, बाजरी, तूर, हरभरा, मूग, ऊस यासारखी पिके तसेच आंबा, केळी, चिकु, पेरू, डाळींब, सिताफळ, नारळ, भेंडी, गवार, टोमॅटो, मिरची, गाजर, कोबी, काकडी, मेथी, कोशिंबर, पालक, शेपू इ. विषयी प्रत्यक्ष शेतात फेरफटका मारून माहिती होण्यास मदत होते.

संदर्भसूची:


१) *कृषी व ग्रामीण पर्यटन मार्गदर्शिका*, तावेर पांडुरंग, कृषी पर्यटन विकास संस्था, बारामती (पुणे), दुसरी आवृत्ती - २०१६, पृ. १२, १८ ते ३४.

२) *Industry traveloregon.com/content/us...* (A Brief History of Agarituorism Internationally and in the US.)

३) *Potential for Eco-Agri-Rural Tourism in Aurangabad District : Problems and prospects*, Galhate Sunil Ranjaji, December 2009.

४) *कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित* (मार्ट), महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित (मार्ट) पुणे, पृ. ०३

५) *विस्तार कृषी पर्यटनाचा*, बराटे बाळासाहेब, लोकप्रभा (मासिक), दिवाळी अंक, २०१६.

६) *व्हिजीट महाराष्ट्र २०१७*, लोकराज्य, जानेवारी, २०१७, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. ३२ व ३३.

७) *Agri Tourism Development Corporation* (ATDC), Directory 2016.

गरण गोंधळ,
ओळख होते.
वाडे, पाचट-
ो घरे, ग्रामीण
ण भागातील
मान याविषयी
शेतातील गहू,
ा, मूग, ऊस
, चिकु, पेरू,
वार, टोमॅटो,
ी, कोशिंबर,
त फेरफटका

तावेर पांडुरंग,
ो (पुणे), दुसरी
३४.
*n/content/*
arituorism
'S.)
*ural Tour-*
*ct : Prob-*
iate Sunil


*ासंघ मर्यादित*
र्यटन सहकारी

ेब, लोकप्रभा

ा, जानेवारी,
ंचालनालय,

*t Corpo-*
2016.






# वाढत्या पर्यटन क्षेत्रात रोजगार संधी


**दिलीप पांडूरंग महाजन, चिखली,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
एस.पी.एम.तात्यासाहेब महाजन कला,
वाणिज्य महाविद्यालय, जिल्हा बुलडाणा.
भ्रमणध्वनी : ९४२०१८२१२८

**राजेंद्र रामराव गव्हाळे, खामगांव,**
सहयोगी प्राध्यापक,
पदव्युतर अर्थशास्त्र विभागप्रमुख,
जी.एस.कॉलेज.
भ्रमणध्वनी : ९४२२५४७७२२


जगातील सर्वात मोठा निर्यात उद्योग पर्यटन हा होय. जगात पर्यटनाचा हिस्सा १२.२% असून रोजगार क्षेत्रात त्याचा हिस्सा ८.१% एवढा आहे. आधुनिक युगात पर्यटनाच्या बदलत्या प्रगतीमुळे सुकर झालेल्या साधनांनी पर्यटन व्यवसाय व्यापक स्वरूप धारण करीत आहे. पर्यटक हा स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इत्यादी कैक रूपात आढळतो. भारताच्या जीडीपीच्या ३.८३% योगदान पर्यटनाचे आहे. जागतिक पर्यटनात भारताचा हिस्सा ०.३७% आहे. जगभरातील पर्यटनासाठी सुकर राष्ट्रात भारताचा



क्रमांक ६५वा आहे. ग्लोबल टुरिझम इंडेक्स २०१५ मध्ये भारत ५२व्या क्रमांकावर आहे. मात्र जगभरातील पर्यटनात खर्च करण्यात मात्र त्याच वेळी त्याचा क्रमांक २० वा आहे.

## पर्यटन व सामुदायिक विकास:

पर्यटनात गावातील खाद्यपदार्थांचा पर्यटक आस्वाद घेतो. तेथील प्रसिद्ध वस्तू विकत घेतो, त्यामुळे तेथील लोकांचा आर्थिक विकास घडून येतो. तेथील ठिकाणे पाहण्यासाठी वाहतुक व्यवस्थेचाही वापर करताना अनेकांना रोजगार मिळतो. स्थानिकांनीही अव्वाच्या सव्वा किंमती सांगून पर्यटकाला लुटू नये. कारण आपली संस्कृती अतिथी देवो भव असेच सांगते. पर्यटनाने अर्थव्यवस्थेला चालना मिळत असते.

## भारतातील पर्यटनाचा विकास:

भारतातील काही राज्यात विदेशी पर्यटक अधिक प्रमाणात आकर्षित होतात ज्यामुळे त्या राज्यातील आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. त्या राज्यातील लोकांना पर्यटन व्यवसायाद्वारे मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न प्राप्त होते. ३.४७ कोटी नोकऱ्यांचे पर्यटन मजबूत क्षेत्र आहे. भारताचे पर्यटन कार्यालय चीनमध्येही स्थापन केलेले आहे तसेच भारतात ९० दिवसांपर्यंत थांबणे आवश्यक असून १८ देशांच्या पर्यटकांसाठी ५-५ वर्षांच्या दीर्घावधीसाठी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

तक्ता क्र.१ व २ वरून असे दिसून येते की, भारतात विदेशी व स्वदेशी पर्यटकांचा ओघ

मोठ्या प्रमाणात वाढला असून मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. अलिकडेच पायाभूत पर्यटनासाठी ४४८०० कोटींची मदत काश्मीरसाठी केलेली आहे. २००४ मध्ये विदेशी पर्यटक ६५ लक्ष २००६-०७ मध्ये ४६.३३ लक्ष, २००८-०९ मध्ये ५०.७ लक्ष, २००९-१० मध्ये ३७.२ लक्ष विदेशी पर्यटक भारतात आले.

पर्यटन व्यवसायातून पर्यटन व्यवस्थापन तसेच संस्कृती, संवर्धन ही रोजगारविषयक कार्ये करू शकतात. पर्यटन ही आर्थिक उलाढालींना चालना देणारी लोकाधिष्ठित सामाजिक क्रिया असून स्थानिकांना त्यात सहभागी करून घेतले तर हा उद्देश सहज साध्य होऊ शकतो. जर पर्यटकांचे सामाजिक, आर्थिक फायदे सामाजिक स्तरावर पोहचले नाहीत तर त्याचा काही उपयोग नाही. पर्यटनात स्थानिक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक लाभ मिळाले पाहिजे.

भारतात विदेशी पर्यटक ४९% उत्तर भारतात, २९% पश्चिम भागात, १८% दक्षिण भागात तर ४% पूर्व भागात विभागले जातात. २०१५ च्या वर्षाअखेरीस पर्यटन व प्रवास क्षेत्र ३.७४ कोटी रोजगार देत एकूण रोजगाराच्या ९% भागीदार असेल. २०२५ पर्यंत या क्षेत्रात ४.६ कोटी नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे.

संयुक्त राष्ट्राच्या आकडेवारीनुसार जगात दरवर्षी २० कोटी लोक पर्यटन करतात. गेल्या दशकात यात ४०टक्क्यांनी वाढ झालेली आहे. भारतात परदेशी पर्यटक कसे वाढतील ही एकच चिंता असते. कारण भारतात परदेशी पर्यटक २% तर देशी पर्यटक ९८% अशी स्थिती आहे. परकीय चलन मिळावे हाच त्यामागचा हेतू आहे. तर देशी पर्यटकांकडेही पैसा नाही असे नाही. त्यामुळे पर्यटन स्थळांच्या ठिकाणी स्थानिकांच्या विकासास चालना मिळू शकते.

तक्ता क्र.१

विदेशी पर्यटकांची संख्या (२०१३-१४)

| राज्य | विदेशी पर्यटकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| महाराष्ट्र | ५१५६३४३ | २०.८ |
| तामिळनाडू | ३९९०४९० | २०.८ |
| दिल्ली | २३१३९५ | ११.५ |
| उत्तरप्रदेश | २०५४४२० | १०.३ |
| राजस्थान | १४३७१६२ | ७.२ |
| पश्चिम बंगाल | १२४५२३० | ६.२ |
| केरळ | ८५८१४३ | ४.३ |
| बिहार | ७६५८३५ | ३.८ |
| कर्नाटक | ६३६३३७८ | ३.२ |
| गोवा | ४९२३२२ | २.५ |
| एकूण राज्ये | १७९३७७१८ | ८९.९ |

*(स्त्रोत - पर्यटन मंत्रालय अहवाल)*

तक्ता क्र.२

| स्वदेशी पर्यटकांची संख्या (२०१३-१४) | | |
|---|---|---|
| राज्य | स्वदेशी पर्यटकांची संख्या | टक्केवारी |
| तामिळनाडू | २४४२३२४८७ | २१.३ |
| उत्तरप्रदेश | २२६५३१०९१ | १९.८ |
| आंधप्रदेश | १५२१०२१५० | १३.३ |
| कर्नाटक | ९८०१०१४० | ८.६ |
| महाराष्ट्र | ८२७००५५६ | ७.२ |
| मध्यप्रदेश | ६३११०७०९ | ५.५ |
| राजस्थान | ३०२९८१५० | २.६ |
| गुजरात | २७४१२५१७ | २.४ |
| पं.बंगाल | २५५४७३०० | २.२ |
| छत्तीसगड | २२८०१०३१ | २ |
| एकूण राज्ये | ९७२७४६१३१ | ८४.९ |

*(स्त्रोत - पर्यटन मंत्रालय अहवाल)*

भारतातील विदेशी पर्यटकांची संख्या :

| | |
|---|---|
| २०११ | ६३०९२२२ |
| २०१२ | ६६४८३१८ |

विदेशी पर्यटकांकडून प्राप्त विदेशी चलन:

| | |
|---|---|
| २०११ | ७७५९१ कोटी रु. |
| २०१२ | ९४४८७ कोटी रु. |

पर्यटन हा देशात जास्त परकीय चलन मिळवून देणारा तिसरा उद्योग आहे. पर्यटन क्षेत्रात भारतातील रोजगार ३.९५ कोटी एवढा आहे. जगातील एकूण उत्पन्नाच्या ९% आर्थिक उत्पन्न पर्यटन उद्योगातून निर्माण होतो.

**भारतीय पर्यटन स्थळे :**

धार्मिक-वाराणसी, बुद्धगया, अमृतसर, गंगोत्री यमनोत्री, अमरनाथ, तिरूपती, शिर्डी, शेगांव, श्रीनगर, द्वारका, पुरी बद्रीनाथ, रामेश्वरम्, केदारनाथ, हरिद्वार, त्र्यंबकेश्वर, मथुरा, काशी, अयोध्या, उज्जैन, कांचीपुरम इ. ऐतिहासिक: मुंबई, आग्रा, दिल्ली, जयपूर, उदयपूर, कलकत्ता, औरंगाबाद, दौलताबाद, सांची, महाबळीपुरम, कोणार्क, अजिंठा, वेरूळ, म्हैसूर, बडोदा, इंदौर, अमृतसर, चित्तोडगड, फत्तेपुर शिकरी, तंजावर, खजुराहो इ. थंड हवेचे ठिकाण : हिमालय, जम्मु काश्मीर, शिमला, नैनिताल, माऊंट अबु, ऊटी, मसुरी, कुल्लू मनाली, कोडाई कॅनॉल, महाबळेश्वर, पटणीटॉप इ. निसर्ग स्थाने: गोवा, काझीरंगा, केवलादेन, सुंदरबन, नंदादेवी, पुष्पघाटी, शालीमार, ऊलर, डल, सांभर, चिलका, लोणार

**भारतीय अर्थव्यवस्थेत पर्यटनाचे योगदान :**

पर्यटनाला आर्थिक विकासाला चालना मिळते. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढते, पर्यटन उद्योगामुळे हॉटेल्स्, वाहतुक, बँकींग क्षेत्र, अल्पोपहार गृहे यात रोजगार वाढतो. २००९-१० मध्ये या व्यवसायात एकूण व्यवसायाच्या २.७%

भांडवल गुंतले असून देशाच्या रोजगारात ७.२% रोजगार यातून मिळतो. अप्रत्यक्षपणे शेती, बांधकाम, पशुपालन, मासेमारी, दुग्धउत्पादने हस्तकला वस्तु उत्पादन या क्षेत्रातही रोजगार वाढतो. पर्यटनासाठी पर्वतीय भागात बांधलेल्या स्थानांचा उपयोग त्या क्षेत्रातील व्यापार वाढीसाठी होतो.

**धोरण, अडथळे व उपाय :**

भारतात बाहेरील लोक पर्यटनासाठी फार कमी येतात. येणाऱ्यांची ठिकाणेही वैशिष्ट्यां-पलिकडे नसतात. त्यातच त्यामधील बलात्कार, स्त्रीयांवरील अत्याचार, राजकारणाचे काळे रूप याबाबतच्या गोष्टी जगभर प्रसिद्ध आहेत. पर्यटन धोरणांबाबतची राजकीय अनास्था यामुळे पर्यटन केंद्री बनू शकत नाही. महाराष्ट्र सरकारचे पर्यटन धोरण हे स्थानिक लोकांना रोजगार मिळेल असेच असले पाहिजे. स्थानिक लोक काही प्रमाणात अशा पर्यटन व्यवसायात सहभागी आहेत. पर्यटन हा ग्रामीण भागातील आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग बनत आहे. कृषी पर्यटन, आरोग्य पर्यटनात केरळ तामिळनाडूतील चेन्नई आघाडीवर आहेत.

**निष्कर्ष:**

जागतिकीकरणाच्या युगात भारतातील पर्यटन व्यवसायातील रोजगाराच्या संधीत वाढ होणे अपरिहार्य असून राजकीय व सामाजिक, सांस्कृतिक इच्छाशक्तीची जोड मिळाल्यास भारताचा ऐतिहासिक व सामाजिक पर्यटन तसेच धार्मिक व सांस्कृतिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणात व्यापक दिशा प्राप्त होईल. मात्र राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी ह्या पर्यटन व्यवसायाला खीळ बसली आहे. राजकीय जाळ्यातून हा पर्यटन व्यवसाय अनास्था जाओ ही सदिच्छा भारतात वैविध्यपूर्ण पर्यटनस्थळांची कमी नाही. पर्यटन सुविधांचा विकास झाल्यास भारताचे पर्यटन दृष्ट्या विकसित देशांच्या यादीतील स्थान अधिकच उंचावेल हे निश्चित!

**संदर्भसूची :**


१. *प्रतियोगीता दर्पण,* भारतीय अर्थव्यवस्था अतिरिक्तांक २०१६

२. *प्रतियोगीता साहित्य,* भारतीय अर्थव्यवस्था अतिरिक्तांक २०११

३. उपकार, *भारतीय अर्थव्यवस्था - एक दृष्टिक्षेप*

४. अर्थसंवाद(एप्रिल जून २०१२)खंड ३६,अंक १, पृ.९

५. दै.लोकसत्ता (२७ सप्टें. २०१४)

६. दै. लोकमत

७. साप्ताहिक विवेक

८. लोकराज्य (मासिक)

९. दै. सकाळ

१०. दै. दिव्य मराठी

# पर्यटन विकासासाठी भारताचे धोरण: एक आढावा

**तानाजी गिते**, राजगुरुनगर,
प्राध्यापक व व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख,
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, जिल्हा पुणे.
भ्रमणध्वनी: ९८५०४९७८९९
ईमेल: tgite 08@gmail.com

**प्रस्तावना:**

विविध निसर्ग सौंदर्याच्या आकर्षणामुळे मानवाच्या आदिम संस्कृतीपासून पर्यटनाचा उगम झालेला आहे. पर्यटन हे मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. निसर्गातील बदल पाहणे अभ्यासणे त्याचा आनंद घेणे हे मानवाच्या अनेक गरजांपैकी एक गरज आहे. मनुष्य हा भटकंती करण्यामध्ये पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिक क्रांती, वाहतुक विकास, कृष्णा क्रांती व रोजगार ही क्षेत्रे अविकसित व विकसनशील देशात वाढू लागली लोकांच्या जीवनमानाचा स्तर उंचावू लागला. नवीन तंत्रज्ञानात वाढ झाली.

आधुनिक काळात पर्यटन हा धंदा न राहता व्यवसाय झालेला आहे. यामधून रोजगार संधी नवीन सेवा निर्माण होऊ लागल्या आहेत. १ जानेवारी १९९५ च्या जागतिक व्यापार करारामुळे आयात-निर्यातीतील खुल्यापणामुळे वाहतुक, मनोरंजन, क्रीडा प्रवास, दळणवळण क्षेत्रात मोठी वाढ होऊ लागली. युरोप खंडाप्रमाणेच आशिया खंडातील चीन, हाँगकाँग, सिंगापूर, मलेशिया, थायलंड, जपान या देशातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा १२% पर्यंत वाढलेला पहावयास मिळत आहे.

जागतिक प्रवास व पर्यटन समिती अहवालानुसार सन २०११ मध्ये भारतातील पर्यटन उद्योगाचा राष्ट्रीय उत्पन्न विकास दरात ६.२५% सहभाग आहे व एकूण रोजगारापैकी ८.७८% रोजगार निर्मिती या उद्योगातून होत आहे. ६.६ लक्ष विदेशी पर्यटकांनी भारतात भेटी दिलेल्या आहे तर १० कोटी भारतीय लोकांनी विदेशात भेटी दिलेल्या आहेत. यातून भारताला १४.२७ अब्ज डॉलरमध्ये परकीय चलन मिळालेले आहे. १४४ देशांपैकी पर्यटनामध्ये भारताचा ६८ वा क्रमांक लागतो. तसेच विविध घटकांनुसार साधनसंपत्तीतील ८ वा क्रमांक आहे तर २४ वा हवाई वाहतूक, ३९ वा रस्ते वाहतूक तर बाजार व सेवांमध्ये ५३ वा

क्रमांक तर स्वस्त दरातील सेवेत ६ व्या क्रमांकावर भारत आहे.

हवाई सुंदरी, मार्गदर्शक अशा प्रकारच्या नोकऱ्या या ठिकाणी निर्माण होतात. पर्यटन हा आर्थिक परिणाम असल्याने या उद्योगाच्या भरभराटीसाठी लोहमार्ग, मोटाररस्ते, वायुमार्ग, जलमार्ग, स्थानके, वीज, पाणीपुरवठा, मालकेंद्रे आदि सुविधांची गरज असते. पर्यटन विकासासाठी सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा झाल्यामुळे पर्यटनस्थळाची व परिसरातील पायाभूत सोयी सुविधांचा विकास होतो. या सुविधांचा विकास पर्यटनासाठी झाला असला तरी त्याचा फायदा स्थानिक लोकांनाही होतो. अशा प्रकारची सुविधात्मक आंतर्रचना जेव्हा निर्माण होत असते तेव्हा त्या भागात जो भांडवली खर्च केला जातो त्यापैकी काही भाग त्या त्या विभागात झिरपतो.

पर्यटक जो पैसा खर्च करतात त्याचा उपयोग पर्यटन व्यवसायालाच होतो असे नाही; पर्यटकांना अनेक सेवा व सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणेस व उद्योजकांना आर्थिक चालना मिळून कार्यकारिणीची भरभराट होत राहते. म्हणजेच पर्यटकांनी खर्च केलेला पैसा अनेक ठिकाणी झिरपत जातो, यालाच अर्थशास्त्राच्या भाषेत गुणन परिणाम असे म्हणतात. देशातील अर्थकारणावर एक वैशिष्ट्यपूर्ण परिणाम झालेले आढळून येतात.

राष्ट्रीय सकल उत्पन्नामधला (GDP) या क्षेत्राचा वाटा ६.२३ टक्के इतका आहे. भारताला दरवर्षी सुमारे ५० लाख परदेशी पर्यटक भेट देतात तर स्थानिक पर्यटकांची संख्या सुमारे ६२ दशलक्ष इतकी आहे. दोन वर्षापूर्वी या क्षेत्राने आपल्या देशाला १०० अब्ज अमेरिकन डॉलर्सची कमाई करून दिली आणि सन २०१८ पर्यंत हा आकडा २७६ अब्ज डॉलर्सच्या घरात जाईल, असा अंदाज आहे.

पर्यटन केंद्राच्या ठिकाणी बाजारपेठांचा विकास होतो. बाजारपेठा या आर्थिक क्रियांचा मुख्य भाग आहे. पर्यटन केंद्राच्या स्थानिक ठिकाणी निर्मित वस्तुंची विक्री त्या माध्यमातून होते. पर्यटनामुळे केंद्र-राज्यांचा महसुलही वाढतो. यामुळे सरकारची जबाबदारी वाढते. पर्यटनाचा विकास झाला की, शेती, हस्तकला वस्तू, फळबाग, वाहतुक, बांधकाम या व इतर पूरक उद्योगांना चालना मिळते. दहाव्या पंचवार्षिक योजनेत परदेशी पर्यटकांची संख्या ८७ टक्के वाढून २३ कोटीवरून ४४ कोटीवर जाऊन पोहचली. जागतिक पर्यटनातील आपला हिस्सा ०.३४ टक्के वरुन ०.५२ टक्के वर गेला. याचा परिणाम म्हणून भारताच्या परकीय चलन उत्पादनात १४७ टक्क्यांची भर पडली.

सन २००६ यावर्षी दर पर्यटकामागे मिळणाऱ्या उत्पादनाची जागतिक सरासरी ८७२ अमेरिकी डॉलर होती तर भारतातील उत्पन्न होते १४७६ डॉलर्स. देशांतर्गत पर्यटकांच्या संख्येचा विचार केल्यास असे आढळून येते की, दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ही संख्या ४६ कोटी झाली जी २००२ मध्ये २७ कोटी होती. दहाव्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासासाठी २९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ९१ टक्के निधी खर्च करण्यात आला. याची फलश्रुती म्हणून पर्यटकांच्या संख्येत मोठा बदल दिसून आला. पर्यटन विकासास यामध्ये अग्रक्रम देण्यात आला. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. लहान व ग्रामीण पातळीवरील पर्यटनावर विशेष भर देण्यात आला. अकराव्या पंचवार्षिक योजनेत (२००७-२०१२) एक कोटी आंतरराष्ट्रीय

पर्यटकांना आकर्षित करण्याचे ठरविण्यात आले आहे.

**पर्यटनाच्या व्याख्या:**

जोस ॲरिलाग-सायकलवरून प्रवासासाठी फिरणे, गिर्यारोहण, नौकाविहार, खेळ, निसर्ग इ. भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय. हुंझीकर व कैप-पर्यटनाचा अर्थ अपरिचित व्यक्तिकडून, पैसा किंवा कायम न राहण्यासाठी केलेली भ्रमंती होय. जागतिक पर्यटन संघटना-एखाद्या व्यक्तीचे आपल्या कायम वास्तव्यापासून तात्पुरत्या काळासाठी केलेला प्रवास होय. हर्मन-विदेशात व्यक्तीचे आगमन व प्रेक्षणीय स्थळांना भेटी देणे म्हणजे पर्यटन होय.

**नियोजन काळातील पर्यटन विषयक धोरण:**

नियोजन मंडळाच्या स्थापनेनंतर १९५२ मध्ये सर्वप्रथम पर्यटन विषयक धोरण असावे असा विचार सुरु झाला. पर्यटनाचे आधुनिकीकरण प्रामुख्याने अलिकडील १५ वर्षात झालेले दिसून येते. १९५७-६८ पर्यंत पर्यटनाविषयी विचार झालेला नव्हता. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विकासासाठी ३३६ लाख रुपयांची तरतुद करण्यात आली.

भारतातील प्रेक्षणीय स्थळांचा विकास करताना त्याचे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत (१९६२-६७) मध्ये बोधगया, खजुराहो, भुवनेश्वर, कांचीपुरम, कोणार्क, महाबळीपुरम, रांची, तिरूअनंतपुरम या पर्यटन स्थळांना मूलभूत सुविधा पुरविल्या गेल्या. चौथ्या पंचवार्षिक योजनेत (१९६७-१९७४) वरील तीन योजनांमधील निधी पुरेसा नसल्याने त्यात वाढ करण्यात आली.

**राष्ट्रीय पर्यटन धोरण:**

पहिल्या पंचवार्षिक योजनेत पर्यटन विषयक धोरणाचा समावेश नव्हता. दुसऱ्या योजनेत ३.३६ कोटी तरतूद करण्यात आली. तिसऱ्या योजनेत पर्यटनासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. १९६६ मध्ये जम्मू काश्मीरमध्ये क्रीडा संकुल उभारले. पाचव्या योजनेत कोकण, गुलमर्ग, गोवा, कुलू-मनाली इ. ठिकाणी पर्यटन कार्यक्रम राबविण्यात आले. सहाव्या योजनेत १९८२ मध्ये कृती कार्यक्रम राबविण्यात आला. Traval Circulate ही नवीन संकल्पना आली. सातव्या योजनेत (१९८५-९०)१९८६ मध्ये राष्ट्रीय पर्यटन समितीची स्थापना करुन सामाजिक आणि आर्थिक घटकांशी संबंधित घटकांचे पुनर्मूल्यांकन केले गेले.

१९८४ मध्ये या समितीने अनेक उपाय सूचना आपला अहवाल सादर केला त्याचा परिणाम म्हणून १९९१ मध्ये परकिय गुंतवणुकीसाठी प्राधान्य क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आले. आठव्या योजनेत (१९९२-९७) या काळात राष्ट्रीय कृती कार्यक्रम राबविण्यात आलात. परकिय चलन आणि रोजगार निर्मितीसाठी पुढील उपाययोजना सुचविण्यात आल्या.

प्राधान्यक्रम नियोजनाद्वारे सकळ वृद्धी करणे पर्यटन उत्पादनात विविधता निर्माण करणे, बाजार विस्तार करणे, पर्यटनाची कार्यपद्धती सोपी करणे, विशेष पर्यटन कार्यक्रम राबविणे, राज्य सरकारचा सहभाग घेणे, देशी पर्यटनाला प्रोत्साहन देणे, पायाभूत सुविधा वाढविणे, निवडक पर्यटन क्षेत्रांची निवड करून विशेष सेवा पुरविणे, हे क्षेत्र अधिक व्यावसायिक बनविणे, परकिय चलन मिळविण्यासाठी सर्वंकष विकास करणे अशाप्रकारे पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.

अलिकडील काळात विशेषी भारत सरकारच्या चलनात मोठी वाढ झालेली आपणास

पाहावयास मिळत आहे.

**पर्यटनाचे परिणामः**

पर्यटन हा अतिप्राचीन व्यवसाय असला तरी प्राचीन काळात या व्यवसायाचा फारसा विकास झालेला नव्हता. पर्यावरणावर पर्यटनाचे अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम होताना दिसून येतात. त्याचप्रमाणे आर्थिक, सामाजिक आणि सांख्यिक घटकांवर परिणाम होत असतो.

अ) पर्यावरणीय परिणामः जमिनीचा ऱ्हास होताना दिसून येतो. मृदेचा ऱ्हास होताना दिसून येतो. त्याचप्रमाणे प्रदूषण वाढते. हवा, जमीन, पाणी, ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणावर होताना दिसून येते. पाण्याचे मोठ्या प्रमाणावर प्रदुषण होते. समुद्र किनारे, नदी, तलाव, सरोवरे या ठिकाणी अनैसर्गिक घटकांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. हवेत कार्बन मोनॉक्साईड प्रमाणाच्या वर होते. टाकाऊ वस्तुपासून प्रदुषणात मोठी वाढ होते. वनस्पतींचा ऱ्हास होतो. वनस्पतींची चोरी होणे, दूर्मिळ वनस्पतीची तस्करी होताना दिसून येते, जंगल आगी लावल्या जातात. प्राण्यांची शिकार केली जाते. प्राण्यांच्या नैसर्गिक जगण्यावर अतिक्रमण होते. मानवी वस्तीमुळे वनस्पती व प्राणी यांच्या जीवनात अडचणी निर्माण होतात. पक्ष्यांची शिकार केली जाते. तसेच अनेक प्राण्याचा मासांचा वापर होतो. त्यांच्या प्रजाती नष्ट होतात. पशु आणि पक्षी आपली मूळ ठिकाणे सोडून इतर ठिकाणी स्थलांतर करतात. प्राणी आणि पक्षी यांच्या प्रजननक्षमतेवर प्रतिकुल परिणाम होतो. वातावरणातील शांतता भंग पावते.

ब) आर्थिक परिणामः पर्यटनामुळे आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळते. पर्यटन प्रगत करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च करावा लागतो. प्रत्यक्ष खर्चामुळे वाहतूक व दळणवळण, निवास, भोजन व खरेदी व सेवा या खर्चाचा समावेश होताना दिसून येतो. पर्यटन व अर्थव्यवस्था यामध्ये दोन प्रकारचा संबंध असतो. त्यात पर्यटकांना हव्या असलेल्या वस्तू ज्यांचा अर्थव्यवस्थेत प्रत्यक्ष संबंध असतो. दुसरा म्हणजे असे व्यापार ज्यांचा इतर व्यापारी उद्योगाशी संबंध असतो.

तक्ता क्र.१: विदेशी पर्यटकांची संख्या आणि विदेशी चलनाची संख्या

| वर्ष | पर्यटकांची संख्या | वाढ% | परकिय चलनाची संख्या | बदल |
|---|---|---|---|---|
| १९५५-५६ | २१.९० | -- | २४.१४ | -- |
| १९९६-९७ | २३.३४ | ६.६ | २८.७७७८८ | ६.१ |
| १९९७-९८ | २३.७१ | १०६ | २९.१४ | १.३ |
| १९९८-९९ | २३.९७ | १.१ | २९.९३ | २.७ |
| १९९९-२००० | २५.०५ | ४.५ | ३०.३६ | १.९ |
| २०००-२००१ | २६.९९ | ७.७ | ३१.३८ | ४.३ |
| २००१-२००२ | २४.२८ | -१०.२ | २९.९० | -८.१ |
| २००२-२००३ | २४.७० | १.७ | ३०.२९ | ४.१ |
| २००३-२००४ | २९.२५ | १८.३ | ३८.३३ | २६.५ |

*आर्थिक पाहणी २००३-०४*

आर्थिक क्रिया: पर्यटनाचा संबंध प्रामुख्याने सेवाक्षेत्राशी आहे. पर्यटनांमुळे सेवा पुरविल्या जातात. त्याचा मोबदला मिळतो. आर्थिक उलाढाल वाढते. गुंतवणुकीत वाढ होते व शाळा अंतर्गत आणि बाह्य चलनात मोठा फायदा होतो. जगातील बहुतेक देशांना आपल्या उत्पन्नाचा मार्ग म्हणून त्याकडे पाहिले जाते उदा. भारताला दरवर्षी लाखो डॉलरचे उत्पन्न केवळ पर्यटन व्यवसायामुळे प्राप्त होते. रोजगारात वाढ होते. विविध प्रकारचे रोजगार निर्माण होतात. रोखपालापासून ते सर्व प्रकारच्या सेवा मानवाला द्याव्या लागतात. स्थानिक पातळीवर मोठा रोजगार निर्माण होतो. स्थानिक लोकांची उत्पन्न पातळी वाढते.

जमिनीला भाव येतो त्यांच्या किंमती वाढतात. देशी आणि परदेशी कंपन्या पर्यटन व्यवसायात गुंतवणूक करतात. त्यामुळे जमिनीच्या किमतीत वाढ होते कमी जागेत लाखो रुपयांचा व्यवहार सुरु होतो. सरकारी महसूलात वाढ होते. सरकारचे वेगवेगळे मार्गांनी उत्पन्न सतत वाढत जाते. बाजारपेठांचा विकास होतो. लघु मध्यम आणि कुटीरोद्योगाचा विकास होतो. मनोरंजनाच्या सुविधा वाढतात. पायाभूत सुविधांमध्ये वाढ होते. वीज, पाणी, शाळा, दवाखाने इ. सुविधा वाढत जातात. प्रादेशिक असमतोल दूर होतो.

**पर्यटनाचे सामाजिक परिणाम:**

वास्तुशिल्प, कलाकृती, कपडे, पेहराव, धर्म, भाषा, चालीरीती राहणीमान इत्यादींच्या परिणामामध्ये नवीन मानवी संस्कृती तयार होते. मिश्र संस्कृती निर्माण होते. पर्यटनामुळे गुन्हेगारीही निर्माण होते. धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत होते. भाषांची देवाणघेवाण होते. आपुलकी वाढते. आरोग्यावरही परिणाम होतो. गोंगाट, सर्दी, प्रदुषण होण्याचा धोका निर्माण होते. पर्यटनामुळे धार्मिक देवाणघेवाण शांतता समाधान आले जीवनमूल्यात वाढ होताना दिसून येते.

**सारांश:**

पर्यटन विकास होणे ही आधुनिक काळाची गरज आहे. मानवी जीवनाचे हे एक अविभाज्य अंग असून मानवाला आनंदी राहण्यासाठी पर्यटन ही गरज आहे. यामध्ये मूल्यातील विविधता, सामंजस्य, जिव्हाळा, प्रेम यासाठी हे क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जागतिक पातळीवर १९९१ पासून याला अधिक महत्त्व आले आहे. भारत सरकारने विविध योजनातून या क्षेत्राला प्रोत्साहन दिलेले पाहायला मिळते.

परकिय चलन मिळविण्याचे हे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून या क्षेत्राला आता उद्योगाचा दर्जा प्राप्त होत आहे. या क्षेत्राला भारत देशातच नव्हे तर जागतिक पातळीवर उज्ज्वल भवितव्य आहे.

**संदर्भ सूची:**


१) डॉ. घागापुरे, *पर्यटन भूगोल,* नागपूर २००५.
२) भागवत, *पर्यटन सूची,* उत्कर्ष प्रकाशन, पुणे २००७.
३) Alan Axelrod, *Principles of Economics,* McGraw Hill.
४) Assam 2000, A Handbook, *Janasayog: Assam.*
५) *Economic Survey* (2002-2003, 2003-2004), Government of India.
६) *Incredible India,* Tourism Department, Government of India
७) *Plan Documents,* Government of India.
८) Tenth Five-Year Plan, 2002-2007, *Sectoral Policies and Program,* Planning Commission, Government of India, New Delhi.



# कोल्हापूर जिल्हा: आर्थिक पर्यटनाची पंढरी

रामलिंग कुंडलिक नाळे, सरूड,
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
श्री शिव-शाहू महाविद्यालय, जि. कोल्हापूर.
भ्रमणध्वनी: ९४२११००४२७, ई-मेल: ramlingnale@gmail.com

जगातील एक प्रमुख आर्थिक पर्यटन राष्ट्र म्हणून भारताकडे पाहिले जाते. भारतात विविध राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी विविध प्रकारची पर्यटन स्थळे आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक पर्यटन व्यवसायात मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, उस्मानाबाद, अहमदनगर, सातारा, सोलापूर, सांगली, सिंधुदूर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यातील पर्यटकांची संख्या वाढत आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पर्यटनात कोल्हापूर जिल्हा आर्थिक पर्यटनाची पंढरी म्हणून ओळखला जातो. कोल्हापूर जिल्ह्यात मोठी अभयारण्ये, विविध प्रकारचे गड (किल्ले) मंदिरे, मस्जिद, तलाव, सार्वजनिक



उद्याने, धबधबे, वस्तुसंग्रहालये, प्राणी संग्रहालये, मत्स्यालये, सागर किनारपट्टी, शेती पर्यटन इत्यादीमधील विविधतेने नटलेली सुबत्ता आहे. त्यामुळे देशातील पर्यटकाबरोबर विदेशी पर्यटकांची संख्या वाढत आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी, पन्हाळा, करवीर, शिरोळ, हातकणंगले, आजरा, चंदगड, गगनबावडा, कागल, भुदरगड, गडहिंग्लज, राधानगरी या १२ तालुक्यामध्ये असलेल्या प्रामुख्याने आर्थिक पर्यटनाचा अभ्यास केला आहे. याकरिता २० बाजूंची निवड केली असून यामध्ये अभयारण्ये-५, किल्ले ५, तलाव - ५ आणि तीर्थक्षेत्रे ५ यांची निवड केली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात कोल्हापूर जिल्ह्यातील आर्थिक पर्यटनाचा अभ्यास करताना निवडक २० बाजूंचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

## आर्थिक पर्यटन म्हणजे काय ?

मानवी जीवनातील अनुभवापेक्षा वेगळा प्रदेश, निसर्ग, ऐतिहासिक स्थळे, धार्मिक स्थळे पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांना त्यांच्या मागणीनुसार सेवा-सुविधा पुरवून रोजगार संधी निर्माण करणे व आर्थिक सुबत्ता वाढविणे म्हणजे आर्थिक पर्यटन होय. येथे पर्यटकांना सेवा-सुविधा पुरवित असताना त्या सेवा रास्त भावाने व गुणवत्ता पूर्ण पुरविणे अपेक्षित आहे. नैसर्गिक व आर्थिक घटकावर पर्यटन हा व्यवसाय अवलंबून आहे. पर्यटन या संज्ञेत प्रवास करणे, वेगळ्या आल्हाददायक घटकांना भेटी देणे, विविध वस्तुंची चव घेणे व पुन्हा आपल्या मूळ ठिकाणी परतणे म्हणजे पर्यटन होय.

**कोल्हापूर जिल्ह्यातील आर्थिक पर्यटन स्थळे: कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक ५ तलाव (धरण):**

१)वारणा प्रकल्प : शाहूवाडी व शिराळा तालुक्याच्या सीमेवर हा तलाव असून 'वसंत सागर' या नावाने तो ओळखला जातो. हा तलाव 'वारणा' नदीवर उभारला असून या तलावाचा बंधारा मातीचा आहे. येथे विजनिर्ङ्कित्ती केली जात असून हा तलाव ३६.२ टी. एम्. सी. चा आहे. या प्रकल्पावर उजवा व डावा असे दोन कालवे असून दोन्ही कालव्यावर जलसेतू उभारले आहेत. निसर्गाच्या हिरव्यागार झाडीत व दोन डोंगराच्या मध्ये हा तलाव उभारला असल्याने आणि मातीचा प्रकल्प म्हणून ओळखला जात असल्याने पर्यटक गर्दी करताना दिसत आहेत.

तक्ता क्र. १

| अ.क्र. | तालुका | पर्यटनस्थळे |
|---|---|---|
| १) | शाहुवाडी | ०५ |
| २) | पन्हाळा | ०५ |
| ३) | हातकणंगले | ०८ |
| ४) | शिरोळ | ०६ |
| ५) | करवीर | ०६ |
| ६) | गगनबावडा | ०२ |
| ७) | राधानगरी | ०४ |
| ८) | कागल | ०७ |
| ९) | भुदरगड | ०७ |
| १०) | आजरा | ०३ |
| ११) | गडहिंग्लज | ०५ |
| १२) | चंदगड | ०४ |
| | एकूण | ६२ |

*(स्रोत: दै.कोल्हापूर सकाळ दि. ११ सप्टेंबर,२०१२)*

२)काळम्मावाडी प्रकल्प : राधानगरी तालुक्यात दूधगंगा नदीवर हा प्रकल्प उभारला असून हिरव्यागार झाडीने त्यास वेढले आहे. राजर्षी शाहू सागर या नावाने हा प्रकल्प ओळखला जातो. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे या प्रकल्पाच्या पायथ्याशी म्हैसूर मधील वृंदावन गार्डनच्या धरतीवर बगीचा निर्माण केला आहे. हा प्रकल्प ३.७ टी. एम्.सी. चा असून पर्यटक येथे गर्दी करताना दिसत आहेत.

३) तुळशी प्रकल्प : राधानगरी तालुक्यात हा प्रकल्प उभारला आहे. हे धरण ३.२ टी. एम्.सी. चे असून तुळशी नदीवर (भोगावतीची उपनदी) उभारले आहे. तुळशी धरण म्हणजे निसर्गाने मुक्त हाताने केलेली उधळणच होय. या धरणाचे वैशिष्ट्य म्हणजे या तलावात केळोशी बुद्रुक लघुपाटबंधारे प्रकल्पातून पाणी सोडण्यात येणार आहे. या ठिकाणी पर्यटकांची गर्दी मोठी आहे.

४) राधानगरी प्रकल्प : राधानगरी तालुक्यात भोगावती नदीवर हा प्रकल्प उभारला आहे. हा प्रकल्प राजर्षी शाहू महाराजांच्या दुरदृष्टिने १९०८ मध्ये तयार करणेत आला आहे. हा प्रकल्प ७.५ टी.एम्.सी. चा असून शेतीसाठी वरदान ठरत आहे. या धरणक्षेत्रात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने पर्यटकांची गर्दी होते.

५) तिल्लारी प्रकल्प : चंदगड तालुक्यात तिल्लारी नदीवर हा प्रकल्प उभारला आहे. २००९ मध्ये याचे काम पूर्ण झाले आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर हे धरण असल्याने याचा बेळगांव जिल्ह्यास त्याचा फायदा झाला आहे. हे धरण १२.३ टी.एम्.सी. चे असून येथे वीजनिर्मिती केली जाते. या धरणाचे वैशिष्ट्य म्हणजे तिल्लारी नदी ही पश्चिमेकडे वाहत जात आहे. त्यामुळे पर्यटक तेथे वाढत आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक ५

अभयारण्ये:

१)दाजीपूर :हे जंगल समुद्र सपाटीपासून १२०० मीटर उंचीवर आहे. कोल्हापूर जिल्हा व सिंधुदुर्ग जिल्हा यांच्या सीमारेषेवर हे जंगल असून भोगावती नदीचे मोठे क्षेत्र या जंगलाने व्यापले आहे. कोल्हापूर पासून ८० कि.मी. अंतरावर हे जंगल वसले असून साग, शिसम, आंबा, जांभळ, हिरडा इत्यादी प्रकारची झाडी या जंगलात मोठ्या प्रमाणात आहे. रानगव्यांचे वास्तव्य या जंगलात असून रानडुक्कर, बिबट्या, सांबर, चिंकारा इत्यादी प्राणी पहावयास मिळतात. पर्यटकांची येथे मोठी रेलचेल पहावयास मिळते. २)वारणावती : शाहुवाडी-शिराळा तालुक्यांच्या सीमेवर हे जंगल असून राज्यातले सर्वात मोठे जंगल म्हणून ते ओळखले जाते. या जंगलास राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देणेत आला आहे. वाघ, बिबटे, गवे, सांबर, अस्वल या प्राण्याबरोबरच महाराष्ट्राचा मानबिंदू शेखरू व हरियाल पक्षी येथे आढळून येतात. विविध प्रकारची झाडी, औषधी वनस्पती या जंगलात असून रानमेवा खाणेसाठी पर्यटक येथे गर्दी करतात. ३)आंबा:कोल्हापूर-रत्नागिरी रोडवर आंबा हे गांव वसले असून शाहुवाडी तालुक्यातील प्रसिद्ध जंगल आहे. आंबा परिसर पर्यटनाच्या दृष्टिने महत्वाचा असून जैवविविधता या जंगलात मोठ्याप्रमाणावर आहे. उन्हाळा, हिवाळा व पावसाळा या तिन्ही ऋतूत पर्यटक येथे गर्दी करतात. रानमेवा, आल्हाददायक हवामान, दवबिंदूचा सडा, गुलाबी थंडी ही पर्यटकांना भोवते. आंबा घाट १४ कि.मी.चा असून नागमोडी वळणाने सुंदर दिसत आहे. माकडांचे चमू ही येथे दिसतात.

४)कानूर : महाराष्ट्र-गोवा सीमेवर हे जंगल असून चंदगड तालुक्यात ते मोठ्या प्रमाणात येते. याचे क्षेत्र १३८४६.४४ हेक्टर इतके आहे. साग, शिसम या प्रमुख झाडाबरोबर जंगली व औषधी वनस्पती मोठी आहे. जैवविविधतेच्या दृष्टिने हे जंगल प्रसिद्ध असून पर्यटक या जंगलास भेटी देतात.

५)गवसे :आजरा तालुक्यात हे जंगल असून कर्नाटक व गोवा या राज्यांच्या सीमा येथे येतात. सागवान, शिसम ह्या झाडीबरोबरच जैवविविधता ही मोठ्याप्रमाणात दिसून येते. हे जंगल मोठे असून येथे पर्यटक गर्दी करताना दिसतात.

१.७.३ कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक ५ किल्ले:

१)पन्हाळगड : पन्हाळा हा ऐतिहासिक तालुका. तीन दरवाजे, धान्य कोठार, तबक उद्यान, वाघदरवाजा, सज्जा कोटी, दुतोंडी बुरूज, तटबंदी, हिरवीगार झाडी-डोंगर, हॉटेल्स, नागमोडी वळणाचे रस्ते, रानमेवा इत्यादी विविधतेने नटलेला पन्हाळा गड पाहण्यास पर्यटक मोठ्या संख्येने येतात.

२)विशाळगड : शाहूवाडी तालुक्यात सह्याद्रीच्या माथ्यावर विशाळगड विस्तारला असून सह्याद्रीचे उभे कडे हेच गडाचे मुख्य कवच आहे. डोंगरावर जाताना अलीकडे लोखंडी पूल उभारला असून ते पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. बाजीप्रभू देशपांडे, फुलाजी प्रभू देशपांडे, राजाराम महाराजांची तृतिय पत्नी अंबिकाबाई यांच्या समाधी येथे आहेत. पर्यटनाच्या दृष्टिने हा किल्ला महत्वाचा असून येथे मलिक रेहमान बाबांचा प्रसिद्ध दर्गा असल्याने पर्यटकांची मोठी गर्दी असते.

३)गगनगड : गगनबावडा तालुक्यात हा किल्ला असून दत्त जयंती मोठ्याप्रमाणात येथे साजरी केली जाते. गगनबावडा घाट, गगनगिरी महाराज यामुळे हा गड पर्यटनाचे केंद्र बिंदू ठरत आहे. महाराष्ट्राचे चेरापूंजी म्हणून हा गड ओळखला जातो. तसेच मिनी महाबळेश्वर असाही या तालुक्याचा उल्लेख केला जातो.

४)सामानगड : कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिणेस गडहिंग्लज तालुक्यात राखणदाराच्या रुपात हा गड उभा आहे. या किल्ल्यातून सैनिकांना रसद

पुरविली जात असे. म्हणून त्याचे नांव सामानगड पडले आहे. १६६७ मध्ये शिवरायांनी हा गड जिंकून आपल्या ताब्यात घेतला.

५)पारगड : चंदगड तालुक्यात हा किल्ला असून नितांत सुंदर किल्ला म्हणून येथे पर्यटक गर्दी करतात. हा किल्ला १६७६ मध्ये शिवरायांनी आपल्या ताब्यात घेतला. स्वराज्यातील पारटोकाचा किल्ला म्हणून याचे नांव पारगड असे पडले आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक ५ तीर्थक्षेत्रे:**

कोल्हापूर हे पंचगंगेच्या काठावर वसले असून ते दक्षिण काशी म्हणून ओळखले जाते. या जिल्ह्यात कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरासह अनेक तीर्थक्षेत्रे असून निवडक ५ तीर्थक्षेत्रे दिली आहेत.

१)जोतिबा : पन्हाळा तालुक्यात वाडी रत्नागिरी येथे हे देवालय असून महाराष्ट्र व कर्नाटकातील अनेक भाविकांचे ते कुलदैवत आहे. चैत्रपोर्णिमेस येथील यात्रा भरते. भाविक मोठ्या संस्थेने येथे येतात. चोपडाई, यमाई, काळभैरव , रामलिंग ही देवालये येथे आहेत.

२)श्री दत्त : हातकणंगले तालुक्यातील नरसिंहवाडी येथे हे प्रसिद्ध देवालय असून प्रत्येक पोर्णिमेस भावीक येथे गर्दी करतात. हे देवालय, कृष्णेच्या काठावर असल्याने पर्यटकाचे ते आकर्षण ठरत आहे. विशेषत: परकीय पर्यटकांची येथे संख्या वाढत आहे.

३)खिद्रापूर : शिरोळ तालुक्यातील प्राचीन मंदीर म्हणून याचा उल्लेख केला जातो. कोपेश्वर/ महादेव मंदीर या नावाने ते ओळखले जाते. हे मंदीर कृष्णेच्या काठावर उभे असून यास तीर्थक्षेत्राचा दर्जा देणेत आल्याने भावीक व पर्यटकांची गर्दी वाढत आहे. १०८ खांबावर हे मंदीर उभारले असून महाभारत- रामायण मधील प्रसंग येथे कोरलेले पहावयास मिळतात.

४)काळभैरव : गडहिंग्लज येथे हे मंदीर असून मार्च महिन्यात काळभैरवाची मोठी यात्रा भरते. १९० कि.मी. अंतरावर हा तालुका असून कोल्हापूर जिल्ह्यातील ती एक व्यापारी बाजारपेठ म्हणूनही ओळखली जाते. तेथे लिंगायत समाज मोठा असल्याने देवास शाकाहारी नैवद्य दाखविला जातो. पर्यटकांना येथे सर्व सुविधा मिळत असल्याने त्यांची येथे गर्दी दिसून येते. विशेषत: परकीय पर्यटक कांची संख्या वाढत आहे.

५)हजरत मलिक रिहान बाबा : शाहूवाडी तालुक्यातील हिंदू-मुस्लिमांचे जागृत देवस्थान म्हणून हे तीर्थक्षेत्र विकसित होत आहे. विशाळगड येथे हा दर्गा असून विठ्ठल-रखुमाई मंदीर, महादेव मंदिर, मारुती मंदीर, राम मंदीर अशी मंदीरे ही येथे आहेत. त्यामुळे पर्यटक येथे गर्दी करताना दिसून येतात.

**आर्थिक पर्यटनाचे फायदे:**

१) आर्थिक पर्यटन आर्थिक विकासास मदत करते. २) आर्थिक पर्यटनामुळे रोजगार संधी वाढत जातात. ३) बाजारपेठांचा विकास होण्यासाठी आर्थिक पर्यटन महत्वपूर्ण ठरते. ४) आर्थिक पर्यटनामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. ५) सरकारला वाढता महसूल मिळणेसाठी आर्थिक पर्यटन महत्वाचे आहे. ६) आर्थिक पर्यटनामुळे आपणास परकीय चलन मिळते. ७) स्थानिक अर्थव्यवस्था आर्थिक पर्यटनामुळे सुधारते.८) सांस्कृतिक घटकाचा विकास होण्यासाठी आर्थिक पर्यटन मदत करते. ९) आर्थिक पर्यटनामुळे लोकांच्या राहणीमानात वाढ होते.

**आर्थिक पर्यटनाचे तोटे:** १) वन्यप्राणी जीवन धोक्यात येण्याचा संभव निर्माण झाला आहे. २) पर्यटन व्यवसायामुळे जलप्रदुषण वाढत आहे. ३) पर्यटकांच्या वाढत्या वाहनामुळे हवेचे प्रदुषण

वाढत आहे.४) सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनतो. ५) पर्यटकांच्या वाढत्या गर्दीमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण झाले आहेत. ६) आर्थिक पर्यटन व्यवसायामुळे 'चंगळवाद' वाढत आहे. ७) पर्यटन स्थळांच्या ठिकाणी 'जुगार अड्डे' निर्माण होतात. ८) पर्यटन स्थळाच्या ठिकाणी भाषेचा प्रश्न निर्माण होत आहे. ९) पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे लोकसंख्येची घनता वाढत जाऊन सामाजिक गुन्हेगारी वाढण्याचा धोका संभवतो. १०)पर्यटन स्थळावर पर्यटकांची संख्या वाढल्यास फसवणूकीचा, चोरीचा प्रकार घडणे शक्य असते.

उपाय:

१) सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्ड्याचा प्रत्येक पर्यटकाने प्रयत्न केला पाहिजे. तसे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. २) पर्यटकांच्या मागणीनुसार त्यांना आवश्यक सेवा-सुविधा पुरविल्या पाहिजेत. ३) पर्यटकाकडून जंगलात फिरत असताना त्यांच्याकडून शिकार होऊ नये. ४) पर्यटकाकडून जंगलातील झाडांची तोड होते ती थांबविली पाहिजे. ५) पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे अभयारण्यातील शांत वातावरण बिघडणार नाही याची पर्यटकांनी काळजी घेतली पाहिजे. ६) अभयारण्यात चोरटे व्यापारी निर्माण होणार नाहीत याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ७) पर्यटकामुळे जंगलातील पशुपक्षांच्या सवयीत बदल होतात. त्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पर्यटकाने त्याकडे बारकाईने लक्ष द्यावे. ८) पर्यटक राष्ट्रीय उद्याने, जंगले, गवताळ प्रदेश यांना आग लावतात त्यामुळे आर्थिक नुकसान होते ते टाळले पाहिजे. ९) पर्यटकांच्यामुळे नैसर्गिक वनस्पतींच्या स्वरुपात होणारे बदल टाळले पाहिजेत. १०) पर्यटनाच्या दृष्टिकोनातून ऐतिहासिक वास्तू, किल्ले, स्मारके, शिल्पे, लेणी, उद्याने यांची काळजी घ्यावी.

आर्थिक पर्यटन हा एक व्यवसाय बनला असून भारतासारख्या देशात हा व्यवसाय वृद्धिंगत होणे आवश्यक आहे. तसेच 'पर्यटन काऊन्सलर' च्या नवीन संधी निर्माण झाल्या पाहिजेत. कोल्हापूर जिल्ह्याचा अभ्यास केल्यास भविष्यकाळात हा व्यवसाय वृद्धिंगत होण्यास मोठा वाव आहे. सरकारने या व्यवसायास काही सवलती दिल्यास रोजगार वाढण्यासाठी 'पर्यटन व्यवसाय' वरदान ठरणार आहे. आर्थिक पर्यटनातून अनेकांचे उत्पन्न वाढत जाऊन त्यांचे राहणीमान वाढत आहे. पर्यटन व्यवसाय भविष्यकाळात वाढत जाऊन अनेकांना रोजगार मिळेल असा आशावाद वाटत आहे.

संदर्भ सूची:


१) गर्गे स. मा., *करवीर रियासत*, १९६८.

२) भिडे ग. र., *कोल्हापूर दर्शन*, १९७१.

३) *भारतीय पर्यटन - सिंहावलोकन*, २०१२.

४) *साप्ताहिक सकाळ (पर्यटन विशेषांक)*, दि. १२ फेब्रुवारी, २०११.

५) *लोकमत (हॅलो पुरवणी)*, दि.२० मे, २०११.

६) *दैनिक पुण्यनगरी - कोल्हापूर*, दि. २७ जुलै, २०१२.

७) *दैनिक पुढारी-कोल्हापूर*, दि. ११ सप्टेंबर २०१२.

८) *जिल्हा परिषद, कोल्हापूर* (२०१५).

# पर्यटनक्षेत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

**मनिषा वासुदेव चौधरी**, शिरपूर,
अर्थशास्त्र विभाग,
श्रीमती. एच.आर. पटेल महिला महाविद्यालय, जिल्हा धुळे.
भ्रमणध्वनी: ९४२३३१५८४६

## प्रस्तावना:

प्रवास करणे हे पारंपरिक आहे असे आपणास वाटते. परंतु पर्यटन या संज्ञेत सांगितले जाते मात्र नवीन आहे. पहिल्या महायुध्दानंतर पर्यटनाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. आज ते आंतरराष्ट्रीय पातळीवर घडत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर पर्यटनाचा तसेच भौगोलिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय घटकांचा परिणाम होतो. हे घटक व पर्यटन तसेच पर्यावरण यांचाही परस्पर संबंध असतो. मानवी जीवनात विविध बाबींचा चांगला-वाईट परिणाम झालेला दिसून येतो. देशी व विदेशी अर्थव्यवस्था, शिक्षण, संशोधन, सामाजिक ऐक्य यांच्यावर पर्यटनाचा परिणाम होतो.

## आर्थिक घटकांवरील परिणाम:

पर्यटन हा आर्थिक विकास घडविण्यास तृतीय स्तरावरील महत्वाचा उद्योग होय. या उद्योगात पर्यटकांना आवश्यक विविध सेवा पैशांच्या मोबदल्यात दिल्या जातात. या व्यवसायात जो खर्च होतो तो दोन प्रकारचा असतो. प्रत्यक्ष खर्च, अप्रत्यक्ष खर्च. प्रत्यक्ष खर्चात वाहतूक, दळणवळण, निवास, भोजन यामध्ये खरेदी व सेवा याचाही समावेश असतो. तर अप्रत्यक्ष खर्चात सेवांवर केलेल्या खर्चाचा समावेश होतो. यातून मिळालेल्या उत्पन्नाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होतो ते पुढीलप्रमाणे- पर्यटनामुळे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नामुळे परकीय चलनात वाढ होते. पर्यटनामुळे रोजगार निर्माण होतो. देशातील कला व हस्तकला वस्तूंच्या निर्यातीत वाढ होते त्यामुळे परकिय चलन मिळते. पर्यटन स्थळाजवळील जमिनींच्या किंमतीत वाढ होते. प्रादेशिक अर्थकारण वाढते, इत्यादी.

पर्यटनाचा आर्थिक परिणाम कॅनडा या देशात १९७७ मध्ये दिसून आला. पर्यटकांची संख्या दुपटीने वाढली. सुमारे १० अब्ज डॉलर परकीय चलन मिळाले. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ९ लाख लोकांना रोजगार मिळाला

तसेच ब्रिटन या देशाचेसुध्दा आहे. पर्यटकांना सेवा व वस्तू देणे हे पर्यटनाचे उत्पन्न होय. या उत्पनाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो. रिचर्डस् एल. जी. यांनी असे म्हटले आहे की, पर्यटकांचा अप्रत्यक्ष खर्च व उत्पन्न याचाही अर्थव्यवस्थेवर परिणाम होत असतो.

### अर्थव्यवस्था व पर्यटन:

देशात प्रामुख्याने तीन प्रकारची पर्यटन अर्थव्यवस्था असते. पर्यटकांनी केलेल्या खर्चामुळे अर्थव्यवस्थेत अनेक परिणाम होत असतात, देशान्तर्गत पर्यटन किंवा देशान्तर्गत प्रवास करणारे त्या देशाचे नागरिक, विविध देशातून आलेले परदेशी पर्यटक, स्वदेशातून इतर देशात जाणारे पर्यटक, इत्यादी. देशातल्या देशात पर्यटकांनी पर्यटनावर केलेला खर्च हा पर्यटन व्यवसायात असलेल्या लोकांना उपयोगाचा असतो. भारतातील महानगरे उदा. दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, पुणे इ. शहरातील श्रीमंत लोक देशातील पर्यटन स्थळांना भेटी देतात. तसेच गोवा, तिरुपती, श्रीनगर यासारख्या ठिकाणी जाऊन पैसा खर्च करतात. म्हणून देशातला पैसा देशात असतो.

इंग्लंड, जपान, जर्मनी या देशातून परदेशी पर्यटक येतात. मौजमजा करतात. विश्रांती, निसर्गाचा आनंद घेतात. त्यावेळी थ्री स्टार व फाईव्ह स्टार हॉटेल्समध्ये राहणे तेथील खाद्यपदार्थांची मजा घेणे. आरामदायी वाहतूक व्यवस्था यामुळे जास्तीचा खर्च करुन परदेशी चलन देशाला मिळते. विकसित देशातील पर्यटकांची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यामुळे विविध हस्तकलेच्या वस्तू खरेदी करतात, त्यामुळेही परकीय चलन मिळते.

स्वदेशातून इतर देशात पर्यटनाला लोक जातात. तो खर्च होतो त्यावेळी त्या देशाला चलन मिळते. देशाला पर्यटकांकडून मिळालेले चलन व आपण दुसऱ्या देशात खर्च केलेला पैसा यातील फरक हा त्या-त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणामकारक ठरतो. म्हणून या फरकाला पर्यटनाचा ताळेबंद असे म्हणतात.

### आर्थिक ताळेबंद व पर्यटन:

ताळेबंद हा पर्यटनावरील खर्च व पर्यटनातून मिळालेले उत्पन्नामधील फरक होय. जगातील सर्व देशात पर्यटनामुळे विकास होत आहे. परकिय चलन मिळत असल्यामुळे हा व्यवसाय विकसित करण्याचा प्रयत्न प्रत्येक देशाचे सरकार करीत आहे. देशाच्या आर्थिक ताळेबंदात अनुकूल/प्रतिकूल परिणाम होतात. भारतातील गोवा व केरळ येथील पर्यटन ताळेबंद अनुकूल आहे. भारताच्या निर्यात व्यापारात पर्यटनाचा सहभाग महत्त्वाचा आहे.

### देशांतर्गत पर्यटनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम:

पर्यटन व्यवसाय हा उत्पन्न मिळवण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. या उद्योगातून पैसा सहज मिळतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात पर्यटन क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. १९९०-९१ मध्ये जगातील ४ लक्ष लोकांनी आंतरराष्ट्रीय पर्यटन केले असे पर्यटन स्थलांतर याआधी कधी झाले नाही असे निर्दशनास आले देशाच्या आर्थिक विकासाबरोबर प्रादेशिक विकासाला गती मिळाल्यामुळे हा उद्योग महत्त्वाचा मानला जात आहे.

### आर्थिक परिणाम - राष्ट्रीय उत्पन्न आणि पर्यटन:

पर्यटनामुळे स्थानिक उत्पादित मालाच्या विक्रीतून व सेवेतून राष्ट्रीय उत्पन्न वाढते. पर्यटकांच्या मागणीनुसार अर्थव्यवस्था विकसित होते. मालाचे उत्पादन वाढते. पर्यटकांसाठी हॉटेल्स्, हॉलीडे होम्स तयार करून सर्व सुखसोयी

दिल्या जातात. त्यामुळे पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात पैसा मिळतो. हॉटेल्स मालक, प्रवासी एजंटस्, नोकर यांना पैसा, मजुरी, पगार मिळतो. पैसा हा आधिक प्रमाणात खेळता होतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन देशाची अर्थव्यवस्था विकसित होण्यास मदत होते.

**पर्यटन व इतर व्यवसाय:**

पर्यटन उद्योगात इतर संलग्न असलेल्या उद्योगांचा विकास होतो. फर्निचर्स, इतर उपकरणे, भोजनासाठी लागणाऱ्या विविध वस्तु उदा. अंडी, मांस, मासे, दुध, फळे इ. उत्पादन पर्यटन उद्योगासाठी केले जाते. भाजीपाला व फळे उत्पादनासाठी शेतीचा विकास होतो. पर्यटकांच्या सोयीसाठी विमानतळ, रेल्वे स्टेशन, रस्त्यांचे चौपदरीकरण, आरोग्य विषयक सुविधा, मनोरंजन यासारख्या सुविधांमधून आर्थिक फायदा होत असतो. इतर व्यवसायांचीही वाढ होते. त्यांना चालना मिळते. त्यातून पर्यटन उद्योग विकसित होत असतो.

**पर्यटन व बाजारपेठ (Tourism & Market):**

बाजारपेठही आर्थिक दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. बाजारपेठ पर्यटकांच्या दृष्टीने आकर्षक ठिकाण असते. पर्यटक भ्रमंतीबरोबरच आकर्षक व नाविन्यपूर्ण वस्तूंची खरेदी करतात. त्यामुळे बाजारपेठेत कलाकुसरीच्या वस्तू, भरतकाम व विणलेले कपडे, स्वेटर्स, शाली, खेळणी इ. वस्तू पर्यटक खरेदी करतो. सिंगापूर, नेपाळ व काश्मिर ही पर्यटन केंद्रे बाजारपेठेमुळे प्रसिध्द आहेत. त्यामुळे तेथील अर्थव्यवस्था मजबूत झाली.

**प्रादेशिक विकास व पर्यटन:**

देशाचे काही भाग विकसित न झाल्यामुळे पर्यटन उद्योग विकसित होत नाही. परंतु पर्यटनाचे आकर्षण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे हॉटेल्स, रिसॉर्ट बांधून व दळणवळणाचे मार्ग वाढवण्यात येते आहेत. त्यातून पर्यटनाला चालना मिळते. भारतात १९९० नंतर अंदमान निकोबार, द्वीपसमुह व लक्षद्वीप या ठिकाणाच्या पर्यटन विकासावर भर देऊन प्रादेशिक विकास करण्याचा प्रयत्न होऊ लागला. अंदमान द्वीपसमुहावर जाण्यासाठी विमान व जहाज सेवा सोयीची झाली. समुद्राच्या काठावर रिसॉर्ट तयार झाले. सेल्युलर जेल हे राष्ट्रीय स्मारक बनले. या सोयींमुळे पर्यटन उद्योग वाढून अविकसित द्वीपसमुह विकसित झाले.

**पर्यटन व रोजगार:**

लोकांना रोजगार मिळवून देणारा पर्यटन व्यवसाय आहे. पर्यटन व रोजगार याचा परस्पर संबंध आहे. यामध्ये कुशल व अकुशल कामगार यांचा समावेश असतो. पर्यटन व रोजगार या संदर्भात रिचर्डस् असे म्हणतात की, एखाद्या उद्योगात निर्माण झालेल्या १०० रोजगारांपैकी ६० रोजगार अप्रत्यक्ष व प्रत्यक्षरित्या पर्यटनाशी संबंधीत असतात. पर्यटन तज्ज्ञ श्री.एस.मॅडलिक यांनी आपल्या पर्यटनाचे आर्थिक महत्त्व (Economic Importance of Tourism) या ग्रंथात पर्यटन व रोजगार या विषयी असे म्हणतात की, ज्या प्रदेशात साधन संपत्ती व उद्योगांची कमतरता आहे. तेथे लोकांना रोजगाराची संधीही पर्यटनातून मिळू शकते. इंग्लंडमध्ये इतर उद्योग असल्यामुळे पर्यटन उद्योगात ५ ते १५% लोक गुंतलेले आहेत. स्थानिक लोकांना पर्यटन व्यवसायात रोजगार उपलब्ध होऊन प्रादेशिक विकासाला चालना मिळत असते.

**इतर आर्थिक घटक:**

पर्यटन व्यवसायात भांडवल गुंतवणुकीची संधी प्राप्त होते. अनेक भांडवलदार हॉटेल्स्, बाजार जमिनीची खरेदी विक्री यामध्ये भांडवल गुंतवणूक करून फायदा मिळवतात.

श्री.मॅडलिक यांच्या संशोधनानुसार इंग्लंड या देशात पर्यटनावर जी गुंतवणूक झाली त्यावर भरपूर व्याज मिळते ते फायदेशीर ठरते. भारतात बँक व पर्यटन मंडळे हॉटेल्स्ना सवलतीच्या दरात कर्ज देऊन पर्यटनाचा विकास करण्यास मदत करतात.

पर्यटनाचा परिणाम राहणीमान व सामाजिक घटकांवर झालेला आढळून येतो असे श्री. मॅडलिक या पर्यटन तज्ज्ञांनी म्हटले आहे. एकंदरीत भारतीय अर्थव्यवस्थेवर पर्यटनाचे चांगले परिणाम झालेले आहेत.

संदर्भसूची:


१) *पर्यटन भूगोल*, डॉ.नागतोडे व प्रा.पारधी, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ. १, ५९ ते ६७.

२) *पर्यटन भूगोल*, डॉ.विठ्ठल घारपुरे, पिंपळापुरे ॲण्ड कं., पब्लिशर्स, नागपूर, पृ.३४ ते ५१.

३) *भारत दर्शन गाईड*, चला सफरीला, घैसास वासंती.

४) *भारत का भूगोल*, शर्मा जगदिश.


५) *भारत २०००*, दास्ताने संतोष.



## निवेदन: अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालये/ शैक्षणिक संस्था/ व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु.१०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु.१५००/- आहे. ही वर्गणी कृपया मराठी अर्थशास्त्र परिषद या नावाने राष्ट्रियीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारेच पाठवावी. मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही. सदर वर्गणी कृपया नवनियुक्त प्रमुख संपादकांच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी: डॉ.राहूल शं. म्होपरे, विद्यापीठ क्वार्टर्स नं.डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर, पिन: ४१६ ००४, भ्रमणध्वनी: ०९९२३८७९०२०.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद



# कृषी पर्यटन: ग्रामीण जीवनाचा आधार


**अरुण तवार, परभणी,**
सहयोगी प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
(पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र)
ज्ञानोपासक महविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१५९०२३२


पर्यटन ही एक आर्थिक क्रिया असल्याने पर्यटनाचा अर्थशास्त्राशी जवळचा संबंध प्रस्थापित होतो. प्रत्येक आर्थिक क्रिया ही मागणी निर्माण करत असते. पर्यटन क्षेत्र देखील आपल्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मागणी निर्माण करत आहे. पर्यटनाला आज व्यापक स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. त्यामुळेच जागतिक पातळीवर पर्यटनाकडे एक महत्वाचा व्यवसाय (उद्योग) म्हणून बघितले जात आहे. देशाला उत्पन्न मिळवुन देणाऱ्या विविध घटकांवरच देशाची अर्थव्यवस्था अवलंबून असते.



आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून पर्यटनाचे महत्व २००२ च्या राष्ट्रीय पर्यटन धोरणात भारताने अधोरेखीत केले आहे. या धोरणानुसार पर्यटन व्यवसायाला प्रोत्साहन देऊन मोठ्या प्रमाणात विदेशी पर्यटकांना भारताकडे आकर्षित केले आहे. सन १९९७ ते २०१२ पर्यंत भारतात आलेले विदेशी पर्यटक व त्यानुसार मिळालेले विदेशी चलन तक्ता क्र.१ मध्ये दर्शविले आहे. तक्त्यावरून स्पष्ट होते की, सन १९९७ ते २०१२ या कालावधीत भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या तर वाढतच आहे आणि त्याचबरोबर त्यातून प्राप्त परकीय चलनही मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहे. अर्थात यापेक्षाही जास्त परकीय चलन मिळविण्याची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे. सन २०१६ या वर्षात भारताला पर्यटनातून २३.१५ अब्ज डॉलर एवढे परकीय चलन मिळाले आहे. पर्यटन क्षेत्राचा समावेश जरी सेवा क्षेत्रात होत असला तरी भारतात पर्यटनाला खरा वाव कृषी क्षेत्रात आहे. कृषी पर्यटन ही एक नवीन संकल्पना भारतात वाढीस लागली आहे.

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय लोकांचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन कृषी आहे. भारतीय कृषीला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. कृषीवर अवलंबुन असलेल्या लोकांच्या जीवनमानात बदल घडवून आणण्यासाठी आणि त्यांना कृषीला पूरक अशा व्यवसायाची अत्यंत निकड आहे. यातूनच कृषी

तक्ता क्र.१: भारतात आलेले विदेशी पर्यटक व त्यातून प्राप्त विदेशी चलन

| वर्ष | पर्यटकांची संख्या (मिलीयनमध्ये) | प्राप्त विदेशी चलन (मिलीयन यू.एस.डॉलर) |
|---|---|---|
| १९९७ | २.३७ | २.९ |
| १९९८ | २.३६ | २.९ |
| १९९९ | २.४८ | ३.० |
| २००० | २.६५ | ३.५ |
| २००१ | २.५४ | ३.१ |
| २००२ | २.३८ | ३.१ |
| २००३ | २.७३ | ४.४५ |
| २००४ | ३.४६ | ६.२ |
| २००५ | ३.९२ | ७.५ |
| २००६ | ४.४५ | ८.६ |
| २००७ | ५.०८ | १०.१ |
| २००८ | २.२८ | ११.१ |
| २००९ | ५.११ | ११.१ |
| २०१० | ५.५८ | १४.१ |
| २०११ | ६.३१ | १६.६ |
| २०१२ | ६.६५ | १७.७ |

*स्त्रोत : पर्यटन मंत्रालय २०१०-११ आणि २०१२*

पर्यटन ही संकल्पना कृषीला पूरक जोडधंदा म्हणून पुढे आली आहे. भारत सरकार, कृषी मंत्रालय, पर्यटन मंत्रालय आणि विविध राज्य सरकारे आज या कृषी पर्यटनाला प्रोत्साहन देवून कृषी क्षेत्रातील समस्यांवर मात करण्याचा प्रयत्न करताना दिसून येत आहेत. कृषी पर्यटन हा व्यवसाय फारच कमी कालावधीत जास्त लोकप्रिय होत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजेच सर्वसामान्य माणसाच्या खिशाला परवडणारा, बुध्दीला पटणारा आणि रुचीला भावणारा हा व्यवसाय आहे. कृषी पर्यटनाला इतर पर्यटन स्थळांसारखी डोळे दिपविणारी श्रीमंतीची झालर नाही. या पर्यटनाचे नाते मातीशी जुळलेले आहे. कृषी पर्यटनामध्ये कुशल, अकुशल लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार तसेच अतिरिक्त उत्पनाचे साधन उपलब्ध करून देण्याचे सामर्थ्य आहे. तसेच कृषी पर्यटन हे पर्यटकांना शाश्वत सुविधा पुरविते. ग्रामीण भागात विविध उपक्रमांमध्ये पर्यटकांना सहभागी करून घेते. यामुळे स्थानिक उत्पादने, खाद्यपदार्थ, निसर्ग दैनंदिन जीवन, संस्कृती, ग्रामीण आपुलकी इ. बाबी पर्यटकांना अनुभवण्यास मिळतात. शहरी लोकांना ग्रामीण जीवन पाहण्याची संधी मिळते.

औद्योगिक प्रगती व कारखानदारीमुळे शहरी भागात पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, त्यातून निर्माण झालेला ग्लोबल वॉर्मिंगचा प्रश्न, हवा, पाणी प्रदुषण, रोगराई या सर्वांवर उपाय म्हणजे कृषी पर्यटन आहे. सदरील शोधनिबंधात कृषी पर्यटनाच्या संदर्भातील विविध पैलूंवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**कृषी पर्यटनाचे महत्व:**

कृषी पर्यटन हा पारंपरिक पर्यटनापेक्षा वेगळा उपक्रम आहे. पर्यटनामध्ये पर्यटन स्थळे बघण्याचा आनंद असतो तर कृषी पर्यटनामध्ये अनुभव, शिक्षण, प्रशिक्षण आणि संस्कृतीच्या आदान-प्रदानांची संधी असते. कृषी पर्यटनात पिके, प्राणी, पक्षी, जलाशय, विहिरी, निसर्ग, नदी, डोंगर, दऱ्या, पीक पध्दती, पिकांना पाणी देण्याच्या पध्दती, वस्त्या, झोपड्या, जनावरांचे गोठे इ. पाहून शहरी लोकांना (पर्यटकांना) समाधान मिळते. ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्था, तेथील एकत्र कुटूंब, त्यांच्यातील आपलेपणा, सण-उत्सव, लग्न समारंभ इ. मध्ये सहभागी होण्याची व अनुभव घेण्याची संधी मिळते.

कृषी पर्यटनाचे महत्व हे प्रामुख्याने दोन बाबींमुळे आहे. एक म्हणजे भारतीय लोकांचा कृषी हा व्यवसाय मुख्य आधारस्तंभ आहे. आज हा व्यवसाय अनियमित पाऊस, शेतमालाच्या अस्थिर किंमती, भांडवलाची टंचाई आणि अशाच काही अंतर्गत व बाह्य समस्यांमुळे त्रस्त आहे. त्यामुळे कृषीमध्ये असे काही नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची गरज आहे की ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात उत्साह येईल. त्या दृष्टीने कृषी पर्यटन किफायतशीर ठरू शकते. दुसरे असे की, शहरीकरणाचा वेग वाढत आहे. शहरी लोकांचे जग हे बंद फ्लॅटस्, कार्यालये, क्लब, संगणक इ. नी बंदिस्त बनले आहे. शहरी लोक निसर्ग फक्त टीव्ही आणि संगणकाच्या पडद्यावरच पाहतात. काही लोक पहिल्यापासून शहरातच राहतात, त्यांचा खेड्याशी फारसा संबंध नाही, नातेवाईक नाहीत, त्यामुळे त्यांना ग्रामीण भागात म्हणजेच खेड्यात राहता येत नाही. मात्र अशा लोकांना ग्रामीण जीवनाचा (खेड्याचा) आनंद उपभोगण्याची तीव्र इच्छा असते. त्यासाठीच कृषी पर्यटन हा त्यांच्यासाठी उत्तम मार्ग आहे. त्या माध्यमातून कृषी पर्यटन केंद्राचा विकास करून ती सर्व सोयी-सुविधांनी युक्त करून चालविली तर निश्चितच शेतकऱ्यांना ते एक अतिरिक्त उत्पन्नाचे साधन होवु शकते. पाहुणचार हा ग्रामीण जनतेचा स्थायीभाव आहे. किंबहुना अतिथी देवो भव ही आपली संस्कृतीच आहे. फक्त ती आता मोफत न करता त्यासाठी मूल्य आकारले तर त्यातून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल. त्यादृष्टीनेच कृषी पर्यटनाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

**कृषी पर्यटन केंद्र कोण चालवू शकतो?**

वैयक्तिक एखादा शेतकरी सुध्दा कृषी पर्यटन केंद्र चालवू शकतो. परंतु अट अशी की, त्यासाठी त्याच्याकडे किमान दोन हेक्टर जमीन, फार्म हाऊस, पाण्याचे साधन व पर्यटकांचे मनोरंजन करण्याची आवड असायला हवी. तसेच शेतकऱ्यांव्यतिरिक्त NGO शेतकरी सहकारी संस्था, कृषी महाविद्यालये, विद्यापीठे देखील कृषी पर्यटन केंद्र चालवू शकतात.

**कृषी पर्यटन केंद्राचे ठिकाण :**

कृषी पर्यटनाच्या यशस्वितेसाठी ठिकाण ही खूप महत्वपूर्ण बाब आहे. हे ठिकाण पर्यटकांना येण्यासाठी सोईस्कर असावे. तसेच त्या ठिकाणी सर्वसाधारणपणे नैसर्गिक पार्श्वभूमी असणे आवश्यक आहे. कारण शहरी पर्यटक निसर्ग आणि ग्रामीण जीवन अनुभवण्यासाठी आवड असणारे असतात. म्हणून शेतकऱ्यांनी अशी केंद्रे सुंदर अशा

ा पडद्यावरच
सून शहरातच
संबंध नाही,
ामीण भागात
ा. मात्र अशा
ग्राचा) आनंद
ासाठीच कृषी
र्ग आहे. त्या
वकास करून
न चालविली
क अतिरिक्त
ार हा ग्रामीण
अतिथी देवो
क्त ती आता
ले तर त्यातून
टीनेच कृषी
है.
कतो ?
सुध्दा कृषी
अशी की,
क्टर जमीन,
पर्यटकांचे
हवी. तसेच
सहकारी
खील कृषी

ती ठिकाण
पर्यटकांना
ा ठिकाणी
ी असणे
र्ग आणि
असणारे
सुंदर अशा

नैसर्गिक वातावरणात निर्माण करावी की जेणेकरून ती शहरी पर्यटकांना आकर्षित करू शकतील.

## कृषी पर्यटन केंद्राच्या सुविधा :

शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात कृषी पर्यटन केंद्राचा विकास करण्यासाठी ज्या मूलभूत आधारभूत संरचना व सुविधा निर्माण कराव्या लागतात त्या पुढील प्रमाणे-

१. पर्यटकांना राहण्याची तेथेच सुविधा असावी.
२. ग्रामीण चेहरा असणारे फार्म हाउस.
३. पाणी व इतर सुविधा तेथेच असाव्यात.
४. पर्यटकांसाठी प्रथमोपचार सुविधा असाव्यात.
५. पर्यटकांना पोहण्यासाठी किंवा मासेमारीसाठी विहिर, तलाव असावा.

पर्यटकांना इतरही सुविधा पुरविल्या जाव्यात:

१. उत्तम दर्जाचे अस्सल ग्रामीण जेवण पुरविणे यामध्ये भाकरी-ठेचा, रुचकर पालेभाज्या, हुरडा, टहाळ, ऊस, पुरणपोळी, चिकन इ.
२. शेतीतील उपक्रमांमध्ये त्यांना सहभागी होण्याची संधी द्यावी. उदा. औत, नांगर चालविणे, पेरणी, मळणी इ.
३. फिरण्यासाठी बैलगाडी, घोडेस्वारी, पाण्यामध्ये म्हशीची सवारी.
४. स्थानिक पशु-पक्षी, धबधबे इत्यादीविषयी माहिती द्यावी.
५. पर्यटकांना सुरक्षा द्यावी.
६. पर्यटकांना शेतीतील फळे, मका, भुईमूग या वस्तू खरेदीसाठी उपलब्ध करून द्याव्यात.

## कृषी पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था:

कृषी पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांच्यात जवळचा संबंध आहे. कारण कृषी पर्यटनासाठी बाहेरून येणारा पर्यटक स्थानिक बाजारपेठेत वस्तू खरेदी करतो. पर्यटकांच्या मनाचा एकूण कल पाहता तो या बाजारपेठेत स्थानिक ग्राहकांपेक्षा जास्त किंमत देण्यास तयार असतो. शिवाय हॉटेल्स, फळ विक्रेते, फोटोग्राफर्स व इतर किरकोळ विक्रेते यावर पर्यटक पैसा खर्च करतो. म्हणजेच कृषी पर्यटनामुळे स्थानिक बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होतो व त्यामुळे त्यांना आर्थिक लाभ होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासास हातभार लागतो.

## कृषी पर्यटन आणि रोजगार :

भारतात लोकसंख्येचे प्रमाण अधिक असल्यामुळे बेरोजगारी देखील जास्त आहे. बेरोजगारी एक समस्या असून तो विकासातील मोठा अडथळा आहे. परंतु कृषी पर्यटनाला जर प्रोत्साहन दिले तर या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी आहेत.

## कृषी पर्यटन आणि पर्यावरण:

कृषी पर्यटनामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होते. कृषी पर्यटन हे एक सुंदर असे दृष्यावलोकन असल्यामुळे पर्यटन स्थळांच्या ठिकाणाचे पर्यावरण संतुलित राहून वातावरण शुध्द असते. त्यामुळे आजच्या या प्रदुषणाच्या जगात आणि अति कामकाजाच्या भारामुळे काही काळ मुक्त श्वास घेण्यासाठी व तणावमुक्त होऊन निवांत स्थळी काही वेळ घालविण्यासाठी कृषी पर्यटन हे चांगले ठिकाण आहे. त्यामुळे कृषी पर्यटन हे पर्यावरणास मारक नसून तारकच आहे.

## कृषी पर्यटन यशस्वितेचा मूलमंत्र:

१)पर्यटन स्थळाची मोठ्या प्रमाणात टी.व्ही., वर्तमानपत्रांच्या माध्यमातून जाहिरात करावी. २) शाळा, क्लब, एनजीओ, संस्था इत्यादींसोबत संपर्क प्रस्थापित करावेत. ३)पर्यटकांच्या गरजा व अपेक्षेनुसार सेवा पुरविणे. ४)व्यावसायिक आकारावर पर्याप्त भाडे आकारावे. ५)सर्वात महत्वाचे म्हणजे पर्यटकांशी नम्र वागणुक व त्यांच्यात मिसळून रहावे.

## कृषी पर्यटनासमोरील समस्या:

१) शेतकऱ्यांना कृषी पर्यटनाचं अपुरं ज्ञान.२) पर्यटक आणि शेतकरी यांच्यातील सुयोग्य संभाषण कौशल्याचा अभाव.३)कृषी पर्यटन केंद्राच्या उभारणीसाठी भांडवलाची कमतरता.४)कृषी पर्यटन हा असंघटित क्षेत्रातील व्यवसाय आहे.५)शहरी पर्यटकांच्या गरजा व आवडी-निवडी विषयीचे शेतकऱ्यांमधील अज्ञान.

**कृषी पर्यटनाला शासकीय प्रोत्साहनाची गरज:**

कृषी पर्यटनाला आधार देण्यामध्ये प्रामुख्याने राज्य व केंद्राचे कृषी मंत्रालय आणि ग्रामीण विकास मंत्रालय यांचा अंतर्भाव होतो. भारत सरकारने ऑगस्ट २००५ मध्ये अॅग्रो-टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन या संस्थेची स्थापना केली. त्याचबरोबर ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकाने अशा क्षेत्रांची ओळख निर्माण करून त्या ठिकाणी मूलभूत संसाधने निर्माण करणे, वैविध्यपूर्ण संस्कृतीचे प्रदर्शन घडवून आणणे, तसेच अल्पदरात राहण्याची सुविधा निर्माण करणे यासारख्या महत्वाच्या बाबी करायला हव्यात. कारण देशातील वाढत्या बेरोजगारांना कृषी पर्यटनामुळे रोजगाराचे साधन उपलब्ध होते. परिणामी लोकांचे उत्पन्न वाढून त्यांच्यातील दारिद्र्य घटण्यास हातभार लागेल.

**संदर्भसूची:**


१. तावरे प.म., २००८ , *कृषी पर्यटन*, लेख, शेतकरी मासिक, महाराष्ट्र शासन.

२. नेगी जगमोहन, २००९, *विश्व के साहसी पर्यटन और खेल*, तक्षशिला प्रकाशन, दरियागंज, नई दिल्ली.

3. Dora . H., *Agri-Tourism*, A new Agricultural Busines Enterprise Community Rural Development.

4. Kumbar V.M., 2009, *Agri-Tourism*, Scope & Apportunities for the Farmers in Maharashtra, Article, India Stat. Com. Sept.- Oct. 2009.

5. Taware Pandurang, Director Sales & Marketing A.T..D.C., Pune, *Agri-Tourism*, Innovative Supplementory Income Generating Activity for Enterprising Farmer.

6. Sendre V.P., 1979, *Tourism in India*, Parimal Printers, Khadkeshwar, Aurangabad.

7. Sharma K.K., 2005, *Planning For Tourism*, Sarp & Sons Publications, New Delhi.

8. Simon Griver, 1999, *Agricultural Tourism*, Israel Magazine on web, May 1999, Israel Foreign Ministry.

9. खातिब के. ए., *पर्यटन भूगोल*, मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे.

१०. मिश्रा जी.पी., *भारत में पर्यटन*, आदिल पब्लिशर्स, बिना (म.प्र.) १९९३.

११. www.agritounism.in

१२. डॉ. एल.एच. पाटील , संपादक, *कृषी पर्यटन*, मयुर प्रकाशन, लातूर, २०१३.

# पर्यटन आणि रोजगार निर्मिती

**सुभाष लक्ष्मण भालेराव**, शहादा,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
पी.एस.जी.व्ही.पी.मंडळाचे
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२१५९५७०६
ई-मेल: subhash10876@rediffmail.com

भारत ही जगातील एक प्राचीन व संपन्न भूमी असून प्राचीन भारतीय संस्कृती ही जगातील एक प्रगत संस्कृती समजली जाते. प्राचीन वैदिक संस्कृतीमुळे सांस्कृतिक पर्यटनाला भारतीय पर्यटनात एक आगळवेगळे स्थान आहे. भारताच्या पर्यटन विकासात इतर पर्यटन व्यवसायांपैकी सांस्कृतिक घटक हा सर्वात महत्वाचा मानला जातो. कारण विदेशी पर्यटकाच्या मनावर येथील संस्कृतीचा जास्त प्रभाव पडतो हे विविध सर्वेक्षणावरुन सिद्ध झाले आहे.

भारतात येणाऱ्या ५४ टक्के पर्यटकांना मानवनिर्मित सुंदर, कलाकुसर असणाऱ्या इमारती, भव्य व कलात्मक मंदिरे व प्रचंड चर्चेस या बाबींमध्ये आकर्षण निर्माण होते. त्यामुळे देशाच्या पर्यटनात या पुराणवस्तु/पुरातन वस्तु व सांस्कृतिक घटकांना प्रथम स्थान आहे. त्या दृष्टीने भारतात पर्यटनाचे खालील प्रकार पडतात.

**१) सुटीच्या किंवा रिकाम्या वेळेतील पर्यटन :**

भारतात अशा प्रकारचे पर्यटन दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. त्याला प्रामुख्याने कामाचा ताण, बदलती जीवनशैली या कारणास्तव लोकांच्या सुट्टीच्या जवळच्या निसर्गरम्य ठिकाणी वरील कामाचा ताण घालविण्यासाठी जातात. तसेच पोहणे, बीचवर फेरफटका मारणे, इत्यादी मुंबई-पुणे या सारख्या शहरात हा पर्यटनाचा प्रकार खूप मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे स्थानिक लोकांना हॉटेलिंग व लॉजींग व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होत आहे.

**२) व्यावसायिक पर्यटन:**

सहाव्या वेतन आयोगामुळे कर्मचारी आणि कर्मचाऱ्याच्या उत्पन्नावर अवलंबून असणारे व्यावसायिक यांच्या उत्पन्नात वाढ झाल्यामुळे अलिकडच्या

काळात व्यावसायीक पर्यटनाला महत्व आले आहे. लोक खरेदीसाठी वेगवेगळ्या वस्तू, कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू, ऑटोमोबाईल वस्तू यांच्या खरेदी निमित्ताने बाजारास भेटी देतात. यातून ग्राहक आणि उत्पादक विक्रेता भावी विक्री आणि खरेदीचा अंदाज वर्तवतात व त्यातून भविष्यातील उत्पादनाची आखणी होते.

३) पर्यावरणीय पर्यटन :

भारताची नैसर्गिक संपदा आणि त्यातील विविधता ही अधिकच संपन्न आहे. त्यामुळे या पर्यटनाकडे देशी आणि विदेशी पर्यटक मोठ्या प्रमाणात आकर्षित होतात. उदा. अंदमान निकोबार बेट, आइसलॅन्ड, ओरिसा, मेघालय, मालकार, काझीरंगा, उत्तराखंड, सिमला, काश्मिर, केरळ आणि गोव्याचे समुद्र बीचेस् हे पर्यटकांना आकर्षित करतात.

४) प्रार्थनास्थळाचे पर्यटन :

भारतात खूप पुरातन काळापासून पौराणिक/काल्पनिक/देवी-देवतांची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे या पर्यटनाचे महत्व विशेष आहे. प्राचीन काळापासून देव दर्शन घेण्यासाठी या पर्यटनाची सुरुवात झाली आहे. याचे छोटे उदाहरण म्हणजे गावच्या देवाची जत्रा ही एक प्रार्थना स्थळाचे पर्यटन होय. यामध्ये भारतातील काही प्रसिद्ध प्रार्थना पर्यटन स्थळे परळी वैद्यनाथ, बालाजी, कोणार्क मंदिर, शिर्डीचे साईबाबा, अष्टविनायक इ. या प्रकारच्या पर्यटनामुळे गावकऱ्यांना शेती व्यतिरिक्त दुसरे उत्पन्नाचे साधन उपलब्ध झाले आहे. जे बारा महिने उत्पन्न आणि रोजगार उपलब्ध करुन देते.

५) ऐतिहासिक पर्यटन :

भारतीय भूमी ही इतिहासाची साक्ष असलेली भूमी मानली जाते. कारण की या भूमीत इतिहासाची ओळख स्तूप, मंदीरे, किल्ले, दुर्ग, चर्चेस, मस्जिद, मिनार, महल यांच्या स्वरुपात ती उभी आहे. जी त्या काळचे वैभव, संस्कृती आणि सामाजिक, धार्मिक परिस्थितीचे वर्णन करतात. उदा. ताजमहल, कुतूब मिनार, लाल किल्ला इ. या स्थळांना विदेशी पर्यटक, अभ्यासू व्यक्ती, संशोधक व्यक्ती भेट देतात. तसेच देशी पर्यटक सुद्धा भेटी देतात. त्यामुळे येथील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

६) वैद्यकीय पर्यटन :

वैद्यकीय पर्यटन हा पर्यटनामधील अलिकडे समाविष्ट झालेला प्रकार होय. या पर्यटन व्यवसायाचा उगम हा स्वस्त आणि कार्यक्षम वैद्यकिय उपचार आणि निदान पद्धत होय. या निकषावर भारत खरा ठरत असल्यामुळे जगातील अनेक ठिकाणावरून उपचार घेण्यास विदेशी पर्यटक येतात आणि उपचार घेतात. हा व्यवसाय हळुहळु वाढू लागल्यामुळे हॉस्पिटॅलिटी आणि लॉजिंग व्यवसाय वाढत असून नवीन रोजगाराचे एक साधन उपलब्ध झाले आहे.

७) आयुर्वेद आणि योग पर्यटन:

आयुर्वेद हे एक विज्ञान जीवन आहे. आयुर्वेद ही एक अशी निदान आणि उपचार पद्धत आहे की ती रोगाचा समूळ नाश करते व तिचा रोग्यावर दुष्परिणाम होत नाही. म्हणून जगात ही पद्धत लोकप्रिय होत आहे. भारतात आयुर्वेद पर्यटनासाठी विदेशातून लाखो लोक केरळ या राज्यात येतात. या ठिकाणी आयुर्वेद पर्यटनाचा विशेष विकास झाला आहे. तसेच अनेक आश्रम ज्या ठिकाणी आयुर्वेद आणि योगा यांच्या माध्यमातून शरीर तणावमुक्त आणि निरोगी कसे ठेवता येईल याचे प्रशिक्षण दिले जाते. उदा. रामदेवबाबा यांच्या आयुर्वेदावर आधारित पतंजली उद्योगाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. यातून त्यांनी देश आणि विदेश या स्तरावर

अनेकांना किरकोळ विक्रेत्यांच्या माध्यमातून व्यवसाय उपलब्ध करुन दिला आहे.

८) साहस पर्यटन किंवा धोकेदायक पर्यटन:

भारतात नैसर्गिक विविधता असल्यामुळे साहस पर्यटनाला एक चांगले स्थळ मानले जाते. यामध्ये ट्रेकींग, गिर्यारोहण, उंटाची सफारी, विंड राफ्टींग इ. प्रकारचे साहस पर्यटन हे विकसित होत आहे. या माध्यमातून सुद्धा रोजगार आणि उत्पन्नाचे साधन निर्माण होत आहे.

९) खेळ पर्यटन :

खेळ पर्यटन हा आंतरराष्ट्रीय प्रवासाचा भाग आहे. जे वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा पाहण्यासाठी लोक प्रवास करतात. या प्रवासातून पर्यटन होते. उदा. Olympics, World Cup (Soccer, rugby and Cricket), Tennis, Golf and formula Grand prix.

१०) वन्यजीवन पर्यटन :

वन्यजीवन पर्यटन हे वन्य प्राण्यांचे निरीक्षण करण्यासाठी, फोटोग्राफी करण्यासाठी, प्राण्याच्या आहाराचे निरीक्षण करणे, त्यांचा व्हिडिओ करणे या दृष्टीने वन्यजीवन पर्यटनाकडे पाहिले जाते. या पर्यटनाला पर्यावरण पर्यटनाचा भाग मानला जातो.

या दहा प्रकाराचा भारतात रोजगार निर्मिती मध्ये खूप मोठा वाटा आहे. कारण पर्यटन असे क्षेत्र आहे की ज्या ठिकाणी अकुशल कामगारापासून उच्च तंत्र असणाऱ्या कुशल कामगारापर्यंत विविध स्तरावर रोजगार निर्माण होतो. म्हणून प्रस्तुत संशोधनात पर्यटन आणि रोजगार निर्मिती याविषयी संशोधित माहितीच्या आधारे रोजगार आणि पर्यटन यांचा संबंध धनात्मक/ऋणात्मक आहे काय? याचा शोध प्रस्तुत संशोधनात घेतला जाईल.

भारतात २०११ ची आकडेवारी लक्षात घेतली तर पर्यटन हा सर्वात मोठा सेवा उद्योग आहे. राष्ट्रीय स्थुल घरगुती उत्पादनात (G.D.P.)६.२३% आणि भारताच्या एकूण रोजगारात ८.७८% वाटा आहे. भारतात प्रत्येक वर्षी साधारणतः ५ मिलियन विदेशी पर्यटक भ्रमंतीसाठी येतात. २००८ मध्ये भारतीय पर्यटन उद्योगाने १०० बिलियन डॉलर्सचा व्यवसाय मिळविला. २०१८ पर्यंत हा व्यवसाय २७५.५ अमेरिकन बिलियनस् डॉलरपर्यंत व्यवसाय वाढण्याची शक्यता आहे. २०१४-१५ या वर्षात पर्यटन व हॉटेल्स यांची एकूण उलाढाल २८ लाख कोटीपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे.

भारत आशिया खंडात चीननंतरची दुसरी मोठी पर्यटन बाजारपेठ आहे. एवढेच नाहीतर जगातील झपाट्याने वाढणाऱ्या व प्रगती करणाऱ्या प्रथम २० जागतिक पर्यटन केंद्रात भारताचा अकरावा क्रमांक आहे. २००० या वर्षात भारताला भेट देणारे सुमारे २७ लाख विदेशी पर्यटक होते. हीच संख्या २०१३ साली ६८ लाख पर्यंत पोहोचली. विदेशातून येणारे मुख्यतः पर्यटक हे अमेरिका, इंग्लंड, रशिया, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स व मलेशिया या देशातून येतात. वैद्यकीय पर्यटन हे प्रतिवर्ष सुमारे ३०% वाढत आहे. २०१५-१६ या कालावधीत या क्षेत्राची उलाढाल सुमारे साडेचार, पाच लाख कोटींच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

भारतात पर्यटन व्यवसायाला नेहमीच दुय्यम वागणुक मिळाली. परंतु पहिल्यांदाच १९९१ मध्ये सरकारने पर्यटन उद्योगाची दखल सरकारी पातळीवर घेतली. १९९१ मध्ये सरकारने *व्हिजिट इंडिया* हा खास कॅम्पेन सुरु केला. नव्वदीचे दशक पर्यटन दशक म्हणून साजरे करण्यात आले. भारतात पहिल्यांदाच २५

जानेवारी १९९८ ला पर्यटन दिवस साजरा करण्यात आला. १९९९ हे वर्ष *एक्स्लोर इंडिया मिलेनियम इयर* म्हणून साजरे करण्यात आले. या काळात भारतात पर्यटनासंबंधी पायाभूत सुविधेचा विकासाचा वेग वाढवण्यात आला. कारण एक विदेशी पर्यटक सरासरी ८ जणांना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार देतो. तसेच १० लाख रुपयाची गुंतवणूक ७८ जणांना रोजगार प्राप्त होते. तर कृषी मध्ये ४५ आणि उत्पादन क्षेत्रात फक्त १८ जणांना रोजगार मिळतो. आजच्या घडीला ५ कोटी लोक या क्षेत्रात कार्यरत आहे. अमेरिकेतील इमोरा चार्ल्स कॅलिस्टेड यांनी हैदराबाद विद्यापीठातील मॅनेजमेंट स्टडीजमध्ये केलेल्या भाषणात भारतीय पर्यटन व्यवसायाचे महत्व अधोरेखित करताना म्हटले की, २०२० पर्यंत पर्यटन क्षेत्र IT क्षेत्रापेक्षा अधिक रोजगार देईल. यांचे महत्व लक्षात घेवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी *व्हिजिट महाराष्ट्र*ची घोषणा केली. नोटबंदीच्या काळातही पर्यटकांची संख्या वाढली.

कारण पर्यटन व्यवसाय हा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करतो. उदा. यात्रेकरु किंवा पर्यटक हा प्रत्यक्ष ट्रॅव्हल एजन्सीला रोजगार देतो. हॉटेल्स धारकांना, टॅक्सी चालक, फुल विक्रेता, भाजीपाला विक्रेता, हस्तकला विक्रेते, शेतकरी, स्वच्छता कामगार, वेटर्स, नाट्यकृती, कलामंच आणि आचारी यासारख्या अनेक लोकांना एकाच वेळी रोजगार उपलब्ध करुन देतो. एकंदरीत २००३ ते २०१४ या कालावधीत *ट्रॅव्हल आणि टुरिझम* या सेवा क्षेत्रातील G.D.P. मधील वाटा हा सरासरी ६.८% इतका राहिला आहे. २०११ ते २०२१ या कालावधीत ८.५% टक्क्याने रोजगार संधी वाढण्याची शक्यता आहे. म्हणून विकासाचे नवे दालन म्हणून या क्षेत्राकडे पहावे.

**संदर्भसूची:**


१) *पर्यटन भूगोल*, डॉ. एस. जी. शिंदे, फडके प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती.
२) Bureau of Immigration, Govt. of India.
३) Ministry of Tourism ,Govt. of India.
४) Tourism & Hospitality - I.B.E.F.
५) www.dainikprabhat.com.
६) www.divyamarathi.bhaskar.com
७) Ministry of Tourism, Govt. of India.
८) Travel and Tourism (2013) World Tourism Council.
९) Research Paper of Sultan Sing Jaswal.


## श्रध्दांजली

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या आजीव सदस्या व बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील गो. से. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातील सेवानिवृत्त प्राध्यापिका कुंदा मुळे यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी ५ मार्च २०१७ रोजी पुणे येथे दु:खद निधन झाले. त्यांना मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद



# पर्यटन क्षेत्र व भारतीय अर्थव्यवस्था

रमजान फत्तुखान मुजावर, पेण,
सहाय्यक प्राध्यापक,
डॉ.पतंगराव कदम आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, जि. रायगड
भ्रमणध्वनी: ९९२१८०३६३३

विसाव्या शतकातील व एकविसाव्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दूरगामी परिणाम करणारी योगवाही आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. प्रवास आणि पर्यटन हा जगातील अग्रेसर व्यवसाय असून त्यामुळे जास्तीत जास्त लोकांना रोजगार प्राप्त होतो. इ.स.२००० मध्ये ९० कोटी लोकांनी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून प्रवास केला आणि सुमारे ७०० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतका पैसा खर्च केला. एकूण जागतिक उत्पन्नाच्या १२ ते १३ टक्के इतकी ही रक्कम होते. अनादी कालापासून



मानवाचा प्रवास सुरू असून अनभिज्ञ ठिकाणांचा ठाव घेण्याची ईर्ष्या व प्रवास यांनी मानव मनास मोहीत केलेले आहे. प्राचीन मानव अजाणतेपणाने प्रवास करीत असे. एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेला मानव आवड, कुतूहल व संशोधक म्हणून प्रवास करतो. अनभिज्ञ व अज्ञाताचा ठाव घेणे हे आर्थिक सुज्ञपणाचे एक लक्षण आहे असे भारतातील माजी अमेरिकन राजदूत जे. के. गॅलब्रेथ म्हणतात. पर्यटनामुळे ते साध्य होते. पर्यटनामुळे प्रत्येक देशाला परकीय चलन मिळत असते. भिन्न-विभिन्न समाजातील, देशांतील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढविण्यासाठी मदत होते.

**साहस पर्यटन:**

हा नवीन प्रकार असून अनेक पर्यटनस्थळांवर साहस पर्यटनाची व्यवस्था असते. त्याकडे देशातील व विदेशी पर्यटक आकर्षिले जातात. यामध्ये गिर्यारोहण, स्नो-राफ्टींग, रिव्हर राफ्टींग, विंड राफ्टींग, रोप वे, जंगल सफारी यांचा समावेश होतो.

**पर्यटनाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम:**

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. या व्यवसायासाठी प्रत्यक्ष खर्च आणि अप्रत्यक्ष खर्च येतो. प्रत्यक्ष खर्चामध्ये वाहतूक, दळणवळण, निवास व्यवस्था, भोजन व पैसे, खरेदी व सेवा इ. खर्चाचा समावेश होतो. तर पर्यटनाचे उत्पन्न म्हणजे पर्यटकाना वस्तू व सेवा पुरवून मिळविलेले उत्पन्न होय. या उत्पन्नाचा

अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होतो. पर्यटनावरील अप्रत्यक्ष किंवा दुय्यम खर्चामध्ये व्यापारी वस्तू ज्या इतर व्यापारी किंवा उद्योगाकडून खरेदी केलेले असतात अशांचा समावेश होतो. उदा. अन्नधान्य, भाजीपाला,फळे,पेये, फर्निचर, लाकडी सामान, इतर घरगुती वापराच्या वस्तु, खेळाचे साहित्य आणि इतर सुविधा ज्या त्या पर्यटकांना त्यांच्या मागणीनुसार पुरविण्यात येतात. या पर्यटनामुळे होणारे आर्थिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. आर्थिक विकासाला सहाय्य -

पर्यटन हा असा महत्वाचा उद्योग आहे की ज्यामुळे अविकसित देशात जलद आर्थिक विकास होण्यास मदत होते. त्यामुळे या उद्योगांच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले जाते. परंतु हा आर्थिक विकास भांडवलाची योग्य प्रकारे गुंतवणूक करण्यावर अवलंबून असतो. म्हणजे भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक स्थिती आणि पर्यटकांच्या आवडीनिवडी पाहून वाहतूक, इमारती, उद्याने इ.वर खर्च होण्याची गरज असते. दुसरी गोष्ट म्हणजे गुंतवणुकीमुळे तेथील लोकांना रोजगाराची संधी मिळते. हॉटेल व्यवसायात गुंतवणूक केल्याने प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होतो. या उद्योगात होणारी गुंतवणूक नियोजनपूर्वक केल्यास त्याचे अधिक फायदे मिळतात शिवाय स्थानिक उत्पादनावर आधारित हस्तोद्योग व कुटीर उद्योगामुळे सेवा उद्योगांचा विकास होतो.

२. परकीय चलन-

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय असून पर्यटकांना विविध सेवा पैशाच्या मोबदल्यात पुरविल्या जातात. भारतातील महत्वाच्या आणि प्रमुख पर्यटन केंद्राना जगातील निरनिराळ्या देशातून अनेक पर्यटक भेटी देतात. परदेशातून येणारे हे पर्यटक आपल्या देशातील चलन बरोबर घेऊन येतात. हे परकीय चलन देशाच्या दृष्टीने महत्वाचे असते. भारतासारख्या विकसनशील देशाच्या दृष्टीने परकीय चलन महत्वाचे असते. आता विकसनशील व अविकसित देशांमध्ये पर्यटन उद्योग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या देशांना भेटी देणाऱ्यांमध्ये औद्योगिकदृष्ट्या प्रगत अशा देशातील पर्यटकच जास्त असतात. अशा देशातून येणारे परकीय चलन हे अधिक महत्वाचे असते. या चलनाद्वारे त्या देशातून औद्योगिक माल आयात करता येतो.

३. रोजगार उपलब्धता -

पर्यटनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा दुसरा प्रत्यक्ष आर्थिक परिणाम म्हणजे रोजगाराची उपलब्धता होय. पर्यटन हा जसा एक आर्थिक व्यवसाय आहे. तसेच तो एक रोजगार उपलब्ध करून देणारा व्यवसाय आहे. या व्यवसायात विविध प्रकारे रोजगार उपलब्ध होतात. त्यामध्ये अत्यंत अकुशल कामगारांपासून तज्ज्ञ, प्रशिक्षित, विशिष्ट, अनुभवी कामगारांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. पर्यटन व्यवसायामध्येही उच्चशिक्षित, विशिष्ट प्रशिक्षण घेतलेले लोक उदा. हिशेबनीस, रोखपाल, आचारी, वेटर्स, हाऊसकिपर्स, मनोरंजन करणारे आवश्यक असतात. निमकुशल व अकुशल कामगारामध्ये हमाल, झाडुवाले, माळी इ. लागतात. या उद्योगाबरोबर संबंधित क्षेत्रात अनेक प्रकारे रोजगार उपलब्ध होतो. उदा. घरगुती साहित्य तयार करणारे, शेतीत काम करणारे, वाहतुकीमध्ये कामगार, मालक या उद्योगातील उपकरणे व त्यांचे सुटे भाग तयार करणाऱ्या कारखान्यातील कामगार यांचाही समावेश होतो.

४. बाजारपेठांचा विकास -

पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी बाजारपेठांचा विकास होतो. या बाजारपेठांचे देखील पर्यटकांना

आकर्षण असते. बाजारपेठा या आर्थिक दृष्टया महत्वाच्या असतात. पर्यटन क्षेत्राच्या ठिकाणी बाहेरून येणारे प्रवासी व पर्यटक त्यांच्या भ्रमंतीच्या व वास्तव्याच्या काळात वस्तूंची खरेदी करतात. त्यामुळे अशा बाजारपेठात विशेषतः नाविन्यपूर्ण वस्तू विक्रेत्यांची संख्या बरीच असते. भारतामध्ये हस्तोद्योगात व कुटीर उद्योगात निर्माण होणाऱ्या वस्तू, कलाकुसरीच्या वस्तु, आकर्षक भरतकाम, विणकाम केलेले कापड, स्वेटर्स, शाली इ.लोकरी कपडे, लाकडी वस्तू, चांदीच्या वस्तू, खेळणी इ. वस्तू विकणाऱ्या विक्रेत्यांचा समावेश होतो. पर्यटन बाजारपेठेत पर्यटक स्वतःहून दुकानात येतो व चटकन माल खरेदी करून जातो. हे वैशिष्टयपूर्ण मानले जाते. उदा. भारतातील मध्यप्रदेशातील पचगढी येथील बाजारपेठ पर्यटकांच्या दृष्टिकोनातून एक आगळेवेगळे आकर्षण मानले जाते. तसेच दक्षिण भारतातील उटी, कोडाई कॅनॉल येथील बाजारपेठा पर्यटकांच्या दृष्टिकोनातून गजबजलेल्या असतात.

५. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ -

भारतामध्ये जम्मू, काश्मिर, पश्चिम बंगाल, राजस्थान, मणिपूर, त्रिपुरा, ओरिसा, आसाम, गुजरात, महाराष्ट्र, गोवा या राज्यातील विविध ठिकाणी पर्यटक नेहमी येत असतात. पर्यटकामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. हे उत्पन्न मालाच्या विक्रीतून तसेच सेवांतून प्राप्त होते. पर्यटनामध्ये खर्च केलेल्या रकमेचा विनियोग विविध प्रकारे होऊ शकतो. उदा. हॉटेलमध्ये जे भाडे आणि बिल मिळते त्याचा उपयोग हॉटेल व्यवस्थापन पर्यटकांसाठी आणलेल्या धान्य, भाजीपाला, फळे, पेये इ. चे मुल्य भागविते. तसेच हॉटेलमध्ये ज्या वापराच्या वस्तू उदा. बेडस्, खुर्च्या इ. साठी तसेच वीज बिल, कपडे, धुलाई आणि मनोरंजन इ. साठी वापरते. अशा प्रकारे प्रत्येक वेळी हा पैसा वेगवेगळ्या लोकांच्या हाती भांडवल म्हणून जातो. हा पैसा जितक्या अधिक लोकांच्या हाती जाईल तितका त्याचा अर्थव्यवस्था विकसित होण्यामध्ये उपयोग होतो. त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नत वाढ होते.

६. सरकारला मिळणारा महसूल -

पर्यटन स्थळाच्या ठिकाणी चालविली जाणारी हॉटेल, रेस्टॉरन्टस्, खानावळी, दुकाने, टॅक्सी आणि विशेषतः क्लब व विविध पेये यावर सरकार कर आकारते. त्यामुळे या माध्यमातून भारतातील सरकारला मोठा पैसा किंवा महसूल मिळतो.

७. देवघेवीचा समतोल -

देवघेवीचा समतोल म्हणजे एका राष्ट्राने इतर देशांसाठी केलेला खर्च आणि त्या देशांकडून आलेले चलन यांचे संबंध. दुसऱ्या शब्दात आंतरराष्ट्रीय जमाखर्चाचा ताळेबंद म्हणजे देवघेवीचा समतोल होय. हा आंतरराष्ट्रीय ताळेबंद तीन प्रकारचा असतो. दृष्य, अदृष्य आणि रकमेचे हस्तांतर. यामध्ये दृष्य हा वस्तूच्या आयात-निर्यातीसंबंधी, अदृष्य हा जहाज वाहतूक, विमा इ. सेवा संबंधी तर रकमेचे हस्तांतर देशांदेशांतील भांडवलाचे हस्तांतर असते. भारतातील पर्यटनाचे महत्व आणि पर्यटनाची होत असलेली प्रगती पाहता हा आर्थिक देवघेवीचा समतोल महत्वाचा आहे.

भारतामध्ये असणारा हा देवघेवीचा समतोल अनुकूल आणि प्रतिकूल अशा स्वरूपात दिसून येतो. परकीय चलनापासून केलेला खर्च हा पर्यटकांसाठी हॉटेल्स, हॉलिडे, कॅम्पस्, रस्ते बांधणी व इतर सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी असतो. अशा प्रकारे देवघेवीचा समतोल हा पर्यटनाचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम वैशिष्टयपूर्ण मानला जातो.

७. स्थानिक अर्थव्यवस्थेला मदत -

भारतामध्ये पर्यटकांचे स्थानिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने बरेच महत्व आहे. कारण बाहेरून येणारा पर्यटक स्थानिक बाजारपेठेत वस्तूची खरेदी करतो. कारण त्याला भारतातील वस्तूंचे आकर्षण असते. पर्यटकांच्या मनाचा एकूण कल पाहता तो बाजारपेठेत स्थानिक ग्राहकांपेक्षा जास्त किंमत देऊन जातो. शिवाय हॉटेल्स, हॉटेलमधील वेटर्स, टॅक्सीवाले, गाईडस् इ. वरही पर्यटक जास्त पैसा खर्च करतात. त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

८. प्रादेशिक विकास -

पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग हा प्रदेशाच्या आर्थिक विकासाकरिता होतो. विकसित देशात या व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न इतर उद्योगांच्या तुलनेने कमी असते. भारतामध्ये १९९० नंतर अंदमान निकोबार द्विपसमूह, ईशान्य भारतामध्ये काही ठिकाणी याच कारणाने पर्यटन विकासावर भर देऊन विकासातील प्रादेशिक असमतोल दूर करण्याचा प्रयत्न केला जात असे. अशा प्रकारे जेथे साधनसंपत्ती कमी आहे किंवा उपलब्धच नाही अशा प्रदेशांत, रोजगार व उत्पन्नच नाही अशा प्रदेशांत रोजगार व उत्पन्नाचे साधन म्हणजे पर्यटन हे आहे.

९. इतर आर्थिक घटक -

भारतामध्ये पर्यटन विकासामुळे निरनिराळ्या कारणांसाठी अधिक जमीन शेतीव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरली जाते. उदा. पर्यटकांसाठी निवास गृहे, हॉटेल्स बांधणे, पर्यटन क्षेत्रात अधिक रस्ते व इतर वाहतुकीची सोय करणे, पशुपक्ष्यांसाठी अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने निर्माण करणे इ.मुळे पीक क्षेत्रात व कुरणक्षेत्रात झपाट्याने घट होते. एका बाजूस पर्यटकासाठी अधिक जमीन तर दुसऱ्या बाजूस शेती पिकाखालील कमी क्षेत्र यामुळे समस्या निर्माण होतात.

समारोप -

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पर्यटन हा एक महत्वाचा व्यवसाय असून अलिकडे भारतातील विविध राज्यात पर्यटन केंद्रांचा विकास घडून येत असल्याचे दिसून येते. दक्षिण भारत,कोकण अशा ठिकाणी भारतास लाभलेल्या नैसर्गिक देणग्यांमुळे अनेक पर्यटन स्थळे पर्यटकांसाठी महत्वाचे ठरत आहेत. पर्यटनमुळे तेथील प्रदेशांचा आणि यामध्ये रोजगार उपलब्ध असलेल्या लोकांचा विकास होत असल्याचे दिसून येत आहे.भारतातील पर्यटन क्षेत्राचा विचार करता या क्षेत्रांतील कमतरता दूर करून जास्तीत जास्त विकास साधला तर पर्यटन क्षेत्र भारताच्या अर्थव्यवस्थेत मोलाची भर घालेल.

## संदर्भसूची:


१. दास्ताने संतोष, *भारत*, २०००

२. घैसास वासंती, *भारत दर्शन गाईड*, चला सफरीला

३. घारपुरे विठ्ठल, *पर्यटन भूगोल*, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर २००९

४. शिंदे एस्. बी., *पर्यटन भूगोल* (१९९७)

5. Batra G.S., *Tourism in the 21st Century* (1996)

6. Bhatia A.K., *Tourism Development*

7. Sharma Vivek, *Tourism in India* (1992)

8. Shrivastava K.K., *Tourism in India* (1983)

# कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास

**शिवाजी बाबुराव पाते, परभणी,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
संत तुकाराम महाविद्यालय.
भ्रमणध्वनी: ९४२०८१५५५२

प्रस्तावना :

देशात महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकासात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. तसेच राज्यात मोठ्या प्रमाणात शहरीकरण झाले असून ४२ टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते. याचाच अर्थ महाराष्ट्रात ग्रामीण भागात ५८ टक्के लोकसंख्या राहते. त्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे, परंतु महाराष्ट्रातील शेती ८२ टक्के कोरडवाहू आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासात शहरी भाग हा विकसित झाला आहे तर ग्रामीण भाग मागासलेला राहिला आहे. याला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. उदा. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव, भांडवलाचा अभाव, तंत्रज्ञानाचा अभाव, निसर्गावर आधारित शेती, कृषी माल किंमतीतील अनिश्चितता, कमी उत्पादकता, पारंपरिक पिके, बाजारपेठेचा अभाव, कृषी आदानांच्या वाढत्या किंमती, व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक, शेतकऱ्यांमधील अज्ञान, कर्जबाजारीपणा, सतत पडणारा दुष्काळ इ.अनेक कारणांमुळे ग्रामीण भागातील शेती व्यवसाय अडचणीत आला आहे. त्याला उभारी देण्यासाठी ग्रामीण भागात शेतीचा शाश्वत विकास आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न केला जातो, परंतु झारीतील शुक्राचार्यांमुळे त्यात यश आले नाही. आज ही आपण चार टक्के पर्यंत देखील शेतीचा विकास दर गाठू शकलो नाहीत. राज्यातील शेतीचा विकास दर वाढवायचा असेल तर शेतीला पूरक व्यवसायाची जोड देणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतीत झालेला तोटा पूरक व्यवसायातून भरून निघेल. त्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे आवश्यक आहे. शेती हे उदरनिर्वाहाचे साधन नसून विकासाचे साधन आहे. सध्या महाराष्ट्रात कृषी पर्यटन व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून ग्रामीण विकासात महत्वाची भूमिका पार पाडत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. शहरी भागातील लोकांचे ग्रामीण भागाबद्दल आकर्षण निर्माण होत

आहे. कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास आणि ग्रामीण विकासातून महाराष्ट्राचा विकास यासाठी महाराष्ट्रातील कृषी पर्यटन व्यवसाय करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन १२ डिसेंबर २००८ रोजी विद्या प्रतिष्ठान बारामती जिल्हा पुणे येथे महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ मर्यादित (मार्ट) या संस्थेची स्थापना करून या संस्थेअंतर्गत राज्यात कृषी पर्यटन व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले जाते, त्यामुळे महाराष्ट्रात कृषी पर्यटन जागृती प्रचार व प्रसारामध्ये मार्टची भूमिका मोठी आहे. मार्ट मार्फत महाराष्ट्र शासन कृषी पर्यटन व्यवसायासाठी आर्थिक मदत करते.

जागतिक पातळीवर कृषी पर्यटनाचा उगम ऑस्ट्रेलिया मध्ये ७० वर्षापूर्वी झाला. आज ऑस्ट्रेलियात कृषी पर्यटन हा ग्रामीण विकासाचा मुख्य स्त्रोत झाला आहे. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात कृषी पर्यटनातून ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी सर्व प्रथम बारामती येथे स्व. आप्पासाहेब पवार यांनी केलेले शेतीमधील नाविन्यपूर्ण प्रयोग, त्यांनी कृषी संशोधन पाहण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची निशुल्क राहण्याची, भोजनाची सोय शेतावर करीत. कालांतराने शुल्क आकारून कृषी अभ्यास दौरे आयोजित केले. त्यांच्या अथक प्रयत्नातून महाराष्ट्रात कृषी पर्यटन व्यवसायाचे बीज रोवले गेले.

कृषी पर्यटन म्हणजे शेतावरील फेरफटका, आपल्या संस्कृतीची ओळख, आनंद, शहरी जीवनशैलीचा उबग आलेल्या लोकांनी चार दिवस शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन राहणे व शेतकऱ्याने शहरी लोकांचा सशुल्क पाहुणचार, आदरातिथ्य करणे म्हणजे कृषी पर्यटन होय.

कृषी पर्यटन हा व्यवसाय शेतकऱ्यांना प्रतिष्ठा व सामर्थ्य मिळवून देणारा व्यवसाय असून शहरी लोकांनाही निसर्ग सौंदर्याचा अनुभव देणारा व्यवसाय आहे. नाबार्ड मार्फत पर्यटन विषयीच्या विविध योजनांमुळे सध्या महाराष्ट्रात कृषी पर्यटन केंद्रांची संख्या ५०० च्या जवळपास असून त्यामध्ये पुढील काही वर्षात १००० पर्यंत वाढ करण्याचा संकल्प केला आहे. नाबार्ड मार्फत कृषी पर्यटन केंद्राला ५० लाखापर्यंत पतपुरवठा करणाऱ्या योजना नाबार्डने आणल्या आहेत. कृषी पर्यटन केंद्र संख्या वाढावी म्हणून मार्ट संस्था मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करते. या शिबिरात विविध विषयावर तज्ज्ञांच्या व्याख्यानाचे आयोजन केले जाते, त्यामुळे कृषी पर्यटन केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागात स्थानिक रोजगार बळकटीकरण होत आहे. १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन असून या दिवशी मार्टच्या वतीने महाराष्ट्रात चांगले कार्य करणाऱ्या कृषी पर्यटन केंद्राना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते, तसेच कार्यशाळेचेही आयोजन केले जाते. राज्यात कृषी पर्यटन केंद्राच्या निर्मितीसाठी राज्य शासन कृषी विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक सहाय्य करते.

**कृषी पर्यटन व्यवसायाची फायदे:**

१) शेतकऱ्यांना प्रतिष्ठा प्राप्त होते.

२) स्थानिक बाजारपेठ मिळते.

३) शहरी व ग्रामीण अंतर कमी होते.

४) ग्रामीण भागात स्थानिक रोजगार निर्मिती होते.

५) मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढालीमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळते.

६) कृषी विकासाला चालना मिळते.

७) कमी भांडवल गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करता येतो.

८) शेती सांभाळून कृषी पर्यटन व्यवसाय करता येतो.

९) ग्रामीण भागात मूलभूत सुविधा निर्माण होतात.

१०) शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो.

**कृषी पर्यटन व्यवसाय केंद्र चालविताना घ्यावयाची काळजी:**

१) पर्यटनाचा कुठलाही प्रकार हा आदरतिथ्यावर अवलंबून असतो म्हणून तुमच्याकडे येणाऱ्या पर्यटकांचे योग्य आदरतिथ्य केल्यास मोठ्या प्रमाणात पर्यटकांची संख्या वाढू शकते.

२) कृषी पर्यटन केंद्र सुरू केल्यानंतर तेथील स्वच्छता पर्यटकांची सुरक्षितता आदि जबाबदारी व्यावसायिकांनी घ्यावी. केंद्रात विहिरी, शेततळी, स्वीमिंग टँक असतील आणि त्यात पर्यटकांना पोहण्याचा आनंद घ्यावयाचा असेल तर त्यासाठी आवश्यक त्या संरक्षण उपाययोजना असायला हव्यात. कारण उत्तम सेवा असेल तरच कृषी पर्यटन केंद्र यशस्वी होऊ शकेल.

३) कृषी पर्यटन केंद्रात शेतीत उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तू विक्रीस ठेवताना ताजा व स्वच्छ भाजीपाला, फळे, तृणधान्ये, कडधान्ये, तसेच इतर वस्तू विक्रीसाठी गावातील बचत गटांना सहभागी करून घ्यावे.

४) शहरी व विदेशी पर्यटकांना ग्रामीण जीवन नवीन असत तसेच त्यांना कुतूहल असते.

त्यामुळे चुलीवरची भाकरीही त्यांना मोठी मौज देऊन जाते. तसेच ग्रामीण भागातील संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी छोट्या लघुपटाचीही सोय असावी.

५) कृषी पर्यटन केंद्राच्या ठिकाणी उत्तम सुखकारक निवासाबरोबर उत्तम जेवणाचीही सोय असली पाहिजे.

६) कृषी पर्यटन स्थळाच्या आजूबाजूला काही ऐतिहासिक स्थळे किंवा पर्यटन स्थळे असतील तर त्या ठिकाणी भेटीच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

७) महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण पर्यटन (मार्ट), कृषी पर्यटन विकास महामंडळ (एटीडीसी) व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) आणि शासकीय पर्यटन विभाग किंवा संस्थेमध्ये तुमच्या कृषी पर्यटन व्यवसाय केंद्राची नोंदणी करावी. त्यामुळे संकेतस्थळावरून तुमच्या केंद्राची माहिती पर्यटकांना होईल.

८) तुमच्या कृषी पर्यटन केंद्राच्या जाहिरातीसाठी सोशल नेटवर्किंग साइटचा उपयोग करावा.

९) कृषी पर्यटन केंद्राची नोंदणी ऑन लाईन खालील संकेत स्थळांवर करता येते.

i) www.agritoursm.in

ii) www.maharashtratoursm.gov.in

iii) www.maharashtragov.in

**कृषी पर्यटन व्यवसाय केंद्रासमोरील आव्हाने:**

१) ग्रामीण भागात मूलभूत सुविधांचा अभाव

२) सवलतीच्या दरात मोठ्या कर्जपुरवठ्याचा अभाव

३) व्यवसाय वाढीसाठी मार्केटिंगची गरज

४) कृषी पर्यटनाबाबत शासनाचे उदासिन धोरण

५) चांगल्या शासकीय योजनांचा अभाव

६) कृषी पर्यटन केंद्र व्यावसायीकांना प्रशिक्षण व मार्गदर्शनाचा अभाव.

७) कृषी पर्यटन केंद्र उभारणीसाठी जनजागृती, प्रचार व प्रसाराचा अभाव

**कृषी पर्यटन व्यवसाय वाढीसाठी उपाय योजना:**

१) महाराष्ट्रात कृषी व ग्रामीण पर्यटनाविषयी शेतकऱ्यामध्ये जनजागृती, प्रचार व प्रसार करणे.

२) महाराष्ट्रात जास्तीत जास्त कृषी पर्यटन प्रकल्प उभारणे.

३) कृषी पर्यटन व्यवसायासाठी मनुष्यबळ निर्मिती करणे.

४) कृषी पर्यटनात सेवा देणाऱ्या शेतकरी व सहकारी संस्था यांना एका छताखाली आणून आर्थिक विकास करणे.

५) सर्व कृषी पर्यटन प्रकल्पांचे संघटित मार्केटिंग करणे.

६) शेतकऱ्यांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून उत्तम दर्जाची सेवा देण्यासाठी प्रवृत्त करणे.

७) कृषी व ग्रामीण पर्यटनासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिरे घेणे.

८) महाराष्ट्राची संस्कृती जागतिक पर्यटनाच्या नकाशावर आणणे.

९) कृषी पर्यटन प्रकल्पाच्या आर्थिक सहाय्याकरीता बँक, राज्य, केंद्र शासन यांच्याबरोबर समन्वय साधणे.

१०) शासनाच्या मदतीने निरनिराळया माध्यमातून कृषी पर्यटनाची देशात व जगात प्रसिध्दी करणे.

११) कृषी महोत्सव, उपक्रमांचे आयोजन करणे.

१२) पर्यावरणाशी सुसंगत जबाबदार पर्यटन महाराष्ट्रात व्हावे यासाठी प्रयत्न व संघटनेची स्वयंशिस्तीची नियमावली निश्चित करणे.

१३) कृषी पर्यटन प्रकल्पांची वेब पोर्टल, फिल्म बनवणे.

१४) कृषी पर्यटन केंद्रावरील कर्मचारी महिला, बचत गट, स्थानिकांना सहभागी करून घ्यावे.

१५) कृषी पर्यटन सहकारी संस्थेच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी निधी उभारणी करणे.

**संदर्भसूची:**

१) दैनिक लोकसत्ता, बुधवार, १५ फेब्रुवारी २०१२.
२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१५-१६.
३) www.agritourism.in
४) दैनिक महाराष्ट्र टाइम्स, गुरूवार, १६ मे २०१३.
५) दैनिक ॲग्रोवन, सोमवार, २० मे २०१३.

## मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष आणि माजी विश्वस्त डॉ.संतोष दास्ताने यांची भारत संचार निगम लि. नवी दिल्ली (बी.एस.एन्.एल्.) यांचे स्वतंत्र संचालक म्हणून तीन वर्षांसाठी नेमणूक झाली आहे. देशातून सध्या फक्त दोघांचीच निवड झाली आहे. त्यात डॉ.दास्ताने यांचा समावेश आहे. चर्चा, सल्लामसलत, निर्णय प्रक्रियेतील सहभाग असे या कामाचे स्वरूप आहे. त्यांच्या या नव्या जबाबदारीबद्दल अभिनंदन व मन:पूर्वक शुभेच्छा !

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४१ वे राष्ट्रीय अधिवेशन, फैजपूर: शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४१ वे वार्षिक अधिवेशन तापी परिसर विद्या मंडळ फैजपूर संचलित धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जिल्हा जळगाव येथे सामान्यपणे नोव्हेंबर २०१७ मध्ये आयोजित केले जाणार आहे. लोणी खुर्द जिल्हा अहमदनगर येथील डॉ.रामचंद्र रसाळ हे अध्यक्षस्थान भूषवतील. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ.पी.आर. चौधरी(भ्रमणध्वनी:९४२२२८३७४६) आणि स्थानिक कार्यवाह डॉ.एन.एल. चव्हाण (भ्रमणध्वनी:९४२०३४७०८७) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

**१) रिकार्डो यांचे आर्थिक सिद्धांत,**

**२) भारतातील करव्यवस्थेतील बदलांचा चिकित्सक अभ्यास,**

**३) महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतदादा पाटील यांचे योगदान.**

वरील विषयांचे टिपण *अर्थसंवाद* च्या याच अंकामध्ये दिले आहे. चौथा विषय तत्कालीन परिस्थितीशी संबंधित असेल आणि तो परिषदेचे अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. त्या विषयावर सदस्यांकडून शोधनिबंध मागविले जात नाहीत.

दि.५ सप्टेंबर २०१७ ही निबंध स्वीकारण्याची अंतिम तारीख राहील. निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दात मांडावयाचे असून निबंधासोबत ३०० शब्दात त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. शोधनिबंध ISM, DVB-TT-Surekh, Kruti Dev, या मराठी फॉन्टमध्ये (Times New Roman या इंग्रजी फॉन्टसाठी) MS-Word File/ PageMaker या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. निबंधाची सॉफ्ट कॉपी (सीडी) व दोन हार्ड कॉपीज मा. अध्यक्षांकडे पाठवाव्यात. निबंध लेखक मराठी अर्थशास्त्र परिषदेचा सभासद असला पाहिजे. निबंध मराठीतच असावेत, ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी, महाविद्यालय/ विद्यापीठाचे नाव व पत्ता हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे. निबंधलेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

डॉ.रामचंद्र रसाळ,
राजाई बंगला, साई कॉलनी
मु.पो.लोणी-खुर्द, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर-४१३ ७१३
भ्रमणध्वनी: ९८५००४४०८९.

- डॉ. रामदास भांडवलकर,
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद



# कृषी पर्यटन-काळाची गरज

सुरेश रामरावजी जगताप, अमरावती,
अर्थशास्त्र विभाग, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय,
भ्रमणध्वनी: ९४२०८३२५९२

पर्यटन म्हणजे प्रवास नवनवीन प्रेक्षणीय स्थळे पाहणे व जगण्याचा आनंद घेणे असा साधासुधा अर्थ होतो. प्रवास करणे माणसाचा जुना छंद आहे. आपल्या सभोवतालच्या वातावरणात बदल व्हावा म्हणून माणूस प्रवास करीत असतो. परंतु या सर्व बाबींचा समावेश आज पर्यटन या संज्ञेत समाविष्ट झालेला आहे. पहिल्या महायुध्दाच्या काळात पर्यटनाला मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. पर्यटन हा एक संशोधनाचा, माहिती करून घेण्याचा किंवा एखाद्या बाबीची जाणीव करून घेण्याचा विषय आहे.



**शेती उत्पादन वाढीकरीता कृषी पर्यटन:**

पर्यटन म्हणजे धार्मिक स्थळांना भेटी देणे, निसर्गसौंदर्य स्थळांना भेटी देणे वर्षभर तेच ते काम करुन थकल्यानंतर सुट्टीच्या काळात आनंद, मौज व मनोरंजन करणे म्हणजे पर्यटन होय, असा सर्वसाधारण पर्यटनाचा उद्देश असतो. परंतु कृषी पर्यटनाला एका दृष्टीने असा अर्थ अभिप्रेत नाही. अनेक व्यवसायांपैकी कृषी हा भारतीयांचा प्रमुख व्यवसाय आहे. परंतु आज कृषीची अवस्था वाईट आहे. विकासाच्या प्रक्रियेतून वाटचाल करणाऱ्या भारतासारख्या राष्ट्रात ६५% लोक कृषी व्यवसाय करतात. परंतु हा व्यवसाय सर्वच दृष्टीने दूर्लक्षित का आहे? सर्व प्रथम सांगायचे म्हणजे कृषी हा अशिक्षित व अडाण्यांचा व्यवसाय आहे असा समज येथील कृषी समाजमनाचा करण्यात आला आहे. मग कृषी पर्यटन ही संकल्पना तर फारच दूर राहीली. आता कृषीला पुढे न्यायचे असेल, विकसीत करायचे असेल तर कृषी पर्यटनाचा आधार घेणे गरजेचे झाले आहे. केवळ आपल्याच शेतात तेच ते काम व पारंपरीक पद्धतीचा वापर करुन उत्पादन काढणे कालबाह्य झाले असून आता नवीन तंत्रज्ञान, नवीन विकसित पद्धती, सुधारित बी-बियाणे, खते व किटकनाशके आणि यांत्रिकीकरणाचा उपयोग करुन कृषी व्यवसाय करणे महत्वाचे आहे. त्यासाठी शिक्षण (अज्ञात भागाचा शोध घेणे हे जसे पर्यटनात येते तसेच कृषीतील अज्ञात बाबी माहित करुन घेणे हे कृषी पर्यटनात समाविष्ट होते.) आधुनिक तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी कृषी शिक्षणासोबतच

कृषीपर्यटनाची आवश्यकताच नाही तर ती एक काळाची गरज आहे. कृषीवर तंत्रज्ञानातून नवनवीन प्रयोग करणे, त्यासाठी विविध ठिकाणी भेटी देणे, तंत्रज्ञान समजावून घेणे विकसनशील बाबींचा अभ्यास करण्यासाठी कृषी पर्यटनाची गरज आहे. कृषीवर आधारित अनेक उद्योग व व्यवसाय आहेत. अनेक शेतकऱ्यांना त्या उद्योग व्यवसायाची माहिती नसते. त्यामुळे असा कृषी व्यवसाय चालविण्यासाठी लागणारे ज्ञान, माहिती पर्यटनातून मिळू शकते. अनेक व्यावसायिक अनेक व्यवसाय करतात. प्रत्येकच व्यावसायिकाला परिपूर्ण माहिती असतेच असे नाही. अभ्यासातून, फिरण्यातून, वाचनातून आणि अनेक ठिकाणी भेटी देवून माहिती घेत असतात व आपल्या व्यवसायाला काळानुरुप विकसित करीत असतात, त्यासाठी त्यांचे संघटन असतात त्यांच्या मार्फत ते कार्यक्रम आयोजित करुन आपल्या सदस्यांना नव्याने माहिती देवून तत्पर (Upgrade) करीत असतात व सदस्य सुद्धा त्या दृष्टीने प्रयत्न करीत असतात. ह्या सर्व बाबींसाठी कृषी क्षेत्र फार मागासलेले आहे. एकमेकांसोबत चर्चा करुन कृषी क्षेत्राला विकसित करु शकतो. माहिती मिळवू शकतो व आर्थिक उत्पादन वाढवू शकतो. त्यासाठी कृषी क्षेत्रामध्ये विचारांची देवाण घेवाण झाली पाहिजे. कृषीत काम करणारे लोक अन्य व्यवसायांवर जे आपल्याशी संबंधीत नाही त्यावर खूप बोलताना दिसतात परंतु आपल्याशी निगडीत असणाऱ्या व्यवसायाबाबत मात्र फारसे बोलताना दिसत नाही. मग संशोधन व अधिक माहिती घेणे हे तर फारच दूर यासाठी अन्य व्यवसायाच्या संघटना कार्यक्रम घेतात त्यांची व्यवस्था करतात. कृषीशी संबंधीत असणारी बी-बियाणे व किटक नाशके उत्पादित कंपन्या अनेक कृषी साहित्य विक्रेत्यांना (कृषी केंद्रधारक) वर्षाकाठी ट्रीप किंवा सहलीचे आयोजन करतात. लाखो रुपये कंपन्या त्यावर खर्च करतात. त्यातून त्यांच्या उत्पादित मालाची अधिकाधिक विक्रीत वाढ व्हावी हा उद्देश असतो.

आता तर जागतिकिकरणाचा काळ आहे. यामध्ये तर कोणताही व्यवसाय कुणासाठी राखीव राहिला नाही तर मग कृषी व्यवसायच का पिढीजात शेतकऱ्यांनीच करावा? त्यात नव्याने समाज का येत नाही? त्यात येणाऱ्यांचा उत्साह का नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे हा व्यवसाय आर्थिक डबघाईस आलेला असून ह्या व्यवसायात *अर्थ* नावाच्या अर्थाला स्थान नाही हातबट्ट्याचा व्यवसाय झालेला आहे. म्हणून कृषी पर्यटनासाठी लागणारा पैसा व माहिती पासून हा कृषी समाज वंचित राहतो. त्यासाठी शासनाने प्रत्येक गावांतील काही शेतकऱ्यांना प्रातिनिधीक स्वरुपात कृषी पर्यटनाला विकसित करावे व ही संकल्पना कृषीमध्ये रुजवावी जेणे करुन त्याला त्याची आर्थिक बाजू विकसित करण्यास मदत मिळेल. अन्य पर्यटक मौजमजा व आवड आणि मनोरंजन म्हणून, बदल म्हणून पर्यटन करतात तर कृषी पर्यटनामध्ये ह्या बाबीशिवाय अत्यंत महत्वाची बाब म्हणजे शेतकरी जो व्यवसाय करतो त्या व्यवसायाची माहिती घेऊन उत्पादनाची पद्धती समजावून घेऊन आपल्या शेतामध्ये त्या पद्धतीचा स्वीकार करणे व आपल्या उत्पादनात वाढ कर ह्या दुहेरी फायदा कृषी पर्यटनातून होवू शकतो केवळ दुहेरीच नाही तर जे शेतकरी कृषी पर्यटनावरुन आल्यानंतर आपल्या कृषी पद्धती बदल घडवून आणतील त्यांचेच अनुकरण त्या गावातील किंवा अन्य शेतकरी करतील व त्या पध्दतीने शेती पध्दती विकसीत करतील. असा बहुआयामी फायदा शेतकऱ्यांना कृषी पर्यटनातून होवू शकतो. म्हणून कृषी पर्यटनाकडे गरजेच्या

भावनेने शासन, समाज, नागरिक, कृषी विद्यापीठे व शेतकऱ्यांनी पाहिले पाहिजे.

कृषी पर्यटनाची फायदे : १. शेतकऱ्यांचा जीवनस्तर उंचावतो. २.शेतीमध्ये नव्याने रोजगाराच्या संधी निर्माण होतात. ३. जलसिंचन, खते, सुधारित बी-बियाणे, जंतू व किटकनाशके इत्यादिंच्या सहाय्याने शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी मदत होते. ४. जमीन ही स्थायी व टिकाऊ संपत्ती आहे. तिचा अधिक उपयोग करुन घेता येतो. ५.उन्नतीचे नवे मार्ग सापडतात. ६.पारंपरीक कृषी सोबतच कृषीशी संबंधित अन्य उद्योग करता येतात. जसे : अ) हरित शेती, भाजीपाला शेती, फुल शेती, कुक्कुटपालन, वराह पालन, गांडुळ खत प्रकल्प, औषधी वनस्पती शेती, दुग्धव्यवसाय, शेळी मेंढी पालन, जर्सी गाईपालन, गुळ काढणे, रसवंती चालविणे, नर्सरी उद्योग, दाळ उद्योग, मधमाशी व मधसंकलन उद्योग-घरगुती बी-बियाणे संकलन उद्योग, इत्यादी नवनवीन उद्योगांची आपआपल्या ज्ञान कौशल्य व साधनांतून विकसित करता येते. ऐपतीनुसार भांडवलाची उभारणी करुन कृषी पर्यटनातून या उद्योगाची माहिती शिक्षण व प्रशिक्षण मिळू शकते. म्हणजे शेतीतून पीक काढणे व आपला उदरनिर्वाह भागविणे एवढेच मर्यादित न राहता शेती भोवती उद्योगाचे जाळे विणले जावून त्यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती व क्रयशक्ती निर्माण होईल. पारंपरीक शेती शिवाय - केळी, मोसंबी, द्राक्ष, पेरु, आंबा, पपया, अननस, चिकू, कांदा साठवण, डाळींब इत्यादिची लागवड करुन त्याचा उद्योगासाठी कसा वापर करता येईल. हे सुद्धा कृषी पर्यटनातून साधले जाईल. शेतीशी संबंधित तंत्रज्ञान - फवारणी यंत्रे, पेरणी यंत्रे, कांडप यंत्रे, कापूस वेचाई यंत्रे, खुरपणी यंत्रे इत्यादी. सिंचनाची यंत्रे- ठिंबक सिंचन, तुषार सिंचन, सोलर वर चालणारी सिंचन मोटार, पाईप व्दारे पाणी पुरवठा करणाऱ्या सोयी, लिफ्ट इरिगेशन, पाणी मोजमाप यंत्रे जसे पाण्याचे महत्व ओळखून राळेगण सिध्दीत अनेक क्रांतीकारक योजना अन्ना हजारे यांच्या नेतृत्वात राबविल्या. या जलसिंचन योजनांसाठी भरपूर सबसिडी देण्यात आली. यासाठी आपले राज्यकर्ते आणि तज्ज्ञ देशभर व जगभर दौरे करत आहेत. परंतु एकानेही शेतकऱ्याला उपयुक्त ठरणाऱ्या मशिनरीच्या कंपनीशी कोलॅबोरेशन करून भारतात असे उद्योग सुरु केले नाहीत.

नागपूर मध्ये मिहान प्रकल्पावर करोडों रुपये खर्च झाले व उद्योगातून उद्योग व रोजगारातून रोजगार निर्मिती होईल असे चित्र उभे केले गेले त्यासाठी कृषी योग्य जमिनीचा वापर केला गेला. असा प्रकार अनेक ठिकाणी व अनेक उद्योगासाठी घडत आहे व चांगली पिकाऊ जमीन त्यासाठी वापरण्यात येत आहे. मात्र त्याची फलश्रृती किंवा रोजगार निर्मिती उत्पादन क्षमता फार नगण्य दिसून येते. शेतकऱ्याची जमीन मात्र त्यासाठी वापरली गेली. परंतु ह्याच शेतकऱ्यांच्या जमिनीवर शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांच्या सहाय्याने पर्यटनातून व प्रशिक्षणातून त्यांना माहिती करून दिल्यास कृषी विकास होऊ शकतो व शेतकरी आपली प्रगती करू शकतो. प्रत्येक पिकाचे हंगामपूर्व प्रशिक्षण व पर्यटन, पीक मध्यावधीमध्ये प्रशिक्षण व पर्यटन आणि पिकाचे अंतीम टप्प्यात प्रशिक्षण व पर्यटन योजना शासनाचे सहाय्याने राबविताना कृषी व्यवसाय निश्चितच उंचावेल व उत्पादनाची शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल. विशेष म्हणजे सुशिक्षीत तरुणांना एक नवा आशेचा किरण त्यातून दिसून येईल व सरकारने जाहीर केलेल्या धोरणानुसार Startup India ही संकल्पना कृषीमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात राबविली जाईल.

**पर्यटनाची व्याप्ती:**

कृषी पर्यटन हे तालुका किंवा जिल्ह्यापुरतेच मर्यादित नसून राज्य, राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर कृषी पर्यटनाचे महत्व आहे. आपल्या राज्यात, देशात किंवा अन्य देशात उत्पादना संबंधी असणारे तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी कृषी पर्यटन महत्वाचे ठरते. यासाठी गरजेनुसार व आवडीनुसार आणि आपल्या कृषीशी संबंधित असणाऱ्या उत्पादनानुसार कृषी पर्यटन महत्वाचे असू शकते यात पिक पध्दतीचे कृषी पर्यटन, वित्तीय पुरवठा संबंधीचे कृषी पर्यटन, शासकीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय योजनानुसार कृषी पर्यटन, यंत्रनिर्मिती उद्योगांसाठी कृषी पर्यटन, रासायनिक खते व किटकनाशके यांच्या वापरासाठी कृषी पर्यटन याचा समावेश होतो.

**कृषी पर्यटन आयोजन व सहभाग:**

अशा स्वरुपाचे कृषी पर्यटनाचे आयोजन शासनाचे कृषीशी संबंधित जे विविध विभाग आहेत त्यांचे आणि शासनाच्या पुरस्काराने कृषी अदाने उत्पादन करणाऱ्या कंपन्या, नाबार्ड (National Bank for Agriculture & Rural Development) (NABARD) यांनी सहभाग घेतला तर शक्य होवू शकते. कृषी पर्यटनाविषयक दुसरा मुद्दा म्हणजे-

**अन्य पर्यटकासाठी कृषी संबंधी - पर्यटन:**

काही ठिकाणी शेतमाल विक्री केंद्रे सरकारने सुरु केली आहेत. परंतु प्रसिध्दीअभावी, व्यावसायिक दृष्टी अभावी ती केन्द्रे प्रगतीशील झाली नाही. कृषी पर्यटनात विविध प्रकारचे ज्यूस, डाळींब, द्राक्ष, अननस, कोरफड, मोसंबी, संत्री रस, पर्यटनस्थळी शिक्षित युवक-युवती विक्री करून रोजगार मिळवू शकतात. अशा कृषी पर्यटन स्थळी बालोद्यान चिल्ड्रेन पार्क निर्माण केल्यास मुलांना विविध खेळणी खेळण्यास वाव राहील सोबतच आई वडिलांना सुध्दा आनंद घेता येईल. अशा ठिकाणी विदेशी पर्यटक सुध्दा आकर्षित होतील. यातून जागतिक पातळीवर भारतीय संस्कृतीची ओळख पटेल. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होण्यास चालना मिळेल.

नैसर्गिक पर्यटन विकसित करण्यासाठी कृषीमध्ये भरपूर वाव आहे. शेतात पर्णकुटी तयार करणे- शेजारीच पाण्याचा लोट तेथेच चुलीवर शिजवलेले अन्न पूर्णपणे ग्रामीण व घरगुती आणि सेंद्रीय पदार्थापासून तयार केलेल्या स्वयंपाकाचे जेवण, ग्रामीण भागात राहणे, पर्यटन वस्ती निर्माण करणे, सिमेंट विटा ऐवजी-साध्या मातीच्या भिंती रोज सडा सारवण केलेली पर्णकुटी वर्षातून काही दिवस-महिने अशा नैसर्गिक ठिकाणी निवास करण्यासाठी राहू शकता. जाने-फेब्रु.-मार्च ह्या तीन महिन्यामध्ये वातावरण संतुलित असते. त्यामुळे जंगलामध्ये अशा ठिकाणी नैसर्गिक पर्यटकांनी (Naturopathy Tourisum) आकर्षित करता येवू शकते. त्याच ठिकाणी संपूर्ण निसर्ग व्यवस्था, व्यायामाची व्यवस्था केल्यास नैसर्गिक पर्यटकांची संख्या वाढेल. जमिनीतील काळी माती, थंड पाणी - साधे जेवण - साधा नैसर्गिक व्यायाम शेणामातीशी संपर्क अशा ठिकाणी एखादा आठवडा घालण्यासाठी पर्यटक फार मोठमोठ्या प्रगत ठिकाणी भटकंती सोबतच अशा ठिकाणी सुध्दा येवू शकतात. शेती ही पारंपरिक पध्दतीने केल्यास उत्पादन वाढत नाही यात काहीतरी व्यावसायीकता हवी. त्यातून कृषी पर्यटन ही संकल्पना आली. शेतीत भांडवल गुंतवणूक करून पारंपरीक पध्दतीने उत्पादन काढून विकण्याऐवजी कृषी पर्यटनावर भर देवून त्यात लक्ष घालणे गरजेचे आहे.

**मुक्त कृषी पर्यटन:**

मुक्त कृषी पर्यटनात येणाऱ्या पाहुण्यांचे

पारंपरीक पध्दतीने स्वागत करण्यात येते. कृषि पर्यटनात सेंद्रीय पध्दतीने केलेल्या शेतीची कृतिशील ओळख होते. निसर्ग व पर्यावरणाची अभ्यासपूर्ण माहिती होते. स्वतःच्या शेतातील उत्पादनांचा शंभर टक्के वापर होतो. विशेषत्वाने शाकाहारावरच भर दिला जातो. भोजनासाठी पर्यटक भाजी खुडतील, पर्यटकांना आनंद घेता येईल. मुलांसाठी रानमेवा व काही मैदानी खेळ असतील म्हणून संपूर्ण कुटूंब यात आनंद घेवू शकतील. भोजनासोबतच आंतरिक शांतता जपण्यासाठी ध्यान साधना केंद्र असे पर्यटन डोंगराच्या पायथ्याशी नदीच्या काठी तलावाच्या शेजारी विकसित करण्यास वाव आहे. पर्यटकांसाठी विश्रामगृहे उंच झाडावर चढण्यासाठी दोराची शिडी, आजूबाजूला पसरलेली तांबडी माती, पाण्याच्या उपलब्धतेनुसार आनंद घेता येतो. दरवर्षी ऑगस्ट ते जानेवारी असा सहा महिने कृषी पर्यटनाचा आनंद घेता येतो. कृषी पर्यटनात संपूर्ण सेंद्रीय शेती केली जाते. कृषी पर्यटनात भात, उडीद, गहू, चवळी, मठ, बाजरी इ. पिके घेतली जातात व पर्यटकांनाच विकली जातात. विशिष्ट चवीचा पॉलीश न केलेला सकस तांदूळ, कैरीचे पन्हे, सरबत, लोणचे पापड देशी गाईचे दूध, तुप, दही, शेतीसाठी उपयुक्त शेणखत असा कल्पनेने उपयोग करून शेती पर्यटनाचा विकास करता येतो.

कृषी पर्यटन निसर्गाशी जवळीक साधणारे एक आनंददायी ठिकाण आहे. त्यातून शिक्षण, मौज व आनंद यांचा सुवर्णमध्य साधता येतो. ही संकल्पना मूळ ब्राझील, ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड या देशातील आहे. त्यासाठी ओढे, नाले, तलाव, टेकड्या, डोंगर, नदी किनारे, समुद्र किनारे यासारख्या निसर्गाचे वरदान लाभलेल्या जागेची निवड केली जाते. त्यामध्ये उद्यान निर्मिती, झोपाळे, घसरगुंड्या, आकाश पाळणा, विविध पशु पाळीव जनावरे, दुर्लक्षित अशा काटे व झुडपांचे सौंदर्य लोकांच्या नजरेत आणून शेजारची सुर्योदय, सुर्यास्त टेकडीवरील ताऱ्यांचे निरीक्षण, ग्रामीण संस्कृतीची ओळख, तेथील खाद्य संस्कृतीचा अनुभव कृषी पर्यटनाच्या माध्यमातून घेता येतो. शेती विषयक पर्यटने वेळोवेळी आयोजित केल्यास अनेक पर्यटक वारंवार भेटी देतात. कृषी पदवीधारकांनी कृषीपर्यटन स्थळांची निर्मिती केल्यास त्यांना बराच फायदा मिळविता येतो.

**संदर्भसूची:**


१) डॉ. स.श्री.मु. देसाई, डॉ. सौ. निर्मल भालेराव, *भारतीय अर्थव्यवस्था*, तेरावी आवृत्ती २०१६.

२) वि.के.पुरी एस.के. मिश्रा, *भारतीय अर्थव्यवस्था*, २८ वी सुधारित आवृत्ती.

३) डॉ. नागतोडे, प्रा. पारधी, *कृषी भुगोल - पर्यटन भुगोल*, प्रथमावृत्ती २००६.

४) वीर उत्तमराव मोहिते , *डॉ. पंजाबराव देशमुख चरित्रग्रंथ*

५) डॉ. विठ्ठल घारपुरे, *कृषी भुगोल* - २०००.

६) *उद्योजक* मासिक - जाने २०१७

७) *शेतकरी* मासिक - जाने २०१७

# ग्रंथ परीक्षण

## स्पर्धा परिक्षा: अर्थशास्त्र

**जयश्री उपाध्ये, पुणे,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आबेदा इनामदार सिनियर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अ‍ॅन्ड कॉमर्स.
भ्रमणध्वनी: ९५५२५७०७९४

*लेखक: डॉ. संतोष दास्ताने, डॉ. मंजुषा मुसमाडे, डॉ. कुंदा दामले*
*प्रकाशक - सुनिधी पब्लिशर्स, पुणे (पृष्ठे ४५६)*

राज्य व केंद्र सरकारच्या अनेक सेवा, बँका, विदेशसेवा, आदि अनेक विभागाच्या विविध स्पर्धा परिक्षात अर्थशास्त्राला मध्यवर्ती स्थान आहे. इतर अनेक सामान्यज्ञान, प्रश्नमंजुषा अशा कार्यक्रमात देखील अर्थशास्त्र विषयक प्रश्न समाविष्ट असतात. अनेक स्पर्धा परिक्षात वैकल्पिक विषय म्हणूनही अर्थशास्त्र विषय निवडणारे अनेक विद्यार्थी असतात. अर्थशास्त्र विषयाच्या अभ्यासामुळे, त्यातील संकल्पना, त्यांचा आपल्या रोजच्या जीवनात उपयोग, धोरणे ठरविताना त्या संकल्पनांचा उपयोग, भोवती घडणाऱ्या घटनांमधील अर्थशास्त्रीय सिद्धांताचा प्रत्यक्ष अनुभव या सर्वांचे आकलन होते. त्यासाठी अर्थशास्त्राचा खोलवर तसेच नेमकेपणाने अभ्यास उपयोगी ठरतो. त्यातून यशाचा मार्ग सुकर होऊ शकतो. सुविधा पब्लिशर्स, पुणे यांचे 'स्पर्धा परिक्षा : अर्थशास्त्र' हे अर्थशास्त्रातील मुलभूत संकल्पनांचे स्पष्टीकरणासह विवेचन करणारे पुस्तक डॉ. संतोष दास्ताने, डॉ. मंजुषा मुसमाडे, डॉ. कुंदा दामले या लेखकत्रयीने नुकतेच प्रकाशित केले आहे.

स्पर्धा परिक्षांना सामोरे जाताना परिक्षार्थींना आपले वेगळेपण व गुणवत्ता ही आपण केलेल्या पद्धतशीर व नेमक्या अभ्यासाच्या उत्तम आणि अचूक प्रदर्शनातून व्यक्त करायची असते. त्या दृष्टीने या पुस्तकाची मांडणी ही त्यातील प्रमुख विषय व उपविषय यांच्या आधारे केली आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. संतोष दास्ताने यांनी अर्थशास्त्राची व्याप्ती अतिशय नेमकेपणाने मांडली आहे. त्यातून वाचकांची किंवा अभ्यासकाची विचार प्रक्रिया शिस्तबद्ध व सुसंगत व्हावी, त्यातील तर्कशुद्धता वाचकांना सहज समजावी अशीच आहे. अर्थशास्त्र हे वर्तणूक शास्त्र आहे. ते गतिमान आहे. त्यामुळे नवे संशोधन, नवे तंत्रज्ञान, नवी विश्लेषण पद्धती, बदलती परिस्थिती, आव्हाने यातून अर्थशास्त्राची बदलणारी व्याप्ती, विस्तारणाऱ्या कक्षा यांचा विचार करूनच

या पुस्तकात पंधरा प्रकरणे समाविष्ट केली आहेत.

'सार्वजनिक आयव्यय' या पहिल्या प्रकरणात कर व करविषयक संकल्पना, करांचे प्रकार, कर आकारणी, करांची संरचना, कर चुकवणे, करेतर उत्पन्न या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. त्याबरोबरच सार्वजनिक खर्च, विकासेतर खर्च, त्याबाबत शासनाची भूमिका उदारीकरणातील आर्थिक नियोजन व त्यातील विसंगती याची माहिती दिली आहे. सार्वजनिक आयव्ययासंबंधी किचकट संकल्पना सोप्या भाषेत उपयुक्त स्वरूपात मांडल्यामुळे वाचकाला या संकल्पना सहजपणे समजणे शक्य होते.

'लोकसंख्याशास्त्र आणि भारताची जनगणना' ही सामाजिक शास्त्रातील आंतरविद्याशाखा स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून अभ्यासली जाते. या प्रकरणात जनगणनेचा इतिहास, जनगणना विषयक संकल्पना, लोकसंख्या रचना, लोकसंख्येची घनता, साक्षरता प्रमाण, लोकसंख्या वाढीचा दर, इ. संकल्पना भारतातील त्या संबंधीच्या आकडेवारीच्या सहाय्याने स्पष्ट केल्या आहेत. विशेषत: जन्मदर, मृत्यूदर, लोकसंख्येची घनता निर्धारित करण्याची सुत्रे उदाहरणासह दिल्यामुळे अभ्यासकांना सहज आकलन होऊ शकते.

'शेती आणि सहकारी संस्था' या प्रकरणांतर्गत भारतीय शेती व भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे स्थान, शाश्वत शेती, जमीन सुधारणा कायदा, सहकारी शेती, पीकरचना, शेतीपूरक व्यवसाय, हरित क्रांती, दुसरी हरित क्रांती, जलसिंचन इ. भारतीय शेतीविषयक विषय आकडेवारीच्या सहाय्याने मांडले आहेत. कृषीवित्त पुरवठा विवेचनाबरोबरच नाबार्ड विषयी सविस्तर माहिती दिली आहे. शेतमाल विषयक किंमत धोरण, शेतमाल विक्री, अन्नसुरक्षा व त्याला अनुलक्षून जागतिक भूक निर्देशांक संकल्पना, भारतातील शेती क्षेत्रावरील तुलनात्मक खर्च, कृषी अनुदाने व त्याची आकडेवारी दिली आहे. सहकारी चळवळ व त्याचे भविष्यातील मार्ग याचा वेध या प्रकरणात घेतला आहे.

औद्योगिकीकरण ही आर्थिक विकासाची आवश्यक प्रक्रीया आहे. 'औद्योगिक विकास' या प्रकरणात औद्योगिक क्रांती, औद्योगिक उत्पादकता, भारतातील औद्योगिकरणाच्या प्रवृत्ती, औद्योगिक आजारपण, निर्गुंतवणूक या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. देशी उद्योगांतर्गत लोखंड व पोलाद, सिमेंट, साखर उद्योग, ताग उद्योग, वस्त्रोद्योग, भारतातील औद्योगिक धोरण, मक्तेदारी नियंत्रण कायदा १९६९, स्पर्धा कायदा २००२, औद्योगिक कलह व त्याचे निवारण याची माहिती दिली आहे. २०१४ मधील उद्योजकतेतील जागतिक पातळीवरील प्रमुख देश व BRIC गटातील देशांचा उद्योगातील क्रमांक ही माहिती अद्ययावत अशी आहे.

औद्योगिक क्षेत्र व शेती व्यवसायाच्या विकासात पायाभूत सुविधांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्याची माहिती देणाऱ्या 'पायाभूत सुविधा' या प्रकरणात भारतातील वाहतुक व्यवस्थेसंबंधी माहिती दिली आहे. भारतातील वाहतुक व्यवस्थेअंतर्गत रस्ते, रेल्वे, जलवाहतूक, हवाई वाहतूक यांच्या विश्लेषणात्मक माहिती बरोबरच त्याच्या समस्या विशद केल्या आहेत. पायाभुत सुविधांबरोबर उर्जाक्षेत्रासंबंधी माहिती दिली आहे. यात सद्यस्थितीतल उर्जाक्षेत्रातील प्रवृत्ती, पायाभूत सुविधा प्रकल्प, भारतातील उर्जा योजना, अपारंपरिक उर्जा स्रोत, भारताचे उर्जा धोरण, उर्जा किंमत धोरण, सार्वजनिक खाजगी भागीदारी प्रकल्प संकल्पना इ. विस्तृत माहिती

दिली आहे.

'भारतीय संस्थात्मक वित्तसंस्था' या प्रकरणात भारतीय वित्तसंस्थांचे वर्गीकरण, भारतातील नाणे बाजार व भांडवल बाजार, त्यातील घटक, साधने, प्रवृत्ती, भांडवलनिर्मिती याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. भारतातील वित्तसंस्था व महामंडळे यांची तक्त्यातून दिलेली माहिती उपयुक्त आहे.

'भारतीय चलन व बँक व्यवस्था' या प्रकरणात राखीव चलन, पैशाचा गुणक, भारतातील पैशाचा पुरवठा, चलनवाढ व त्याची कारणे, रुपयांचे अवमूल्यन, किंमत निर्देशांक, इतर समग्र अर्थशास्त्रीय संकल्पना स्पष्ट केल्या आहेत व त्यासंदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात दिलेली आकडेवारी संकल्पनांच्या स्पष्टतेसाठी योग्य अशी दिली आहे. भारतातील मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची कार्ये, चक्रवर्ती कमिटीचा अहवाल, रिझर्व्ह बँक कार्यातील तांत्रिक संकल्पना यांच्या माहितीपूर्ण विवेचनामुळे हा भाग अतिशय माहितीपूर्ण ठरला आहे.

स्वतंत्र भारतासमोर दारिद्र्य व बेकारी या दोन समस्या आव्हानात्मक आहेत. 'दारिद्र्य' या प्रकरणात दारिद्र्य विषयक अनेक संकल्पना, दारिद्र्याचे दुष्टचक्र, भारतातील दारिद्र्य विषयक अभ्यास, दारिद्र्य निर्मुलन योजना, बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक, गिनी-लॉरेन्झ गुणोत्तर, दारिद्र्य तफावत निर्देशांक, गरिबी निर्मुलन - आधुनिक दृष्टीकोन याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. या प्रकरणातील विविध तज्ज्ञ समित्यांनी दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचा अंदाज याबाबतीत तक्ता स्वरुपातील माहिती ही अतिशय अभ्यासपूर्ण आहे.

आंतरराष्ट्रीय बाजार या प्रकरणात आंतरप्रदेशीय व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार, व्यापार शर्ती, विनीमय दर, विनीमय दर नियंत्रण, सीमाशुल्क, आंतरराष्ट्रीय रोखता, अभ्यांश किंवा वाटा, निर्यात प्रोत्साहन, विदेशी विनीमयदर, व्यापार तोल, व्यवहार तोल इतर संकल्पना सोपेपणाने स्पष्ट केल्या आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य करणाऱ्या संस्था विशद करताना, कोलंबो प्लान, बँक ऑफ इंटरनॅशनल सेटलमेंटस्, कॉमकॉन, युरोपिअन ट्रेड असोसिएशन, युरोपिअन युनियन, उत्तर अमेरिकन मुक्त व्यापार करार, ओपेक संघटना, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचे योगदान स्पष्ट केले आहे.

आर्थिक नियोजन व विकास या प्रकरणात आर्थिक नियोजन व वित्त आयोग या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. सद्यस्थितीत नीति आयोगाने नियोजन मंडळाची घेतलेली जागा व त्याचे सविस्तर विवेचन आहे. भारतातील नियोजनाच्या पार्श्वभूमीवर सद्यस्थितीपर्यंतचा भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास, विकासाचे सामाजिक निर्देशांक, आर्थिक विकासाचे निकष याचे सविस्तर विवेचन आहे. प्रादेशिक नियोजन: एक संक्षिप्त आढावा हा तक्ता थोडक्यात पण महत्त्वपूर्ण माहिती देणारा आहे.

कामगार आणि रोजगार या प्रकरणात बेरोजगारी, त्याचे प्रकार, बेरोजगारी निर्मुलनाच्या योजना, निर्गमन धोरण, संघटित व असंघटित श्रम याची माहिती आहे. सेवा क्षेत्र हे गेल्या २५-३० वर्षात विस्तारलेले क्षेत्र आहे. त्या प्रकरणात प्राथमिक, दुय्यम व सेवा क्षेत्राची संकल्पना, भारतातील सेवाक्षेत्र, त्याच्या वाढीची कारणे, माहिती तंत्रज्ञान संचार क्षेत्र यांच्या विषयी उपयुक्त माहिती व आकडेवारी दिली आहे. माहिती तंत्रज्ञान कायदा २०००, बीपीओ व कॉलसेंटर्स यांची

झालेली वाढ व त्यातून रोजगार निर्मिती ही माहिती आकडेवारीसह दिली आहे. शिक्षण क्षेत्र हे सेवा क्षेत्र असल्याने त्याचा याच प्रकरणात समावेश केला आहे.

राष्ट्रीय उत्पन्न हे विकासाचे निदर्शक मानले जाते. राष्ट्रीय उत्पन्न या प्रकरणात राष्ट्रीय उत्पन्न संकल्पना, राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती, दरडोई उत्पन्न, दरडोई वास्तव उत्पन्न, या संकल्पना विशद केल्या आहेत.

सूक्ष्म अर्थशास्त्र हा अर्थशास्त्राचा पाया आहे. सूक्ष्म अर्थशास्त्र या प्रकरणात मागणी व त्या संबंधित संकल्पना, खर्चाचे प्रकार, मूल्यविभेदन, मक्तेदारी शक्ती, मक्तेदारी विरोधी धोरणे, अपूर्ण स्पर्धा, विक्री नियंत्रण संघ, किंमत नेतृत्व, बिगर किंमत स्पर्धा, सरासरी व्ययमूल्य सिद्धांत, प्रशासित मूल्यनिर्धारण, भाटक किंवा खंड, अभ्यासखंड, व्याजदर, नफा इतर संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

संकीर्ण संकल्पना या प्रकरणात इतरत्र न आलेल्या परंतु सद्यस्थितीत माहिती असणे गरजेच्या असलेल्या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. त्यात युरोपिअन आर्थिक समाज, समांतर अर्थव्यवस्था, वस्तू विनीमय केंद्र, वस्तूंची बाजारपेठ, शहर भूधारणा कायदा, लोकशाही समाजवाद, पूर्ण रोजगार, प्रभावी मागणी, विमुद्रीकरण, हवामान विषयक संकल्पना, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिक स्पर्धात्मकता निर्देशांक, घटना दुरुस्तींचे आर्थिक स्वरूप, भारतातील नविन आर्थिक सुधारणा, शहर बांधणी निर्देशांक, बारावी आर्थिक योजना व संबंधित आकडेवारी, आर्थिक पुर्नबांधणी, सूक्ष्म, स्थूल अर्थशास्त्रीय संकल्पना व इतर सरमिसळ संकल्पना स्पष्ट केल्या आहेत.

अशा तऱ्हेने एकंदर पंधरा प्रकरणात अर्थशास्त्र या विषयाच्या अनुषंगाने असणारी माहिती केवळ ४५६ पानात देण्याची अवघड कामगिरी लेखकत्रयीने पार पाडली आहे. थोडक्यात तरीही मुद्देसूद आणि आकडेवारीसह माहिती देण्यात लेखक यशस्वी झाले आहेत. नवीन संकल्पना त्यासाठी समर्पक, सुयोग्य तरीही नेमक्या व थोडक्या शब्दात अर्थवाही माहिती देणे हा अतिशय कठीण प्रयास आहे. ते समर्थपणे मांडल्याबद्दल सर्व लेखकांचे अभिनंदन!

प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी सराव प्रश्नपत्रिका दिल्या आहेत. त्यातील प्रश्न कोणत्या वर्षी, कोणत्या परीक्षेत विचारले होते व त्याची उत्तरसूचीही दिल्यामुळे वाचकांना संभाव्य प्रश्न, त्याचे स्वरूप, त्याच्या दिशा यांचे आकलन होऊन अभ्यास व सराव करणे सोयीचे ठरते. सुरवातीच्या प्रस्तावनेत डॉ. संतोष दास्ताने यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास कसा करावा या संबंधी दिलेल्या सूचना या फक्त स्पर्धा परिक्षांच्या अभ्यासकांनाच नव्हे तर सर्वच अभ्यासकांना अतिशय उपयुक्त आहेत. अर्थशास्त्र संबंधित विषयांचे परिशीलन करून त्यातून थोड्या वेळात पण पद्धतशीर सराव करण्यासाठी दिलेल्या विस्तृत सूचना हे डॉ. दास्ताने सरांच्या अनेक वर्षांच्या अर्थशास्त्राच्या अभ्यासातून व अनुभवातून आलेले 'नवनीत' आहे. त्या आधारे विषय सुलभतेने समजेल हे खास नमूद करत आहे.


अर्थशास्त्रासारख्या प्रचंड व्याप्ती असलेल्या विषयावर स्पर्धापरिक्षा डोळ्यासमोर ठेवून विस्तृत प्रमाणात संकल्पना, अद्ययावत व समर्पक आकडेवारी देणारे, सराव प्रश्नांतून परिक्षेतील प्रश्नांचे स्वरूप दर्शविणारे, तरीही अतिशय साध्या आणि सोप्या भाषेतील तज्ज्ञ लेखकांच्या लेखणीतून उतरलेले हे पुस्तक वाचनीय तर आहेच व आपल्या संग्रही ठेवावे असेच आहे.



# विदेशी पर्यटकांची राज्यनिहाय स्थिती

**पांडुरंग मारोतराव कल्याणकर, फुलंब्री,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, जिल्हा औरंगाबाद.
भ्रमणध्वनी:९४४५८९९४८४

मानवाच्या मुलभूत गरजांच्या पूर्तीनंतर तो मनोरंजनाच्या व मनाला आल्हाददायक वाटणाऱ्या बाबींकडे वळतो. पर्यटन ही त्यातील एक महत्त्वाची बाब आहे. पर्यटन केल्याने व्यक्ती प्रफुल्लित होऊन परत कार्यक्षमतेने कामास लागतो. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पर्यटन हे विकासाचे इंजिन आहे. पर्यटन हा विदेशी चलन मिळविण्याचा एक महत्त्वाचा स्त्रोत आहे. तसेच पर्यटनातून रोजगारात वाढ होते. पर्यटनामुळे पर्यटकांच्या निवासाची, त्यांच्या भोजनाची, त्यांच्या प्रवासाची, मनोरंजनाची व्यवस्था करणाऱ्या क्षेत्रांच्या उत्पन्नात व रोजगारात वाढ होते. तसेच पर्यटनाशी प्रत्यक्ष संबंधित असलेल्या क्षेत्रांकडून



अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रातील वस्तूंची व सेवांची मागणी वाढून तेथील उत्पादनास व रोजगारास चालना मिळते. देशात अधिकाधिक विदेशी पर्यटक आकर्षित करण्यावर भर देण्यात येत असला तरी, देशातील एकूण पर्यटकांच्या संख्येतील देशी पर्यटकांचे प्रमाण १९९१ ते २०१५ या कालावधीत ९५.५ टक्क्यांवरुन ९८ टक्के इतके वाढले, तर विदेशी पर्यटकांचे प्रमाण ४.५ टक्क्यांवरुन १.६ टक्के इतके कमी झाले. या पार्श्वभूमीवर संबंधित संशोधन लेखामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील पर्यटनाचे महत्त्व शोधण्यात आले आहे.

## पर्यटनाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व:

जागतिक प्रवास आणि पर्यटन मंडळ गेल्या २५ वर्षापासून प्रवास आणि पर्यटनाच्या आर्थिक परिणामांचे मोजमाप करते. या मंडळाच्या २०१५ च्या वार्षिक आर्थिक अहवालात १८४ देशांचा समावेश केला आहे. २०१४ साली जागतिक अर्थव्यवस्थेच्या उत्पन्नात प्रवास आणि पर्यटनांचा हिस्सा १० टक्के होता, तर जगातील ११ रोजगारांपैकी १ रोजगार प्रवास आणि पर्यटनातून निर्माण झाला होता.

२०१४ साली भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात पर्यटन आणि प्रवासाचा प्रत्यक्ष वाटा २.२ टक्के होता तर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष मिळून एकत्रित वाटा ६.७ टक्के होता. रोजगाराच्या दृष्टीने विचार करता २०१४ साली प्रवास आणि पर्यटनातून प्रत्यक्ष निर्माण होणाऱ्या रोजगाराचा देशात निर्माण झालेल्या एकूण रोजगारातील वाटा ५.५ टक्के होता. पर्यटनामुळे प्रत्यक्ष आणि

अप्रत्यक्ष निर्माण होणाऱ्या रोजगाराचा देशाच्या एकूण रोजगारातील वाटा ८.७ टक्के होता.

**जागतिक पर्यटनात प्रमुख देशांचा वाटा :**

२०१५ साली जगातील विविध देशात आलेल्या विदेशी पर्यटकांची संख्या ११८४ मिलीयन होती (११८ कोटी ४० लाख). तर भारतात आलेल्या विदेशी पर्यटकांची संख्या ८.०३ मिलीयन (८० लाख २९ हजार) होती.

संबंधित देशात वर्षभरात आलेल्या विदेशी पर्यटकांच्या संख्येवरुन जगातील देशांचा क्रम लावला असता त्यात फ्रान्स (७.१४ टक्के), युनायटेड स्टेट्स (६.५५ टक्के), स्पेन (५.७० टक्के), चीन (४.८१ टक्के), इटली (४.२८ टक्के), तुर्की (३.०६ टक्के), युनायटेड किंगडम (३.०५ टक्के), जर्मनी (२.९६ टक्के), मेक्सिको (२.७१ टक्के), रशियन फेडरेशन (२.६४ टक्के) या देशांचा जगातील पहिल्या दहा देशात क्रम लागतो. २०१५ या वर्षी या दहा देशात आलेल्या विदेशी पर्यटकांचे जगातील एकूण विदेशी पर्यटकांशी प्रमाण ४२.९५ टक्के होते. २०१५ या वर्षी भारतात आलेल्या विदेशी पर्यटकांचे जगातील एकूण विदेशी पर्यटकांशी प्रमाण ०.६८ टक्के होते. २०१५ साली विदेशी पर्यटकांच्या संख्येवरुन भारताचा जगात ४० वा क्रम होता. १९९९ साली वरील प्रमाण ०.३९ टक्के तर जगातील क्रम ४६ वा होता.

२०१५ या वर्षी जगातील सर्व देशांना विदेशी पर्यटकांपासून मिळालेल्या उत्पन्नाचा विचार करता १२३२ बिलियन अमेरिकन डॉलर उत्पन्न प्राप्त झाले होते. विदेशी पर्यटकांपासून त्या त्या देशांना प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा जगातील सर्व देशांना विदेशी पर्यटकांपासून एकूण प्राप्त झालेल्या उत्पन्नाशी प्रमाण काढले असता पहिल्या दहा देशात युनायटेड स्टेट्स (१४.४७ टक्के), चीन (९.२६ टक्के), स्पेन (४.५९ टक्के), फ्रान्स (३.७३ टक्के), थायलंड (३.६२ टक्के), युनायटेड किंगडम् (३.४४ टक्के), इटली (३.२२ टक्के), जर्मनी (३ टक्के), हाँगकाँग (चीन) (२.९१ टक्के), मकाऊ (चीन) (२.५४ टक्के) या देशांचा समावेश होता.

२०१५ वर्षी भारताला विदेशी पर्यटकांपासून मिळालेल्या उत्पन्नाचे जगातील सर्व देशांना मिळालेल्या एकूण उत्पन्नाशी प्रमाण १.६२ टक्के होते. या बाबतीत भारताचा जगातील क्रम १४ वा होता. १९९९ साली हे प्रमाण व क्रम अनुक्रमे ०.६६ टक्के व ३५ वा होता. यावरुन असे स्पष्ट होते की, विदेशी पर्यटक येण्याच्या बाबतीत भारताचा जगातील क्रम (४० वा) मागे असला तरी विदेशी पर्यटकांपासून मिळालेल्या उत्पन्नाच्या बाबतीत भारत जागतिक क्रमवारीत बराच पुढे आहे. तसेच १९९९ च्या तुलनेत २०१५ मध्ये या क्रमवारीत बरीच सुधारणा झालेली आहे.

**भारतात आलेल्या पर्यटकांची स्थिती:**

२०१५ साली भारतात जगातील विविध देशांतून ८० लाख २७ हजार १३३ पर्यटक आले होते. २०१५ या वर्षी देशात आलेल्या एकूण विदेशी पर्यटकांशी त्या त्या देशातून आलेल्या पर्यटकांचे प्रमाण काढले असता अग्रक्रमाने युनायटेड स्टेट्स (१५.१२ टक्के), बांग्लादेश (१४.१३ टक्के), युनायटेड किंगडम् (१०.८१ टक्के), श्रीलंका (३.७३ टक्के), कॅनडा (३.५० टक्के), मलेशिया (३.४० टक्के), ऑस्ट्रेलिया (३.२८ टक्के), जर्मन (३.०९ टक्के), फ्रान्स (२.८८ टक्के), जपान (२.५८ टक्के) या दहा देशांचा क्रम लागतो. २०१५ साली भारतात आलेल्या एकूण विदेशी पर्यटकांत या दहा देशातून आलेल्या पर्यटकांचा हिस्सा ६२.५२ टक्के होता. यावरुन भारताकडे विकसित देशाप्रमाणेच विकसनशील देशातील पर्यटक आकर्षित होतात.

**भारतात आलेले विदेशी पर्यटक:**

२०१५ या वर्षी भारतातील विविध घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना एकूण २ कोटी ३३ लाख २६ हजार १६३ विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या होत्या. भारताचे विभागनिहाय पूर्व भारत, पश्चिम भारत, उत्तर भारत, दक्षिण भारत आणि पूर्व-पश्चिम भारत (ईशान्य भारत) अशा पाच विभागात विभागणी केल्या जाते. देशातील विभागनिहाय भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांचा विचार करता देशाच्या पश्चिम विभागाला सर्वाधिक विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या होत्या (३०.६३ टक्के). विदेशी पर्यटकांच्या भेटी देण्याबाबत पश्चिम विभागातील राज्यांचा प्राधान्यक्रम महाराष्ट्र (१८.९० टक्के), राजस्थान (६.३२ टक्के), गोवा (२.३२ टक्के), मध्यप्रदेश (१.८० टक्के), गुजरात (१.२२ टक्के), छत्तीसगड (०.०३ टक्के) ही घटकराज्ये, दमन व दीव (०.२ टक्के), दादर आणि नगरहवेली (०.०१ टक्के) हे केंद्रशासीत प्रदेश असा होता.

२०१५ या वर्षी देशात पश्चिम विभागाखालोखाल, दक्षिण विभागास विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या होत्या. या विभागातील राज्यांना भेटी दिलेल्या विदेशी पर्यटकांच्या संख्येचे देशातील सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येशी प्रमाण २९.०८ टक्के होते. विदेशी पर्यटक भेटी देण्याच्या बाबतीत दक्षिण विभागातील राज्यांचा प्राधान्यक्रम तामिळनाडू (२०.०८ टक्के), केरळ (४.१९ टक्के), कर्नाटक (२.७३ टक्के), आंध्रप्रदेश (१.०२ टक्के), तेलंगण (०.५४ टक्के), ही घटक राज्ये, पाँडिचेरी (०.४५ टक्के), लक्षद्वीप (०.०० टक्के), अंदमान निकोबार द्वीप समूह (०.०० टक्के) ही केंद्रशासीत प्रदेश असा होता.

देशातील दक्षिण विभागाखालोखाल, उत्तर विभागातील राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या होत्या. देशातील सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी देणाऱ्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येशी उत्तर विभागास भेटी देणाऱ्या एकूण पर्यटकांच्या संख्येचे प्रमाण २८.४२ टक्के होते. विदेशी पर्यटक भेटी देण्याच्या बाबतीत उत्तर विभागातील राज्यांचा प्राधान्यक्रम उत्तर प्रदेश (१३.३१ टक्के), दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश) (१०.२० टक्के), हिमाचल प्रदेश (१.७४ टक्के), हरयाणा (१.३० टक्के), पंजाब (१.०४ टक्के), उत्तराखंड (०.४५ टक्के), जम्मू आणि काश्मिर (०.२५ टक्के) ही घटक राज्ये व चंदीगड (०.१३ टक्के) हे केंद्रशासीत प्रदेश असा होता.

विदेशी पर्यटक भेटी देण्याच्या बाबतीत पूर्व विभागातील राज्यांचा चौथा क्रम लागतो. २०१५ या वर्षी या विभागातील घटक राज्यांना भेटी दिलेल्या एकूण पर्यटकांच्या संख्येचे, देशातील सर्व राज्यांना व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येशी प्रमाण ११.३५ टक्के होते. विदेशी पर्यटक भेटी देण्याबाबतीत पूर्व विभागातील राज्यांचा प्राधान्यक्रम पश्चिम बंगाल (६.३९ टक्के), बिहार (३.९६ टक्के), झारखंड (०.७२ टक्के), ओरिसा (०.२१ टक्के) असा होता.

देशातील उत्तर - पूर्व विभागातील राज्यांना (ईशान्य भारत) सर्वात कमी विदेशी पर्यटकांनी भेटी दिल्या. २०१५ या वर्षी या विभागातील घटक राज्यांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येचे, देशातील सर्व घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येशी प्रमाण फक्त ०.५१ टक्के होते. विदेशी पर्यटक भेटी देण्याच्या बाबतीत उत्तर-पूर्व विभागातील घटक राज्यांचा प्राधान्यक्रम

सिक्किम, त्रिपुरा, आसाम, मेघालय, मणिपूर, नागालँड, मिझोराम असा लागतो.

विदेशी पर्यटकांनी भेटी देण्याच्या बाबतीत देशातील घटक राज्यांचा सुटासुटा विचार करता, २०१५ या वर्षी देशातील विविध घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांच्या संख्येशी त्या त्या राज्याला भेटी दिलेल्या विदेशी पर्यटकांच्या संख्येचे प्रमाण काढल्यास पहिल्या दहा राज्यात प्राधान्याने तामिळनाडू (२०.०८ टक्के), महाराष्ट्र (१८.९० टक्के), उत्तर प्रदेश (१३.३१ टक्के), दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश) (१०.२० टक्के), पश्चिम बंगाल (६.३८ टक्के), राजस्थान (६.३२ टक्के), केरळ (४.१९ टक्के), बिहार (३.९६ टक्के), कर्नाटक (२.७३ टक्के), गोवा (२.३२ टक्के) या राज्यांचा क्रम लागतो. यातील पहिल्या पाच राज्यांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांचे देशातील सर्व राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या एकूण विदेशी पर्यटकांशी प्रमाण ६८.८७ टक्के होते.

**निष्कर्ष:**

१) पर्यटन आणि प्रवासाचा भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील प्रत्यक्ष वाटा २.२ टक्के होता, तर त्यामुळे प्रत्यक्ष निर्माण झालेल्या रोजगाराचा देशाच्या एकूण रोजगारातील वाटा ५.५ टक्के होता.

२) विदेशी पर्यटक येण्याच्या बाबतीत भारताचा जगातील क्रम बराच मागे (४० वा) असला तरी विदेशी पर्यटकांपासून मिळालेल्या उत्पन्नाच्या बाबतीत भारत जागतिक क्रमवारीत बराच पुढे (१४ वा) असून १९९९ च्या तुलनेत २०१५ या वर्षी या क्रमवारीत बरीच सुधारणा झालेली आहे.

३) भारतात विकसित देशाप्रमाणेच विकसनशील देशातील पर्यटक सुध्दा आकर्षित होतात.

४) २०१५ या वर्षी भारतातील पाच विभागातील विविध घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना भेटी दिलेल्या विदेशी पर्यटकांच्या संख्येचा विचार करता सर्वाधिक भेटी (३०.६ टक्के) पश्चिम विभागातील घटकराज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना दिल्या होत्या. पश्चिम विभागापाठोपाठ दक्षिण विभाग (२९.१ टक्के), उत्तर विभाग (२८.४ टक्के), पूर्व विभाग (११.४ टक्के) आणि उत्तर-पूर्व विभागास (०.५१ टक्के) पर्यटकांनी भेटी दिल्या.

५) २०१५ या वर्षी सर्वाधिक विदेशी पर्यटक भेटी देणाऱ्या राज्यांमध्ये तामिळनाडू राज्याचा अग्रक्रम होता. त्यानंतर महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश), पश्चिम बंगाल या राज्यांचा क्रम होता.

**शिफारसी:**

१) भारतात विदेशी पर्यटकांना विशेषत: महिला पर्यटकांना असुरक्षित वाटते. यामुळे भारतातील पर्यटन उद्योगाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिमेवर वाईट परिणाम होत आहे. भारतातील महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेची कमकुवत स्थिती लक्षात घेता, देशातील अंतर्गत कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी जसे शासकीय पातळीवर ठोस प्रयत्न करणे गरजेचे ठरते. सामान्य माणसातील जागरुकता फक्त अतिथी देवो भव सारख्या जाहिरातीतूनच सुधारणार नाही तर त्यासाठी शालेय स्तरापासूनच व्यक्तिमध्ये जागरुकता निर्माण करण्याचे धोरण ठेवावे लागेल.

२) विदेशी व देशी पर्यटकांच्या जीविताची मानवनिर्मित व नैसर्गिक संकटापासून सुरक्षितता व्हावी यासाठी यंत्रणा सज्ज करणे गरजेचे ठरते.

३) आपल्या देशातील अनेक जागतिक वारसा स्थळांना भेटी देण्यासाठी विदेशी पर्यटक आकर्षित होतात, परंतु अशी वारसास्थळे ज्या शहरात अथवा गावात आहेत तेथील अस्वच्छतता पर्यटनात अडथळा ठरते. जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहाल ज्या

आग्रा शहरात आहे तेथील सामुहिक स्वच्छतेची दयनिय स्थिती व त्या ठिकाणचे उघड्यावरील प्रात:विधीस बसण्याचे प्रमाण पाहता हे सहज लक्षात येते. त्यामुळे देशातील नागरिकांमध्ये व्यक्तीगत स्वच्छतेच्या जाणिवेबरोबरच सामुहिक स्वच्छतेच्या सवयी वाढविणे गरजेचे आहे. सार्वजनिक स्वच्छतेसाठी त्या त्या ठिकाणच्या प्रशासनाचीही भूमिका महत्त्वाची ठरते.

४) विदेशी पर्यटकांना विमानतळ, रेल्वेस्थानक, बसस्थानकापासून अथवा हॉटेलपासून ते पर्यटन स्थळापर्यंत पोहोचविण्यासाठी रस्त्यांची स्थिती उत्तम असणे गरजेचे आहे. तसेच अशा रस्त्यांची नियमित डागडुजीची व्यवस्था करणे गरजेचे ठरते.

५) विदेशी पर्यटकांची गाईड व अन्य वस्तू व सेवेच्या पुरवठादारांकडून फसवणूक होऊ नये यासाठी अशा सेवा पुरविणाऱ्या कायदेशीर व्यक्ती व संस्थांची नावे महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी, स्थानिक व आंतरराष्ट्रीय भाषेत गरजेचे ठरते.

६) विदेशी पर्यटकाला प्रथम भेटणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरपासून ते वेटरपर्यंतच्या व्यक्तिंची वागणूक कशी असेल, यावर पर्यटकांचे विशिष्ट ठिकाणी थांबणे अवलंबून असते. यादृष्टीने आंध्र प्रदेशातील तिरुपती येथील टॅक्सी ड्रायव्हरांचा आदर्श समोर ठेवता येईल. त्यामुळे टॅक्सी ड्रायव्हर पासून ते वेटरपर्यंतच्या साखळीतील सर्व व्यक्तिंचे प्रबोधन करावे लागेल.

**संदर्भसूची:**

(१) Government of India, *India Tourism Statistics, At A Glance,* 2015, Ministry of Tourism, Market Research Division, July 2016, pp. 8,12,14-15.

(२) Government of India, *Economic Survey 2015-16*, Ministry of Finance, Department of Economic Affairs, Economic Division, Feb. 2016, pp. 162-163.

(३) Government of India, *Rank of India in World Tourism Industry*, Ministry of Tourism, Press Information Bureau, July, 20, 2016. http://pib.nic.in/newsite/printrelease-147336.

(४) World Travel & Tourism Council, *Travel and Tourism Economic Impact 2015 India,* London, United Kingdom, www.wttc.org., pp.1-3.

(५) रावल जयकुमार (पर्यटन मंत्री, महाराष्ट्र शासन), *अमर्याद आणि मनमोहक,* लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, जानेवारी २०१७, पृ. १२-१५.

(६) सुंकले राजेश, *महाराष्ट्रातील पर्यटनाचे ढासळते चिरे,* महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद आवृत्ती, दि.१५ मार्च २०१७, पृ.१०.

(७) *Maharashtra Top in Investment in Tourism Sector : Assocham,* The Financial Express, August 22, 2016, www.financialexpress.com.

हे त्रैमासिक प्रकाशक डॉ.रामदास भांडवलकर (प्रमुख संपादक डॉ.अविनाश निकम) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता सातपुडा ऑफसेट, एम.आय.डी.सी. एरिया, अजिंठा रोड, जळगाव येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिध्द केले.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र पहिले

### प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार

सूत्रसंचालक: ज. फा. पाटील, कोल्हापूर

भ्रमणध्वनी:९४२२०४६३८२

वृत्त संकलक: अनिल सत्रे, बोरगाव

प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार या विषयावरील चर्चासत्रात एकूण सहा संशोधकांनी आपल्या शोधनिबंधांचे वाचन केले.

१) डॉ. हिरालाल वामन चव्हाण:

(प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार)

प्रा. नी. वि. सोवनी यांच्या अर्थशास्त्राचे स्वरूप, सर्वसाधारण समतोल, अर्थकारण आणि राजकारणामधील संबंध, लोकसंख्या, हिंदुस्थानातील चलन व्यवस्था, भारताची सुवर्ण समस्या यासारख्या अनेक विषयांवर आपले मत व्यक्त केले.

२) डॉ. मंजुषा मुसमाडे:

(प्रा. नी. वि. सोवनी यांच्या मराठी साहित्यातील योगदानाचा परामर्श)

प्रा. सोवनी यांच्या सैध्दांतिक अर्थशास्त्र, आर्थिक इतिहास सर्वेक्षण, नागरीकरण आणि भारतीय अर्थशास्त्र अशा अनेक विचारांचे विवेचन सदर शोधनिबंधामध्ये केले. अर्थशास्त्राचे स्वरूप व विकास केन्स्चे विचार, सूक्ष्म-समग्र अर्थशास्त्र समतोल संकल्पना, लेनिनवाद मिमांसा या मुद्यांवर चर्चा केली.

३) डॉ. संजय तुपे:

(भारतातील राजकारण आणि अर्थकारण - प्रा. नी. वि. सोवनी यांचे चिंतन)

अर्थकारणी दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ती करताना कृतिहीन होत असतात. राजकारण संस्थात्मक होण्याऐवजी व्यक्तीभोवतीच घोटाळत असते. लोकशाहीत आपल्या मागण्या सनदशील मार्गांनी मंजूर करून घेण्याऐवजी निदर्शने, घेराव, संप, बंद इत्यादी मार्गांची अंमलबजावणी केली जाते. राष्ट्रीयत्वाच्या वाढीऐवजी प्रादेशिक, जातीय व धार्मिक यासारख्या राष्ट्रदोही प्रवृत्तींची वाढ होते.

४) प्रा. डॉ. मोहन किसनराव चौधरी:

(प्रा. नी. वि. सोवनींचे भारतातील अर्थकारण व राजकारण या संदर्भातील विचार)

सदर शोधनिबंधामध्ये प्रा. सोवनी यांचे आर्थिक विकासाचे स्वरूप, आर्थिक विकास

आणि लोककल्याण, लोकांच्या अपेक्षा, खासगी उत्पादकांच्या अपेक्षा, पाण्याचा प्रादेशिक उपयोग या संकल्पनांची सखोल चर्चा केली.

५) प्रा. विश्वजीत कदम:

(अर्थतज्ज्ञ प्रा. नी. वि. सोवनी यांनी स्वीकारलेल्या समष्टी संकल्पनेचा सैध्दांतिक आशय आणि टीकात्मक विश्लेषण)

सदर शोधनिबंधामध्ये नी. वि. सोवनी यांनी व्यष्टीय व समष्टीय या दोन स्वतंत्र विश्लेषण पध्दतींमधील समावेशक समन्वयाच्या प्रश्नाची चर्चा करण्यात आली. पध्दत शास्त्रीय व्यक्तीवादाची चर्चा केली.

६) प्रशांत हरमकर:

(अर्थशास्त्राच्या वैज्ञानिकतेचा द्वैतवाद: संदर्भ नी. वि. सोवनींच्या आर्थिक विचारांचा)

सदर शोधनिबंधामध्ये नैसर्गिक शास्त्राची कारणमिमांसा व सामाजिक शास्त्राची कारणे या भिन्न बाबी आहेत. नैसर्गिक शास्त्राची कारणे कार्याशी संबंधित असतात ती मानवाच्या वर्तमानाची नसतात, असे मत व्यक्त केले.

सदर चर्चेमध्ये डॉ. जहागीरदार प्रा. डॉ. कल्याणकर, प्रा. डॉ. दास्ताने, प्रा. डॉ. पडोशी यांनी नी. वि. सोवनी यांच्या आर्थिक विचाराबाबतच्या विविध मुद्द्यांची चर्चा केली.

---

**ANNOUNCEMENT FOR CALL OF ARTICLES**

***DR. RAVINDRA SABNIS MEMORIAL PRIZE***

Marathi Arthashastra Parishad has constituted an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand only for outstanding contribution in form of an article published during the Calender Year 2016 in standard accredited journals on themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for submission of the entries (Two Copies) for this years contest is 31$^{st}$ August 2017. For further details, contact the undersigned at this address:

*Charudatta S. Gokhale, Plot No.10,*
*Professor Colony, Behind D.I.C.,*
*Jalgaon-425001.*
*(Mob.9422618410)*

**Charudatta S. Gokhale,**
Executive President,
Marathi Arthashastra Parishad.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र दुसरे

### आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती

सूत्रसंचालक: जयवंत भदाणे, देवळा
सह सूत्रसंचालक: करमसिंग राजपूत, यवतमाळ
वृत्त संकलक: सुभाष पाटील, पुणे

आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती या विषयावरील चर्चासत्रात मोठ्या संख्येने संशोधकांनी आपल्या शोधनिबंधांचे वाचन केले.

प्रा.भिमराव उगले यांनी आपल्या शोधनिबंधात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची विभागनिहाय तुलना केली. शेती विकासाच्या बाबतीत प्रादेशिक विषमता दिसते असे मत व्यक्त केले. प्रा.वर्षा नेहते यांच्या मते विकासाचा वेग वाढविणे ही व्यूहरचना अपयशी ठरली आहे. पर्यायाने आर्थिक सुधारणांची गरज भासली. जागतिकीकरणाच्या काळात निर्यातीवरील बंधने दूर झाली. तांदूळ, तेलबिया व मसाल्याचे पदार्थ यांच्या निर्यातीवर अनुकूल बदल झाले आहेत. तर प्रा.निता वाणी यांच्या मते जागतिकीकरणामुळे शेतीवर अनेक विपरित परिणाम होत असून योग्य पीक नियोजन, कृषि संशोधनावर भर, जागतिक मागणीचा विचार करून उत्पादन यासारख्या दिशात्मक बदलांची आवश्यकता व्यक्त केली. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर करार शेतीची गरज असल्याचे स्पष्ट केले. योग्य नियमांच्या चौकटीत करारशेती केल्यास ती शेतकऱ्यांच्या, शेतीच्या व राष्ट्रविकासासाठी हितकारक ठरू शकेल असे विचार व्यक्त केले. डॉ.विकास सुकाळे यांनी शेतीसंबंधी कायद्याबाबत विवेचन केले की, २५७ कायदे शेतीसंबंधित असून त्यातील आवश्यक वस्तूंचा कायदा हा एक महत्त्वाचा कायदा आहे. शेतीविषयक कायद्यामध्ये बदल केलेले नाहीत. शेतीत खासगीकरणाचा समावेश नाही. देशांतर्गत खासगीकरणासाठी कायद्यात बदल होणे आवश्यक आहे, असे विचार व्यक्त केले. प्रा.पंढरीनाथ विभुते यांनी जागतिक व्यापार संघटना आणि भारतीय शेती याबाबत विचार व्यक्त करताना जागतिक व्यापारात कृषीचा सहभाग अत्यंत कमी आहे. शेतीसाठी खासगीकरण, उदारीकरण नको जागतीकीकरण हवे. आर्थिक सुधारणांची कार्यक्षम अंमलबजावणीची गरज असल्याचे विचार त्यांनी स्पष्ट

केले. डॉ. करमसिंग राजपूत व डॉ.आर. बी. भांडवलकर यांनी यवतमाळ जिल्ह्यातील कापूस उत्पादकांच्या स्थितीबाबत संशोधन पेपर सादर केला. कापूस उत्पादनात यवतमाळ जिल्हा अग्रेसर आहे. मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत देखील हा यवतमाळ जिल्हा प्रथम क्रमांकावर असल्याचे विचार त्यांनी व्यक्त केले. या जिल्ह्यात ३००० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. या आत्महत्या रोखण्यासाठी शेतमालास हमी भाव, रास्त दराने वित्त पुरवठा, जलसिंचन सुविधा यांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. प्रा. एल. एस. सिताफुले यांनी अन्नधान्य उत्पादन व उत्पादकतेच्या प्रवृत्तीचा अभ्यास याबाबत पेपर सादर करताना स्पष्ट केले की, भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेच्या विकासाचे एकूण चार टप्पे दिसून येतात. आर्थिक सुधारणा काळात तृणधान्य उत्पादन लागवड क्षेत्रफळात व उत्पादनात घट झाल्याचे दिसून येते. काही पिकांच्या उत्पादन घटीस हवामानातील बदल हे मुख्य कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. वैशाली जोशी व डॉ. संजय तुपे यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण करताना परंपरागत पिकांची पिछेहाट होत असून नगदी पिकांच्या उत्पादनात वाढ होत आहे असे विचार स्पष्ट करण्यात आले. त्यानंतर यवतमाळ जिल्ह्याची पीकरचना, त्यावर परिणाम करणारे घटक, ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आर्थिक सुधारणेचा झालेला परिणाम स्पष्ट करण्यात आला. डॉ. आप्पासाहेब पवार यांनी नवीन आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेतीवरील परिणाम या विषयावर आपला संशोधन पेपर सादर केला. या प्रसंगी १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा काळात गहू, तांदूळ, कापूस, उस, तेलबिया या प्रमुख पिकांच्या उत्पादनात वाढ झाली असल्याचे विचार व्यक्त करण्यात आले. नरसिंहम् समितीच्या शिफारशींचा परिणाम म्हणून बँकांनी सवलतीचे कर्ज बंद केले. परिणामी भारतीय शेतकरी संकटात सापडला आहे. लहान शेतकरी जास्त करून आत्महत्या करीत आहे असे विचार त्यांनी मांडले. तर प्रा. एम. व्ही. चौधरी यांनी खाउजा व शेतमालाचे विपणन याबाबत विचार व्यक्त केले की शेतमालास योग्य किंमत मिळाल्यास कृषि उत्पादनात वाढ होईल. कृषि विपणनांतर्गत ग्रामीण शेतकरी स्थानिक दलालांना मालाची विक्री करतो. प्रभावी विक्री व्यवस्थेसाठी सरकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज त्यांनी स्पष्ट केली.

डॉ. भाऊसाहेब देशमूख यांनी भारतातील आर्थिक सुधारणांचा कृषि क्षेत्रावरील परिणाम स्पष्ट करताना जागतिकीकरणाचे अनुकूल परिणाम प्राप्तीसाठी उपाय करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. जसे सहकार शेती, प्रक्रिया उद्योगांची स्थापना, आंतरराष्ट्रीय संस्थांचे सहकार्य घेणे, परकिय गुंतवणूक वाढविणे इत्यादी उपायांची आवश्यकता आहे. डॉ. सुमित्रा पवार यांनी आपल्या संशोधनात म्हटले आहे की, कुपोषण, शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्येचे अवलंबित्व, कोरडवाहू अल्पभूधारक शेतकऱ्यांना कमी फायदा, हवामानातील भिन्नता यामुळे प्रादेशिक विषमता व दुष्काळ ही प्रमुख आव्हाने आहेत. शिवनाथ बोरसे यांनी शेतीसंदर्भातील विमा संकल्पना ही धोका व्यवस्थापनावर आधारित आहे असे विचार व्यक्त केले. आर्थिक सुधारणेचा भारतीय शेतीवरील परिणाम हा नकारात्मक झाला असल्याचे प्रतिपादन योगिता क्षीरसागर यांनी केले. कृषीची उत्पादकता खालावल्याने निर्यातीत घट झाली आहे. शेती उत्पादनाच्या खर्चात वाढ झाली असल्याचे विचार त्यांनी व्यक्त केले.

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन

## सूत्रसंचालकांचा अहवाल - चर्चासत्र तिसरे

## महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासंदर्भात शासनाची भूमिका

सूत्रसंचालक: तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर

भ्रमणध्वनी:९६०४३४३४००

वृत्त संकलक: शकुंतला पाटील, इचलकरंजी

महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासंदर्भात शासनाची भूमिका या विषयावरील चर्चासत्रात एकूण दहा संशोधकांनी आपल्या शोधनिबंधांचे वाचन केले.

१) डॉ.जितेंद्र दगडू तलवारे:

(महाराष्ट्रातील जलव्यवस्थापन: समस्या व उपाययोजना)

पाण्याचे नियोजन करणे अत्यंत गरजेचे असून धावते पाणी चालते करा, चालते पाणी रांगते करा योग्य तितकेच पाणी वापरण्यावर भर द्यायला हवा. प्रचंड खर्च करूनही अद्यापपर्यंत पाणी समस्या सुटलेली नाही असे विचार व्यक्त केले.

२) प्राचार्य बाळासाहेब इंगळे:

(जलयुक्त शिवार अभियान- दुष्काळ निवारण्याचा मार्ग)

२०१९ पर्यंत टंचाईमुक्त गावे करण्याचे उद्दिष्ट जलयुक्त शिवार अभियानाचे आहे. पाण्याचा वापर अधिकाधिक काटकसरीने होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

३) डॉ. एस. डी. पाटील:

(महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणाबाबत पीक विमा योजनेचे योगदान)

दुष्काळाचा आढावा घेऊन त्याचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पीक विमा योजनेचे महत्त्व विशद केले. दुष्काळ प्रसंगी शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना एक आधार म्हणून कार्य करीत असते.

४) डॉ. शकुंतला पाटील:

सिंचनक्षमता जास्तीत जास्त वाढविण्याचा प्रयत्न करणे. दुष्काळ निवारण करून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने जलयुक्त शिवार अभियान महत्त्वाचे ठरते असे प्रतिपादन केले.

५) डॉ. संजय पाटील, योगेश भंवरे:

(धुळे जिल्ह्यातील कोरडवाहू शेती: एक अभ्यास)

मृत अवस्थेतील जलसिंचन योजनांमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. याबाबत शासनाची भूमिका व लोक सहभाग महत्त्वाचा असल्याचे विचार व्यक्त केले.

६) प्रा. मदनसिंग राठोड:

(महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण)

पाण्याची उपलब्धता दिवसेंदिवस कमी होत असल्याने पाण्याचा काटकसरीने वापर होणे पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ठरते. शेतीक्षेत्रात पाण्याचा अतिरिक्त वापर टाळणे देखिल आवश्यक असल्याचे विचार व्यक्त केले.

७) डॉ. जीवन सोळुंके:

(महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणात शासनाची भूमिका)

महाराष्ट्रातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. पाणी वापराचा प्राधान्यक्रम शहरी विभागाकडे वाढला आहे. पाण्याचा फेरवापर, शेतीपाण्याचे नियोजन तसेच पाण्याबाबत संशोधन होणे गरजेचे आहे. शासनाने पाण्याचे राजकारण करू नये अशी अपेक्षा व्यक्त केली.

८) डॉ. जयश्री भंगाळे:

(दुष्काळ निवारण्यासंदर्भात शासनाचे धोरण व उपाययोजना)

दुष्काळ योजना शासनाने वेळोवेळी जाहीर केल्या पण त्याची अंमलबजावणी मात्र प्रामाणिकपणे झाली नाही. दुष्काळ निवारण्याचे साहस कोणत्याही शासनाने केलेले दिसत नाही.

९) डॉ. पांडूरंग कल्याणकर:

(जलयुक्त शिवार अभियान-मराठवाडा विभागाची मांडणी)

लोकसहभाग मिळाल्याने मराठवाडा विभागात किती प्रगती झाली याचे उत्तर काळच ठरवेल. जिल्हानिहाय लोकसहभागाचा विचार केल्यास तो अपूर्ण होता. योजनेत अनेक त्रूटी असल्या तरी त्या त्रूटी दूर करून ती योजना यशस्वी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

१०) प्रा. कल्पना भागवत:

(दुष्काळ - धुळे जिल्ह्याचा अभ्यास)

शेततळयाचा वापर शेतीसाठी करणे आधुनिक काळात गरजेचे आहे. शेतीक्षेत्रात पीक नियोजनाकडे लक्ष देऊन स्वयंपूर्ण खेडे निर्माण करण्याचा प्रयत्न शासनाकडून तसेच ग्रामीण भागाकडून होणे अत्यंत गरजेचे असल्याचे विचार व्यक्त केले.

## अर्थसंवाद

### एप्रिल-जून २०१७ अंकासाठी लेख पाठवा

अर्थसंवादच्या एप्रिल-जून २०१७ अंकासाठी लेख Shree Lipi किंवा ISM किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Page Maker तथा MS-Word मध्ये टाईप करून पाठवावा. शोध निबंध कृपया नवनियुक्त प्रमुख संपादकांच्या पुढील पत्त्यावर पाठवावा: डॉ.राहूल शं. म्होपरे, विद्यापीठ क्वार्टर्स नं.डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर, पिन: ४१६ ००४, भ्रमणध्वनी: ०९९२३८७९०२०, ई-मेल: rahulmhopare@rediffmail.com

- नवनियुक्त प्रमुख संपादक, अर्थसंवाद

# अर्थसंवाद

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४१वे राष्ट्रीय अधिवेशन, फैजपूर

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा:चर्चासत्र-१

## रिकार्डो यांचे आर्थिक सिद्धांत

**विनायक श्रीधर देशपांडे**, नागपूर,
प्राध्यापक व अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखा,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, भ्रमणध्वनी: ९८२२७३७७२५

अभिमत संप्रदाय अर्थशास्त्रज्ञांच्या गटातील एक अत्यंत नावाजलेली व्यक्ती म्हणजे डेव्हिड रिकार्डो. १९ एप्रिल १७७२ रोजी रिकार्डो यांचा जन्म झाला. १७९९ म्हणजे वयाच्या २७ व्या वर्षी ॲडम स्मिथ यांच्या वेल्थ ऑफ नेशन्स या ग्रंथाचे त्यांनी वाचन केले आणि राजकीय अर्थव्यवस्थेत त्यांना आवड निर्माण झाली. अर्थशास्त्रातील नव्या सिद्धांताचा जन्म होण्यास *वेल्थ ऑफ नेशन्स* कारणीभूत ठरले. प्रकरणनिहाय या ग्रंथाचे वाचन करून ॲडम स्मिथ यांच्या युक्तीवादाला अधिकाधिक सुस्पष्ट आणि समृद्ध करण्याच्या प्रक्रियेत १९ एप्रिल १८१७ रोजी रिकार्डो यांचा *ऑन दि प्रिन्सिपल्स ऑफ पोलीटीकल इकॉनॉमी ॲड टॅक्सेशन* हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात उपयोगात आणलेली पद्धत ही पूर्णतः तर्कशुद्ध रितीने चर्चा करून सत्याचा शोध घेणे यावर आधारित होती. वेल्थ ऑफ नेशन्सची घाटणी वर्णनात्मक होती यात विश्लेषणाचा भाग तुलनेने कमी होता. प्रिन्सिपल मध्ये मात्र अमूर्तपणा किंवा शुन्यमनस्कता (Abstraction) आणि निगमन (Deduction) अनुमान तर्क याचे प्रतिबिंब रिकार्डो यांच्या मूलभूत गृहितांमध्ये आढळतात. भांडवलशाही समाजाचे शरीरविज्ञानशास्त्र जाणून घेण्याचा प्रयत्न करणारे रिकार्डो हे पहिले अर्थशास्त्रज्ञ होते. रिकार्डोमुळे उत्पादनावर असलेला भर वितरणाकडे वळला. वितरणाचे विनियमन करण्यासाठी कायद्याचे निर्धारण करणे ही राजकीय अर्थव्यवस्थेची मुलभूत समस्या आहे असे रिकार्डो मानत.

डेव्हिड रिकार्डो यांचा अर्थशास्त्रातील प्रवेश स्कंध बाजारात त्यांना प्राप्त झालेल्या अनुभवाच्या आधारे झाला जेथे त्यांनी शेअर दलाल आणि कर्ज ठेकेदार म्हणून कार्य केले. यामुळे आर्थिक व्यवस्थेच्या कार्यप्रणाली बाबत त्यांना अंतर्ज्ञान प्राप्त झाले. विद्याशाखेच्या औपचारिक प्रशिक्षणाचा लाभ त्यांना प्राप्त झाला नव्हता परंतु स्टॉक एक्सचेंज मधील अनुभव त्यांना आर्थिक प्रश्नांचे विश्लेषण करण्यास उपयुक्त ठरले. नवा पायंडा पाडणाऱ्या ॲडम स्मिथ यांच्या लिखाणात रिकार्डो यांना काही त्रुटी दिसल्या आणि रिकार्डोचे अर्थशास्त्र उदयास आले.

वयाच्या २७ व्या वर्षी म्हणजे १७९९ साली बारकाईने वाचलेला वेल्थ ऑफ नेशन्स पुढील दहा वर्षे अर्थशास्त्र या विषयाचा अभ्यास करण्यासाठी डेव्हिड रिकार्डो यांच्यासाठी प्रेरक ठरला. 'The High Price of Bullion, a proof of the Depreciation of Bank Notes' ही एक छोटेखानी पुस्तिका त्यांनी धातू चलनाचे समर्थन करण्यासाठी प्रकाशित केली. मुद्रास्फितीमुळे

विदेशी विनिमय दर आणि सोन्याचा प्रवाह यावर कसा परिणाम होतो हे रिकार्डो यांनी दर्शविले.

अर्थशास्त्रातील सुप्रसिद्ध ऱ्हासी सीमांत प्रत्याय सिद्धांताची मांडणी रिकार्डो यांनी Essay on the influence of a Low Price of Corn on the profit stock या त्यांच्या लिखाणात प्रथमत: केल्याचे आढळते. आयाती धान्यावरील करात वाढ केल्यास त्याचा परिणाम धान्याच्या किंमती वाढण्यावर होऊन जमीन मालकाच्या उत्पन्नात वाढ होईल आणि कष्टकऱ्यांच्या जीवावर खानदानी आणि औद्योगिक वर्ग वाढीस लागेल असा युक्तीवाद रिकार्डो यांनी केला. कॉर्न लॉज रद्द केल्यास राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी समाजातील उत्पादक वर्गाकडे अधिकाधिक वळवता येईल असे मत रिकार्डो यांनी मांडले. या विषयावर लिखाण करण्यास बराच वाव आहे. रिकार्डो सिद्धांताचे विवेचन करतांना पुढील बाबींवर प्रकाश टाकता येईल.

१.स्थिर संसाधनांच्या जोडीला उत्पादनाच्या प्रक्रियेत अधिकाधिक इतर संसाधनाचा वापर केल्यास अधिकच्या होणाऱ्या उत्पादनात घट होते या त्यांच्या सुप्रसिद्ध 'Law of Diminishing Marginal Returns' चे वर्णनात्मक विश्लेषण आता झपाट्याने विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या चौकटीतुन निबंध लेखकांना करता येईल.

२.रिकार्डो यांची राजकीय अर्थव्यवस्थेची संकल्पना त्यांच्या पूर्वाधिकाऱ्यापेक्षा लक्षणीयरित्या भिन्न होती या विषयावर देखील लेखकांना रिकार्डोने उत्पन्न वितरणावर केलेल्या भाष्यावर लेखन करता येईल.

३.रिकार्डीअन पद्धत ही मुळत: गतिशील होती, या पद्धतीची गुणग्राहकता योग्यरित्या न तपासल्याने या पद्धतीवर गैरवाजवी टिका देखील झाली. रिकार्डो यांच्या विश्लेषण पद्धतीवर भाष्य करू शकतील.

४.'On the Principles of Political Economy and Taxation' मध्ये रिकार्डो यांनी संचयनाचे स्वरूप, कारणे आणि परिणाम याबाबत आपली मते विविध प्रकरणांच्या माध्यमाने प्रकाशित केली. त्यांच्या मूल्य सिद्धांताद्वारे यांची उत्पत्ती झाली. भांडवलाची बचत नफ्यातून होते त्यामुळे भांडवलाचा संचयनासाठी मोठ्या प्रमाणावरील नफा अनुकूल असतो असे मत रिकार्डो यांचे होते. दीर्घ कालावधीत उत्पादन, वितरण आणि वस्तुंचा पुरवठा संचयनाच्या आकारमानावर अवलंबून राहील असे रिकार्डो मानत यामुळेच हॅरॉड गतीशील दृष्टीकोनाची आठवण करून देतात. आधुनिक अर्थशास्त्राच्या सिद्धांतात रिकार्डो यांचे विचार कसे प्रतिबिंब होतात याचा उहापोह करता येईल.

५.डेव्हीड रिकार्डो यांच्या लिखाणात कर पद्धतीचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. प्रिन्सीपल या ग्रंथात जवळपास १/३ भागात कर आपात बाबत चर्चा आहे. परंतु रिकार्डो यांच्या विश्लेषणाच्या या भागास तितकेसे लक्ष पुरविण्यात आले नाही. मूल्य आणि वितरण या सिद्धांताकडे ज्या प्रमाणात लक्ष वेधल्या गेले त्या मानाने रिकार्डोच्या कर पद्धतीवर भाष्य झाल्याचे दिसत नाही. कराचा व्यष्टी आणि समष्टी परिणामाचा विचार एकाच वेळी झाल्याने रिकार्डो यांचे कराबाबतचे विश्लेषण अधिकच प्रभावशाली झाले आहे. लेखकांना या संदर्भात आपले विचार मांडण्यास वाव आहे.

६.जमिनीच्या किंमती आणि खंड यांची दीर्घ कालीन उत्क्रांती कशी झाली हा रिकार्डो यांच्या विश्लेषणाचा प्रमुख भाग होता. या विषयावर लेखक आपले विचार व्यक्त करू शकतील.

७.डेव्हिड रिकार्डो यांचा १८१७ साली लिहिलेला On the Principles of Political Economy and Taxation (Batoche Books Kitchener 2001) हा ग्रंथ उपयुक्त ठरू शकेल. शोध निबंध लिहितांना भर विश्लेषणावर अधिक असावा.

# अर्थसंवाद

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४१वे राष्ट्रीय अधिवेशन, फैजपूर

## निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा:चर्चासत्र-२

# भारतातील करव्यवस्थेतील बदलांचा चिकित्सक अभ्यास

संजय निवृत्ती तुपे, नाशिक,
प्राध्यापक व विभाग प्रमुख, बँकिंग आणि वित्त,
बिटको महाविद्यालय, नाशिकरोड.
भ्रमणध्वनी: ९९६०२७८८९९

भारतातील करव्यवस्था प्राचीन असून इतिहासातील नोंदी आढळून येतात. अर्वाचीन काळात मनुस्मृतीत आणि कौटिल्याच्या अर्थशास्त्रात करांचा उल्लेख असुन मनु म्हणतो, *राजाने शास्त्रानुसार कर आकारणी करावी.* कौटिल्याच्या अर्थशास्त्रात कर रचना, प्रशासन आणि राजकोषीय धोरणाची पद्धतशीर चिकित्सा करण्यात आली आहे. मुगल व मराठा राजवटीत देखील समग्र कर पद्धत अस्तित्वात होती. भारतातील संघटित कररचनेची सुरुवात ब्रिटीश साम्राज्यातच १८६० साली लावलेल्या उत्पन्न कर कायद्यापासून झाली. १९२१ ला अखिल भारतीय उत्पन्न कर समितीने सुचविल्याप्रमाणे १९२२ ला भारतीय उत्पन्न कर कायदा अंमलात आला. स्वातंत्र्यपूर्व भारतात जुन्या कर कायद्यांची चिकित्सा करून नवीन कर कायदे आणण्यात आले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात उत्पन्न कर सुधारणेसाठी १९५६ साली कायदा आयोग नेमण्यात आला. सदर आयोगाने १९५८ ला अहवाल सादर केला. तद्नंतर केंद्र सरकारने प्रत्यक्ष कर प्रशासकीय व चौकशी समिती, करदात्यांचा त्रास कमी करणे, करचुकवेगिरीला लगाम घालणे इ. उपाय सुचविण्यासाठी नेमण्यात आली होती. निकोल्हास कल्डोर यांचे १९६१ चे उत्पन्न कर विधेयक स्वीकारून केंद्रिय प्रत्यक्ष कर मंडळाची स्थापना त्या सुमारास करण्यात आली. १९८४, १९८७, १९८८, १९८९ व १९९१ या वर्षी प्रत्यक्ष कर कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. या व्यतिरिक्त कर चौकशी समिती, वांछू समिती, कै.एन.राज समिती, डब्ल्यु. जे. इ. मेडे १९७७, एल. के. झा यांचे अध्यक्षतेखाली अप्रत्यक्ष कर सुधारणा समिती इ. समित्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कररचनेत बदल सूचविण्यास्तव नेमण्यात आल्या होत्या.

नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर भारताच्या करपद्धतीत कालसुसंगत बदल सूचविण्यासाठी राजा चेल्लीया यांच्या अध्यक्षतेखाली १९९२ मध्ये कर सुधारणा समिती नेमण्यात आली. अर्थतज्ज्ञ डॉ.विजय केळकर यांच्या

अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष कर सुधारणा दलाची स्थापना २००२ मध्ये करण्यात आली.

आजपावेतोची कर रचना व सुधारणेतील विविध सरकारांची भूमिका, करदाते व भारतीय उद्योजकांच्या याबाबतच्या सूचना, उद्योग संघटनेच्या शिफारशी, आंतरराष्ट्रीय सल्लागार संघटना व सल्लागारांचे अहवाल व शिफारशी याची सैद्धांतिक चर्चा करता येईल. भारतातील करव्यवस्थेतील वरील संक्रमण व बदल विचारात घेता आपणास खालील विषयावर सैद्धांतिक आढावा, अनुभवाधिष्टीत प्रकारातील शोध निबंध लिहिता येतील. १)भारतातील कर सुधारणेत शासनाची भूमिका २)भारतातील कर पद्धतीचा विकास ३)भारतातील कर पद्धतीचे सैद्धांतिक विवेचन ४)भारतातील कर संकलनातील कल व प्रवृत्ती ५)भारतातील कर संकलन आणि राष्ट्रीय उत्पन्न वृद्धी यातील सहसंबंध ६)भारतीय कर सुधारणेत विविध समित्या व आयोगाची भूमिका ७)केंद्र व राज्य सरकारमधील कर महसूल विभागणी कल व प्रवृत्ती ८)वित्त आयोगाची कर विभागणीतील भूमिका ९) विविध वित्त आयोगांच्या कर विभागणी शिफारशींची चिकित्सा १०)भारतातील व्यक्तिगत कर रचनेतील बदल ११)भारतातील उद्योग कर रचनेतील बदल १२)भारतातील कररचनेतील उत्पादकता व कार्यक्षमता १३)समता व न्याय निर्माण करण्यात भारतातील कररचनेची भूमिका १४)भारतातील दारिद्र्य व आर्थिक विषमता पातळी कमी करण्यात भारतातील करपद्धतीची भूमिका / योगदान १५) भारतीय कर सुधारणेत राज्यघटनेचे महत्व १६) भारतीय कर सुधारणेत पाश्चिमात्य करपद्धती व सुधारणांचा प्रभाव १७)भारतीय कर सुधारणेत काळ्या पैशाचा अडसर १८)भारतीय कर सुधारणेत अर्थसंकल्पाची भूमिका १९)भारतीय कर सुधारणेत कर लवाद व न्यायालयाची भूमिका २०)भारतीय कर सुधारणेसाठी प्रशासकीय बदल व संगणकीकरण २१)राज्य कर पद्धतीतील वृद्धी, बदल, उणिवा २२) भारतातील कर पद्धतीत वस्तू व सेवा करांचे वाढते महत्व व प्रस्तावित बदल. वरील विषयांव्यतिरिक्त मात्र भारतातील कर पद्धतीशी संबंधित विषय लेखक निवडू शकतात. शोध निबंध लिहिण्यासाठी लेखक खालील संदर्भ साहित्य व संकेत स्थळांचा उपयोग करू शकतात.

1) Bhatia H. L., Public Finance,
2) Shrivastav D. K., Issues in Indian Public Finance,
3) Ganguli S. P., Control over Public Finance in India,
4) Chand S. L., Public Finance,
5) Bagchi A., Reading in Public Finance,
6) www.financialservices.gov.in
7) www.finmin.nic.in
8) www.nipfp.nic.in
9) www.indiabudget.nic.in

शोध निबंध लिहिताना लेखकांना पुढील सूचना विचारात घेणे आवश्यक आहे. शोध निबंध शब्द मर्यादा २००० असून ए ४ (ए-फोर) ची पाने आकृती / आलेख, तळटिपा व संदर्भासह असावीत. शोध निबंधाच्या पहिल्या पानावर शोध निबंधाचे नाव, लेखकाचा पत्रव्यवहाराचा पत्ता भ्रमणध्वनीसह असावा. त्याखाली शोध निबंधाचा ३०० शब्दातील गोषवारा असावा. पुढील पानांवर केवळ शोध निबंधाची सुरुवात शोध निबंधाच्या नावाने करून प्रस्तावना, उद्दिष्टे, गृहितकृत्ये, आकडेवारी व संशोधन पद्धती, संदर्भ साहित्याचा आढावा, प्रारूपाचा उपयोग, चर्चा, निरीक्षणे किंवा तथ्ये, मूल्यमापन व सूचना, संदर्भ इत्यादी मुद्दे क्रमश: येणे आवश्यक आहे.

**अर्थसंवाद**

## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४१वे राष्ट्रीय अधिवेशन, फैजपूर

### निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा:चर्चासत्र-३

# महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतदादा पाटील यांचे योगदान

**मधुकर शिंदे**, इस्लामपूर,
जिल्हा सांगली,
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद
भ्रमणध्वनी : ९८९०११४८९६
Email - mnshinde@gmail.com

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक जडणघडणीमध्ये ज्या समाजधुरिणांचा वाटा आहे. त्यात मा. वसंतदादा पाटील यांचे स्थान वरच्या पातळीवर आहे. महाराष्ट्रातील कृषी-औद्योगिक क्रांती व सहकारी चळवळीचा विकास यामध्ये वसंतदादांचे मोलाचे योगदान आहे. शेतकरी समाजात जन्मलेले व ग्रामीण समस्यांची खडा न् खडा माहिती असलेले वसंतदादांचे व्यक्तिमत्व होते, म्हणून त्यांनी शेती, शेतकरी व ग्रामीण समाजाच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य वेचले. अशा थोर पुरुषाच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मराठी अर्थशास्त्र परिषदेने आपल्या ४१ व्या अधिवेशनासाठी *महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतदादा पाटील यांचे योगदान* हा विषय शोधनिबंध लेखन व चर्चेसाठी ठेऊन वसंतदादा पाटील यांच्या कार्याचा गौरव केला आहे. महाराष्ट्रातील नवीन पिढीला वसंतदादा पाटील यांचे कृषी-औद्योगिक व सहकारी चळवळीच्या विकासातील कार्याची माहिती व्हावी व विकासाची प्रेरणा मिळावी हा उद्देश आहे.

वसंतदादांचे व्यक्तिमत्व साधे, सरळमार्गी, त्यागी, धाडसी व अन्यायाविरूद्ध पेटून उठणारे होते. महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. ते गांधीजींच्या विचारांचे पाईक होते. त्यामुळे सर्वसामान्य व गरीब लोकांना ते आपले वाटत असत. दादा कमी शिकलेले परंतु सर्वात शहाणे व्यक्तिमत्व होते. त्यांचे अनुभवसिद्ध शेती व ग्रामीण विकासाचे ज्ञान पाहून आयएएस अधिकारी देखील स्तिमीत होत असत. दादांना त्यांच्या या गुणांचा फायदा पुढे आपल्या सामाजिक व राजकीय जीवनात झाला. सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले. ब्रिटिशांनी भारताला देखील त्या युद्धात ओढले, म्हणून गांधीजींनी ब्रिटीशांविरूद्ध सत्याग्रह आंदोलन सुरू केले. यावेळी वसंतदादा

काँग्रेसमध्ये सक्रीय झाले होते. काँग्रेस पक्षाने या आंदोलनात भाग घेतला व त्याचे लोण खेडोपाडी पसरले. वसंतदादांनी सांगली जिल्ह्यातील बिसूर गावात सत्याग्रह केला. त्यामुळे वसंतदादांना अटक झाली व एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली.

शेतीच्या सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी वसंतदादांनी अनेक लहान-मोठ्या जलसिंचन योजना राबविल्या. सन १९४८-४९ मध्ये पद्माळे येथे सहकारी उपसा जलसिंचन योजना सुरू केली. वसंतदादा पाटबंधारे मंत्री व मुख्यमंत्री असताना पुढील योजना त्यांनी सुरू केल्या. सांगली जिल्ह्यातील चांदोली धरण, कोल्हापूर जिल्ह्यातील काळम्मावाडी धरण, सातारा जिल्ह्यातील कोयना धरण, नगर जिल्ह्यातील भंडारदरा धरण, पुणे जिल्ह्यातील उजनी प्रकल्प, कृष्णा नदीवरील धोम धरण, वेण्णा नदीवरील कण्हेर धरण, बीड जिल्ह्यातील धनेगाव येथील मांजरा धरण या मोठ्या धरणांची घोषणा अथवा भूमीपूजन त्यांच्या काळात झाले.

१९७५ मध्ये कसबे डिग्रज सहकारी पाणी पुरवठा योजना, सांगली जिल्ह्यातील दुष्काळी भागासाठी वरदान ठरलेले ताकारी-म्हैसाळ उपास योजना, ज्या योजनेखाली ९०००० हेक्टर दुष्काळी भागातील शेती ओलिताखाली आली. सन १९८४ मध्ये मुख्यमंत्री असताना कोरडवाहू शेतीसाठी *पाणी अडवा पाणी जिरवा* योजना राबविण्याचा महत्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला.

शेती क्षेत्रात केवळ उत्पादन वाढवूनच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होणार नाही. तर शेतमाल प्रक्रिया उद्योगांची उभारणी सहकारी क्षेत्रात केली पाहिजे असे त्यांचे विचार होते. सहकारी क्षेत्रातील उद्योगांमुळे त्यासाठी आवश्यक भांडवल उभारणीची समस्या सुटेल, म्हणून वसंतदादांनी सन १९५६ मध्ये सांगली येथे आशिया खंडातील मोठा शेतकरी सहकारी साखर कारखाना सुरू केला. त्या कारखान्याला पुरेसा ऊस उपलब्ध व्हावा म्हणून शेतकऱ्यांना ऊस लागवडीचे शिक्षण दिले. या कारखान्यातील मळीपासून अल्कोहोल व ॲसिटोन निर्माण करण्याचा प्रकल्प सुरू केला आणि साखर कारखान्याच्या उत्पन्नात वाढ केली. यामधून महाराष्ट्रात साखर कारखानदारीमध्ये वाढ झाली.

शेतकऱ्यांना संघटीत कामगार वर्गासारख्या कोणत्याच सोयी व सवलती मिळत नाहीत म्हणून शेतकऱ्यांना सहा टक्के दराने कर्ज मिळाले पाहिजे असे त्यांचे मत होते. सन १९७७ मध्ये मुख्यमंत्री असताना ज्या शेतकऱ्यांच्या पिकांची आणेवारी ५० पैशापेक्षा कमी होती त्यांचा शेतसारा माफ केला. शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे सपाटीकरण करणे व बडींगची कामे मोफत करून दिली. शेतकऱ्यांना पूरक जोडधंदा उपलब्ध व्हावा म्हणून १९८४ मध्ये मुख्यमंत्री असतांना *दुधाचा महापूर* योजना राबविली.

शेती, सिंचन, साखर कारखाने, पुरक उद्योग धंदे, लहान मोठ्या शहरात निर्माण झालेल्या औद्योगिक वसाहती, दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री फार्मिंग, मत्स्य व्यवसाय, सहकारी चळवळ, बँकींग क्षेत्र, बाजारपेठांचा विकास वगैरे क्षेत्रातील वसंतदादांच्या कार्यामुळे माहितीचे संकलन करून व तिचे विश्लेषण करून लेखकांना खालील मुद्यांवर शोधनिबंध लिहिता येतील.

१) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे विश्लेषण - एक अभ्यास

२) महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या उत्पादकतेत झालेले बदल

३) महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्रामुळे शेतीतील पीक रचनेत झालेला बदल

४) महाराष्ट्रातील कृषी सिंचन व शेती क्षेत्रात झालेले बदल

५) शेती आदाने-प्रदाने किंमती व शेतीचा किफायतशीरपणा - एक विश्लेषण

६) विविध पिकांचे खर्च - लाभ विश्लेषण

७) शेतमाल बाजार समित्या व शेतमाल बाजार व्यवस्था - एक विश्लेषण

८) फळबाग पिकांचे अर्थशास्त्र - एक अभ्यास

९) स्वातंत्र्योत्तर काळातील कृषी धोरणे व शेती क्षेत्र

१०) सहकारी चळवळीचे शेती कर्ज पुरवठ्यातील योगदान

११) सहकारी चळवळ व ग्रामीण नेतृत्वाचा उगम व विकास

१२) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे ग्रामीण विकासातील योगदान

१३) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे अर्थशास्त्र

१४) महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याचे खर्च-लाभ विश्लेषण

१५) ग्रामीण कर्ज पुरवठ्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचे योगदान

१६) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व कृषी कर्ज पुरवठा

१७) सहकारी साखर कारखाने व ग्रामीण रोजगार

१८) महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे SWOT विश्लेषण

१९) महाराष्ट्रातील मोठ्या पाटबंधारे योजनांच्या कार्याचे मूल्यमापन

२०) महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व ग्रामीण रोजगार

२१) महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसायाचे ग्रामीण विकासातील योगदान

२२) महाराष्ट्रातील कृषी पूरक उद्योग व ग्रामीण विकास

२३) महाराष्ट्रातील दूध महापूर योजना व ग्रामीण विकास

२४) कृषी पुरक उद्योगांचे खर्च लाभ विश्लेषण

२५) कृषी सिंचन योजनांचे अर्थशास्त्र

यासारखे विविध विषय शोधनिबंध लेखकांना अभ्यासासाठी घेता येतील. त्यासाठी विविध संस्थाचे अहवाल, शासकीय अहवाल, महाराष्ट्रातील सहकारी संस्था, साखर कारखान्यांचे वार्षिक अहवाल, कृषी अर्थशास्त्रावरील पुस्तके, रिझर्व्ह बँक, नाबार्डचे अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताची आर्थिक पाहणी वगैरे साधने माहिती संकलनासाठी उपयुक्त ठरतील.

संदर्भसूची:

१) रा.तु. पाटील, *वसंतराव दादा पाटील - एक दिलदार नेता व राजा माणूस*, परखड प्रकाशन, तडसर, जि. सांगली

२) डी.जी. पाटील, *वसंतदादा पाटील-व्यक्ती आणि कार्य*, माणिकमोती प्रकाशन, कोल्हापूर

३) राजा माने, *महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतदादा*, सुविद्या प्रकाशन, सोलापूर

४) मधुकर भावे, *यशवंतराव ते विलासराव*, मनोविकास प्रकाशन, पुणे

५) भाई गणपतराव कोळी, *पुरोगामी जीवनसफर* (आत्मचरित्र), प्रकाशक- मधुकर रायकर - २००८

६) डॉ. शालिनीताई वसंतराव पाटील, *संघर्ष* (आत्मचरित्र), विश्वामित्र प्रकाशन, बोरी, ता. इंदापूर, जि. पुणे

७) डॉ. जे.के. पवार, *गर्जा महाराष्ट्र आपुला*, राज प्रकाशन, कोल्हापूर- २०११

# ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन २०१६-१७

## कार्यवाहांचा अहवाल

रामदास भांडवलकर, यवतमाळ
कार्यवाह-खजिनदार,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४० वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन रविवार, दि. ०६ नोव्हेंबर ते दि. ०८ नोव्हेंबर २०१६ या तीन दिवसाच्या कालावधीमध्ये कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालय, चांदवड जि. नाशिक येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. प्रा. डॉ. एस. एम. भोसले, सातारा हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

### अधिवेशन उद्घाटन सोहळा:

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन रविवार ०६ नोव्हेंबर २०१६ रोजी नाशिक जिल्ह्यातील चांदवड येथील जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरूकुल) संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच. जैन विज्ञान (वरिष्ठ) महाविद्यालयाच्या निसर्गरम्य परिसरामध्ये संपन्न झाले. उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीशजी महाजन उपस्थित होते. परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एम. भोसले हे उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये खा. हरिश्चंद्र चव्हाण, आमदार डॉ.राहुल आहेर, भूषणजी कासलीवाल, स्वागताध्यक्ष बेबीलालजी संचेती, कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर. बी. भांडवलकर, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, ३९ व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. सुहास आव्हाड, स्थानिक कार्याध्यक्ष व प्राचार्य डॉ.जी. एच. जैन, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. उद्घाटन समारंभाची सुरूवात प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. परिषदेच्या वतीने प्रास्ताविक डॉ. आर.बी. भांडवलकर आणि स्वागतपर प्रास्ताविक डॉ. सुरेश पाटील यांनी व्यक्त केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा यथोचित सत्कार पुष्पगुच्छ आणि शाल श्रीफळ देवून करण्यात आला. महाविद्यालयाचा परिचय आणि अधिवेशन आयोजनामागील भूमिका प्राचार्य डॉ.जी.एच. जैन यांनी विशद केली. अधिवेशन निमित्ताने काढण्यात आलेल्या

*अर्थनेमि* या स्मरणिकेचे प्रकाशन माननीय ना. गिरीष महाजन यांचे हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. मधुकर शिंदे आणि डॉ. अनिल सत्रे लिखित चालू आर्थिक घडामोडी २०१६ या पुस्तकाचे तसेच डॉ. दि. व्यं. जहागिरदार लिखित *आर्थिक जगत खंड*-४ या पुस्तकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी परिषदेला एक लाख रूपयाची देणगी दिल्याबद्दल डॉ. शंकर मोडक यांचा तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेचे निदेशक डॉ. आशुतोष रारावीकर यांचा विशेष उपस्थितीबद्दल मंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. दैनिक देशदूतचे संपादक श्रीमान देवकर यांचे पुष्पगुच्छ व शाल देवून स्वागत करण्यात आले. खासदार हरिश्चंद्र चव्हाण आणि आमदार डॉ. राहुल आहेर यांनी मनोगत व्यक्त करून अर्थशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाला शुभेच्छा दिल्यात आणि या परिसरातील विकासात्मक कार्यासाठी सुचना करण्याची अपेक्षा अर्थशास्त्र अभ्यासकाकडून व्यक्त केली. स्वागताध्यक्ष बेबीलाल संचेती यांनी संस्थेच्या विकासात्मक प्रगतीचा अहवाल आपल्या भाषणातून सादर केला आणि संस्थेच्या वाढीस मंत्री महोदयांनी सहकार्य करावे असे मत मांडले. उद्घाटक गिरीशजी महाजन यांनी महाराष्ट्राच्या जलसंपदा खात्याची स्थिती विशद करून योजना मंजूर आहेत परंतु निधीचा तुटवडा ही समस्या मोठी आहे. पाण्याची गळती ही सुद्धा फार मोठी समस्या असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील सिंचनाच्या समस्यांचा अभ्यास आपण करून त्यासंबंधी अहवाल व सुचना माझ्याकडे पाठविल्यास निश्चितपणे त्यांचे स्वागत करून अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करेल असे विचार उद्घाटकीय भाषणातून व्यक्त केले. ४० व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एम. भोसले यांचे *महाराष्ट्रातील जलसिंचन : एक चिंतन* या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण झाले. त्यांनी जलसिंचनाचा उद्देश, आवश्यकता, महत्व सांगतांना सिंचनाच्या विविध पद्धती, महाराष्ट्रातील जलधोरण व सिंचनक्षमता यासह जलसिंचनाचे परिणाम व समस्या अध्यक्षीय भाषणातून प्रभावीपणे व्यक्त केल्यात. उद्घाटन सोहळ्याचे सूत्र संचलन डॉ. तुषार चांदवडकर आणि आभारप्रदर्शन उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी यांनी केले.

## चर्चासत्रे:

सदर अधिवेशन कालावधीत दरवर्षी प्रमाणे एकूण चार चर्चासत्रे संपन्न झाली. रविवार ६ नोव्हेंबर २०१६ रोजी भोजनावकाशानंतर दुपारी पहिले सत्र *प्रा.नी.वि. सोवनी यांचे आर्थिक विचार* या विषयावरील सत्राचे सूत्र संचालन डॉ. जे.एफ.पाटील, वृत्तसंकलक डॉ. अनिल सत्रे यांनी कामकाज पार पाडले. या विषयावरील सत्रामध्ये डॉ. हिरालाल चव्हाण, डॉ. मंजुषा मुसमाडे, डॉ. संजय तुपे, डॉ. मोहन चौधरी, डॉ. विश्वजीत कदम, डॉ. प्रशांत हरमकर यांनी अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केलेत. सदर विषयाचे अनुषंगाने उपस्थित चर्चेत डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. आबासाहेब कल्याणकर, डॉ. संतोष दास्ताने आणि डॉ. अनिल पडोशी यांनी सहभाग घेतला. सोमवार ७ नोव्हेंबर २०१६ रोजी दुसरे व तिसरे समांतर चर्चासत्र घेण्यात आले. *आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती* या विषयावरील दुसऱ्या सत्राचे सूत्र संचालन डॉ. जयवंत भदाणे, सहसूत्रसंचालक डॉ. करमसिंग राजपूत आणि वृत्तसंकलक डॉ. सुभाष पाटील होते. या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. भिमराव उगले, प्रा.सौ. वर्षा नेहते, प्रा. नीता वाणी, डॉ. तेजस्विनी मुडेकर, डॉ. विकास सुकाळे, प्रा. पंढरीनाथ विभुते, डॉ.

करमसिंग राजपूत व डॉ. आर.बी. भांडवलकर, प्रा. एल. एस. सिताफुले, डॉ. वैशाली जोशी व डॉ. संजय तुपे, डॉ. आप्पासाहेब पवार, डॉ. सुनिता राठोड, प्रा.श्रीमती चौधरी, डॉ. भाऊसाहेब देशमुख, डॉ. सुमित्रा पवार, प्रा. सुर्यकांत पवार व विजया बगाडे, कु. योगिता क्षिरसागर, श्री. शिवनाथजी बोरसे यांनी अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केलेत. ऐन वेळेच्या चर्चेत डॉ. शंकर मोडक, डॉ. संजय तुपे, डॉ. ए.डी. पाटील, पी.एल. किरकिरे यांनी सहभाग घेतला. *महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासंदर्भात शासनाची भुमिका* या विषयावरील तिसऱ्या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी मुडेकर, वृत्त संकलन डॉ. शंकुतला पाटील यांनी कामकाज पाहिले. सदर सत्रामध्ये डॉ. जितेंद्र तलवारे, प्राचार्य बाळासाहेब इंगळे, डॉ. एस.डी. पाटील, डॉ. शंकुतला पाटील, डॉ. संजय पाटील, योगेश भवरे, प्रा. राठोड, डॉ. जीवन साळुंखे, डॉ. जयश्री भंगाळे, डॉ. पांडुरंग कल्याणकर, कैलास पाटील व डॉ. राहुल म्होपरे, प्रा. कल्पना भागवत यांनी अभ्यासपूर्ण शोधनिबंध सादर केलेत. या सत्राचे आभार प्रा. मोहन पावरा यांनी मानले. दि. ८ नोव्हेंबर २०१६ रोजी चौथ्या ऐनवेळच्या *मेक इन इंडिया* या विषयावरील चर्चासत्राचे प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर भावके, सहसूत्रसंचालक प्रा. आर. जे. इंगोले व वृत्तसंकलन डॉ. सुभाष दगडे यांनी यशस्वीरित्या पार पाडले. या तीनही दिवसांच्या चार सत्रांमध्ये परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस. एम. भोसले सत्राध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह, डॉ. आर.बी. भांडवलकर व अर्थसंवादचे प्रमुख संपादक डॉ. अविनाश निकम उपस्थित होते.

प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यान:

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी.वि. सोवनी स्मृती व्याख्यान या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये सातवे पुष्प प्रसिद्ध चार्टर्ड अकाऊंटन्ट आणि अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर, नाशिक यांनी गुंफले. *अर्थ-भारतीय आणि अभारतीय दृष्टीकोन* हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. सदर व्याख्यानाचे अध्यक्ष ४० व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस.एम. भोसले होते. यावेळी कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह-खजिनदार डॉ. आर.बी.भांडवलकर, डॉ.सुरेश पाटील, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, डॉ. जीवन साळुंके उपस्थित होते. प्रमुख वक्त्यांचा परिचय डॉ. जीवन साळुंके यांनी करून दिला. तर व्याख्यानमालेचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन डॉ. अविनाश निकम यांनी केले. व्याख्यानमालेचे प्रास्ताविक डॉ. आर.बी. भांडवलकर कार्यवाह-खजिनदार यांनी सदर व्याख्यान सुरू करण्यामध्ये डॉ. दि.व्यं. जहागिरदार व डॉ.सौ. मुक्ता जहागिरदार यांच्या योगदानासह आपणा सर्वांच्या सहकार्याने ही व्याख्यानमाला नियमित सुरू असल्याचे सांगितले. ३९ व्या अधिवेशनात डॉ. रूपा शहा यांनी रु. १५,०००/- ची देणगी सदर व्याख्यानाचे उपक्रमास दिली असून या निधीमध्ये वाढ होत आहे ही समाधानाची बाब आहे. प्रमुख वक्ते डॉ. विनायक गोविलकर यांनी विकासाची अवधारणा करणे हे अर्थशास्त्राचे कार्य आहे. भांडवलशाही ही स्वार्थावर आधारित आहे तर साम्यवाद संघर्षावर आधारित आहे. तसेच जग हे पर्यायासाठी भुकेले असून जगात कुठल्याही प्रकारची व्यवस्था याला अभारतीय विचार आणि भारतीय विचारामध्ये अर्थ या विचाराला महत्व दिले नाही. तसेच मनुष्य हा उद्यमशील झाला नाही असे विचार आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून

व्यक्त केलेत.

**डॉ. वि.म. दांडेकर स्मरणार्थ व्याख्यान:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४० व्या अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या कार्याचा परिचय व्हावा या उद्देशाने अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी स्मृती व्याख्यान आयोजित करण्याचा नवीन उपक्रम सुरू करण्यात आला. त्याप्रित्यर्थ पहिले पुष्प डॉ. वि.म.दांडेकर स्मरणार्थ व्याख्यान दि. ०९ नोव्हेंबर २०१६ रोजी आयोजित करण्यात आले. या उपक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. एस.एम.भोसले होते तर प्रमुख वक्ते डॉ. ज.फा. पाटील कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, कार्यवाह डॉ. आर.बी. भांडवलकर, अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, डॉ. राजु शिंदे, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. व्याख्यानमालेचे संचलन डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी केले. वृत्तलेखक डॉ. राजू शिंदे यांनी आभार व्यक्त केले. प्रमुख वक्ते डॉ. ज.फा.पाटील यांनी डॉ. वि.म. दांडेकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय करतांना त्यांच्या वत्कृत्व शैलीचा, गोखले संस्थामधील योगदानाचा परिचय देतांना त्यांचे तर्कशुद्ध विचार, पीएच्.डी. बाबतचे विचार, केंद्र व राज्य सरकारच्या विविध समित्यावरील कार्याचा परिचय करून दिला. त्यांनी डॉ. दांडेकर यांची उंची त्यांच्या कार्यात असल्याचे मत व्यक्त केले.

**वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा):**

४० व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने ०७ नोव्हेंबर २०१६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस.एम.भोसले यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरूवातीला पद्मश्री भंवरलाल जैन, जळगाव, प्रा. भीमा सापनर नाशिक, प्रा. राजेंद्र शिरसाठ नाशिक, श्रीमती प्रभा देशपांडे दिल्ली, डॉ. वि.शि.शेणवाई नागपूर, डॉ. वि.म.दांडेकर यांच्या पत्नी श्रीमती दांडेकर आणि दिवंगत सदस्य यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली सर्वसाधारण सभेतील काही महत्वाचे निर्णय पुढील प्रमाणे आहेत. ऑक्टोंबर - नोव्हेंबर २०१७ मध्ये होणाऱ्या ४१ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद स्वीकारण्यासाठी (१) धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूर, जि. जळगाव, (२) कन्या महाविद्यालय, मीरज, जि. सांगली, (३) गुरू गोविंदसिंह महाविद्यालय, झरी, जि. नांदेड येथील प्रस्ताव असल्याचे कार्यवाह यांनी सभेला सांगितल्यानंतर त्यावर चर्चेअंती फैजपूर येथे प्रथम पदाधिकाऱ्यांनी भेट द्यावी त्यानंतर झरी, नांदेडचा विचार करावा व शेवटी मीरजचा विचार करावा असे ठरले. ४१ व्या वार्षिक अधिवेशनाकरीता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले. १) रिकार्डो यांचे आर्थिक सिद्धांत, २) भारतातील करव्यवस्थेतील बदलांचा चिकित्सक अभ्यास, ३) महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतदादा पाटील यांचे योगदान.

**निवडणूक:**

४१ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी डॉ. रामचंद्र रसाळ, प्रवरानगर यांची बहुमताने निवड झाली. विश्वस्त म्हणून प्राचार्य डॉ. जे.एस. पाटील सातारा यांनी एकमताने दि. १ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०२० कालावधी करिता नियुक्ती करण्यात आली. तसेच पुढील तीन वर्षाकरीता कार्यवाह - खजिनदार म्हणून डॉ. आर. बी. भांडवलकर यांची दुसऱ्यांदा बहुमताने निवड झाली. सन २०१७-२०२० (दि. १ एप्रिल २०१७ ते दि. ३१ मार्च २०२०) या तीन वर्षाकरीता कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून डॉ.

अशोकगीर गोस्वामी, भुसावळ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांची बहुमताने निवड झाली. तर डॉ. विनोद गावंडे, अमरावती, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ. संतोष कदम, सोलापूर, सोलापूर विद्यापीठ, डॉ. सुभाष पाटील पुणे एसएनडीटी महिला विद्यापीठ, प्रा. एम.जी. पाटील मीरज गट क्र. १ ते १० ही विद्यापीठे वगळता उर्वरित विद्यापीठे यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली. डॉ. राहुल म्होपरे यांची दि. १ एप्रिल २०१७ ते दि. ३१ मार्च २०२० या कालावधीकरीता अर्थसंवादचे संपादक म्हणून निवड झाल्याची माहिती कार्यवाह यांनी सभागृहाला दिली.

**डॉ.श्री. आ. देशपांडे स्मृती जीवन गौरव पुरस्कार:**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सन २०१२ पासून सुरू करण्यात आलेला जीवन गौरव पुरस्कार सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. सदर सोहळ्याचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस.एम. भोसले होते. पुरस्कार वितरण सोहळ्याचे प्रास्ताविक कार्यवाह-खजिनदार डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी केले. डॉ.श्री. आ. देशपांडे यांच्या जीवनकार्याबाबत डॉ. अनिल पडोशी यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ.श्री.आ. देशपांडे जीवन गौरव पुरस्काराचे पाचवे मानकरी डॉ. यशवंत रारावीकर, नवी दिल्ली यांचा परिचय डॉ. सुहास आव्हाड, संगमनेर यांनी करून दिला. डॉ. विनायक देशपांडे, नागपूर यांनी मानपत्राचे वाचन केले. सदर कार्यक्रमाला डॉ. आशुतोष रारावीकर, डॉ. सुहास आव्हाड, प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. सुरेश पाटील, डॉ. अविनाश निकम, डॉ. अनिल पडोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आशुतोष रारावीकर यांनी मनोगत व्यक्त करतांना वडिलांच्या कार्यकर्तृत्वाने आणि परिषदेच्या वतीने दिलेल्या पुरस्कारामुळे रारावीकर कुटूंब कृतार्थ झाल्याचे मत व्यक्त केले. डॉ. यशवंत रारावीकर यांनी परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार स्वीकारतांना अतिशय भावपूर्ण होवून परिषदेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला आणि माझी संपत्ती ही माझे विद्यार्थी असल्याचे गौरवोद्गार काढले. त्यानंतर पुरस्कार सोहळ्याचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस.एम. भोसले यांनी अध्यक्षीय भाषण केले. यावेळी प्रामुख्याने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एच.जैन, डॉ. विनायक गोविलकर, डॉ. यशवंत रारावीकर यांचे अनेक विद्यार्थी उपस्थित होते. सदर पुरस्कार वितरण सोहळ्याचे सूत्रसंचलन डॉ. मंजुषा मुसमाडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. सुरेश पाटील यांनी केले.

**समारोप सोहळा:**

मंगळवार दि. ०८ नोव्हेंबर २०१६ दुपारी १२:०० वाजता अधिवेशनाचा समारोप सोहळ्याचे अध्यक्ष प्रा.डॉ. एस.एम. भोसले तर प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ.जी.एच.जैन होते. तसेच कार्याध्यक्ष प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. आर.बी. भांडवलकर, डॉ. अविनाश निकम, विश्वस्त, कार्यकारिणी सदस्य, नवनियुक्त कार्यकारिणी सदस्य, नवनियुक्त संपादक डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुरेश पाटील यांनी केले. यावेळी अधिवेशन आयोजनाचा आढावा प्रातिनिधीक स्वरूपात घेण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. जैन यांनी अधिवेशनाबाबत मौलिक असे विचार प्रगट करून अधिवेशन यशस्वीरित्या पार पाडण्यात परिषदेच्या सदस्यांनी सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले. परिषदेचे अध्यक्ष

डॉ. एस.एम. भोसले यांनी समोरापीय कार्यक्रमात परिषदेने मला अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी दिली व आपण सर्वांनी सहकार्य करून मदत केल्याबद्दल ऋण व्यक्त केले आणि तीन दिवसीय अधिवेशनाची सांगता झाल्याचे घोषित केले. अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनाबाबत व्यवस्थापन मंडळाचे आभार व्यक्त करून प्रातिनिधीक स्वरूपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एच. जैन आणि स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील यांचा परिषदेच्या वतीने शाल, सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. तसेच अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम यांनी संपादक म्हणून केलेल्या कार्याचा गौरव परिषदेच्या वतीने करण्यात आला. डॉ. रामचंद्र रसाळ यांची अध्यक्ष म्हणून तर डॉ. आर. बी. भांडवलकर यांची कार्यवाह-खजिनदार म्हणून निवड झाल्याबद्दल डॉ. सुहास आव्हाड मित्र परिवाराचे वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. सुमित्रा पवार यांच्या *स्थूल अर्थशास्त्र* या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. समारोप सोहळ्याला उपस्थित माजी अध्यक्ष डॉ. दि. व्यं. जहागिरदार, डॉ. श्रीराम जोशी, डॉ. संतोष दास्ताने, डॉ. सुहास आव्हाड, डॉ. दिलीप कदम, प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. तुषार चांदवडकर तर आभार प्रदर्शन डॉ. आर.बी. भांडवलकर यांनी केले. याच वेळी कार्यकारिणी मंडळ आणि नवनियुक्त सदस्य, विश्वस्त यांचा यथोचित सन्मान चिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

## परिषदेच्या वतीने विविध पारितोषिकांचे वितरण:

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे हस्ते करण्यात आले.

१) प्रा. मो.स.भावे पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवाद मधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल डॉ. विश्वजीत कदम, नाशिक यांच्या *ग्रीक शोकांतिका* या लेखाला देण्यात आले.

२) प्रा.सौ. अरूणा रारावीकर वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) प्रा.डॉ. संजय तुपे नाशिक यांच्या 'अपेक्षा अर्थसंकल्पाकडून' तर द्वितीय पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) प्रा.डॉ. कृष्णा शहाणे, नाशिक यांच्या 'शेती उद्योगाचा दर्जा, तरूणांचे दुर्लक्ष, शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या लेखाला देण्यात आले.

३) स्व.भाऊसाहेब गेणुजी दरेकर स्मृती पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम आलेले विद्यार्थी बाळु पुरूषोत्तम पावडे, मुंबई यांना देण्यात आले.

४) स्व.प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (रु. २०००/- व सन्मानपत्र) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम आलेले विद्यार्थी अविनाश सुंकरवार, पाटणबोरी यांना देण्यात आले.

५) डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (रु. ४०००/- व सन्मानपत्र) डॉ. बी.एस. खुरूद, राहुरी यांच्या "Export Performance of MSME Sector in the post Liberalization Era' या लेखाला देण्यात आले.

अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या

**सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके:**

१) कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ. विश्वजीत कदम, नाशिक व डॉ. प्रशांत हरमकर अमरावती यांना विभागून देण्यात आले.

२) प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्यसेन पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंध पारितोषिक कैलास सुनिल पाटील व डॉ. राहुल म्होपरे यांना विभागुन देण्यात आले.

३) डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक विद्यार्थ्यांकरिता (रु. २०००/- व सन्मानपत्र) कु. योगिता क्षीरसागर, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदवड यांना देण्यात आले.

४) पद्मजा गंधे पारितोषिक (रु. २०००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंध महिलाकरिता प्रा.डॉ. तेजस्विनी मुडेकर, कोल्हापूर यांच्या *आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभुमीवर करार शेतीची गरज* या विषयावरील शोध निबंधास देण्यात आले.

**ऋणनिर्देश:**

१) तज्ज्ञ परिक्षक: प्रा. सुभाष दगडे, सांगली, प्रा.मो. स. भावे, जळगाव, प्रा. शिवाजी काकडे, गढी, डॉ. एन. आर. मढवी, पनवेल यांनी पुरस्कार व पारितोषिक निवडण्याकरिता तज्ज्ञ परीक्षक म्हणून सहकार्य केल्याबद्दल आभार !

२) सूत्रसंचालक व वृत्तसंचालक

पहिले सत्र: प्रा. नी.वि. सोवनी यांचे आर्थिक विचार, सूत्रसंचालक डॉ. ज.फा.पाटील, वृत्तलेखक डॉ. अनिल सत्रे.

दुसरे सत्र: आर्थिक सुधारणा आणि भारतीय शेती सूत्रसंचालक डॉ. करमसिंग राजपूत, सहसूत्रसंचालक डॉ. जयवंत भदाणे, वृत्तलेखक डॉ. सुभाष पाटील

तिसरे सत्र: महाराष्ट्रातील दुष्काळ निवारण्यासंदर्भात शासनाची भूमिका सूत्रसंचालक डॉ. तेजस्विनी मुडेकर, वृत्तलेखक डॉ. शकुंतला पाटील.

चौथे सत्र: मेक इन इंडिया सूत्रसंचालक डॉ. प्रभाकर भावके, सहसूत्रसंचालक आर. जे इंगीले वृत्तलेखक डॉ. सुभाष दगडे, प्रमुख वक्ते: प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी सहकार्य केल्याबद्दल आभार !

**निवडणूक अधिकारी व सहकारी:**

प्रा. सुभाष दगडे, सांगली व डॉ. सुरेश पाटील चांदवड आणि चांदवड महाविद्यालयातील डॉ. सुरेश पाटील यांच्या सहकाऱ्यांचे विशेष आभार !

याशिवाय जैन ब्रम्हचर्याश्रम (जैन गुरूकूल) चे सर्व सन्माननीय व्यवस्थापन मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एच. जैन, उपप्राचार्य डॉ. दत्ता शिंपी, स्थानिक कार्यवाह डॉ. सुरेश पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ज्यांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले त्या सर्वांचे परिषदेच्या वतीने मन:पूर्वक आभार व्यक्त करतो हे कार्य करीत असतांना कोणी अनवधानाने दुखावले गेले असल्यास त्यांच्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करून यापुढे सहकार्याची अपेक्षा करतो तसेच मला कार्यवाह खजिनदारपदी दुसऱ्यांदा कार्य करण्याची संधी आपण दिल्याबद्दल आभार व्यक्त करून आपल्या ऋणात राहू इच्छितो. अशा प्रकारे परिषदेचे ४० वे राष्ट्रीय अधिवेशन चांदवड जि. नाशिक येथे सर्वार्थाने संपन्न झाले.

# अर्थसंवाद वार्षिक अहवाल

## २०१६-१७ (खंड ४०, अंक १ ते ४)

**अविनाश रामलाल निकम**, शहादा,
प्रमुख संपादक, अर्थसंवाद
मराठी अर्थशास्त्र परिषद.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या *अर्थसंवाद* त्रैमासिकाचा २०१६-१७ या वर्षाचा ४० व्या खंडाचा वार्षिक अहवाल परिषदेच्या सर्व सन्माननीय सदस्यांसमोर सादर करतांना मला अत्यंत आनंद होत आहे. माझ्या संपादकीय कारकिर्दीतला हा सहावा व अंतिम अहवाल. अर्थसंवादचे ४० खंड अखंडपणे प्रकाशित झाले. सन २०१६-१७ या वर्षात अर्थसंवादचे चार अंक प्रकाशित झाले. अर्थसंवाद ISSN व Registration Number प्राप्त जागतिक पातळीवरील नियतकालिकांच्या यादीतील प्रतिष्ठाप्राप्त नियतकालिक ठरले आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य, अर्थसंवादचे लेखक, जाहिरातदार, वर्गणीदार यांच्या सहकार्यामुळेच परिषदेला हे त्रैमासिक चालू ठेवणे शक्य झाले आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने अनुदान मंजूर करुन मोलाचे सहकार्य दिले,त्याबद्दल मी या संस्थेचा परिषदेच्या वतीने अत्यंत कृतज्ञ आहे.

सन २०१६-१७ च्या चाळीसाव्या खंडात स्वतंत्र लेख, ग्रंथ परीक्षण, परिषदेच्या ४० व्या राष्ट्रीय अधिवेशनाचा वृत्तांत, प्रत्येक अंकात संपादकीय, अध्यक्षीय भाषण, अर्थसंवाद २०१६-१७ चा अहवाल, ४० व्या राष्ट्रीय अधिवेनातील सत्रांचा अहवाल अशा विविधांगी मजकुराचा समावेश करण्यात आला आहे. सन २०१६-१७ या वर्षात प्रकाशित झालेल्या चारही अंकांची मिळून अनुक्रमणिकेसह एकूण ४५८ पाने झाली. वर्षभरात ज्या ज्या लेखकांचे योगदान अर्थसंवादला मिळाले त्या सर्व लेखकांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. संपादकपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सर्व माजी संपादकांनी आपल्या कार्यातून निर्माण केलेल्या आदर्श परंपरा कायम राखून बदलत्या काळानुसार विचारपूर्वक काही निर्णय घेतले. त्यानंतर बदल आणण्याचा प्रयत्न केला आहे.

१) कोणत्याही लेखकाचे एकापेक्षा जास्त लेख गेल्या पाच वर्षाप्रमाणेच या वर्षातसुध्दा अर्थसंवादमध्ये समाविष्ट केले नाहीत. त्यामुळे अर्थसंवादच्या इतिहासात सर्वाधिक लेखकांचा समावेश ३६ व्या खंडात होता ३७ व्या

खंडात नवीन उच्चांक आपण गाठू शकलो आहोत. ३८, ३९ व ४० व्या खंडात जास्तीत जास्त सभासदांना अर्थसंवादचे लेखक होण्याची संधी प्राप्त होण्यासाठी हा निर्णय घेतला. त्यासह शोधनिबंधाच्या पृष्ठसंख्येवर नियंत्रण आणल्याने समाधानकारक संख्येने लेख देऊन अंकाची गुणवत्ता वाढवण्याचा प्रयत्न देखील केला आहे. तसेच काही आर्थिक विषयांचे स्पष्टीकरणासाठी जास्त पृष्ठांची आवश्यकता लक्षात घेता या वर्षी त्यांना जास्त पृष्ठे उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे लेख व लेखक संख्येवर या वर्षी नियंत्रण आले आहे.

२) शहरी भागातील लेखकांबरोबरच ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण लिहिणाऱ्या लेखकांना तितकीच संधी अर्थसंवादच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.

३) प्रस्थापित लेखकांबरोबरच नवीन लेखकांना अधिक संधी देण्याचा प्रयत्न करताना महाराष्ट्राच्या सर्व भागातील, अगदी काना-कोपऱ्यातील लेखकांना अर्थसंवादच्या लेखकसूचीमध्ये आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

४) अर्थसंवादच्या माध्यमातून अर्थशास्त्रीय लेखन करणाऱ्या नवीन लेखकांची एक पिढी महाराष्ट्रातील इतर दैनिके, मासिके, साप्ताहिके, जर्नल्स यात लिहिण्यासाठी मराठी अर्थशास्त्र परिषदेने द्यावी म्हणून प्रयत्न केला.

५) अर्थसंवादचा प्रत्येक अंक उत्तरोत्तर उत्तम यावा, सुबक यावा यासाठी सातत्याने गुणवत्तावाढीचे प्रयत्न केले, प्रयत्न करणे सुरूच आहे.

६) गेल्या ५ वर्षांप्रमाणे या वर्षीसुध्दा प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ, मुखपृष्ठ व मलपृष्ठाच्या आतील पृष्ठे असे एकूण चार पृष्ठे रंगीत दिली आहेत.

७) मुखपृष्ठ व आतील पृष्ठांचा किफायतशीर खर्चात अधिकाधिक उत्तम दर्जा उपलब्ध करून देता यावा यासाठी प्रयत्न केले आहेत.

८) ज्या ज्या सन्माननीय आजीव सदस्यांना अर्थसंवादमध्ये शोधनिबंध प्रकाशित करण्याची इच्छा आहे, ज्यांनी योग्य त्या फॉण्टमध्ये गुणवत्तेचा शोधनिबंध पाठविला त्यांना अर्थसंवादमध्ये संधी देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गेल्या ३६ वर्षांच्या तुलनेत सर्वाधिक शोधनिबंध ३७ व्या खंडात प्रकाशित झाले आहेत. तर ३८ व्या, ३९ व्या तसेच ४०व्या खंडातही समाधानकारक संख्येने लेख प्रकाशित केले आहेत.

९) ४० व्या खंडात अर्थसंवादचे दोन विशेषांक प्रकाशित झाले. हे विशेषांक अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच पर्यटन या विषयांवर आधारित होते. लेखकांनी या विशेषांकांना उत्तम प्रतिसाद दिला.

१०) अंकाचे पाकीट पूर्वी परंपरेने खाकी रंगाच्या कागदाचे होते. सन्माननीय सभासदांपर्यंत पोहोचेपर्यंत बऱ्याच वेळा ते फाटत असे. अंक सर्वांपर्यंत सुरक्षित पोहोचावा यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकाप्रमाणे दर्जेदार प्लॅस्टिकचे पाकीट गेल्या ५ वर्षांप्रमाणे याही वर्षी चारही अंकांसाठी आपण वापरले.

११) अंकास आपण मशीनवरील परफेक्ट बाइंडिंग सर्व सहा वर्षात दिले आहेत. या बाइंडिंगमध्ये पीनचा वापर केला जात नाही.

१२) कागदाच्या किंमती गेल्या चार-पाच वर्षात खूपच वाढल्या आहेत. अशा महागाईच्या काळात देखील जळगाव येथील सातपुडा ऑफसेट लाठी परिवाराच्या सहकार्याने किफायतशीर किमतीत अंक तयार केले आहेत.

१३) मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मी महाविद्यालय व ग्रंथालयाच्या वर्गणी वाढीचा प्रस्ताव सादर केला होता. *अर्थसंवादची वार्षिक वर्गणी आधीच्या रु.६००/- वरून रु.१०००/- करावी, पंचवार्षिक वर्गणी आधीच्या रु.१०००/- यात वाढ करून रु.१५००/- करावी, तसेच वार्षिक वर्गणी स्वीकारणे बंद करावे* या प्रस्तावाला आजीव सदस्यांनी गेल्या ४ वर्षापूर्वी एकमताने मंजुरी दिली. त्यामुळे अर्थसंवादच्या चालू वर्षातील उत्पन्नात गेल्या ४ वर्षांप्रमाणे वाढ झाली आहे.

१४) अर्थसंवादच्या पृष्ठ संख्येचे नियोजन केल्याने संपूर्ण सहा वर्षातील अंकांमध्ये एकही पृष्ठ कोरे सोडलेले नाही.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी त्रैवार्षिक वर्गणीदार म्हणून महाविद्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. अर्थसंवाद आपापल्या महाविद्यालयात घेतला जाईल याकडे परिषदेच्या सर्व सदस्यांनी लक्ष दिल्यास वर्गणीदार महाविद्यालयांच्या संख्येत वाढ होऊन अर्थसंवादचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व सन्माननीय सभासदांनी आपापल्या परिसरातील एखादी पूर्ण पानाची जाहिरात उपलब्ध करुन दिल्यास अर्थसंवादची तूट कमी होण्यास निश्चितच मदत होईल. अर्थसंवाद त्रैमासिकाच्या प्रत्येक अंकाच्या सामान्यपणे १८४० प्रती छापल्या जात आहेत. आजीव सदस्य व वर्गणीदार यांच्या संख्येत सातत्याने वाढ होणे ही अर्थसंवादची जमेची बाजू आहे. चारही अंकांची अनुक्रमणिकेसह एकूण पृष्ठसंख्या ४५८ इतकी ठेवण्यात आली असून प्रत्येक अंक सामान्यपणे ११४ पृष्ठांच्या जवळपास ठेवण्याची परंपरा कायम राखली आहे. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात अर्थसंवादला जाहिरात मिळण्यासाठी चांदवड येथील श्री. नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित कर्मवीर केशवलालजी हरकचंदजी आबड कला, श्रीमान मोतीलालजी गिरधारीलालजी लोढा वाणिज्य व श्रीमान पी.एच.जैन विज्ञान महाविद्यालयातील स्थानिक कार्याध्यक्ष व प्राचार्य डॉ.जी.एच.जैन, स्थानिक कार्यवाह प्रा. सुरेश पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्वांचा परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळात विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी निवडले जातात. या प्रतिनिधींना जाहिरात पाठविण्याविषयी विनंती केली आहे. ४० व्या खंडातील चारही अंकांचा टपालसह एकूण खर्च रु.३५८९२९/- इतका झाला. गेल्या तीन-चार वर्षात कागदाच्या किमती खूपच वाढल्या आहेत. तरी देखील अर्थसंवादचा खर्च काटकसरीने केला आहे ही उल्लेखनीय बाब सभासदांच्या निदर्शनास आणू इच्छितो. अर्थसंवादच्या खर्चात या वर्षी थोडी वाढ झाली आहे. त्याची कारणे- १) आजीव सदस्य संख्या वाढली आहे. त्यामुळे अंकांची संख्या वाढली. २)या वर्षी सर्व अंक रंगीत आहेत. ३) सर्व अंकांच्या मुखपृष्ठास लॅमिनेशन केले आहे.

## अर्थसंवादची महत्त्वपूर्ण तौलनिक माहिती

| तपशिल | खंड ३५ २०११-१२ | खंड ३६ २०१२-१३ | खंड ३७ २०१३-१४ | खंड ३८ २०१४-१५ | खंड ३९ २०१५-१६ | खंड ४० २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ अंकातील एकूण लेख | ३१ | ६३ | ६५ | ५६ | ५८ | ५७ |
| ४ अंकातील एकूण लेखक | ५० | ७५ | ७७ | ७१ | ७२ | ६४ |
| ४ अंकाच्या एकूण प्रती | ६८६० | ७१४० | ७२२० | ७२७० | ७३०० | ७३५० |
| ४ अंकाची एकूण पृष्ठे | ४२२ | ४४२ | ४६२ | ४७२ | ४५८ | ४५८ |
| ४ अंकातील रंगीत अंक | ०३ | ०४ | ०४ | ०४ | ०४ | ०४ |
| ४ अंकाचा एकूण खर्च रु. (टपालखर्चासह) | २२५७७३ | २५९११८ | २९८५०० | ३१२४६८ | ३२४६२८ | ३५८९२९ |
| दर नगाचा सरासरी खर्च रु. (टपालखर्चासह) | ३२.९१ | ३६.३० | ४१.३४ | ४२.९८ | ४४.४६ | ४८.८३ |
| दर पानाचा सरासरी खर्च रु. (टपालखर्चासह) | ०.३१ | ०.३२ | ०.३५ | ०.३६ | ०.३८ | ०.४२ |
| जाहिराती पासून उत्पन्न रु. | ४३००० | ५५००० | ५५००० | ६३००० | २५००० | ४५००० |
| ४ अंकातील एकूण रंगीतपृष्ठे (कव्हरपृष्ठांसह) | १२ | २२ | ३२ | ३२ | ३२ | ४८ |

४)पर्यटन विशेषांकात रंगीत व एकूण पृष्ठसंख्या वाढली आहे. ५)अंक संख्या वाढल्याने पाकीट व पोस्टेज खर्चात वाढ झाली. ६) या वर्षीदेखिल चारही अंकांसाठी आंतरराष्ट्रीय नियतकालिकां प्रमाणेच प्लॅस्टीकचे पाकीट वापरले आहे. ७)अंकबिलामध्ये या वर्षातील व्हॅट(VAT)चा एकूण खर्च रु.१७९०५/- समाविष्ट आहे.

अर्थसंवादची तूट भरुन काढण्यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई यांचे योगदान मोलाचे असते. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेकडून अनुदानासाठी प्रयत्न सुरू आहेत. तर महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने २०१६-१७ साठी रु.४५०००/- अनुदान दिले आहे. दरवर्षी ही संस्था अनुदान देते. परिषदेच्या वतीने मी अत्यंत आभारी आहे.

भारतीय अर्थव्यवस्था व जागतिक अर्थव्यवस्थेत घडणाऱ्या विशेष महत्त्वाच्या घटनांविषयी चालू घडामोडींवर आधारित लेख देण्याची परंपरा कायम राखली. स्वतंत्र लेख, सैद्धांतिक लेख, तसेच शेती क्षेत्र, उद्योग क्षेत्र, जागतिकीकरण, सेवा क्षेत्र, बँकिंग क्षेत्र, सहकार क्षेत्र, रोजगार क्षेत्र, आदिवासी विकास, जल प्रकल्प, विमुद्रीकरण या विषयांवरील लेख अर्थसंवादमध्ये प्रकाशित करण्यात आले.

बऱ्याच वेळी ठरलेल्या फॉण्टमध्ये व पेजमेकरमध्ये टाईप करून लेख न येणे, पाकीटात सीडी तडा पडून प्राप्त होणे किंवा आलेली सीडी ओपन न होणे, लेख/मजकूर उशिरा प्राप्त होणे व सर्वात महत्त्वाचे म्हणजे विजेचे भारनियमन अशा कारणांनी अर्थसंवादचा अंक पूर्ण करताना समस्या आल्यात. आपण अर्थसंवादच्या प्रत्येक अंकात जाहिरात देतो त्या वेळेवर उपलब्ध होत नाहीत. त्याकरिता कार्यकारिणी सदस्य, सल्लागार मंडळ, आजीव सदस्य यांनी अर्थसंवादला सहकार्य

करण्याची गरज आहे. चांदवड येथे संपन्न झालेल्या चाळीसाव्या वार्षिक अधिवेशनात ५ नोव्हेंबर २०१६ रोजी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळाची बैठक संपन्न झाली. या प्रसंगी पदाधिकारी व सदस्यांनी अर्थसंवादचा दर्जा वाढविण्यासाठी मार्गदर्शनपर सूचना केल्या.

अर्थसंवादच्या ४० व्या खंडाची जडण घडण करण्यासाठी अनेकांनी मला मोलाची मदत केली. आदरणीय कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. अर्थसंवाद तयार करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी माझे गुरूवर्य प्रा.चारुदत्त गोखले यांनी वेळोवेळी सहकार्य केले. लेखक, जाहिरातदार, कार्यकारी मंडळ सदस्य, माजी अध्यक्ष डॉ. दि. व्यं. जहागीरदार, डॉ. ज. फा. पाटील, डॉ. विनायक देशपांडे, डॉ.मुक्ता जहागीरदार, डॉ.संतोष दास्ताने, डॉ.अ.रा.पडोशी, डॉ.दिलीप कदम, डॉ.सूर्यकांत जगदाळे, डॉ.श्रीराम जोशी, डॉ.जगन्नाथ पाटील, डॉ.मधुकर शिंदे, डॉ. के.के. पाटील, डॉ.सुहास आव्हाड, अध्यक्ष डॉ.शिवाजी भोसले, माजी कार्यवाह खजिनदार डॉ.अनिल सुर्यवंशी, कार्यवाह खजिनदार डॉ.आर.बी. भांडवलकर, विश्वस्त डॉ.अर्जुन महाडिक, विश्वस्त डॉ. विनायक भिसे, विश्वस्त डॉ.बालाजी शिंदे यांचे मार्गदर्शन मिळाले. डॉ.तुकाराम मुंडे (मानवत), डॉ.सुभाष गुर्जर(वरवट बकाल), डॉ. अशोक खाचणे(जळगाव), डॉ. महादेव पाटील (मीरज), हनुमंत नन्नवरे (अकलूज), डॉ.संजय धनवटे (कारंजा), डॉ. पांडुरंग कल्याणकर (फुलंब्री), डॉ. दिनकर मोरे(इस्लामपूर), डॉ.जीवन सोळंके (नाशिक), डॉ.राजेंद्र शिंदे(धुळे), डॉ.वामन सावंत(रत्नागिरी), डॉ.राहुल म्होपरे(कोल्हापूर), सुरेश ढाके (भुसावळ), सुरेश पाटील(चांदवड) या कार्यकारी मंडळ सदस्यांचे सहकार्य लाभले. प्रा.मो. स.भावे(जळगाव), डॉ.विलास खंदारे (औरंगाबाद), डॉ.रामचंद्र रसाळ(लोणी), डॉ. हरिहर तिवारी (शेंदूरजना), डॉ. अरुण तवार(परभणी), डॉ. रावसाहेब जाधव, डॉ.श्रीहरी मिसाळ, डॉ.वसंत पाटील(भुसावळ), डॉ. मोहन चौधरी(पुणे) डॉ. तानाजी गिते(पुणे), डॉ. प्रशांत काटोले (अमरावती), डॉ.रामकृष्ण टाले (नागपूर), विद्या पाटील(धुळे), डॉ.जयश्री सरोदे (भुसावळ), डॉ. संतोष कुटे (मेहकर) डॉ. संतोष कदम(सोलापूर), डॉ. सुरेश जगताप(अमरावती), डॉ.ए.डी.गोस्वामी(भुसावळ), प्रा. एस. एल. भालेराव (शहादा), डॉ. बालाजी सुरवसे (फोंडा), डॉ.संजय तुपे(नाशिक), डॉ.दिलीप पाटील (नंदुरबार), डॉ.जयवंत इंगळे, डॉ.के .बी.दिवटे, डॉ.आर. के. दातीर(नाशिक) यांचे सहकार्य लाभले. सर्व अंकांची कॉम्प्युटरमध्ये जडण घडण व प्रूफ रीडींग करणारे सुनील भांडारकर व सातपुडा ऑफसेटचे निलेश लाठी या मित्रांच्या सहकार्याशिवाय मी अंक आणूच शकलो नसतो. या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. अर्थसंवादचे सहाय्यक संपादक शंकर पवार, सल्लागार मंडळ सदस्य डॉ.तेजस्विनी मुडेकर, प्रा.अरुण पिसे, डॉ.राजेंद्र गव्हाळे, डॉ.विजय भोपाळे यांचा मी परिषदेच्या वतीने आभारी आहे. अर्थसंवाद पाकीटात टाकणे, पोस्टाची तिकिटे चिकटवणे या संदर्भात कु.ईशा लाठी व कु.नेहा लाठी यांनी उत्स्फूर्त सहकार्य दिल्याबद्दल मी त्यांचा देखील आभारी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील त्रैमासिक अर्थसंवाद अधिक दर्जेदार बनविण्यासाठी आपण सर्व जण यथाशक्ती योगदान देऊ या !

# अर्थसंवाद

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सन २०१६-१७ या वर्षात झालेले आजीव सभासद

| अ.क्र. | सभासदाचे नाव | आजीव सभासद क्र. |
|---|---|---|
| १ | विद्या सुपडू निकम, धुळे | १६८१ |
| २ | रामेश्वरी नरेश कमठम, जालना | १६८२ |
| ३ | संगिता भालचंद्र काटकर, चिपळूण | १६८३ |
| ४ | सोमनाथ वसंतराव पाटील, तळेगाव ढमढेरे | १६८४ |
| ५ | रोहिणी जयदिप भोईटे, पुणे | १६८५ |
| ६ | संगिता साहेबराव बोरसे, पुणे | १६८६ |
| ७ | वैशाली जयंत जोशी, नाशिक | १६८७ |
| ८ | मुकूंद रामदास दातीर, आकोट | १६८८ |
| ९ | आशिष सुधाकरराव निमकर, अमरावती | १६८९ |
| १० | दिलीपकुमार रंगनाथ बाड, पंढरपूर | १६९० |
| ११ | ईश्वर जनार्दन वाघ, मौदा, नागपूर | १६९१ |
| १२ | कमलेश भिमराज विसपुते, वरूळ, नाशिक | १६९२ |
| १३ | गणेश सदाशिवराव मायवाडे, नागपूर | १६९३ |
| १४ | निलेश वसंतराव घोरपडे, वर्धा | १६९४ |
| १५ | सुनिल अण्णा गोरडे, कन्नड, औरंगाबाद | १६९५ |
| १६ | सुनिल छगनराव पाटील, पारोळा, जळगाव | १६९६ |
| १७ | राम नारायण गोसावी, पनवेल, नवी मुंबई | १६९७ |
| १८ | अरुण पांडुरंग चांदूरकर, दर्यापूर, अमरावती | १६९८ |
| १९ | प्रभाकर विलासराव शिंदे, वाघोली, सातारा | १६९९ |
| २० | शाहुराज व्यंकटराव गायकवाड, सांगली | १७०० |
| २१ | बसवराज फत्तेसिंह भुसे, अक्कलकोट | १७०१ |
| २२ | रामचंद्र नामदेव जाधव, चांदवड, नाशिक | १७०२ |
| २३ | सुभाष संपतराव सावंत, नाशिक | १७०३ |
| २४ | योगेश झुलाल भामरे, मेहेरगाव, धुळे | १७०४ |
| २५ | रामेश्वर आण्णासाहेब तांबे,पैठण,औरंगाबाद | १७०५ |
| २६ | राजेंद्र शंकर शहाणे, नाशिक | १७०६ |
| २७ | गणेश बी. पोटे, पाथर्डी, अहमदनगर | १७०७ |
| २८ | प्रसन्ना खडकीकर, हैदराबाद | १७०८ |

## मराठी अर्थशास्त्र परिषद

### मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास रु.११,०००/- व शाल,श्रीफळ,साडी,सन्मानचिन्ह, मानचिन्ह देण्यात येते. १ जाने. २०१६ ते ३१ डिसें.२०१६ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथाच्या महिला लेखिकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे त्वरीत पाठवाव्यात.

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रसिध्द सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय ग्रंथास रु.१,०००/- चे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १/१/२०१६ ते ३१/१२/२०१६ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३१ ऑगस्ट २०१७ पर्यंत पाठवाव्यात.

### डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्य पातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रांसाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिध्द झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार रु.१०००/- चा व द्वितीय पुरस्कार रु.५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी २०१६ ते ३१ डिसेंबर २०१६ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त तीन लेख पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिध्द झालेले लेख, वृत्तपत्राचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करुन ३१ ऑगस्ट २०१७ पूर्वी डॉ. रामदास भांडवलकर, कार्यवाह, म.अ.प., गजानन नगर, पिंपळगावरोड, यवतमाळ - ४४५ ००१ (भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६) यांच्याकडे पाठवावेत. २०१७ च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील.

- डॉ. रामदास भांडवलकर, कार्यवाह-खजिनदार

### प्रा. नी. वि. सोवनी व्याख्यानमाला : २०१६-१७

| देणगीदाराचे नाव | पावती क्र. | रक्कम रु. |
|---|---|---|
| प्रा. बी. एस. खुरद | २७९ | ४००० |
| प्रा. कैलास पाटील | २८० | ५०० |
| डॉ.तेजस्विनी मुडेकर | २८१ | १००० |
| डॉ. संजय तुपे | २८२ | १००० |
| डॉ. कृष्णा शहाणे | २८३ | ५०० |
| डॉ.प्रशांत हरमकर | २८४ | ५०० |
| डॉ.विश्वजित कदम | २८५ | १००० |

# अर्थसंवाद

## अर्थसंवाद (खंड ४०, २०१६-१७)

(अ) लेख सूची:



| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद | ३ - १४ |
| २ | जल व्यवस्थापनातील डॉ. आंबेडकरांचे योगदान | १५ - २० |
| ३ | डॉ.आंबेडकर: एक निष्णात अर्थतज्ज्ञ | २१ - २५ |
| ४ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर-एक अर्थतज्ज्ञ | २६ - ३२ |
| ५ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर - एक अर्थशास्त्रज्ञ | ३३ - ३८ |
| ६ | अनंत पैलूंचा अर्थशास्त्रज्ञ: डॉ.बाबासाहेब आंबेडकर | ३९ - ४४ |
| ७ | रुपयाच्या प्रश्नाविषयी डॉ.आंबेडकरांचा प्रासंगिक दृष्टिकोन | ४५ - ५० |
| ८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार | ५१ - ५६ |
| ९ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा आढावा | ५७ - ६१ |
| १० | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कृषिविषयक विचार | ६२ - ६६ |
| ११ | अर्थतज्ज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार | ६७ - ७१ |
| १२ | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक विचारक्रांती | ७२ - ७६ |
| १३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार | ७७ - ८४ |
| १४ | महिला सक्षमीकरणात डॉ.आंबेडकरांचे योगदान | ८५ - ९० |
| १५ | मानवी हक्क आणि सहकारी चळवळ | ११३-११९ |
| १६ | बंदरांच्या विकासाचे बळी | १२०-१२६ |
| १७ | डॉ.अमर्त्य सेन यांचे आर्थिक सामाजिक विचार | १२७-१३२ |
| १८ | एकच कर - वस्तू व सेवा कर | १३३-१३८ |
| १९ | ठाणे जिल्ह्यातील बचतगटांचा प्रभाव | १३९-१४३ |
| २० | नाशिक जिल्ह्यातील साखर उद्योगाची रोजगार निर्मिती | १४४-१४९ |
| २१ | भारतातील गरीब कुटुंबातील बालकांच्या समस्या | १५०-१६३ |
| २२ | जलयुक्त शिवार अभियान:शाश्वत सिंचन धोरण | १६४-१६९ |
| २३ | वस्तू आणि सेवा कराचे स्वरुप व परिणाम | १७०-१७४ |
| २४ | दारिद्र्य आणि सर्वसमावेशक वृद्धी | १७५-१८१ |
| २५ | राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची कार्यप्रणाली | १८२-१९० |
| २६ | शेतकऱ्यांची आत्महत्या: एक समस्या | १९१-१९७ |
| २७ | मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे व उपाय | १९८-२०३ |
| २८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार | २०४-२०९ |

## अर्थसंवाद



| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | भारताच्या सामाजिक प्रगतीची सद्यस्थिती | २१९-२२५ |
| ३० | ग्रीन बँकींग: संकल्पना व उपयोजन | २२६-२३३ |
| ३१ | आर्थिक सुधारणांची पंचविशी-एक सिंहावलोकन | २३४-२४१ |
| ३२ | काळा पैसा आणि नोटांचे विमुद्रीकरण | २४२-२४७ |
| ३३ | सरदार वल्लभभाई पटेल यांचे आर्थिक विचार | २४८-२५३ |
| ३४ | जागतिकीकरणाचे परिणाम व आव्हाने | २५४-२६१ |
| ३५ | कायदेशीर नोटा रद्द: विविध आर्थिक स्तरांचे अनुभव | २६२-२६५ |
| ३६ | ग्रामीण महिला सक्षमीकरण व जीवनोन्नती अभियान | २६६-२७१ |
| ३७ | सोलापूर जिल्ह्यातील कापूस उत्पादकतेतील कल | २७२-२७९ |
| ३८ | काळा पैसा आणि पायाभूत सुविधांचा विकास | २८०-२८७ |
| ३९ | महाराष्ट्रातील कामकरी लोकसंख्या | २८८-२९५ |
| ४० | ७३व्या घटनादुरुस्ती अंतर्गत वित्तीय स्वायत्तता | २९६-३०३ |
| ४१ | शेतीक्षेत्रातील मजुरांचा तुटवडा | ३०४-३०८ |
| ४२ | अर्थव्यवस्थेतील उर्जास्रोत: उत्पादन व उपभोग | ३०९-३१६ |
| ४३ | महाराष्ट्रातील जलसिंचन:एक चिंतन | ३२७-३४० |
| ४४ | ई-पर्यटन | ३४१-३४६ |
| ४५ | महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसाय: संधी व भवितव्य | ३४७-३५० |
| ४६ | पर्यावरणीय पर्यटनाचा अर्थकारणावरील परिणाम | ३५१-३५६ |
| ४७ | कृषी पर्यटनाचा इतिहास व विकास | ३५७-३६० |
| ४८ | वाढत्या पर्यटनक्षेत्रात रोजगार संधी | ३६१-३६५ |
| ४९ | पर्यटन विकासासाठी भारताचे धोरण: एक आढावा | ३६६-३७० |
| ५० | कोल्हापूर जिल्हा: आर्थिक पर्यटनाची पंढरी | ३७१-३७६ |
| ५१ | पर्यटनाचा अर्थव्यवस्थेवर परिणाम | ३७७-३८० |
| ५२ | कृषि पर्यटन: ग्रामीण जीवनाचा आधार | ३८१-३८६ |
| ५३ | पर्यटन आणि रोजगार निर्मिती | ३८७-३९० |
| ५४ | पर्यटनक्षेत्र व भारतीय अर्थव्यवस्था | ३९१-३९५ |
| ५५ | कृषीपर्यटनातून ग्रामीण विकास | ३९६-४०० |
| ५६ | कृषी पर्यटन-काळाची गरज | ४०१-४०७ |
| ५७ | विदेशी पर्यटकांची राज्यनिहाय स्थिती | ४११-४१६ |

# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **४० वे राष्ट्रीय अधिवेशन** | |
| | **सूत्रसंचालकाचे टीपण** | |
| १ | प्रा. नी. वि. सोवनी यांचे आर्थिक विचार | ४१७ |
| २ | आर्थिक सुधारणा व भारतीय शेती | ४१९ |
| ३ | महाराष्ट्रातील दुष्काळ निवारणासंदर्भातील शासनाची भूमिका | ४२१ |
| | **४१ वे राष्ट्रीय अधिवेशन** | |
| | **निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा** | |
| १ | रिकार्डो यांचे आर्थिक सिध्दांत | ४२३ |
| २ | भारतातील करव्यवस्थेतील बदलांचा चिकित्सक अभ्यास | ४२५ |
| ३ | महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतदादा पाटील यांचे योगदान | ४२७ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | सूक्ष्म वित्ताचा सुबोध परिचय | ३१७ |
| २ | स्पर्धा परिक्षा: अर्थशास्त्र | ४०७ |
| | **श्रध्दांजली** | |
| १ | गोविंद तळवलकरांना विनम्र श्रध्दांजली | ३२५ |

# अर्थसंवाद (खंड ४०, २०१६-१७)

## (ब) लेखक सूची:



| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | विजय कविमंडन, नागपूर | ३ - १४ |
| २ | माधव गायकवाड, औरंगाबाद | १५ - २० |
| ३ | उमेश घोडेस्वार, अकोला | २१ - २५ |
| ४ | माधुरी लेले, नागपूर | २६ - ३२ |
| ५ | संतोष ताडे, मोरेश्वर नन्नावरे, आकोट | ३३ - ३८ |
| ६ | महादेव रिठे, बुलढाणा | ३९ - ४४ |
| ७ | नितीन चौधरी, अकोला | ४५ - ५० |
| ८ | शकुंतला पाटील, इचलकरंजी | ५१ - ५६ |
| ९ | दिनकर मोरे, इस्लामपूर | ५७ - ६१ |
| १० | दीपक भुसारे, पैठण | ६२ - ६६ |
| ११ | सुमित्रा पवार, भुसावळ | ६७ - ७१ |
| १२ | सुभाष गुर्जर, वरवट बकाल | ७२ - ७६ |
| १३ | यल्लप्पा पुजारी, सोलापूर | ७७ - ८४ |
| १४ | सुषमा मंडले, लातूर | ८५ - ९० |
| १५ | नारायण टाक, नसरापूर | ११३-११९ |
| १६ | अविनाश कुलकर्णी, पुणे | १२०-१२६ |
| १७ | भिमराव उगले, बीड | १२७-१३२ |
| १८ | सुरेश पाटील, जळगाव | १३३-१३८ |
| १९ | श्रीराम जोशी, जळगाव, स्नेहल देशमुख,मुंबई | १३९-१४३ |
| २० | साधना पाटील, नाशिक | १४४-१४९ |
| २१ | जयवंत इंगळे, विटा | १५०-१६३ |
| २२ | साहेबराव माळोदे, पिंपळगाव (ब.) | १६४-१६९ |
| २३ | सीमा चव्हाण, श्रीरामपूर | १७०-१७४ |
| २४ | हिरालाल चव्हाण,जळगाव,मुरलीधर गायकवाड,मुरुडजंजिरा | १७५-१८१ |
| २५ | मधुकर अनंतकवळस, सातारा | १८२-१९० |
| २६ | जयश्री भंगाळे, भुसावळ | १९१-१९७ |
| २७ | सुरेश घुमटकर, बीड | १९८-२०३ |
| २८ | दीपक शेलार, चिंचणी | २०४-२०९ |

# अर्थसंवाद

| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| २९ | एस. के. ढगे, पुणे | २१९-२२५ |
| ३० | युगंधरा एस. टोपरे, औरंगाबाद | २२६-२३३ |
| ३१ | सुभाष पाटील, पुणे | २३४-२४१ |
| ३२ | रामदास भांडवलकर, यवतमाळ | २४२-२४७ |
| ३३ | निता वाणी, रावेर | २४८-२५३ |
| ३४ | सुरेखा फाकडे, पेठ-वडगाव | २५४-२६१ |
| ३५ | वैशाली जोशी, नाशिक | २६२-२६५ |
| ३६ | आशिष निमकर, अमरावती | २६६-२७१ |
| ३७ | संतोष कदम, श्रीकांत होटकर, सोलापूर | २७२-२७९ |
| ३८ | कृष्णा शहाणे, नाशिक | २८०-२८७ |
| ३९ | रामेश्वर तांबे, धनश्री महाजन, औरंगाबाद | २८८-२९५ |
| ४० | माधव शिंदे, गणेश पोटे, अहमदनगर | २९६-३०३ |
| ४१ | मनिषा चौधरी, जामनेर | ३०४-३०८ |
| ४२ | रमेश भालेराव, परभणी | ३०९-३१६ |
| ४३ | शिवाजी भोसले, सातारा | ३२७-३४० |
| ४४ | विरेंद्र वडेर, कोल्हापूर | ३४१-३४६ |
| ४५ | सोमनाथ पाटील, तळेगाव ढमढेरे | ३४७-३५० |
| ४६ | शशिकांत आंडगे, मोहोळ | ३५१-३५६ |
| ४७ | बबन भापकर, वालचंदनगर, महंमद मुलाणी,बारामती, | ३५७-३६० |
| ४८ | दिलीप महाजन, चिखली, राजेंद्र गव्हाळे,खामगाव | ३६१-३६५ |
| ४९ | तानाजी गिते, राजगुरूनगर | ३६६-३७० |
| ५० | रामलिंग नाळे, सरुड | ३७१-३७६ |
| ५१ | मनिषा चौधरी, शिरपूर | ३७७-३८० |
| ५२ | अरूण तवार, परभणी | ३८१-३८६ |
| ५३ | सुभाष भालेराव, शहादा | ३८७-३९० |
| ५४ | रमजान मुजावर, पेण | ३९१-३९५ |
| ५५ | शिवाजी पाते, परभणी | ३९६-४०० |
| ५६ | सुरेश जगताप, अमरावती | ४०१-४०७ |
| ५७ | पांडुरंग कल्याणकर, फुलंब्री | ४११-४१६ |

# अर्थसंवाद



| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **४० वे राष्ट्रीय अधिवेशन** | |
| | **सूत्रसंचालकाचे टीपण** | |
| १ | ज. फा. पाटील, कोल्हापूर | ४१७ |
| २ | जयवंत भदाणे | ४१९ |
| ३ | तेजस्विनी मुडेकर | ४२१ |
| | **४१ वे राष्ट्रीय अधिवेशन** | |
| | **निबंध लेखकांच्या मार्गदर्शनासाठी विषयाची रूपरेषा** | |
| १ | विनायक श्रीधर देशपांडे, नागपूर | ४२३ |
| २ | संजय निवृत्ती तुपे, नाशिक | ४२५ |
| ३ | मधुकर शिंदे, इस्लामपूर | ४२७ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १ | मंजुषा मुसमाडे, पुणे | ३१७ |
| २ | जयश्री उपाध्ये, पुणे | ४०७ |
| | **श्रध्दांजली-लेखक** | |
| १ | चारुदत्त गोखले, जळगाव | ३२५ |



**अर्थसंवाद अंकाचा तपशील: खंड ४०**

| क्र. | अंक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १ | एप्रिल-जून २०१६ | ११० |
| २ | जुलै-सप्टेंबर २०१६ | १०६ |
| ३ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१६ | १०६ |
| ४ | जानेवारी-मार्च २०१७ | १२८ |

## ‘अर्थसंवाद’ या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

(फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | |
|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : मराठी अर्थशास्त्र परिषद,<br>द्वारा/डॉ.रामदास भांडवलकर,<br>गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| २. नियतकाल | : त्रैमासिक. |
| ३. मुद्रकाचे नाव | : डॉ.रामदास भांडवलकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : गजानन नगर, पिंपळगावरोड,<br>यवतमाळ - ४४५ ००१. |
| ४. मुद्रण स्थळ | : सातपुडा ऑफसेट, एमआयडीसी एरिया,<br>जळगाव |
| ५. प्रकाशकाचे नाव | : बाब क्र.३ प्रमाणे |
| ६. संपादकाचे नाव | : डॉ.अविनाश रामलाल निकम |
| ७. राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : मातृपितृ कृपा, प्लॉट नं.३०, परिमल<br>कॉलनी, यशवंत क्लासेसच्या मागे,<br>शहादा-४२५ ४०९, जिल्हा - नंदुरबार. |
| ८. मालकाचे नाव | : मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा:सेंटर फॉर दी<br>स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम्.एन्.रॉय<br>ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र.६,<br>एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूल<br>जवळ, सरकारी वसाहत इमारत क्र.३२३<br>समोर, वांद्रे (पूर्व),<br>मुंबई-४०० ०५१. |

मी रामदास भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

डॉ.रामदास भांडवलकर,
मुद्रक व प्रकाशक

७३

वर्षांची परंपरा असलेली

## सात दशकांपासून अविरत, अविश्रांत सेवा...

ESTD. 1945

मू. जे. महाविद्यालय.

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय

इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँण्ड रिसर्च.

एस.एस. मणियार लॉ कॉलेज

समवाय एव साधुः

शिक्षणशास्त्र महाविद्यालय

अध्यापक विद्यालय

कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँण्ड आय.टी.

ए.टी. झांबरे विद्यालय

Let the Light Shine

ओरिऑन सीबीएसई इंग्लिश मिडियम स्कूल

Let the Light Shine

ओरिऑन इंग्लिश मिडियम स्कूल

किलबील बालक मंदीर

KCES's Ojaswini College of Fine Art

ओजस्विनी कला महाविद्यालय

ओजस्विनी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँन्ड डिझाईन

इन्स्टिट्यूट ऑफ मल्टीमिडिया, प्रिंटींग टेक्नॉलॉजी

जलश्री पाणलोट सर्वेक्षण व संशोधन संस्था.

पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अँड रिसर्च

ज्ञानज्योत इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पिटेटीव्ह एक्सलन्स

एकलव्य शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय.

K.C.E. Society's SPARK design & print services

स्पार्क डिझाईन अँण्ड प्रिन्ट सर्व्हिसेस

ViViDhaTa Research & Training Center

विविधता संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र.

ESTD : 1944

एकलव्य क्रीडा संकुल

एकलव्य क्रीडा संकुल.

# खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव

एम. जे. कॉलेज परिसर, जळगाव - ४२५००१ फोन/फॅक्स : ०२५७-२२३९८००
वेबसाईट - www.kces.in | ईमेल - kcesociety@gmail.com

## प्रज्ञावंत नंदकुमार जी. बेंडाळे

अध्यक्ष आणि सन्माननीय व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व के.सी.ई. परिवार, जळगाव

SPARK-2251918

केसीई... एक प्रगल्भ शैक्षणिक चळवळ...

(जाहिरात सहकार्य : प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष, म.अ.प.)




(जाहिरात सहकार्य : प्रा. चारुदत्त गोखले, कार्याध्यक्ष, म.अ.प.)

Registration No.31918/77 अर्थसंवाद, मार्च २०१७/खंड ४०, अंक ४, मूल्य रु.२०